स०१९८५८
म. ग्रं. सं. ठाणे
विषय इतिहास
सं. क्र. ७९२

# मुरुड

## ऐतिहासिक आणि सांस्कृतिक

लेखक

वामन रामचंद्र गानू

REFBK-0021689

शतायुषी अण्णासाहेब कर्वे गौरव समिति मुरुड ( हर्णै )

सन १९५८ २१६८९
इतिहास
वि० क्र. ७९२

# मुरूड

## ऐतिहासिक आणि सांस्कृतिक

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थलप्रत
अ. क्र. ३९२४२ वि: इतिहास
७९२ नों: दि २१।१२।५८
७९२ इतिहास
२१६८९
REFBK-0021689

लेखक : वामन रामचंद्र गानू
प्रस्तावना ले. : य. न. केळकर

किंमत २ रुपये ]
[ १९५८

पुस्तक मिळण्याचें ठिकाण :–

(१) शतायुषी अण्णासाहेब कर्वे गौरव समिति,
बोमन चेंबर्स, २७/३३ मेडोज स्ट्रीट,
फोर्ट मुंबई १.

(२) वा. रा. गानू,
२६ बिरादर मन्झिल,
मुंबई १४.

सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन

प्रकाशक:– शतायुषी अण्णासाहेब कर्वे गौरव समिति मुरुड (हर्णै)
मुद्रक:– मधुकर शंकर साठे, दि प्राज्ञप्रेस, वाई जि. उ. सातारा,

ती. स्व. अण्णा,

दधिची मुनींचें स्मरण देणारें जीवन जगत आहांत. उभ्या भारतानें तुम्हांला अभिवादन केलें अशा या वैभवांतहि मुरूडवरील तुमचें प्रेम बालपणांत होतें तेंच आजहि आहे.

मुरूडची ही छोटी जीवनकथा अन्य कोणाला अर्पण करणार ?

— वा. रा. गानू

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| | पुरस्कार | १— ३ |
| | निवेदन | १— ७ |
| | प्रस्तावना | १— ६ |
| प्रकरण | १ लें : पूर्वपीठिका | १— ७ |
| ,, | २ रें : सिद्धपुरुष | ८— १५ |
| ,, | ३ रें : वसाहत | १६— २२ |
| ,, | ४ थें . कांहीं कर्तबगार व्यक्ति | २३— ३० |
| ,, | ५ वें : वैशंपायन | ३१— ३७ |
| ,, | ६ वें : हिरे प्रकरण | ३८— ४४ |
| ,, | ७ वें : श्री दुर्गादेवी व इतर देवळें | ४५— ५२ |
| ,, | ८ वें : सुरस कथा व दंतकथा | ५३— ५९ |
| ,, | ९ वें : सामाजिक जीवन | ६०— ७२ |
| ,, | १० वें : कालचें मुरुड | ७३— ८२ |
| ,, | ११ वें : बोलके आंकडे | ८३— ८९ |
| ,, | १२ वें : जमाती व संस्था | ९०— ९६ |
| ,, | १३ वें : शिक्षण आणि कला | ९७—१०२ |
| ,, | १४ वें : मी आणि मुरुड | १०३—११४ |
| | उपसंहार | ११५—११६ |
| | मुरुड शकावलि | ११७—१२२ |
| | कर्वे शकावलि | १२२—१२४ |
| | परिचय | १२५—१६७ |
| | परिशिष्ट | १— ३४ |

भारतरत्न अण्णासाहेब कर्वे



मुरुड हा माझा गांव. ह्या गांवा विषयी
मला नेहमीच अतिशय प्रेम वाटत आले आहे.
मुरुड मध्ये संस्था निर्माण झालेली संघटना व चैतन्य
असेच वाढत जावो अशी माझी इच्छा व हाच माझा
आशीर्वाद.

धोंडो केशव कर्वे
१८-४-५८



कै. शं. बा. दीक्षित

जन्म

२१ जुलै १८५३ ]

मृत्यु

[ २७ एप्रिल १८९८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनु. — वि.
क्रमांक नों. दि.

# पुरस्कार

शतायुषी अण्णासाहेब कर्वे गौरव-समितीनें ज्या विविध योजनाचा संकल्प सोडला त्या सर्व आपापल्या परीनें महत्त्वाच्या आहेतच; पण 'मुरूड-ऐतिहासिक आणि सांस्कृतिक' या पुस्तकाचें प्रकाशन अनेक दृष्टींनीं अपूर्व आहे.

सजीव वस्तुसारखीच गावची अवस्था असते. रागत, पडत तो लहानाचा मोठा होतो. त्याची प्रकृति नेहमींच सुदृढ असते असें नाहीं. त्याला रोग होतात. साथीच्या रोगानें लोक बेजार झाले कीं गांव ओसाड पडतो. ऐतिहासिक काळात लुटारूंचे हल्ले हा एक जबरदस्त रोग होता आणखी एक रोग संभवतो तो म्हणजे गावाची एकसुरी वाढ. गाव अमाप धनसंचय करीत असेल; पण त्याचवेळीं त्याचा सांस्कृतिक ऱ्हास होत असेल. भौतिक आणि सांस्कृतिक उत्कर्ष हेंच लोकसमूहाच्या निरोगी विकासाचें लक्षण. गावाच्या रोगटपणाचें आणखी एक लक्षण म्हणजे सामाजिक जीवनातील अन्यायाचें अस्तित्व. सामाजिक, आर्थिक, धार्मिक, जातीय अशा अनेक अंगांतून तो आपलें डोकें वर काढीत असतो. ती. स्व. अण्णासारखे सत्वशील थोर पुरुष कार्यप्रवण होतात ते या अन्यायाचें दर्शन होताच. ते दंड थोपटून उभे राहतात. समाज त्याना बहिष्कृत करतो. पण ते डरत नाहींत. हटत नाहींत. अन्यायाला नेस्तनाबूत केल्याशिवाय लोकाना निरोगी जीवनाचा लाभ होणार नाहीं हें ते जाणून असतात.

मुरूडनेंहि गेल्या ४-५ शें वर्षांत विकासाच्या विविध अवस्था अनुभवल्या. सिद्धपुरुषानें ग्रामस्थापना केली त्यानंतर अनेक जाती मुरूडला स्थायिक झाल्या. कालांतरानें त्यांतील कांहीं निघून गेल्या. त्यांच्या जागीं नवीन आल्या. भालेराई ( हल्ले ) झाल्या. भीतीनें लोक गाव सोडून गेले. सारें शांत झाल्यावर परत आले. दुष्काळ पडले. गाव निर्धन झाला. पुन्हा सावरला. देवानें दिलें. सिद्धपुरुषानें हेरलें हेतू एक : लेकरांनीं निर्वेध उपभोग घ्यावा; पण

चार माणसें एकत्र आलीं कीं त्यानीं आपापसात भाडावें हें अपरिहार्य असतें. मुरूडचीं लेकरेंहि आपापसात भाडलीं, मानापानावरून, जातीवरून, आर्थिक लोभानें.

पण मुरूड मात्र सिद्धपुरुषाच्या वेळीं होतें तियेंच आजहि आहे. लगडत, रखडत का होईना आंसव नदी अजून वाहते आहे. कोणीहि हेवा करावा असा मुरुडचा बदर किनारा सिद्धपुरुषाच्या वेळीं होता तसाच आज आहे. हर्णैचा दीपस्तभ नसेल. सुवर्णदुर्ग नसेल; पण हर्णैची वसाहत होतीच.

अन्य ठिकाणाप्रमाणेंच पहिल्या काळात मुरूडचा बहुजनसमाज निद्रिस्त होता. कालातरानें त्याला जाग येऊ लागली. तो श्वासोच्छ्वास करू लागला. ती. स्व. अण्णासारखा सत्पुरुष त्याना हात देऊ लागला. काळाचा झपाटा प्रतिदिनीं वाढत आहे आणि आशा वाटते कीं नजिकच्या काळात मुरूड एकात्म होईल, आपण सारीं या सुदर गावाचीं लेकरें आहोत या भावनेनें मुरूडकर जीवन जगू लागतील, परस्पराच्या सुखदु:खात सहभागी होतील. यापुढें मुरूडला यष्टीकडून समष्टीकडे वाटचाल करायची आहे. ती. स्व. अण्णांचा यथार्थ गौरव तेव्हाच होणार आहे. आमच्या समितीचे सर्व सकल्प या रोखानें योजिलेले आहेत.

असा हा इतिहास शब्दरूपानें साकार करणें किती अवघड आहे हें सागायला नको. श्री. गानूच्या पुढें अनेक अडचणी उभ्या होत्या. नित्याचे व्यवसाय साभाळून लेखन करायचें. मुबईहून मुरूडची माहिती मिळविणें म्हणजे उटावरून शेळया हाकण्यासारखें. वेळात वेळ काढून एक-दोन वेळा मुरूडला ते स्वत: जाऊन आले. ग्रामस्थानींहि त्याना तत्परतेनें साहाय्य केलें, तरी सर्व अडचणींचें, शकाचें निराकरण होणें शक्य नव्हतें.

मुळात जे कागदपत्र उपलब्ध होते ते फक्त ब्राह्मण जातीचे. या वस्तुस्थिती-मुळें श्री. गानू प्रथमपासून नाराज होते. गावातील प्रत्येक जातीची सर्वांगीण माहिती मिळविण्याची त्याची इच्छा होती. ह्या विविध जाती मुरूडला कशा आल्या, कोठून आल्या, का आल्या ? अन्य जातीयाशीं त्याचे सबंध

काय होते ? गतकाळात या जातींत कोणतीं विविध स्थित्यतरें झालीं ? व सास्कृतिक आणि अन्यक्षेत्रात त्यानीं मुरूडला आणि पर्यायानें महाराष्ट्राला काय दिलें–हा सारा इतिहास प्रस्तुत पुस्तकात यावा अशी त्याची इच्छा होती त्या ईर्षेनें गेलें एक वर्ष ते खपत होते.

वस्तुतः पहिल्या स्वराज्यात मराठे, भडारी, आदि क्षात्रवृत्तीच्या जातींनीं मोठे पराक्रम गाजविले. मुरूडकरानीहि आपलें रक्त या यज्ञात साडलेलें असणार.

काळाच्या सर्वभक्षक वाटचालींत हें धन आपण गमावलें आहे

पण नाउमेद न होता श्री. गानूंनीं प्राप्त परिस्थितींत जें शक्य होतें तें केलें. मराठी साहित्यात शोधावा लागेल असा हा प्रयत्न आहे मुरुडचें गेल्या चार–पाचशें वर्षांचें हें चरित्र लिहून श्री. गानूंनीं मुरूडची मोठी सेवा केली आहे प्रत्येक मुरूडकर त्याना धन्यवाद देईल याविषयीं आम्हास शका नाहीं.

समितीच्या वतीनें मीहि त्याचे मन.पूर्वक आभार मानतों, कारण या सत्कार्यांत सहभागी होण्याला त्यानीं आम्हाला सधि दिली.

श. दा. मोरे

अध्यक्ष, शतायुषी, अण्णासाहेब कर्वे गौरव समिति,

मुरुड ( हर्णै )

# निवेदन

मुरूडचें वैशंपायन घराणें हें माझें आजोळ. लहानपणापासून या घरानें माझ्यावर कसले तरी खोल संस्कार केले आहेत. त्यापैकींच एकाचें दृश्य स्वरूप म्हणजे हें पुस्तक होय. तेथील फळीवरील पोथ्यांचीं बांधलेलीं बाडें माझें लक्ष वेधून घेत. तीं बाडें आपण एकदां चाळावींत असें कित्येकदा माझ्या मनात येई. फार वर्षांपूर्वीं पोथ्यांच्या पानांत दडलेलीं काहीं जुनीं पत्रें माझ्या वाचनात आलीं. आंग्रे सरदारांसंबधीं काहीं तरी ते कागद होते एवढें आठवतें! कुतूहल जागृत झाल तरी ते कागद पाहण्याचा योग अनेक वर्षें आला नाहीं.

दोन वर्षांपूर्वीं मुरुड येथें गेलों होतों. प्रसिद्ध इतिहाससंशोधक श्री. शा. वि. आवळसकरहि गेले होते. त्यांच्या मदतीनें वैशंपायनांकडचीं बाडें पुन्हा एकदां चाळूं लागलों. महाराष्ट्राच्या इतिहासाला उपयुक्त असे कागद फारसे मिळाले नाहींत. पण मुरूडच्या संबधीं मात्र अनेक होते. त्या वेळेस मुरूडचा इतिहास लिहिण्याचीं सूचना श्री. आवळसकर यांनीं मला केली होती. ती सूचना त्या वेळेस तरी मला फारशी आकर्षक वाटली नव्हती, मात्र त्या बाडातून महत्त्वाचे वाटणारे कागद– त्यातच मुरूडच्या दोन बखरी होत्या– मी मुंबईला घेऊन आलों. मधून मधून ते कागद चाळीत असे. पण अजूनहि मुरूडच्या इतिहासाची कल्पना मूळ धरीत नव्हती.

गेल्या वर्षीं मार्च महिन्यांत शतायुषी अण्णासाहेब कर्वे गौरव-समिति स्थापन झाली. मे महिन्यांत हे कागद चाळीत असतां मुरुड गावावर दोन चार लेख लिहिता येण्याइतका मजकूर आहे असें मी सहज माझे मित्र श्री. श्री. ना. पेंडसे यांच्याजवळ बोललों. त्यांना ती कल्पना फार आवडली. पण तिचें स्वरू-

पच त्यांनीं पालटून टाकलें, मुरूडचा साद्यंत इतिहासच पुस्तकरूपानें का प्रसिद्ध करूं नये ? मुरुड संबंधीच्या अनेक योजना गौरव-समितीनें हातीं घेतल्या आहेत त्यात या योजनेचा अंतर्भाव इष्टच नव्हे तर कर्तव्यच ठरेल. मुरूडवर नितान्त प्रेम करणाऱ्या अण्णासाहेबाना तर अतिशय आनंद होईल. शिवाय ज्या मुरुड ग्रामस्थानीं किमान महाराष्ट्राच्या इतिहासात स्वत:पुरता एक अभिमानास्पद कोंपरा निर्माण केला आहे त्याचेहि कांहीं अंशीं उतराई झाल्यासारखें होईल !

अशा रीतीनें गेल्या मे महिन्यात या पुस्तकाचा संकल्प सोडला. पण या कामात मी पूर्णतः अनभ्यस्त. मराठी शाळा सुटली तेव्हाच मोडी वाचन सुटलें होतें. सुरुवात झाली ती मोडी वाचनाच्या अडचणींपासून. त्यात प्रगति होते आहे तोंच 'मोख्तसर,' 'गयाळ' 'सानक' यासारख्या अपरिचित शब्दांचे खडक. त्यातूनहि पुढें जावें तों 'सलासीन,' 'मया' व 'अलफ' याची गुलावळ. या सर्वांतून मी सहीसलामत सुटलों आहे असा माझा दावा नाहीं. पण हळूहळू जुन्या कागदाशीं पुरेसा परिचय होत चालला.

एवढी तयारी झाली, जुने कागद पाहून झाले; तरी पुस्तकाची योजना आखणें, महिनेन्‌महिने जुन्या कागदात डोकें खुपसून बसणें व पुस्तक लिहून काढणें हें माझ्या प्रकृतीला न मानवण्यासारखेंच काम ! तें लिहून झालें याचें सर्व श्रेय माझे मित्र श्री. श्री. ना. पेंडसे व मावसबंधु श्री. म. वा. जोशी यांनाच आहे. प्रकरणें लिहिण्याचा टकळा लावणें, लिहून झाल्यानंतर त्याचें वाचन करणें, त्यात आवश्यक त्या सुधारणा सुचविणें या गोष्टी त्या दोघानीं जातीनें केल्या नसत्या तर पुस्तक लिहून झालें असतें कीं नाहीं याची मला शंकाच आहे आणि लिहून झालें असतें तरी तें सध्याच्या स्वरूपात—चांगलें का वाईट हें वाचकानींच ठरवावयाचें आहे— त्यांच्या सहकार्याच्या अभावीं नक्कीच मिळालें नसतें. त्याचे आभार कसे मानायचे ?

पुस्तकाचें स्वरूप विविधरंगी आहे. धड संशोधन नाहीं, निव्वळ संकलन नाहीं. लेखन आणि त्यात इतिहासलेखन हीं तर लेखकाला नवीनच आहेत. या सर्वांचा एकत्र परिणाम म्हणून चोखंदळ वाचकाना या पुस्तकात अनेक उणीवा

आढळतील, विवाद्य प्रश्न, अतिव्याप्त विधानें हीं लेखनात कुठें भेटतील तर कुठें विवेचनात सूत्र तुटलेलें आढळेल. अर्थात् याला कारणें आहेतच. अधिक वेळ मिळता तर यातले काहीं दोष टाळता आले असते. प्रकाशनाची फार पुढची तारीख धरली असती तर कदाचित् प्रयत्नच झाला नसता

पुस्तकाच्या स्वरूपासबंधीं थोडासा खुलासा आवश्यक आहे. पहिल्याच प्रकरणांत दापोली तालुक्याचा इतिहास देण्याचा प्रयत्न केला आहे, मुरुड गावाच्या वसाहतीची ऐतिहासिक पार्श्वभूमि समजावी हा जरी प्रमुख हेतु असला तरी त्यात दुसराहि एक दुय्यम हेतु आहे. सर्व बाबतींत कोंकणची उपेक्षा चालली आहे त्याप्रमाणेंच त्याच्या इतिहासाची. मराठी पुस्तकातून दक्षिण कोंकणच्या इतिहासाचें स्थूल दर्शनहि मोठ्या प्रयत्नानेंच होतें. तेव्हा गेल्या दोन हजार वर्षांत या छोट्या भूमिखडानें अनुभवलेल्या स्थित्यतराचें— अस्फुट का होईना— दर्शन घडावें हा लेखकाचा हेतु आहे. दुसऱ्या प्रकरणांत नागर ब्राह्मणाची थोडीशी माहिती दिली आहे. मुरूडची वसाहत करणारा सिद्धपुरुष हा नागर ब्राह्मण आहे एवढाच आधार व समर्थन या प्रकरणाकरिता लेखकाजवळ आहे. वाचकाना कदाचित् हें विषयान्तर वाटेल. लेखकाला नागरांच्या कर्तृत्वाची बैठक या प्रकरणाला असावी असें वाटलें म्हणूनच तें देण्यात आलें आहे.

त्यापुढच्या प्रकरणातून मुरूडचा इतिहास दिला आहे. या बाबतींतहि एका गोष्टीचा खुलासा आवश्यक आहे. हा इतिहास प्रामुख्यानें ब्राह्मणांचाच झाला आहे. याचें कारण लेखकाला मिळालेल्या कागदात आहे. कागद मिळाले ते वैशंपायन याजकडचे, व आणखी एक मिळाला तो पडिताकडचा. याशिवाय आणखी जुने कागद मिळविण्याच्या प्रयत्नात लेखकानें बिलकुल कसूर केली नाहीं. सर्व जमातींच्या प्रमुख लोकाजवळ जुने कागद व जुना इतिहास मिळविण्याचा वारंवारदां भेटून प्रयत्न करण्यात आला पण या सर्व प्रयत्नांना फारच थोडें यश आलें. ब्राह्मण समाजाची माहिती कागदातूनच मिळाली इतर जमातींच्या इतिहासाकरिता ना कागदाचा ना आख्यायिकाचा आधार. गावाचें संपूर्ण चित्र उभें राहण्याकरिता सर्व जमातींचा समकालीन इतिहास देणें हें आवश्यक

असलें तरी साधनांच्या अभावीं लेखकाला एकाच जमातीच्या इतिहासावर संतुष्ट व्हावें लागलें आहे या अपुऱ्या प्रयत्नातूनहि मुरूडच्या जीवनप्रवाहाची अल्पशी तरी कल्पना यावी.

ब्राह्मणाचा आलेला इतिहासहि कांहीं व्यक्तींच्या त्रोटक चरित्रातूनच उभा करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याला उपलब्ध असलेलीं साधनें हें एक कारण तर झालेंच दुसरें म्हणजे व्यक्तींच्या जीवनचित्रांतून प्रकरणें अधिक रंगतील ही लेखकाची अपेक्षा; पण सर्वांत महत्त्वाचें कारण म्हणजे या चरित्राच्या अनुषंगानें तत्कालीन सामाजिक परिस्थितीवर पडणारा प्रकाश.

पुस्तक तयार करण्याच्या कामात मला अनेकांचें बहुमोल साहाय्य झालें आहे. माझे मामेबंधु श्री. यशवंतराव वैशंपायन यांचे आभार कसे मानावे तेंच कळत नाहीं. आपल्या जवळच्या कागदांचा त्यांनीं मला हवा तसा उपयोग मोठ्या औदार्यानें करू दिला, पण हें ऋण केवळ वैयक्तिक आहे असें मला वाटत नाहीं. ज्या कागदपत्रांचा तादृश उपयोग कांहीं नाहीं ते वर्षानुवर्षं उरीपोटीं बाळगून ठेवायचे, कसर आणि अन्य आपत्ती यापासून रक्षण करणें यात या अमोल धनावरील त्याचें प्रेम तर व्यक्त होतेंच, पण या कागदपत्राविना — यात आतापर्यंत प्रकाशात न आलेली एक बखरहि आहे-प्रस्तुत पुस्तक केवळ अशक्य झालें असतें हा विचार मनात आला कीं श्री. यशवंतराव केवढ्या धन्यवादास पात्र आहेत याची कल्पना येते.

श्री. यशवंतराव वैशंपायन यांच्या बरोबरच श्री. दा. म. पंडित यांचाहि उल्लेख केला पाहिजे. कुलकर्णी वतनाचा कागद व आपल्या कुळाविषयींची उपयुक्त बहुमोल माहिती पुरवून मला त्यांनीं उपकृत केलें आहे. मुरुड येथील स्थानिक समितीचे कार्यवाह श्री. तात्यासाहेब दामले व अप्पा काळे यांनीं सक्त मेहनत घेऊन जर मला माहिती पुरविली नसती तर ' आजचें मुरुड ' हा भाग समजलाच नसता. सत्तरीच्या जवळ पोंचलेल्या तात्यांचा उत्साह तरुणानाहि लाजविणारा आहे. श्री. नानासाहेब आवळसकर यांचें साहाय्य तर मला सुरुवातीपासूनचेंच आहे. इतिहासलेखनात होणाऱ्या अनेक चुकांबाबत त्यांनीं मला

वेळोवेळीं इशारा दिला, जुन्या कागदांतील मजकुराच्या अर्थाचा खुलासा तर केलाच पण बखर व इतर अनेक कागद याची शुद्ध संहिता करण्याच्या बाबतींत अत्यंत आस्थेनें व तत्परतेनें बहुमोल मदत केली. इतिहाससंशोधनावर अपत्यवत् प्रेम करणारे व लेखनावर अनन्य श्रद्धा असलेले श्री. नाना आवळसकर याच्याशी विचारविनिमय करण्याची संधि मला लाभली हा निःसंशय सुयोग होय.

वासुदेव जोशी मुरुडकर हा आपल्या मुरूडचाच हें मला अनपेक्षितरीत्या कळलें. पण त्याबद्दलची निश्चित माहिती प्रसिद्ध इतिहाससंशोधक श्री. य. न. केळकर यानीं मला पुरविली. तसेंच या वासुदेव जोशासंबंधीं आणखी माहिती त्याचे वंशज श्री. नारायण वामन जोशी ( कुळगावकर ) व माझे मित्र श्री. के. ह. वैद्य यानीं पुरविली. या तिघाचाहि मी आभारी आहे. या शिवाय श्री. य. न. केळकर यानी पुस्तकाला बहुमोल प्रस्तावना दिली आहे. पुस्तकाचें मूळचें मूल्य काय असेल तें असो पण श्री. केळकराच्या प्रस्तावनेनें तें निश्चित वाढलें आहे. नागर ब्राह्मणाच्या माहितीकरितां मी प्रा. जे. एच्. दवे ( भारतीय विद्या भवन ) व प्रा. हरिभाऊ वेलणकर याना त्रास दिला. तो त्यानीं आनंदानें सहन केला. मुरूडच्या इतिहासाला उपयुक्त होईल म्हणून लाडघरचे श्री. वि. कृ. बाळ याच्याकडून एक ताम्रपट मिळविला व तो डॉ. पी. एम्. जोशी याच्याकडून वाचून घेतला त्याबद्दल त्या दोघाचाहि मी आभारी आहे. संदर्भाकरिता ग्रथालयाचा उपयोग करू दिल्याबद्दल श्री. वा. वि. भट व 'नेनेंचें कोंकण' ( कोंकणच्या इतिहासावरील दुर्मिळ पुस्तक ) हें पुस्तक दिल्यावद्दल श्री. र. वा. रामदास याचा मी आभारी आहे.

मुरुड येथील विविध जमातीची माहिती मिळविण्याचा लेखकानें मिळालेल्या अवधींत कसोशीनें प्रयत्न केला. त्या त्या जमातींतील व्यक्तींना व्यक्तिशः भेटणें, त्याबाबत पत्रव्यवहार करणें व मुरूडचा संबंध कुठें कांहीं मिळतो काय म्हणून संदर्भाकरिता निरनिराळीं ग्रंथालयें धुंडाळणें याबाबत जें जें करणें तें तें लेखकानें केलें ! तसें पाहिलें तर सुवर्णदुर्ग तर मुरूडच्या उशाशीं ठाण मांडून

वसला आहे. तेव्हा मुरूडचे मराठे व भंडारी हे सैन्यात व आरमारात अहमहमिकेनें गेले असलेच पाहिजेत. ज्या भंडाऱ्यानीं आपल्या पराक्रमानें कोंकणचा विस्तृत किनारा दुमदुमविला व ज्या शूर मराठ्यानीं जिंजीपासून पानपतपर्यंत रणमैदानें पायाखालीं तुडविलीं त्यात मुरूडचे शूर गडी असलेच पाहिजेत. त्याच्या त्या पराक्रमकथा मुरूडच्या इतिहासाला मात्र अद्याप अज्ञात आहेत. मुरूडच्या सोनारानीं आपल्या कर्तबगारीनें श्री दुर्गादेवीच्या उत्सवात ब्राह्मणाच्या बरोबरीनें मान पटकाविला होता. त्याच्या कर्तृत्वाच्या खुणा तरी कुठें माहीत आहेत ? यवन मुरूडला सुरुवातीपासून आहेत. सुरुवातीला तर त्यांचेंच राज्य होतें. त्याच्या कर्तबगारीलाहि वाव मिळाला असलाच पाहिजे. पण त्या बाबतींतहि आपण अद्याप अंधारांतच वावरत आहोंत. आणि कुणबी तर अजूनपर्यंत दुर्लक्षिली गेलेली, भरडलेली व नागरी संस्कृतीला नुकती नुकतीपर्यंत पारखी झालेली जमात. जेथें भंडारी, मराठे वा मुसलमान याच्या बद्दलचें जुनें एकादें चिटोरेंहि मिळत नाहीं, तेथें कुणब्याविषयीं कांहींच कळलें नाहीं तर नवल नव्हे ! त्यामुळें जी तुटपुंजी माहिती श्री. मुरुडकर वकील, श्री. रुमडे, श्री. साटले व श्री. एन्नरकर यानीं दिली त्यावर समाधान मानणें प्राप्त आहे. ती माहिती पुरविल्याबद्दल लेखक त्याचा आभारी आहे.

आजचें मुरुड यात जी विविध माहिती आली आहे ती देऊन अनेकानीं मला उपकृत केलें आहे. सर्वश्री अण्णा गद्रे, पंढरीनाथ गद्रे, हरिभाऊ जोशी, भि. के. भावे, ना. के. बिवलकर, प. म. जोशी, स. गो. बाळ, सी. दा. काणे, बापुशास्त्री जोशी, द. सी. चोळकर, द. धों. मुकादम, वि. स. पुसाळकर, कुशाभाऊ दातार, याच्याबरोबरच मुरूडचे तलाठी श्री. पेठे व ग्रामसेवक याचा लेखक आभारी आहे.

श्री. दिनकराव लिमये बी. ई. यानीं कच्च्या प्रतीवरून मुरूडचा नकाशा करून दिला. त्याचा मी फार आभारी आहे

अखेरीस पुस्तकाच्या शेवटच्या भागाबद्दल अल्पसा खुलासा आवश्यक आहे. मुरूडच्या कर्त्या व्यक्तींचा धावता परिचय देण्याचा त्यात प्रयत्न केला आहे.

विसाव्या शतकातील मुरूडच्या जीवनाचा एक छेदच ( cross section ) त्यात पहायला मिळावा अशी लेखकाची इच्छा. हें परिचयाचें प्रकरण असमाधानकारक झालें आहे, याची लेखकाला जाणीव आहे. यायलाच पाहिजेत अशा अनेक व्यक्ती तेथें वाचकांना भेटणार नाहींत. परिचय देणार असल्याचें गेल्या सप्टेंबरमध्येंच जाहीर करण्यात आलें होतें. पण परिचय मिळविण्याकरिता लेखकानें भेटणें व पत्रव्यवहार करणें हाच उपाय योजावा लागला. अनेक स्मरणपत्रें पाठवावीं तेंव्हा एखादा परिचय हातीं लागावा. यामुळें लेखकाला जेवढे लोक माहीत होते व ज्याचे परिचय मिळविणें शक्य झालें त्याचेच परिचय येथें आले आहेत. परिचय मिळविण्याकरिता वृत्तपत्रातूनहि मुरूडकराना विनति करण्यात आली होती, परतु त्याचा उपयोग झाला नाहीं. परिचय दिलेल्या व्यक्तींपैकीं फक्त काहींचीच छायाचित्रें आढळतील. इतरांचीं मिळू शकलीं नाहींत

मुद्रणप्रत तयार करताना माझी पत्नी सौ. नलिनी गानू व स्नेही श्री. दत्ता गांधी, श्री. अरुण जोशी, तसेंच माझा मुलगा विद्याधर गानू आणि मुलगी लता गानू यानीं मदत केली नसती तर पुस्तकाची ' कॉपी ' छापखान्याकडे गेली त्या वेळेवरहि जाऊ शकली नसती छापखान्याचे व्यवस्थापक श्री. मधुकरराव साठे यानीं प्रकरणें पाठविण्यात माझ्याकडून अक्षम्य विलंब होत असतांनाहि तो चालवून घेतला व पुस्तक अल्पावधींत व सर्वांगसुंदर छापून तयार केलें याबद्दल त्याचेहि आभार मानले पाहिजेत.

सरतेशेवटीं शतायुषी अण्णासाहेब गौरव समितीचे मला अंतःकरणपूर्वक आभार मानायचे आहेत. समितीनें प्रकाशनाची जबाबदारी शिरावर घेतली —केवळ यामुळेंच प्रस्तुत पुस्तकाच्या लेखनाचा मीं विचार करूं शकलों.

२३–४–५८

२६ बिरादर मझील
नायगांव मुंबई १४ } वा. रा. गानू

अनु. 23022 - दि.
क्रमांक ... नों. दि. 29/9/58

# प्रस्तावना

सार्वजनिक जीवनात केवळ अपूर्व असा महर्षि कर्वे यांचा शताब्दि-पूर्ति समारंभ भारतभर नुकताच साजरा झाला. गेल्या १२ एप्रिलपासून त्या समारंभांची जी परंपरा सुरू झाली, तिची परिपूर्ति खुद्द त्यांच्या जन्म-ग्रामीं म्हणजे मुरूड येथें होणाऱ्या समारंभानेंच अखेर होणार आहे. आणि त्यांत तसेंच औचित्यहि आहे खास कारण काशी–प्रयागच्या यात्रा झाल्या तरी गंगोत्रीची यात्रा झाल्याशिवाय यात्रिकाला खरें समाधान होत नाहीं किंवा यात्रेचें पुण्य पूर्णांशानें पदरात पडलें असें वाटत नाहीं !

प्रत्येक लहानसाहि पर्या, ओढा किंवा नाला हे सर्वच आपापल्यापरी अल्प प्रमाणात एकाद्या नदीसारखेच असतात. ज्या भागातून वाहणें त्यांच्या नशिबीं लिहिलेलें असतें, त्यातच आनंदानें वाहात राहून स्वतःच्या 'जीवना'चा प्रत्येक कण किंवा बिंदू तेथेंच जिरवावयाचा आणि तेथील सृष्टीला लाभणाऱ्या समृद्धींत स्वतःच्या आनंदाचीहि समृद्धि मानावयाची – हाच त्यांचा निःस्वार्थ, परोपकारी जन्मस्वभाव असतो. त्या दृष्टीनें पाहिलें असता एकादा छोटा नाला आणि मोठी नदी यांच्या मौलिक माहात्म्यात कांहींच फरक नसणार हें उघड आहे.

तथापि लौकिक कारणामुळें त्यांच्या पुढील स्वरूपात, यशात आणि माहा-त्म्यात महदंतरें पडतात आणि त्यांचीं कारणेंहि अनेकविध असू शकतात. एकाद्या प्रवाहाला आपल्या उगमानजीकच थोड्याशा अंतरावर नामशेष होण्याची पाळी येते. कारण त्याला दुसरे प्रवाह येऊन मिळण्यासारखी भौगोलिक परिस्थि-तीच नसते. दुसऱ्या कांहीं, कोंकणातल्या पहाडात उगम पावलेल्या नद्या अस-तात त्यांना पाण्याचा पुरवठा, उगमापाशीं अमाप असतो आणि त्यांना येऊन मिळणारे ओढेनालेहि विपुल असतात; परंतु त्यांना फैलावण्याला विस्तृत क्षेत्र,

लाभत नाहीं आणि म्हणून त्याना थोड्याच अवधींत 'खाड्या' बनून समुद्रात विलीन होऊन जावें लागतें ! उलटपक्षी, दुसरी एकादी गंगेसारखी भाग्यवान नदीहि असते. तिचा जन्म हिमालयाच्या उत्तुंग शिखरावर होतो. परंतु उगमापाशीं पाण्याचें पल्वलहि नसतें आणि भोवतीं तर गोठून दगड बनलेल्या बर्फाचेच सारे प्रस्तर. परंतु मौज ही कीं, तें बर्फच तिची कायमची हक्काची गंगाजळी बनते आणि ऐन उन्हाळ्यातहि तिला महापूर आणते, शिवाय ती गंगा मार्गक्रमण करीत जसजशी पुढें जाते, तसतशा तिला अनेक उपनद्या मिळत जात असतात आणि सुदैवानें तिला वागडायला क्षेत्रहि असें लाभतें कीं, तिची लांबी शेकडों योजनांनीं मोजावी लागते.

वृद्ध शतायुषी मनुष्य आणि शतयोजन लांबीची एकादी नदी याच्यात सकृद्दर्शनी मोठेंच साम्य दिसलें तरी वास्तविक विरोधच फार असतो. कारण मनुष्य वृद्ध होत जातो तसतसा तो अधिकाधिक कृश बनत जातो आणि त्याच्या जीवनशक्ति क्षणाक्षणानें क्षीणतर होत जातात. उलट नदीची लांबी जशी वाढत जाते तशी ती अधिक पुष्ट होते, तिचें पात्र विस्तारत जातें, आणि तिचें परोपकारी कर्तृत्वहि अधिकाधिक व्यापक होत जातें आणि म्हणूनच तिला तीर्थाची पदवी प्राप्त होते.

कर्वे हे अतिवृद्ध, शतायुषी झालेले असले आणि वर सांगितल्याप्रमाणें त्यांच्या कर्तृत्वाला आता क्षीणता आलेली असली तरी त्याच्या जीवनाला गंगेचेंच माहात्म्य लाभलेलें आहे यांत शंकाच नाहीं. अशा महानुभावाच्या भाग्याचा कोणीच हेवा करीत नाहीं, कोणीच विषाद मानीत नाहीं. उलट जो तो त्याच्या भाग्यांतच स्वतःचें सद्भाग्य सामावलें आहे असें समजतो. सर्वसामान्य लोक असतात ते त्या गंगेच्या प्रवाहात डुबतात, आनंद पावतात. आणि तिच्याच पात्रातील पाण्यानें तिला अर्घ्य देऊन कृतकृत्यताहि मानतात. पण दुसऱ्याहि एका प्रकारचे लोक असतात ते स्वतः थोडेबहुत कार्यकर्ते असतात, सहृदय असतात आणि गंगेप्रमाणेंच जात्या उदार परोपकारी असतात. ते मात्र आपल्या विधायक कर्तृत्वाचा छोटासा का होईना पण तो प्रवाह, त्या मुख्य गंगाप्रवाहातच

सोडून तिचा महिमा वाढविण्याचा आपापल्यापरी सात्विक प्रयत्न करतांना दिसतात. प्रस्तुत पुस्तकाचे लेखक श्री. वा. रा. गानू याची गणना तशा लोकात करावयाला काहीं हरकत नाहीं.

मुरूड गावच्या नदींतून कर्वे याच्या जीवनाचा कालवा निघाला. पण कालवा कितीहि विस्तारला व लाबवर गेला तरी अखेर त्या मूळ नदींतच आणून सोडतात; त्याप्रमाणें बाहेर देशभर कर्वेशताब्दिपूर्तीचे कितीहि उत्सव झाले तरी अखेरचा उत्सव त्याच्या जन्मग्रामीच करण्यात जें औचित्य आणि मार्मिकता मुरूडकरानीं प्रकट केली तेंच औचित्य आणि तीच मार्मिकता कर्व्यांच्या नव्हे तर त्या कर्व्यांना जन्म देणाऱ्या त्याच्या मुरूड गावचा साद्यत इतिहास या वेळीं लिहून प्रसिद्ध करण्यात श्री. गानू यानीं दाखविली आहे यात शका नाहीं.

मुरूड गावीं होणारा उत्सव आणि कर्व्यांचा गौरव लौकिकदृष्ट्या अत्यावश्यकच. त्याबाबत दुमत नाहीं. तथापि त्या उत्सवाचें स्वरूप क्षणिक, क्षणभगुरच ठरेल हेंहि खोटें नाहीं. कारण त्या वेळीं त्या उत्सवात होणारीं भाषणें हीं, तेव्हा कर्व्यांच्या गळ्यात पडणाऱ्या फुलाच्या माळाप्रमाणेंच दुसऱ्या दिवशीं सुकून जातील. उलट या पुस्तकाच्या रूपानें सशोधक श्री. गानू यानीं जी माळ तयार केली आहे ती मात्र पुराणातरीच्या माळेप्रमाणें सदा ताजी टवटवीत राहून आपल्या सुगधानें कायमची आल्हाद देत राहील. खुद्द कर्वे यांनाहि याच उपक्रमाचें मनोमन अधिक कौतुक वाटेल अशी खात्री वाटते. कारण ‘ जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी ’ अशीच त्याची मुरूडासबधीं खोल, नाजूक भावना कशी आहे, तें त्याचें आत्मचरित्र वाचलेल्याना तरी निराळें सागावयास नको.

महर्षि कर्व्यांच्यामुळें मुरूड गावाला मोठेपणा आला आहे असें म्हणणें हें लौकिकदृष्ट्या शंभर टक्के सत्यच आहे. तथापि खुद्द कर्वे मात्र आपल्या उदात्त व पवित्र भावनेनें असेंच म्हणतील कीं, “ गंगा नदीच्या तीरावर निर्माण झालेल्या शहरानीं काहीं गंगेला तिचा मोठेपणा प्राप्त करून दिलेला नाहीं. तर उलट त्या गगेच्या सानिध्यामुळेंच केवळ त्या शहराना तो मोठेपणा तसा प्राप्त

झाला. त्याप्रमाणें पुरातन कालापासून वाहात आलेल्या या मुरूडच्या इतिहास-गंगेच्या काठीं तेथील कर्तबगार पुरुषाच्या रूपानें जीं गांवें उभारलीं गेलीं, त्यापैकीं एक होण्याची संधि मला लाभली हें मात्र मी माझें सद्भाग्य समजतों."

कर्वे यांच्या मनात उभी राहणारी ती सभाव्य व्यापक भावना त्याच्यासारखी तशीच मुरूडांतील दुसऱ्याहि कांहीं जणाच्या मनात उदित झाली असावीसें वाटतें. त्याना त्याच्या मुरूड गावचा अभिमान स्वाभाविकच वाटत असला पाहिजे. आणि तो तसा का नसावा ? कारण रावसाहेब मडलिक, शकर बाळकृष्ण दीक्षित आणि आता अण्णासाहेब कर्वे अशीं नररत्नें गेल्या शभर वर्षांत याच गावात प्रसवलीं आहेत. पण हे अभिमानी लोक व्यापकदृष्टीचे अधिक चिकित्सक आणि अधिक चौकस असल्यामुळें साहजिकच त्याच्या मनात असा विचार येऊन गेला असेल कीं, "या शभर वर्षांतच काहीं या आपल्या भूमीचा कुसवा असा एकाएकी संपन्न झाला नसेल खास. त्या पूर्वींच्या पुरातन कालातहि येथें अशाच कर्तबगार लोकांची निपज, झाली असलीच पाहिजे" आणि त्या स्तुत्य जिज्ञासेनेंच ते मुरुड गावच्या इतिहाससशोधनास प्रवृत्त झाले. अशा लोकांपैकींच श्री. गानू हे अग्रेसर असून त्यानीं मोठ्या प्रयत्नानें हा मुरूड गावचा छोटा परतु सर्वांगसुंदर असा इतिहास निर्माण केला आहे.

श्री. गानू पेशानें काहीं इतिहास सशोधक नव्हेत परतु गावच्या अभिमानानें अखेर त्यास तसें बनविलें आहे. आणि त्यामुळेंच एरवी त्या गावचीं जीं इतिहास-साधनें जीर्णशीर्ण स्थितींत उद्या नष्टच होऊन गेलीं असतीं तीं सारी साक्षेपानें त्यानीं जमविलीं आणि त्यावरून त्यानीं मुरूड गांवच्या पिशाच्चवत् अदृश्य झालेल्या इतिहासाला लौकिक स्वरूपात आणून या मोठ्या मोहक परिवेशात लोकापुढें उभें केलें आहे.

तात्यासाहेब केळकरांनीं या इतिहास-सशोधनाच्या कधींहि न संपणाऱ्या उद्योगाविषयीं एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, " अंतरंगात पेटलेली

देशाभिमानाची मशाल घेऊन जो कोणी हल्लींच्या या अज्ञान व अनास्थारूपी तमोमय रात्रींत सचार करण्यास अजूनहि प्रवृत्त होईल त्याला पोकळगांव'च्या इनामदाराच्या पडक्या वाड्याचे वळचणींत, तात्या पतोजीच्या शाळेंत पुस्त्या गिरवणाऱ्या पोराचे दप्तरात, अभिमानानें जतन केलेल्या परतु अज्ञानामुळें सतरा गाठी मारून अठरा कुलुपात ठेवलेल्या कागदपत्राचे ब्रह्मघोटाळ्यात, किंवा तागडीतुकाप्पाचे रद्दीचे पुडक्यात, ज्याच्या योगानें इतिहासचा इतिहास फिरेल अशी माहिती अद्यापीहि मिळेल, नाहीं कोणी म्हणावें ! मात्र हें सर्व होण्यास अभिमानानें उजळलेली व कौतुकानें तीक्ष्ण केलेली अशी दृष्टि असणें जरूर आहे " - अशी ' अभिमानानें उजळलेली ' आणि ' कौतुकानें म्हणजे जिज्ञासेनें तीक्ष्ण केलेली दृष्टि ' श्री. गानू याच्याजवळ भरपूर आहे हें त्याच्या या पुस्तकावरून कोणासहि स्वच्छ दिसून येईल. या ग्रथात विविध अस्सल ऐ. साधनें तर आहेतच पण त्यावरून लिहिलेला सुदर विवेचक इतिहासहि आहे. किंबहुना सर्वसामान्य वाचक तोच मोठ्या आवडीनें वाचतील. कारण श्री. गानू याच्या लेखनाला खऱ्या वाङ्मयाचीहि लज्जत लाभली असल्यामुळें त्याचें कथन मोठें वाचनीय झालें आहे.

थोडक्यात असें म्हणता येईल कीं ज्यात इतिहास आणि भूगोल याचें विश्वसनीय कथन झालेलें आहे असें मुरूडगावचें हें छोटे गॅझेटिअरच निर्माण होत आहे. मुरुड गांव हा तसा लहान सामान्यच असता तत्सबधी किती नवी अपूर्व माहिती या पुस्तकानें उपलब्ध करून दिली आहे तें पाहिलें म्हणजे महाराष्ट्रातील प्रत्येक गावाकडून असा प्रयत्न का केला जाऊं नये अशी इच्छा मनात प्रबल होते. त्या प्रत्येक गांवात असा एकेक गानू खासच असेल. फक्त त्याला उत्तेजन आणि साहाय्य पुरवून सरकारनें त्याच्या गुणाची बूज करण्याची गुणग्राहकता दाखविली जाणें जरूर आहे.

प्रत्येक गावच्या स्थानिक लोकास उत्तेजन व साहाय्य देऊन, त्याच्यातीलच जाणत्या साक्षेपी लोकाकडून असलीं कामें करवून घेण्याची दूरदृष्टि सरकार

दाखवील तर गावोगांवच्या विश्वसनीय इतिहासाचे ढीग साधनासुद्धा जागच्या जागीं निर्माण होऊन राहतील आणि सरकारचेंहि काम किती सुलभ होईल !

असो, सद्य.कालाच्या मुखापासून मागें जात जात मुरूडच्या इतिहास-नदीच्या उगमापाशीं जाऊन येण्याची अवघड यात्रा श्री. गानू यानीं यशस्वीपणें उरकली आहे. गंगोत्रीसारखी यात्रा करणारे, शेकडों हजारों लोकात दोन चारच निघतात. कारण ती यात्रा अवघड. त्यात संकटें, अडथळे फार. अपरिचित अज्ञात प्रदेशातला तो प्रवास. तो अंगिकारणाराच्या अंगीं निस्सीम निष्ठा, तीव्र जिज्ञासा आणि काटक प्रकृति लागते. तोच मनुष्य ती यात्रा उरकतो आणि इतराना दुर्लभ असें पुण्य जोडतो. म्हणूनच असा कोणी मनुष्य असली यात्रा पुरी करून परत आला म्हणजे लोक भक्तिभावानें त्याच्या भोवतीं जमून त्याचें यात्रा-वृत्त श्रवण करतात आणि कृतज्ञतेनें त्याच्या पायावर डोकें ठेऊन त्या यात्रेचा पुण्यांश 'जोडल्याचें' समाधान मिळवितात. श्री. गानू याच्या मुरूडच्या इतिहासयात्रेच्या या ग्रथानें तोच अनुभव येईल अशी खात्री वाटते.

पुणें<br>
१९।४।५८

य. न केळकर

स्थलप्रत
वि. .. .. ..
क्रमांक ......
ग्रंथालय (स्थळ प्रत)

# प्रकरण १ लें

## पूर्वपीठिका

भारताचा इतिहास प्राचीन आहे. अनादिकालापासून विचार आणि भावना यांच्या लाटा वर्तमानकाळच्या किनाऱ्यावर अजूनहि येऊन थडकत आहेत. या वैभवसंपन्न वारश्याबद्दल आपण आपल्या पूर्वजांचे कृतज्ञ राहतों पण माणसाचें मन वेडें असतें. भारताचा इतिहास विशाल आहे. तसाच आमच्या महाराष्ट्राचा असावा, तो तितकाच प्राचीन असावा; वाङ्मय, कला, तत्त्वज्ञान, आणि वीरांच्या रोमहर्षक कथा यानीं तो तेवढाच स्फुरलेला असावा, असाहि विचार त्याच्या मनात डोकावूं लागतो. पण मन एवढ्यावरच थाबत नाहीं. भाषेच्या सीमेवर न थांबता तें अधिक संकोच पावतें. तें उत्सुकतेनें विचारतें, " आमच्या या कोंकणचा इतिहासहि असाच असेल काय ? सावित्री ते वाशिष्ठी या ज्या भूमिभागाच्या अंकावर आम्ही वाढलों, पोसलों, जेथच्या सागराचा खारा वारा, तांबडी माती, सघन-हिरवळ, शरद् हेमंता-तील हुरहुर लावणारीं कडव्या-पावट्याचीं शेतें, वसंतऋतूंतील फुलाचा मादक सुगंध, तें सागराचें अविरत घनगर्जित, त्या माडापोफळींच्या चिरतरुण बागा– या सृष्टिसौंदर्यांत मनमुराद खेळलों, बागडलों, त्या या आमच्या भूमीलाहि असाच वैभव-शाली इतिहास असेल काय ? " मन उत्सुकतेनें शोधीत राहतें, साशंक होतें– पण इतिहासाचें कोरें पान पाहून तें विषण्णतेनें माघार घेतें !

सावित्री ते वाशिष्ठी एवढासा चिमुरडा प्रदेश ! त्याला इतिहास तो काय असा-यचा ? पण नाहीं; इतिहासकालीं एवढ्याल्या चिमुरड्या प्रदेशांनींहि आपलीं नांवें चिरंजीव केलीं आहेत. कर्तृत्वाला दैव हें सामोरें मात्र गेलें पाहिजे गेलीं अठ्ठावीस युगें हा भूमिभाग त्या अपेक्षित दैवाची वाट पहात आहे !

सावित्री ते वाशिष्ठी ह्या भूभागाच्या रचनेकडे लक्ष टाकलें तर या प्रदेशाला महत्त्व न येण्याचें कारण सहजच लक्षात येतें. समुद्रकिनाऱ्याजवळची कुठें फर्लांग

तर कुठें फार तर दीड-दोन मैल रुंदीची पट्टी सोडली, तर हा सर्व प्रदेश डोंगराळ आणि खडकाडीत आहे. या समुद्रकिनाऱ्यालगतच काय त्या सुपीक बागा आहेत. दाट लोकवस्तीचा भाग तो एवढाच. पर्जन्याची कृपा या भागावर सतत होत आली असली, तरी शरद् ऋतु संपला कीं नद्या एखाद्या शन्याचें रूप धारण करूं लागतात. एक डोंगर ओलांडला कीं उतार सुरू. उतार संपला कीं पुनः दुसऱ्या डोंगराची चढण सुरू. या दोन उतारामधून पावसाळ्यात हटकून वाहणाऱ्या नदीच्या पात्रात मात्र हिरवळ असते व ती बारमाही टिकते. तांबडी माती व ह्या नद्यांच्या पात्रातील नागमोडी हिरव्या राया हें या विभागाचें वैभव रत्नाची खाण मानलेल्या या प्रदेशांत खनिज संपत्तीचा अद्याप मागमूस नाहीं. दैवानें पाठ फिरविलेल्या अशा या नापीक प्रदेशाची वसाहतहि फार उशीरां झालेली असली तर नवल काय!

उत्तर कोंकणांत अनेक ठिकाणीं बौद्धांची लेणीं आहेत. थेट कुंडलिका नदी-पर्यंत ( रेवदंड्याची खाडी ) हीं लेणीं आपणास पाहायला मिळतात. वाशिष्ठीच्या दक्षिणेसहि तुरळक प्रमाणात कां असेना तेथेंहि लेणीं आहेत. पण दापोलीच्या या भागामध्यें अद्यापपर्यंत एकाहि लेण्याचा शोध लागला नाहीं. लेणीं तयार करण्या-करितां लागणाऱ्या काळ्या दगडाची उणीव या भागात आहे असेंहि नाहीं. मुरुड-च्या उत्तरेस फुटका टेंभा किंवा दक्षिणेस लाडघरचें दत्ताचें देऊळ, या जागांकडे नजर टाकली तरी ही गोष्ट लक्षात येईल. कांहीं ठिकाणीं बौद्धांनीं लेण्यांना सुरुवात करून मग तेथील खडक योग्य नसल्यामुळें तीं सोडून दिलेलीं आढळतात. तसेंहि या विभा-गांत आढळत नाहीं. आतां बौद्धांनीं लेणीं खोदलीं तीं साधारणपणें मोठमोठ्या रह-दारीच्या मार्गावर! आपल्या येथें लेणीं नाहींत याचा एक अर्थ तरी असाच कीं येथें मोठे रहदारीचे रस्ते नव्हते व वस्तीहि नव्हती–लक्षात घेण्याजोगी तरी नव्हती खास.

रहदारीचे रस्ते मोठे नाहींत याचींहि कारणें समजून घेण्यासारखीं आहेत. खिस्तपूर्व कालापासून भारताचा परदेशाशीं व्यापार कोंकण किनाऱ्यावरील बंदरातून चालत असे. या बंदरातून निघालेले राजमार्ग हे देशावरील राजधान्यांकडे धावत असत सावित्री ते वाशिष्ठी या किनारपट्टीवर बाणकोट व दाभोळ हीं बंदरें सोडलीं तर दुसरीं चांगलीं बंदरें नाहींत. हीं बंदरें प्राचीन कालापासून चालत आलीं आहेत. पण या बंदरातून देशावरील राजधान्याकडे जाणारा कोणताहि सोयीचा मार्ग या भूविभागाला छेदून जात नाहीं. सह्याद्रींतून पलीकडे जाण्याकरिता उपयोगी

पारघाट व कुंभार्ली घाट हे तर या दापोली प्रदेशाला अनुक्रमे उत्तरेला व दक्षिणेला येतात. यामुळें प्राचीन काळापासून हा भाग रहदारीच्या मार्गावर कधींच येऊ शकला नाहीं. लेण्याच्या अभावाप्रमाणेंच किल्ल्याचा अभावहि या भागात जाणवतो, याचें दुसरें कोणतें कारण असणार ? लोकवस्तीच्या दृष्टीनें किंवा राज्यरक्षणाच्या दृष्टीनें या भागाला महत्त्वच आलेलें नव्हतें.

इसवी सनाच्या सुरुवातीच्या शतकात सुवर्णदुर्ग येथें चाच्याची वसती होती असें पाश्चात्त्य इतिहासकारांचें मत आहे. ( नेर्नचा कोंकणचा इतिहास ). ती तशी असली तर आतां मुळींच आश्चर्य वाटायला नको. हर्णैचे सागरात घुसलेले सोईस्कर खडक ( तेव्हा किल्ला नव्हता ), उत्तरेस व दक्षिणेस मैला-दोन मैलावर मुरुड व आजर्लें ( हीं दोनहि गावें त्या वेळीं नव्हतीं ) या गावाच्या गलबतें हाकारता येण्यासारख्या रुंद खाडया व पार्श्वभागीं खंबीर राजसत्तेचा अभाव या गोष्टी चांच्यांच्या साहसी उद्योगाला पोषकच होत्या. या चाच्याच्या उद्योगाना पुढें पायबंद पडत चालला असला पाहिजे. कारण चवथ्या व सातव्या शतकातील प्रसिद्ध चिनी प्रवासी फा हिआन व ह्यु एन् त्संग यानीं बाणकोटच्या बंदरातून प्रयाण केलें असावें असा इतिहाससंशोधकाचा तर्क आहे इ. स. ५५०-७८ या काळात दाभोळ येथील चंडिकेचें प्रसिद्ध देवालय बाधलें गेलें. हें या भागात अधिकाधिक वस्ती होत असल्याचें एक चिन्हच होय.

खिस्ती शकाच्या सुरुवातीला महाराष्ट्रावर सातवाहनाचें राज्य होतें सातवाहनानीं सागरी सामर्थ्याकडे लक्ष दिलें होते. तरी अर्थात् वर सांगितल्याप्रमाणें चाच्याचा बंदोबस्त ते करूं शकले नव्हते. सातवाहनानतरचे वाकाटक व चालुक्य हे राज्यकर्ते याच्या अमदानींत सागरी सामर्थ्याकडे दुर्लक्ष होऊं लागलें. पश्चिम किनाऱ्यावरील बदरावर या दुर्लक्षाचा परिणाम अनिष्ट झाला. त्याच्या वैभवाला उतरती कळा लागली. चाच्याना प्रबल राजसत्तेचा दाब राहिला नाहीं. नंतरच्या राष्ट्रकूटाच्या कारकीर्दींत कोंकणात उत्तर शिलाहार, दक्षिण शिलाहार व कदंब ह्या सामंताचीं राज्यें होतीं त्यांच्याजवळ आरमारें असलीं तरी किनाऱ्याचा बंदोबस्त त्याच्यानें करवला नाहीं उत्तर शिलाहाराचें राज्य इ. स. ८१० ते १२६० या काळात ठाणें येथें होतें. कऱ्हाड व पन्हाळा येथील शिलाहाराचा उच्छेद याच्या आधींच झाला होता. देवगिरीच्या यादवानीं उत्तर शिलाहाराना इ. स. १२६० मध्यें जिंकलें. राष्ट्रकूट हे कन्नड राजे. शिलाहार हे त्यांचे सामंत. शिलाहाराचे

पुष्कळसे अधिकारी कन्नड असावे असें त्या काळच्या ताम्रपटांवरून दिसतें या वेळच्या कानडी अमलाचे वा कदाचित् पुढें झालेल्या विजयनगरच्या पहिल्या देवरायाच्या आधिपत्याचे अवशेष आपल्याला अद्याप पाहायला मिळतात विटी-दांडूच्या खेळातील " वकट लेंड मुंड...... " वगैरे कन्नड संख्यावाचक शब्दांत विजयनगरकराच्या आधिपत्याची स्मृति आपण जतन करून ठेवली आहे.[१]

यादवांच्या कारकीर्दींत दापोली भागाचा समावेश दक्षिण सुभ्यांत होत असे. चौदाव्या शतकाच्या सुरुवातीस अल्लाउद्दीन खिलजीच्या मलिक कफूर या प्रतापी सेनानीनें यादवाचें राज्य धुळीस मिळविलें त्याच्या आधींच इ. स. १३१२ मध्यें त्यानें चौल व दाभोळ प्रांत आपल्या स्वाधीन करून घेतले होते. पुढे इ. स. १३४७ मध्यें बहामनी राज्य स्थापन झालें. त्या राज्याच्या चार सुभ्यांपैकीं गुलबर्गा सुभ्यांत दाभोळ भागाचा अंतर्भाव होई. या काळात मुसलमानाची सत्ता कोंकणात असली तरी ती दृढ झाली नव्हती मुसलमानांचें अधिराज्य मान्य करून अनेक छोटे मोठे मराठे मांडलिक राज्य करीत होते. मुरूडच्या बखरींत उल्लेखिलेला जालंधर राजा ह्याच काळातला असावा. उत्तरेंतील शिलाहाराची सत्ता नष्ट झाल्यानंतर त्याच्याच पैकीं कोणा पुरुषानें यादव राज्याच्या कोपऱ्यात–दापोली विभागांत–आपल्या सत्तेची स्थापना केली असावी. बखरींत आलेल्या उल्लेखांवरून याची सत्ता जंजिऱ्याच्या खाडीपासून ते थेट शास्त्रीनदीपर्यंत ( जयगडच्या खाडीपर्यंत ) असावी. सिद्ध-पुरुषानें जालंधर राजाकडून दिवे, मुरुड व गुहागर या गावाच्या इनामतीचे ताम्रपट आणल्याचा उल्लेख आहे. तेव्हां या गावावर या राजाची सत्ता होती असें मानण्यास हरकत नाहीं. सिद्धपुरुष वसाहतीला योग्य अशा जागेच्या शोधांत थेट सैतवडे ( जयगड खाडी ) येथपर्यंत गेला असल्याचें सांगितलें आहे. जालंधर राज्या-च्या सत्तेची सैतवडें हीं दक्षिणेकडची मर्यादा असावी [२]

---

१ या कन्नड शब्दांचा उपयोग मुरुड व गुहागर येथें होतो. दापोली व चिपळूण तालुक्यात होतो असें म्हणायला हरकत नाहीं. चौकशीअंतीं जंजिरा –मुरुड भागांत होत नाहीं असें कळलें.

२ मुरुडहून सैतवडें हें दक्षिणेकडे सुमारें ३५–४० मैलांवर येईल वाटेंत दाभो-ळची रुंद खाडी आहे. त्यामुळें सिद्धपुरुष जयगड जवळच्या सैतवड्याला गेला असेल काय ही लेखकाला शंका आहे. दाभोळच्या अलीकडे एखादें सैतवडें नांवाचें गांव त्या वेळीं असावें काय ?

बहामनी राजा फिरुजशाहा याच्या कारकीर्दींत विजयनगरचा प्रतापी राजा पहिला देवराय ( इ. स. १४०६–१४२२ ) यानें इस्लामी सैन्यावर हल्ला केला व त्याचा पराभव करून दाभोळ चौलपर्यंतचा मुलूख आपल्या राज्याला जोडला. विजयनगरकराचा हा अमल इ. स १४५३ पर्यंत चालला. त्या सालीं बहामनी राजाचा सेनापति मलिक उल् तुजार यानें कोंकणावर स्वारी करून चौल व दाभोळ काबीज केलीं. पण यावेळीं मुसलमानाची सत्ता कोंकणात दृढ झाली नाहीं. शिर्के व मोरे या दोन छोटया राजानीं एकी करून विशाळगडच्या निबिड अरण्यांत मलिक उल् तुजारच्या सैन्याचा पार धुव्वा उडविला. या पराभवाचें शल्य मुस्लिम राज्यकर्त्यांच्या मनांत सतत सलत राहिलें सूड घेण्याच्या तीव्र लालसेनें इ. स १४६९ मध्यें प्रसिद्ध बहामनी दिवाण महमद गावान हा कोंकणात उतरला व पुष्कळ दिवस रेंगाळत चाललेल्या लढाईनंतर त्यानें विशाळगड काबीज केला. यापुढें मात्र विजयनगरकरांचें कोंकणातलें वर्चस्व पार नाहींसें झालें.[३]

बहामनी राजाचें या भागांतील वर्चस्व कमी अधिक प्रमाणांत इ स. १४९० पर्यंत टिकलें. त्याच्या आधींच निजामशाहीचा संस्थापक निजाम उल्मुल्क याचा मुलगा मुल्क अहमद यानें कोंकणातील छोटे अधिपति बुडवून टाकले होते. त्यानेंच १४९० मध्यें दंडाराजापूर कोळी राजाकडून जिंकलें. जालगावचे शेलार राजे याच काळांत नष्ट झाले असावे. यानंतरहि नवीन अधिपतींनीं डोकें वर काढलें असावें. कारण दापोलीजवळच्या दळवी राजाला शिवाजीनें इ. स. १६६० मध्यें जिंकल्याचा उल्लेख आहे.

---

३ अगदीं अलीकडे लाडघरचे श्री. वि. कृ वाळ यांनीं एक फारशी ताम्रपट मिळवला आहे. त्यावर अधिक संशोधन व्हावयाला पाहिजे आहे. अल्ली अदिलशहाच्या शिक्याचा पाटीलवतनासंबंधींचा तो ताम्रपट आहे. त्यात हें पाटीलवतन मूळचें रामराजाच्या कारकीर्दींचें. तें अल्ली अदिलशहानें पुढें चालूं केलें या ताम्रपटाच्या बाबतींत अनेक शंका येतात. म्हणूनच अधिक चौकशी आवश्यक. पण कन्नड राजांच्या सत्तेचा कानोसा या ताम्रपटातहि मिळतो या ताम्रपटाचें वाचन डॉ. पी. एम्. जोशी यानी केलें.

दंडाराजापूरच्या कोळी राजांचें स्वातंत्र्य नष्ट झालें त्याच सुमारास बहामनी राज्याचे तुकडे झाले. या वेळीं सावित्रीच्या उत्तरेकडचा कोंकणचा विभाग निजामशाहीकडे गेला, व सावित्रीच्या दक्षिणेकडचा प्रदश अदिलशाहीकडे राहिला.

सावित्रीच्या डाव्या तीराकडचा हा प्रदेश अदिलशाहीच्या सरहद्दीवर येत असे. अदिलशाहीचा कर्तबगार संस्थापक युसुफ अदिलशहा व तत्पूर्वीचा महमद गावान यानीं भारतात पहिले पाऊल टाकलें तें दाभोळ बंदरात त्यामुळें त्याची या प्रदेशावर मर्जी होतीच. कोंकणचें महत्त्वहि या धोरणी पुरुषाच्या ध्यानांत आलें होतें या सर्व कारणामुळें अद्यापपर्यंत उपेक्षित राहिलेल्या या भागाचें भाग्य उदयाला आलें. इ स. १५०२ मध्यें युसुफ अदिलशाहानें दाभोळला सुभेदार नेमला त्यानें या भागाच्या वसाहतीकडे मनापासून लक्ष दिलें. खोत वतनदारी अदिलशहानें एव्हापासून सुरू केली. असुरक्षितता व दारिद्य यात पिचलेला हा प्रदेश ! तेव्हा उर्जितकाल येण्याकरिता नवीन लागवड आवश्यक होती. कमी सारा आकारणीचें आमिष दाखवलें तर जमीनमालक लागवड करतील हें हेरून तशी व्यवस्था झाली स्थिर राजवट व सरकारी साह्याय्य यामुळें अन्नधान्याची निपज वाढू लागली. नवीन बागा उठूं लागल्या लोकवस्ती वाढूं लागली. हर्णैचें महत्त्व राज्यकर्त्यांच्या लक्षांत येऊं लागलें. सोळाव्या शतकाच्या मध्याच्या पुढें केव्हातरी सुवर्णदुर्गचा जजिरा किल्ला बाधण्यात आला. सुवर्णदुर्गच्या पचक्रोशीला दाभोळचें महत्त्व एव्हापासून प्राप्त झालें.

मुरूड ज्याभूभागावर वाढलें, पोसलें त्याभागाची मुरूडच्या जन्मापूर्वीची ही कथा– जन्मापूर्वीचा इतिहास. अथवा इतिहास कसला ? इतिहासाचा अभाव ! त्यात ना कर्तृत्व ना पराक्रम, कलाची चमक नाहीं कीं बुद्धीचें वैभव नाहीं. जें दिसतें तें मूक प्राण्याचें निर्बुद्ध जीवन ! एका जोखडाखालची मान दुसऱ्या जोखडाखालीं घालण्याइतके केविणवाणें जीवन ! शापित भूमीचें मूक स्पंदन मात्र त्यातून प्रत्ययाला येतें !

असा हा रानवट, गर्दीपासून दूर, व उपेक्षित भाग सिद्धपुरुषानें वसाहतीकरितां निवडला त्या वेळीं हर्णैचा सुवर्णदुर्ग किल्ला नव्हता. दाभोळ, हा सरहद्दीवरचा सुभा म्हणून महत्त्वाचा, हीहि घटना भविष्याच्या उदरातील होती त्यामुळें स्नानसंध्या, पूजाअर्चा व राजाचें अभीष्टचिंतन या हेतूनें तपोवनाचा एकांत देणारें, दूर कोपऱ्यांत असलेलें व गर्द झाडी आणि ठायींठायीं पाटस्थलें असलेलें मुरूड हें रम्य स्थल गंगाधरभटानें आपल्या निवासस्थानाकरिता निवडलें.

सिद्धपुरुषाला पुढें यवनराज्य येणार हें कळलें होतें. भविष्य त्याच्या दृष्टिपथांत होतें. पण फार दूरचें नव्हे. शतकें दोन शतकें गेलीं असतील नसतील तोंच सिद्धपुरुषाच्या निवासस्थानातच बसून उजव्या कोपऱ्यात पाहिलें तर सुवर्णदुर्गचा भव्य किल्ला डोळ्यांनें उभा असलेला दिसूं लागला. आणि जणूं काय सारा भूभाग मुचकुंदाच्या दीर्घ निद्रेतून जागा झाला. कारण लवकरच तोफांचे आवाज दोन कोसावरच्या सुवर्णदुर्गलाच नव्हे तर मुरूडच्या एकांत पवित्र जागीं घुमूं लागले! मुरूड हें आडवाटेला राहिलें नाहीं! चांगलें राजमार्गावर येऊन पडलें!

# प्रकरण २ रें

## सिद्धपुरुष

" सिद्धपुरुषाची अगाध महिमा " एक स्थानिक शाहीर.

मुरूडची वसाहत अशा तऱ्हेच्या पार्श्वभूमीवर झाली ती वसाहत करणारा गंगाधरभट हा नागर ब्राह्मण होता. पुढें दिलेल्या दोनहि बखरींच्या सुरुवातीच्याच वाक्यांवरून ही गोष्ट उघड होते. गंगाधरभट हा कनौजा ब्राह्मण होता हें कै. रावसाहेब मंडलिक यांचें अनुमान सोडून दिलें पाहिजे. वसाहतीच्या त्या नवल कथेकडे वळण्यापूर्वी गंगाधरभट व नागर ब्राह्मण यांचा अधिक परिचय करून घेऊं या.


चित्पावनाप्रमाणेच नागर ब्राह्मणाचा इतिहास हा पश्चिम भारताच्या इतिहासांत एक कुतूहलाचा विषय होऊन राहिला आहे चित्पावन कोंकणात वसाहत करावयाला आले ते कोठून आले याबद्दल विद्वानात शंभर वर्षांच्या ऊहापोहानंतरहि एकमत नाहीं वडनगरचे नागर स्वत ला कुंकण नागर म्हणवितात कुंकण म्हणजे कोंकण. " नागराः चित्तपावना " अशी नागर व चित्पावन यांची समव्याप्ति दाखविणारा श्लोकखंड आहे. शिवाय या नागरांपैकीं तिघे बंधु चित्पावनांचे तीन गांव स्थापन करण्याइतका त्यांचा विश्वास संपादन करतात, त्यांच्यात मिसळून जाऊन अखेरपर्यंत तेथेंच रहातात ! या सर्वांची संगति लावण्याचा प्रयत्न केला तर नागर व चित्पावन यांचा जवळचा संबंध असावा असा तर्क सहजच मनात येऊन जातो.[४]

नागर ब्राह्मण हे मूळ उत्तर भारतातून गुजरातेंत वडनगर येथें येऊन राहिले. तेथें असतांनाच त्यांनीं निरनिराळी वतनें संपादन केलीं होतीं. इ स. १००० च्या

---

४ हा तर्क लेखकाला आपणहून सुचला नाहीं " सह्याद्री " ( ले. स आ जोगळेकर ) या पुस्तकांत ' गुजराती संशोधकाच्या मतें नागर व चित्पावन एक " असें विधान आलें आहे. श्री. जोगळेकर यांना हें विधान मान्य नाहीं. येथें हेंहि लक्षात ठेवावयास हवें कीं, गुजराती संशोधकांतहि हें विधान सर्वमान्य झालेलें नाहीं. अधिक विचार व्हावा या हेतूनेंच लेखकानें या विधानाचा वर उल्लेख केला आहे.

बखरीचें पहिलें पान



सुमारास ते सौराष्ट्रात विशालनगर येथें आले त्यांच्यात पुढें अनेक उपजाती निर्माण झाल्या. सौराष्ट्रात आल्यापासून त्यांनीं महत्त्वाच्या जागा व्यापण्यास सुरुवात केली. महत्त्वाकांक्षा, बुद्धिमत्ता आणि राजकारण-चातुर्य यांच्या बळावर गेलीं आठ नऊ शतकें त्यांनीं गुजरात व सौराष्ट्र यांच्या इतिहासावर छाप पाडली आहे.

भारतातील जातींच्या इतिहासाला नागरापासून सुरुवात झाली असें म्हणायला हरकत नाहीं " एक अविज्ञात ब्राह्मण नागरांच्या शहरीं आला. त्याला एका नागर ब्राह्मणानें आपली मुलगी दिली पुढें तो ब्राह्मण नसून चांडाल आहे असें कळलें तेव्हां जातींत मोठा घोटाळा उत्पन्न झाला आणि नागरांनीं तेव्हांपासून असा नियम केला कीं, नागर ज्ञातींतील ब्राह्मणाशिवाय दुसऱ्या कोणासहि मुलगी द्यावयाची नाहीं. त्यासाठीं त्यांनीं नागरांचीं कुळें परिगणित केलीं. हळुहळू हीच व्यवस्था बहुतेक सर्व जातींत किंवा पोटजातींत अमलात आली." ( मध्ययुगीन भारत खंड ३ ). तत्पूर्वी ब्राह्मण आपल्या नावाबरोबर फक्त शाखा व गोत्र सांगत असत. १३ व्या शतकाच्या पुढें 'नागर जातीं'चा ( नागरज्ञातिभाजा ) असा उल्लेख येऊ लागला. मुरुड येथें आलेला सिद्धपुरुष हा नागर जातीचा. म्हणजेच हा १३ व्या शतकाच्या पुढें असावा असा तर्क सहजच सुचतो

चित्पावन राजसत्तेचा पाठिंबा येण्यापूर्वीच पसरले कानडा जिल्ह्यात चित्पावनांची वस्ती आहे ( गेल्या शतकांतील प्रसिद्ध विदुषी पं. रमाबाई या चित्पावनांतीलच ) चित्पावनापेक्षाहि नागरांचीं परिभ्रमणें जास्त विस्तृत आहेत. खंबायतच्या आखातापासून ईशान्य पूर्व व विशेषतः दक्षिणेकडे त्याचा संचार शतकानुशतकें पहायला मिळतो. अहिछत्राहून बत्तीस कुटुंबें दक्षिणेंत वसाहतीला गेलीं होतीं. द्वैतमताचा प्रसिद्ध प्रणेता मध्वाचार्य हा याच नागर कुळांतील असें म्हणतात. आपल्याजवळ कोंकणात जंजिरा-मुरुड येथें अजूनहि नागरसेठींची वस्ती आहे.

तेव्हा नवीन नवीन प्रदेशांत वसती करून त्या प्रदेशांत नवीन रक्त व विचार रुजविणें हें नागराच्या रक्तांतच आहे असें दिसतें. असेच तीन नागर बंधु आपल्या देशाहून फिरत फिरत दक्षिणेकडे निघाले. या तिघाची नावें गंगाधरभट,[५] दिवाकर-

५ प्रा. हरिभाऊ वेलणकर यानीं गंगाधरभटाचे "मंडलिक महाकाव्य" नांवाचें संस्कृतकाव्य प्रसिद्ध केलें आहे. गंगाधरभट हा नागर ब्राह्मण. अंतर्गत पुराव्यावरून हें काव्य इ. स. १४६०च्या सुमारास लिहिलें असावें असा प्रा. वेलणकर यांचा तर्क

भट्ट व पद्माकरभट. गोत्र गार्ग्य हे कोणत्या कालातले याचा केवळ अंदाजच करतां येतो. बाराव्या शतकानंतरचे असावे असें वर सांगितलेंच आहे. शिलाहार कुळातला ( शेलार ) जालधर राजा त्या वेळीं राज्य करीत होता ठाणें, कऱ्हाड व पन्हाळा येथील शिलाहारांच्या वंशावळींत हें नांव येत नाहीं त्यामुळें पहिल्या प्रकरणात सांगितल्याप्रमाणें यादवांनीं बुडविलेल्या ठाण्याच्या शिलाहाराचाच हा वंशज असावा. म्हणजे तेराव्या शतकाच्या पुढचा काळ येतो. तसेंच या राजानें सिद्धपुरुषाला ताम्रपट करून दिले असा उल्लेख आहे. चवदाव्या शतकाच्या पुढें ताम्रपटाचा वापरहि कमी होत चालला. या संदर्भात आणखी दोन गोष्टींचा विचार हवा. " पुढें यावनी राज्य होणार असें चित्तात आणून " सिद्धपुरुषानें शून्यालयाची स्थापना केली असें बखरींत म्हटलें आहे. याचा अर्थ कोंकणांत इस्लामी राज्य सुरू झालें होतें असा करावा लागतो पण ती सत्ता दृढमूल झाली नसावी – खेडोंपाडीं पोंचली नसावी. त्याचप्रमाणें इस्लामी सत्तेच्या उधाण भरतीचीहि कल्पना शेंकडों कोस व अनेक राज्यांच्या सीमा ओलांडून आलेल्या या चौकस व बुद्धिमान पुरुषाला आली असली पाहिजे. याबरोबरच आणखी एका गोष्टीकडे लक्ष वेधवणें आवश्यक आहे. ती ही कीं उपलब्ध झालेल्या कागदात इ. स. १६०० च्या पूर्वीच्या एकाद्याहि घटनेचा उल्लेख नाहीं. अर्थात् हेंहि विधान अपूर्णच आहे. कारण इ. स. १६२४ च्या सुमारास मुरूडवर असें संकट कोसळलें कीं त्यातून मुरूडच्या इतिहासाला आवश्यक अशीं साधनें संपूर्ण नष्ट झालीं या सर्व ऊहापोहाचा अर्थ असा कीं मुरूडची वसाहत चवदाव्या शतकापासून पुढें व पंधरावें शतक पुरें होण्याच्या पूर्वी झाली.

दोनहि बखरींचा एकत्र विचार केला तर मुरूडची स्थापना करण्यापूर्वी या तिघां नागर बंधूंची दिवें व नादिवडे या ठिकाणीं वस्ती होती ( दिवें हें जंजिरा मुरूडजवळ

---

आहे सिद्धपुरुष तो हाच असावा काय ? सिद्ध पुरुषानें परांजपे घराणें मुरूडला आणून वसविलें. इ. स. १६३५ च्या कागदात परांजपे यांचे मंडलिक झालेले आढळतात. परांजपे यांना मंडलिक हें नाव कसें प्राप्त झालें ? मंडलिक महाकाव्यातील मंडलिक सौराष्ट्राचा शेवटचा स्वतंत्र हिंदु राजा होय. सुलतान महंमद बेगडा यानें मंडलिक राजाला इ. स. १४७२ मध्यें जिंकून त्याला मुसलमान धर्म स्वीकारावयास लावलें होतें.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
23622 दि. 31/12/81
सिद्धपुरुष 11
क्रमांक .. 692 .... नों. दि. 29/12/81

व नांदिवडें हें जयगडजवळ. हीं दोनहि स्थळें चांगल्या बंदराच्या जवळ आहेत ). मुरूडला आणून वसविलेल्या ब्राह्मणाकडे पाहता गंगाधरभट ह्याची वस्ती नादिवडें या ठिकाणींच असावी असें दिसतें. कारण मुरुड येथें वसविलेल्या काहीं ब्राह्मणांचीं मूळ ठिकाणे वाशिष्ठीच्या दक्षिणेस असलीं पाहिजेत. जोशी हे, वरवडे येथील, असा उल्लेख प्रश्नमालेंत आला आहे. ( पहा परिशिष्ट ) बाळ व बेहरे हे मूळ एकच असावेत. बेहरे हे खारेपाटणचे ( पहा प्रकरण ९ ) पराजपे हे आडिवरें किंवा गावखडी म्हणजे मुचकुंद खाडींतले वैशंपायन हे सिद्धपुरुषाचे शिष्यत्व करीत हिंडत होते असें वैशंपायनांच्या एका साक्षींत नमूद केलेलें आहे. हे पंचनदी किंवा गुहागरचे असावे ( वैशपायन याच्याविषयींचे श्री ना. गो. चापेकर यांचे मोठे मजेदार तर्क आहेत. त्याच्या गोत्रावरून ते मूळचे तेलगण प्रातातले असावे असें ते अनुमान करतात. पहा–चित्पावन पृ ६१, २४२ ). एवढ्या कुटुंबासंबंधीं निदान वरील विधान करता येतें शिवाय एक गोष्ट निश्चित आहे कीं शतकाच्या वाटचालीबरोबर चित्पावन कुटुंबें चिपळूण तालुक्यातून व त्याच्या दक्षिण भागातून उत्तरेकडे सरकत चाललीं. तेव्हा मुरुड येथें स्थापन केलेलीं कुटुंबें गंगाधरभट यांनीं दक्षिण कोंकणांत प्रवास करीत असतानाच हेरून ठेवलीं असलीं पाहिजेत. त्या कुटुंबाचा व गंगाधरभटाचा चांगला परिचय असावा. गाव स्थापन करण्याचा, दक्षिणेंत यायला निघाल्यापासून, त्याचा विचार असावाच, असें आपल्याला जरी काहीं म्हणता आलें नाहीं, तरी ईश्वरोपासनेकरिता निवात व निर्वेध स्थल गगाधरभट शोधीत होता हें निश्चित

तें निर्वेध स्थल त्याला कसें मिळालें व त्यानें मुरुड गावाची स्थापना कशी केली ती नवलपूर्ण कथा आपण मुळातूनच पाहू या.

हकीकत कसबे मुरुड

श्री

हकीकत कसबे मुरुड प्रात दाभोळ. पूर्वी सिद्धपुरुष नागर ब्राह्मण फीरस्ता फिरत आला तो नादिवडें यासी आला. तो दातार ब्राह्मण याचे घरीं राहिला त्यामध्यें अने(क) प्रकारच्या विद्या होत्या. आणि देवता सिध्ध होती व वेताल सिध्ध होता व साब्रारी बंगाली विद्या होती. दातार ब्राह्मण याजला मूल तीन व कन्या बालविध्वा येक येकूण चार जणें होतीं. त्या चोहोजणास आपली विद्या सागोन परमविद्वान आपल्याप्रमाणे केले, त्यामध्यें ती विध्वा बायको ती परमनिपुण साब्रारीबंगाली विद्ये-

मध्यें निपुण जाहाली. विद्या सिध्ध होऊन जालंधर राजा राज्य करीत होता त्याजवळ सिद्धपुरुष ती चार भावंडें घेऊन आला. त्याजवर आसूद (यापुढील बंदाचा भाग हरवला आहे. त्यांत जास्तीत जास्ती १०–१२ ओळी गेल्या असाव्या) . म्हण वस्ती केली आणि ब्राह्मणास अधिकार दिल्हे. स्नानसंध्या करून श्रीची आराधना करीत असत. त्यास कोणे येक दिवसी प्रातोप्राती बहुरूपी बहुरूप घालून जीतपत्र घेत घेत असे या राजद्वारी आले बहुरूपी फुगडी आणि बहुरूप घालून जीतपत्र घेऊन जावे तेन्हा ते बहुरूप घालू लागले तेन्हा राजेयासी संकट पडले की आपले राज्यातून हे जीतपत्र घेऊन जातात. याजकरिता आपले राज्यामध्यें दंवडी पिटली की या बहुरूपी याजबरोबर कोणी गावगुड खेल करी ऐसा असिला तर आणावा. तेन्हा ते फिरोन आले की कोणी नाही ऐसे जाहाले. तेन्हा गगाधरभट आपले गुरूची व श्रीची आज्ञा घेऊन राजद्वारी गेले आणि राजश्रीजवल विनंति केली की आम्ही ब्राह्मण आहो आम्हास आज्ञा जाहाली (तर) आम्ही याजवल खे(ल) पाहों. त्याजवर बहुरूपी बहुरूप घालू लागले आणि त्याजबरोबर हे खेलो लागले खेळता खेळता चार दिवस जाहाले परंतु कोणी कोणास आटपेना ऐसे जाहाले त्यामध्यें बालानंध्वा त्याची ब्राह्मण बाइका जा मायाविद्यमध्यें उत्कृष्ट परंतु तिचीही विद्या त्या बहुरूपीयापुढें चालेना ऐसे जाहाले तेन्हा गंगाधरभट याणी आपले गुरूचे व श्री दुर्गेचे ध्यान करून श्रीस विनति केली त्याजवरून श्रीचे कानचे तानवडे अमोलक अमोलिक याचे हाती हाती आले. त्याजवर बहुरूपी याजला दुसरे आणावयासी सांगितले परंतु त्याजला दुसरे येईना. त्याजवरून हे हटले. बहुरूप समाप्त जाहाले. बहुरूपी याजला जितले बहुरूपी याजपासून मागील जीतपत्रे घेतली. तेन्हा बहुरूपी यानी फिरोन बहुरूप घालू नये ऐसे जाहाले तेन्हा बहुरूपी याजला शरण आले की आम्ही बहुरूप घालू नये परंतु आमचे पोट भरणार नाहीं. तुम्ही कृपा करून आम्हास बहुरूप घालावयासी आज्ञा द्यावी. त्याजवर याणी बहुरूपाची आज्ञा दिली आणि जेथें आपले दाताराचे गावी घर असिलियासी त्याचे घरची भिक्षा घेऊ नये. याप्रा। (प्रमाणें) त्या(ज)वळ करार करून त्याजला आज्ञा दिली. याजप्रा। जाहाले असता राजश्री फार सुप्रसन्न जाहाले, आणि बोलिले की हे प्रसंगी जे मागाल ते तुम्हास बक्षीस आहे त्याजवर हे बोलिले की आम्हास स्नानसंध्येस स्थळे उदरनिमित्याचे चाले आणि कोणा येकाचा वेध नाहीं दिवाण अथवा बलुतेकरी कोणाचा वेध नाही व मागील कोणाचा नेम

नाही याज प्रा। करून दिल्याने स्नानसंध्या करून राहो आणि राजयास अभिष्ट चिंतू. याजप्रा। बोलिले याजवर राजश्रीनी आज्ञा केली की तुम्ही असी स्थले निर्वेध पाहोन ( येणे ) त्याजवर आसूदाहून निघाले ते बंदरकि( नारा ) दक्षिणेकडे पाहात पाहात गेले. बंदर कि ( नारिया ) सी वसाहात नवती. त्यामध्ये ( बंदरोबंदरीं ) गाव पाहात सेतवडेयाचे खाडी पावेतो गेले. आणि तेथून फिरले ते उत्तरेस पाहात पाहात चोलेपावेतो गेले आणि तेथून फिरोन आले आणि राजश्रीजवळ सांगितलें की बंदर किनारेयाचे जागा रान वाढोन ओसाड आहेत व वेलाटीस पाटपाणी येत असे. जागा ब्राह्मण राहिलियास स्नानसंध्या योग्य आहेत. आज्ञा जाहालियान ( व ) साहाल करू. आज्ञा घेऊन निघाले ते आद्यग्रामाचे पश्चिमेस रान बदरकिनारा जागा नीट करू लागले. त्यास वटवृक्ष मोठा होता तोडू लागले ( त्या ) मध्ये स्वयंभु देव निघाली आणि बहुत भुतावलि उठली. त्याणे माणसे मरो लागली तेव्हा सिध्धपुरुष ध्यानस्त बसिले आणि ध्यानी आणिले त्याजवरून भुतावलीस गुतावली काढावी व वर्षामध्ये येक नरबळ द्यावी याजप्रा। करार करून वेताजवळ सर्व बंदोबस्ती करून जंगल तोडून त्याची बहीण बोडकी जो माय तिजला साबरी वेताल साध्य होता. तीमध्यें केळीचे कालाची नाव करून समुद्र पलाटण करावे याजप्रा। अनेक विद्या होत्या तिजला ग्राम सिद्ध करावयासी सागितला तिणें अल्प-यासेक ( येथें कांहीं ओळी गेल्या असाव्या )... रुन ग्रामाची भूमी सिध्ध केली. आणि कर्णाटक प्रातीहून देवाच्या प्रतिमा आणून गाव वसाहात करावयासी प्रारंभ दक्षिणेकडून केला. प्रथम आपणास जागा नेमून उत्तरेस गडदू स्थापिला. त्याचे उतरेस वैशंपायन याजला जागा नेमून त्याचे उतरेस शीमेपलीकडे रुद्रभूमीस शव न्यावयासी मार्ग ठेविला. त्याचे उतरेस रिसबूड ब्राह्मणास जागा नेमिला. त्याचे उतरेस वैद्य ब्राह्मणास जागा नेमिला. त्याचे उतरेस बाळ ब्राह्मणास जागा नेमिला. त्याचे उतरेस श्री. गंगानारायण याचे देवलास व त्याचे पूजेस ब्राह्मण पराणजप्या यासी जागा नेमिला. त्याचे उतरेस जोसी याजला जागा नेमिला. त्याचे उतरेस गडदू स्थापून श्रीचे देवालयासी व त्याचे अधिष्ठानास दाडेकर याजला जागा नेमिला. त्याचे उतरेस गड्डदु स्थापून त्याचे उतरेस कोपरकर ब्राह्मणास जागा नेमिला. त्याचे उतरेस सुतर ब्राह्मण याजला जागा नेमिला. त्याचे उतरेस रुद्रभूमीस स्थल ठेविले. त्याचे उतरेस राहाळकर ब्राह्मण याजला जागा नेमिला. त्याचे उतरेस घारप ब्राह्मणास जागा नेमिला. त्याचे उतरेस गडदू स्थापून त्याचे

उतरेस यवनास जागा नेमून त्यामध्ये शून्यालयासी जागा नेमिला. त्याचे उत्तरेस खाडीपलीकडे उतरेस बाहेरवाडीस जागा नेमून त्यामध्यें सोनार, कासार, सीपी, सुतर, न्हावी, परीट, कुंभार, तेली, साळी, कुळवाडी, भंडारी, चाम्हार येकूण संपूर्ण अन्य जातीसी जागा नेमिला. त्याचे उतरेस श्री सीमादेवीचे देवळास जागा नेमिला. त्याचे उतरेस सीमे ( दोन अक्षरें गेलीं आहेत ) पर्वत त्याचे नाव चद्रासारिखा पाहोन त्याचे नाव चंद्रागिरी ठेविले. त्याचे पूर्वेस पूर्वेकडेचे सीमेस पर्वत पर्वताअलिकडेस उदक पाहोन क्षेत्रपाळ देव स्थापावयासी जागा नेमून दक्षिणेकडेस जाऊन दक्षिणेचे सीमेचा पर्वत त्याचे भद्रागिरी नाव ठेवून त्याचे उतरेस उदक पाहोन तेथे क्षेत्रपाल स्थापावयासी जागा नेमून त्याचे पूर्वेस उदक पाहोन क्षेत्रपाल स्थापावयासी जागा नेमिला त्याजप्रमाणे चतुःसीमा. चतु:सीमेस देव स्थापू लागले. तऱ्हा श्रीच व गुरूचा आज्ञा घेऊन आद्य ग्रामी मान दिल्हे होते त्याजप्रा। का। ( कसबे ) केला त्यामध्यें मान दिल्हे. प्रथम पहिला मान महाजनकीचा आपणास ठेविला. त्याजवर पहिला मान वैशपायन उपाध्ये यासी दिल्हा. दुसरा मान वरवडेयाहून जोसी आणिले त्यास दुसरा मान जोतिषपणाचा दिल्हा तिसरा मान फिरोन वैशंपायन यासी धर्माधिकरण दिल्हे. चवथा ( मा ) न वैद्य याजला दिल्हा. याजप्रमाणें भिक्षुकपणाचे मान देऊन श्री दुर्गेची स्थापना केली. श्रीस इनामत वेगळी नेमिली. आणि श्रीचे अधिष्ठानास चाकरीस साहित्यास कारभारी नेमावे त्यास इनामतपैकीं सेतें द्यावी. त्या प्रथम माहाजनकीचा मान दाडेकर ब्राह्मण यासी दिल्हा. आणि त्याणें श्रीची पूजा करावी. अधिष्ठानाचे धणीपण त्याकडे त्याणे करावे. त्याजला दुसरे साहित्यास कारभारी वर्तक असे नाव ठेवून दुसरा मान कोपरकर यासी दिल्हा. आणि त्याजला श्रीचे अधिष्ठानाचे लिहिणे व इनामतीची जमाबंदी कोठी व जामादारखाना त्याचा त्याणे कारभार करावे. व तिसरा मान बाल वर्तक याजला दिल्हा. त्याणे श्रीचे देवालयामधी श्रीचे दर्शनास येईल त्याची चवकसी करावी व देवलांत बसावयासी घालवावे व सारा देवलांत असावे. तिसरा मान सुतर ब्राह्मण याजला दिल्हा आणि त्याणे देवलाचे काम मोडिले तुटले पाहोन ते करवावे. व पाचवा मान धारप ब्राह्मण याजला दिल्हा त्याणे सिपी याचे काम कापडाचे त्याणे करावे. याजप्रमाणे सर्वांनी आपली कामे करावी आणि त्रिकाल श्रीचे पूजेचे साहित्य करावे व यात्रेचे साहित्य करावे. चवथा मानकरी याणे त्रिकाल पूजा सागावी. धर्माधिकारी याणी पुराण सागावे

वारीक याजला सातवा मान देऊन त्याणे श्रीसन्निध जी चाकरी पडेल ती करावी. आणि नरबल देणे ती त्यासी द्यावी. याजप्रा॥ श्रीचे अधिष्ठान करून त्याजला इनामतीपैकीं सेते वाटून दिल्ही. माहाजन याजला श्रीचा आगर व बावील सेत दिल्हे. व चवथा मानकरी याजला मळा व कोपरकर याजला पेढे व आळ यासीं लंगर व सुतर याजला गुबरवणे व घारप याजला कणकीच्या पाळ्या व वारीक याजला मड सेते याजप्रा॥ सेते देऊन त्याही सेते लावून चवथाई पीक श्रीचे कोठीस श्रीस द्यावे आणि बाकीचे आपण घ्यावे. आणि श्रीची चाकरी जी पडेल ती करावी. याजप्रा॥ श्रीचे अधिष्ठान करून आपले अधिष्ठानास रिसबूड याजला ग्रहस्त मईलीमध्यें मान देऊन आपला घरचा कारभार सांगितला व राहाळकर याजला मान देऊन बाहेरवाडीचा कारभार सांगितला. याजप्रा॥ अधिष्ठान करून ग्रामदेव श्री भैरव व श्री काळंबा स्थापून त्याजला गुरव पूजेस ठेविला. आणि त्याजला कशेडी क्षेत्रावर राहावयासी ठिकाण दिल्हे सीमेचे ठिकाणा-आलिकडे तिही जागा क्षेत्रपाळ स्थापिले, श्री सीमादेव स्थापिली आणि तिजला सेवा अधिकारी स्थापिला त्याणे पूजा व लावणी त्याणे करावी व त्याजला बाहेरवाडीचा अधिकार सांगितला त्याजकडे बाहेरवाडीचे वडीलपण दिल्हे. याजप्रा॥ ग्रामदेवते स्थापून श्रीनारायण व गंगानारायण यासी स्थापना करून त्याजला पूजेस पराणजप्या यासी ठेविला. आणि त्याजला श्री गंगानारायण याचा आगर व नारायण पाटया सेत दिल्हे. श्री महारुद्र याची स्थापना करून त्याजला गुरव पूजेस ठेवून त्याजला चदनखरी सेत दिल्हे व श्रीव्याघ्रेश्वर याजला पलीकडे इनाम सेत करून दिल्हे. व शून्यालयासी त्या करून स्थापना करून त्याजला काजी स्थापून व अनखी मुकादम वगैरे स्थापिले ( तीन अक्षरे गेलीं आहेत ) केस सेत इनामतकरून दिल्ही. याजप्रा॥ गावाची रचना करून राजश्री याजवल जाऊ ( न ) गावाचे इनामपत्र करून घेतले व ताम्रपट करून घेतले व गुहागर व दिवे व करदली याचेहि इनामपत्रें घेऊन त्याची त्यास दिल्ही. याजप्रा॥ तीन कसबे व दर कसबे यासी कर्याती गाव कसब्यास चवऱ्यासी. त्याची याद़ी अलाहिदा आहे. चैत्र शुद्ध प्रतिपदेपासून श्री यात्रा वसंत नवरात्र प्रारंभ प्रतिपदेचे दिवसीं श्रीचा अधिकारी याणें श्रीचे यात्रेची प्रातःकालीं आमंत्रणें करावी.

हकीकत समाप्त.

# प्रकरण ३ रें

## वसाहत

" करोडिका क्षेत्रावर उभे राहून सिद्धपुरुषानें खालीं पाहिलें "


स्मशानभूमींत नंदनवन फुललं ! आतां प्रवास संपला होता ! आयुष्यभरची वणवण संपली होती ! विद्येची साधना व अस्थिर राजकारणाचे चटके आता मार्गी पडले होते कमावलेली विद्या व जमवलेला अनुभव हीं राहिलीं होतीं. हींच आतां सिद्धपुरुषाला जन्माची सोबत करणार होतीं !

प्रसन्न मनानें सिद्धपुरुष महारुद्राची घाटी चढून गेला. झुळझुळ वाहणाऱ्या गारंबीच्या झऱ्याजवळ उभा राहून नुकत्याच निर्माण केलेल्या नवीन सृष्टीकडे त्यानें नजर टाकली ! समोरच उजवीकडच्या कोपऱ्यात हर्णैचे खडक सिंधुसागरात घुसलेले दिसत होते. बाजूलाच सरपटणारा व फेंसाळणारा सागर अखंड गर्जना करीत मुरूडचें रक्षण करीत होता. जरा अलीकडे फुटका टेंभा सागराच्या विशाल विस्ताराकडे पाहून अकस्मात् दचकल्याप्रमाणे वाळूंत पुतळयासारखा निश्चल उभा होता. त्याच्याहि अलीकडे गर्द झाडीनें झाकून गेलेली आसव नदी घाईगर्दीनें सागराला मिळायला चालली होती. आणि आपल्या पायापासून उतरत सपाट होत गेलेलें, गारंबीच्या पाण्यानें सुपीक बनलेलें रुंद मैदान ! तें थेट नदीपर्यंत.

या मैदानाच्या पलीकडे पश्चिमेला गंगाधरभटानें पाहिलें. कोपरकर, धारप, राहाळकर कोणाचींच घरें उमगेनात. गर्द झाडींत एकाचेंहि घर दिसत नव्हतें. स्वतःचें ठिकाण तर पाठच्या डोंगराआड अदृश्य झालें होतें.

अर्धी घाटी राहिली होती ती ओलांडून सिद्धपुरुष धारेवर आला. आतां थेट कर्दे गावापर्यंत त्याची दृष्टि पोंचत होती. समोर असणाऱ्या सागराचं विशाल रूप आतां डोळयात मावत नव्हतं. लाट पुढें सरके तेव्हां पाघरलेल्या उपरण्याची सुरकुतीच अलगद पुढें सरकते असा भास होई. सिद्धपुरुषानें डावीकडे कोपऱ्यात पाहिलं. वादळाच्या पऱ्याची जागा जेमतेम ओळखून काढली. केतकीच्या बनात पाण्याचा रुपेरी प्रवाह ओळखणं मुष्किलीचें झालें होतें ! पण तें निश्चित केल्यावर मात्र बाकीच्या


सिद्धपुरुषाचें देऊळ, मुरुड



मराठी शाळा, मुरूड



कर्वे तलाव ( गणपतीचें तळें ) मुरूड



## लाडघर येथील ताम्रपट

लाडघर येथें श्री. वि. कृ. बाळ यांना मिळालेल्या फारशी ताम्रपटाचा तर्जुमा पुढें दिला आहे.

| बादशहा | अली अदिलशहा बादशहा | बादशहा |
| --- | --- | --- |

### फरमाने बादशहा

मौजे लाडघर जुमला दाभोळ, अमल रामराजाकानडाचा होता. अली अदिलशहा बादशहा झाला. मुख्य ठाणे विजापूरकडून मुस्तफाखान वतनदार झाला. पुरातन काळचा वतनदार रामाजी बिन नानाजी कदम पाटील यास मानपान, होळी, पोळीचा वतनदार सभाजी बिन कानोजी ( मधला मजकूर लागत नाहीं ) वतनदार केला ( सन लागत नाहीं. )

भाषांतर शब्दशः नाहीं. मुस्तफाखान हा दाभोळचा सुभेदार होता. हा शहाजीचा समकालीन

---

पृष्ठ ५ वरील तळटीपेंत उल्लेखिलेला ताम्रपट.

खुणा त्याला मनांतच समजून घ्याव्या लागल्या. प्रथम आपली मठी, पुढें वैशंपायन, या क्रमानें मनानेंच खुणा पटवीत नारायणाच्या देवळापर्यंत तो पोचला. इथेंच वरच्या बाजूला पण आपल्या पायाच्या खालीं भैरवाचें देऊळ. दोनहि देवांना मनांतच नमन करून उत्तरेच्या दिशेनें त्यानें पुन दृष्टि टाकली गंगानारायण, परांजपे, याच्यापुढें जोशीचें ठिकाण निश्चित केल्यावर भक्तिभावानें पुढच्या ठिकाणाकडे पाहिलें इथें दुर्गादेवीचें देऊळ ! मनानेंच श्रीदुर्गेला नमस्कार केला.

समाधानाचा सुस्कारा टाकून सिद्धपुरुष खालीं उतरला उरलेलें आयुष्य त्यानें वादळयाच्या खालीं भद्रागिरीच्या पायथ्याशीं ईश्वरचिंतनात घालविलें. अखेरपर्यंत सेवा करण्याचें भाग्य शिष्य वैशंपायन याला मिळालें.

निसर्गाच्या ललित आकृतींतील प्रमाणबद्धता मुरुड गावाच्या रचनेंत सहज दृष्टींत भरते. बरोबर मध्यभागीं देवीचें भव्य पटांगण. त्याच्या उत्तर व दक्षिण या दोनहि बाजूस दूरवर हिरव्या पंखाप्रमाणें मुरुड गाव वसलें आहे. या दोनहि पंखात मध्यावर दोन मंदिरें दडलेली आहेत वसाहतीचे वेळीं उत्तरेकडील या पंखाच्याहि पलीकडे, आसव नदीपलीकडे, सर्व कारागीर व कामकरीवर्ग याची वस्ती होती. वह्याळ ते आसव नदी अशी दक्षिणोत्तर व तीहि फक्त पश्चिम आळीला ब्राह्मण वस्ती होती. भावी काळाचीं पावलें ओळखण्यात चतुर असलेल्या सिद्धपुरुषानें या आळीच्या उत्तरेला पण नदी अलीकडे यवनाना मानाची जागा दिली

गाव स्वयपूर्ण असणें ही त्या काळाची गरजच होती. ती साधण्याकरितां सर्व प्रकारच्या श्रमजीवी व बुद्धिजीवी जमातींची वस्ती मुरुड येथें सिद्धपुरुषानें कर-विली. विपरीत काळाच्या तडाक्यांत सापडल्यानंतर त्यांतील कांहीं जमातीनीं स्थलां-तर केलें. सुतार, कासार व अगदीं अलीकडे न्हावी या त्या जमाती होत.

गावाची स्वयंपूर्णता साधण्याकरितां किती दूरवरचा विचार सिद्धपुरुषानें केला असेल याचें एकच उदाहरण सहज लक्षांत येतें. त्या काळीं मुरूडच्या आसपास ब्राह्मणवस्तीचे फारसे गांव नव्हते. वाहतुकीच्या साधनांचा व मार्गांचा अभाव होताच. शिवाय दूरचा प्रवास सुरक्षिततेच्या अभावीं अशक्य नसला तरी कठीण, यामुळें जीं ब्राह्मणकुटुंबें मुरुड येथें रहावयास आणावयाचीं त्यांच्यांत आपसांतच सोयरीक होणें इष्ट तशी सोय असेल तर या ठिकाणीं वसाहत करायचें धाडस करायला लोक तयार होतील.

विवाहसंबंधाकारिता चित्पावनाच्या चौदा गोत्रांचे एकूण सहा गट पाडलेले आहेत. या प्रत्येक गटातील एकतरी कुटुंब अशा स्वयपूर्णतेला आवश्यक होतें. सिद्धपुरुषानें या गोष्टींचा विचार केला होता हें पुढील तक्त्यावरून ध्यानात येईल मागच्या प्रकरणात आलेली बखर ही सर्वांत प्राचीन बखर होय असें लेखकाचें मत आहे. तींत पुढील ब्राह्मणकुळें मुरुड येथें वसतीला आलीं असें म्हटलें आहे तीं त्यांच्या गोत्रासुद्धा पुढें दिलीं आहेत

( १ ) वैशंपायन–नित्युंदन ( २ ) परांजपे–विष्णुवृद्ध ( ३ ) जोशी–शांडिल्य ( ४ ) दाडेकर ( दांडेकर )–वाशिष्ठ ( ५ ) कोपरकर–वाशिष्ठ ( ६ ) सुतर–? ( ७ ) राहाळकर–भारद्वाज ( ८ ) धारप–कपि ( ९ ) वैद्य–? ( १० ) बाळ–बाभ्रव्य ( ११ ) रिसबूड–शांडिल्य यांखेरीज उपलब्ध अनेक कागदावरून फणसूं ( फणसवणें ) येथील ( १२ ) हिरे-गोत्र वत्स हेहि मुरुडला सुरुवातीपासूनच होते. एकमेकाशीं न पटणाऱ्या गोत्रांचें कोष्टक पुढें दिलें आहे.

| | | |
|---|---|---|
| कपि, गार्ग्य, भारद्वाज | काश्यप, शांडिल्य | कौंडिन्य, वासिष्ठ |
| कौशिक, बाभ्रव्य | जामदग्न्य, वत्स | विष्णुवृद्ध, नित्युंदन |

या कोष्टकात दिलेल्या प्रत्येक गटातील गोत्रांचें आपसात पटत नाहीं, इतर गटातील गोत्राशीं पटतें. मुरुड येथें आलेल्या सर्व ब्राह्मण कुटुंबाचा विचार केला तर या सहाहि गटांतील गोत्रपुरुषाची वस्ती मुरुड येथे झाली होती हें दिसून येईल. अर्थात् ही गोष्ट योजनापूर्वकच झाली असली पाहिजे.

गावाचें रचनासौंदर्य, गांवाच्या गरजा व तेथील आरोग्य याकडे जसें सिद्ध-पुरुषाने लक्ष पुरविलें तसेंच गावातील भिन्नभिन्न जमातींत सतत सौहार्द राहण्याचा प्रयत्नहि त्यानें केला. त्याचें प्रत्यतर वसत उत्सवाची जी घडी त्यानें बसवून दिली त्यात पहायला सापडतें. ( पहा परिशिष्ट लेखांक १ ) मागें सांगितल्याप्रमाणें विज-यिष्णु मुस्लिम समाजाचा मान राखण्याचें धोरणहि त्याच्या हातून सुटलें नाहीं. गावाला मूळची कुणाची जमीन नव्हती. सिद्धपुरुषानें चद्रागिरीच्या ( सालदुऱ्याचा डोंगर ) उतारावरील जागा ग्रामस्थाकरितां इनाम मिळविली. सर्व संभाव्य धोके व अडचणी याचा अशा रीतीनें सुरुवातीलाच परिहार करण्यांत आला. गांवाच्या भरभराटीला आतां कोणताच अडथळा राहिला नाहीं. शतक दोन शतक तरी ही गांवाची आगेकूच चालू होती

याची कल्पना जीं नवीन घराणीं मुरुड येथें येऊन स्थाईक झालीं त्यांवरून करता येते. अर्थात् हेंहि कळायला साधनें अपुरींच आहेत. मूळ घराण्यापैकीं नसलेलें पंडित या उपनावाचें एक घराणें १६०० च्या सुमारास मुरूड येथें येऊन स्थाईक झालें होतें. त्यांचें मूळ उपनाव बर्वे (?) ह्या घराण्यात विद्या बऱ्याच प्रमाणांत असावी. याच घराण्याकडे पुढें मुरूडचें कुळकर्णपण ग्रामस्थानीं नहाल केलें. या कुळातले कोणी गृहस्थ विजापुरच्या दरबारीं जात असत. त्याच्या विद्वत्तेमुळें तेथें त्यांचें 'पंडत' हें नाव पडलें. व त्यानतर त्याच्या मूळ उपनामाचा लोप होऊन पंडित हेंच नाव रूढ झाले. शिवकालापूर्वीच हें नाव रूढ झालें होतें. थत्ते सुद्धां असेच १६३५ च्या पूर्वी मुरुड येथें स्थाईक झाले होते. (परिशिष्ट लेखाक २ पहा). मूळ जोशापैकीं नसलेले कान्हेरे-जोशी हेहि १६०० च्या सुमारास मुरूडला आले होते. १६६० चा जो एक कागद उपलब्ध आहे त्यात जवळजवळ साठ जणाचीं नावें आलीं आहेत. मुरुडबद्दलचें जबरदस्त आकर्षण निर्माण झालें होतें एवढें खरें.

यावरून मुरुड गांवाचा लौकिक वाढत होता हें निश्चित एक सधन गाव म्हणूनहि त्या पट्ट्यात त्याची प्रसिद्धि झाली असली पाहिजे. त्यामुळें लवकरच लुटारू चांच्यांच्या धाडीला मुरूड बळी पडलें.

या सुमारास एकहि सागरी सत्ता पश्चिम किनाऱ्यावर नव्हती त्यामुळें पश्चिम किनाऱ्यावर मलबारी चांच्यांचा उपद्रव थेट शिवकालापर्यंत चालू होता. हे चांचे समुद्रावर तर लूटमार करीतच. पण जमल्यास किनाऱ्यावरहि उतरत. इ स १६२४ मध्यें डि ला वाले याचें गलबत केळशी बंदरांत नागरून पडलें होतें. पण मलबाऱ्या-च्या भीतीमुळें तो तेथें उतरला नाहीं. (रत्नागिरी गॅझेटीयर) मलबाऱ्यानीं मुरूडवर हल्ला केला ते बहुधा हेच असावेत. इ. स. १७०० नंतर कांहीं काळानें लिहिलेल्या प्रश्नमालेंत (परिशिष्ट लेखाक ४) या प्रसगाचें मोठ्या शैलीदार भाषेंत वर्णन आलें आहे: " परंतु मलबारी याची धामधूम होऊन कै सुदत्त प्रान्त उद्वस्त होता. त्यातून कोणी आले व कोणी न आले. ठिकाणातून काहीं झाडझाडोरा राहिला. व कांहीं मोडला. आणि दाभोळ बसाहात होती ते समई यवनानि आगर मोडीस आले ते काही गाव गावी पुनः त्यातून आगर वसाहात केले आहेत याची चौकशी करावी" (प्रश्नमाला). सदाशिवभट वैशंपायन यानें इ स.१७६४ मध्ये लिहिलेल्या एका अर्जांत या दंग्याचा व त्याच्या काळाचा उल्लेख मिळतो: "त्याउपरी मलबारी याचें दंग्यामुळें भूमि दग्ध जाली. तेव्हां त्या पांचदेवाच्या

देवळातील मुहूर्ती श्रीनारायणाचे देवळात ठेविल्या आहेत. दंग्यामुळें गांव उध्वस जाह्याला त्यास दीडशें वर्षे जाहाली " ( पहा परिशिष्ट लेखांक १० ).

मुरूडच्या वसाहतीनंतरची सध्या ज्ञात असलेली हीच पहिली घटना होय.[६] मलबाऱ्यांच्या या हल्ल्यामध्यें मुरुड व त्याच्या आजूबाजूचा प्रदेश पार बेचिराख होऊन गेला. सघटित शक्तीच्या अभावीं स्थानिक प्रतिकार झालाच नाहीं. अनेक लोक परागंदा झाले. वसाहतीची पागापाग झाली. काहीं घराणीं गावातून यापुढें अजीच गेलीं. हिरे, वरवडेकर जोशी, बहुधा याच वेळेस गेले असावे. जी जाळपोळ झाली त्यांत वसाहतीनंतर केव्हातरी स्थापन झालेलें पाच देवांचें देवालय जळलें. मलबाऱ्याची दहशत एवढी बसली कीं लोक वसतीला पुनः येईनात. त्यामुळें किनारपट्टीच्या जागा ओस पडल्या. गावाचा वसूल थकू लागला. लोकांच्या मागें सारावसुलीबद्दल सरकारचा तगादा सुरू झाला. गांवाच्या पुनर्वसनाचा प्रश्न गावकऱ्यानाच सोडविणें आवश्यक होऊन बसल.

यामुळें कारभाऱ्यानीं गांवांत वस्ती भरण्याचा उपक्रम जोरानें सुरू केला. इ. स. १६३५ च्या कौलनाम्यावरून हा प्रयत्न स्पष्ट होतो ( परिशिष्ट ले. २ ) बाबाजी वैद्य नावाचे एक गृहस्थ याच्या आधीं मुरुड येथे येऊन राहिले होते त्याचें स्वतःचें असें ठिकाण नव्हतें. एका मंडलिक महाजनाचें ठिकाण ओस पडलें होतें. गावकऱ्याच्या विनंतीवरून सुभेदारानें तें ठिकाण बाबाजीला मिरास करून दिलें. बाबाजीला त्याबद्दल सवाशें लारी– चारआणें किंमतीचें चांदीचें नाणें–द्याव्या लागल्या. बाबाजीला हें ठिकाण या किमतीला विकत मिळालें कीं त्यानें फक्त सारा बाकी भरली हें कळायला मार्ग नाहीं.

मुरुड येथील मूळची वस्ती पश्चिम आळीला होती. या दीर्घ कालावधीनंतर आतां पूर्व आळीलाहि वस्ती झाली होती. मानकऱ्यांत काहीं खादेपालट झाला.

---

६ सदाशिवभटाच्या हिशेबाप्रमाणें या दंग्याचा सन १६१४ येतो. सदाशिवभटाला अजमासें १५० वर्षे असें सागावयाचें असावें. म्हणून इ. स. १६२४ हा सन अंदाजें धरला आहे. पोर्तुगीज सेनापति आल्मीडा यानें मलबाऱ्याच्या साहाय्यानें दाभोळची इ. स. १५०८ मध्यें जाळपोळ केली होती, तेव्हा तो दाभोळपासून काहीं मैलावर उतरला होता. दाभोळच्या दक्षिणेकडील रुंद खाडीचा विचार केला तर आल्मीडा हा बुरोंडीच्या जवळ उतरला असावा.

कारण तिमाजी मंडलिकाचा महाजन म्हणून उल्लेख आहे. याखेरीज माहादमानी व केसमानी हे अनुक्रमें वर्तक व महाजन होते हें दोन कोण म्हणजे त्याचें उपनाम काय याचा उलगडा होत नाहीं. उपनामाचा प्रसार सर्रास रूढ झाला नव्हता याचेंच हें द्योतक आहे. या कागदाइतके नंतरच्या कोणत्याहि कागदात इतक्या बहुसंख्येनें फारशी शब्द आलेले नाहींत. पण फारशी भाषेच्या या आक्रमणानें मुरुड येथें फारसें मूळ धरलें नाहीं.

इ. स. १६३९ चा हा एकच कागद उपलब्ध आहे. पण यानंतर गावास भराभर वस्ती वाढायला सुरुवात झाली. दाभोळच्या यवन सुभेदारानें कौल दिला असावा असें 'प्रश्नमाले'वरून दिसतें. पश्चिम किनाऱ्याच्या संरक्षणाचे प्रयत्न अधिक कसोशीनें झाले वसाहत करणाराना सवलती देण्यात आल्या. या सर्वांचा परिणाम इ. स. १६६० च्या सुमारास आढळून येतो. यावेळीं मुरुड येथें साठाहून अधिक ब्राह्मण कुटुंबें नांदत होतीं. त्यापैकीं काहींचीं नावें पहा : पावगी, छत्रे, देवल, दाते, खाडीलकर, नेने, अभयंगर ( अभ्यंकर ), राहाळकर, बापट, हीं कुटुंबें मुरूडला होतीं हेंसुद्धा ग्रामस्थ विसरून गेले आहेत. कोलापुरकर-कोल्हापुरकर-नांवाचे गृहस्थ मुरूडला स्थाईक इतक्या दूरचे गृहस्थ मुरूडला कसे आले असें आश्चर्य वाटायला नको ! कारण यानंतर लवकरच पाटण प्रदेशांतून तेथील धामधूम व दुर्भिक्ष यांना कंटाळून काणे व बेहरे हे मुरूडला आले पण हेंहि विशेष नव्हे. इ. स १६६० च्या आगेमागें नारायण देवधर अग्निहोत्री हे हजार मैलांवरच्या काशीहून येऊन मुरूडला स्थाईक झाले.

मुरुड गाव आता भरलें होतें. अगदीं गजबजून गेलें होतें म्हटलें तरी हरकत नाहीं. उपासनेला तपोवनाप्रमाणें एकान्त स्थळ म्हणून सिद्धपुरुषानें मुरूडाची निवड केली होती तो एकान्त आता कितपत शक्य होता ? मोठें धाडस करून सिद्धपुरुषाबरोबर मुरूडची वसाहत करायला आलेल्या मूळपुरुषामध्यें एकमेकांबद्दल आदर, प्रेम व सहकार्याची भावना होती ! पण आता त्या सहकार्याच्या प्रेरणेचें कारणच राहिलें नाहीं. सिद्धपुरुषाच्या वेळेपासून एव्हापर्यंत मुरूडनें पुष्कळच प्रवास केला होता. मुरूडचें स्वरूप पार पालटून गेलें होतें. बदललेलें स्वरूप एव्हापासून पुढें हळूहळू उलगडूं लागलें.

सतराव्या शतकाला सुरुवात झाल्यानंतर-कदाचित् सुवर्णदुर्ग बांधल्यामुळें शासनयंत्रणेच्या कक्षेंत मुरुड अधिकाधिक येत चाललें. प्रथम मुरुड येथें, गावाचा

वसूल करण्याकरितां सरकारी अधिकारी नेमीत असत. हा अधिकारी बहुधा मुरूडचाच असावा पुढें इ. स. १६५० आगेमागें कृष्णाजी विश्वनाथ पंडित याला मुरूडचें कायमचें कुलकर्णीवतन आदिलशहाकडून देण्यांत आलें त्याकरिता शिफारस ग्रामस्थांचीच होती इ. स १६६० च्या आधीं, मुरूडकरांना म्हणून मिळवून दिलेली गुरेंचराईची सालदुऱ्यातील जागा आदिलशहाची आई मायसाहे-बीण–इतिहासांतील प्रसिद्ध बडी साहेबीण–हिला इनाम करून देण्यांत आली. येथील गाविक ठिकाण व सुवर्णदुर्ग, अंजनवेल व गोवळकोट या किल्ल्याच्या उत्पन्नाचा अंश मुरूडच्या जुम्मा मशीदीकडे लावण्यात आला. मुरुड हें अशा रीतीनें सरकारी अधिकाऱ्याच्या कृपेला पात्र होत होतें !

मुरुड बदलत होतें ! मूळच्या मुरूडच्या प्रवाहात अनेक प्रवाह येऊन मिळत होते. मूळ वसाहत करणाऱ्या लोकांतील प्रेम व सहकार्य आणि त्यानीं घालून दिलेलें वळण या नवीन परिस्थितींत टिकणें शक्य नव्हतेंच पण याच सुमारास मुरूडच्या आजू-बाजूची–नव्हे महाराष्ट्राचीच राजकीय परिस्थिति झपाट्यानें बदलत होती शिवा-जीनें स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवून एक तपाहून जास्त काळ लोटला होता. अफझल खानाच्या वधामुळें शिवाजीच्या नावाचा दरारा सर्व कोंकण प्रांतावर बसला होता योग्य संधीचा फायदा घेण्यात चतुर असलेल्या शिवाजीनें लवकरच सावित्रीच्या या टापूवर आपली सत्ता बसविली. चारशें वर्षांनतरच्या या मुक्ततेमुळें महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात अभूतपूर्व क्रान्ति झाली. मुरूडच्या जीवनावर त्याचे पडसाद उमटल्याखेरीज कसे राहतील ?

# प्रकरण ४ थें

## कांहीं कर्तबगार व्यक्ति

कान्होजी आंग्रे, बाळाजी विश्वनाथ, थोरले बाजीराव-महाराष्ट्राने निर्माण केलेलीं डोंगराएवढीं माणसें. तर त्या सर्वांना आपल्या अंगाखांद्यावर सहज पेलणारे हिमालयाप्रमाणें शिवाजीमहाराज महाराष्ट्राच्या इतिहासाचा जन्म त्यांच्यापासून. भारताच्या इतिहासाचें इष्ट वळण हें त्यांच्या कर्तृत्वाचें फळ. अशा थोरथोर व्यक्तींशीं अल्प काल का होईना मुरुडग्रामस्थांना सहवास घडला हा विचारच केवढी धन्यता निर्माण करणारा आहे. मातीचें सोनें करणारा हा थोरांचा सहवास मुरूडकरांना मिळाला. एव्हांपासून मुरूडकराच्या कर्तृत्वावरील सावट निघून गेलें. गुणांचें चीज करणारे व कर्तृत्वाला नवीननवीन क्षेत्रें निर्माण करणारे ज्याप्रमाणें महाराष्ट्रात एकापुढें एक राज्यकर्ते निर्माण झाले तसेच आपला उत्कर्ष साधू इच्छिणारे महत्त्वाकांक्षी लोक मुरुड येथें जन्म घेऊं लागले. कोंडून राहिलेल्या कर्तृत्वाचा पाट आता सातारा, पुणें या दिशेनें वाहूं लागला तर संपत्तीचा ओघ दरिद्री कोंकणच्या दिशेनें वाहूं लागला.

हा क्रम अव्याहत दीडशें वर्षें चालू राहिला. या काळात येथील किती कुलांनीं भाग्योदय साधून स्थलान्तर केलें तें कळायला सर्व साधनें अद्याप उपलब्ध झालीं नाहींत. अनेकांचीं नांवें सांगता येतात तर कांहींचीच तपशीलवार माहिती मिळते. अशा कांहींचा त्रोटक वृत्तान्त पुढें दिला आहे.

"९०-९५ वर्षांचे प्रमाणिक ग्रहस्त वाराणसींत आहेत" असा केशव जोशी याचा कान्होजी आंग्रे याच्या इ. स. १७१६ च्या कागदांत उल्लेख सांपडतो. दुसऱ्याहि अनेक कागदांतून केशव जोशी याच्याविषयींचे उल्लेख सांपडतात. या श्रीमान् व महा खटपट्या गृहस्थाचें व्यक्तित्व मोठें विवाद्य झालें आहे हा शिवाजी महाराजांचा समकालीन व समवयस्क गृहस्थ. शिवाजीनें याचा सन्मान केला. प्रौढपणचीं याचीं वर्षें कान्होजी आंग्रे याच्या सहवासात गेलीं. यामुळें याच्या चरित्राभोंवतीं मोठेपणाचें एक वलय निर्माण झालें आहे.

शिवाजीनें दाभोळ प्रांत इ. स. १६६० मध्यें जिंकला. पण यानतर लगेच त्याचा मोंगलाशीं तीव्र झगडा सुरू झाला. व सुवर्णदुर्गाची मजबुती करणें बारातेरा वर्षे लांबणीवर पडलें. फुरसत झाल्यावर १६७३ मध्यें शिवाजीनें सुवर्णदुर्गाची दुरुस्ती करविली. त्या वेळेस शिवाजी हर्णैस आला होता. केशव जोशी या श्रीमान् गृहस्थाचें नांव शिवाजीच्या कानावर आलें: "शिवाजी जिंकलेल्या प्रांतांतील पैकेकरी लोकाचा बहुमान करून त्याना वश करीत असे' सदाशिवभट वैशंपायनाचे हे शब्द लक्षांत घेण्याजोगे आहेत. केशव जोशीचा शिवाजीनें सन्मान केला. (शिवाजी मुरूडला आला असेल काय ? देवाधर्माबद्दल शिवाजीला विलक्षण आकर्षण होतें. श्री दुर्गा-देवीची कीर्ति शिवाजीच्या कानावर गेली असेल काय ?) शिवाजीला हवें असलेलें कर्ज केशव जोशानें पुरविलें. केशव जोशी मुरब्बी ! शिवाजीकडच्या या वजनाचा त्याने स्वतःकरिता चांगलाच उपयोग करून घेतला.

सावकारी व व्यापार हे केशव जोशाचे व्यवसाय. शिवाजीच्या भेटीपासून हर्णैच्या हवालदाराकडे त्याचें वळण सुरू झालें. थोरामोठ्याच्या ओळखीच्या बळावर त्यानें सावकारी वाढविली. अचलोजी मोहिता- हर्णैचा किल्लेदार- याच्या दाट ओळखीचा उपयोग त्यानें सरकारी वसुलाचें काम मिळविण्यात केला. सरकारी सुपारी व नारळ परप्रांतात नेऊन विकण्याचें जोखीमहि त्यानें स्वीकारलें. त्यांत त्याला एकदा चागलाच फटका बसला मुरुड व आजूबाजूचे गांव येथची सरकारी नारळ व सुपारी त्यानें पुतळी गलबतातून विकायला पाठविली. वादळात गलबतानें समुद्राचा तळ गांठला. व्यापारी कसबात मुरलेल्या केशव जोशानें 'रयतीचा माल बुडाला" म्हणून बोभाट केला गावकऱ्याना पुनः वसूल देणें जिवावर आलें. पण त्यातून सुटकाच नव्हती या वसुलापायीं अनेकाच्या जमिनी गहाण पडल्या.

या सुमारास मुरुड व आजूबाजूच्या प्रदेशावर भालेराईचं (पुंडाई) मोठं संकट येऊन कोसळलें. (इ. स. १६८३). एव्हाना महाराष्ट्रातले राजकारणाचे रंग भराभर पालटूं लागले. शिवाजीचा मृत्यु झाला आणि औरंगजेब आपल्या प्रचंड सेनेसह मराठ्याचा एकदाचा निकाल लावण्याच्या ईर्षेनें दक्षिणेंत उतरला संभाजीची विजच्या तेजानें तळपणारी समशेर मोंगलांचा नक्षा उतरवू लागली. या प्राणान्तिक लढ्यानें कोंकणांत तीव्र स्वरूप धारण केलें. या लढयाची झळ मुरूडला लागल्या-खेरीज राहिली नाहीं खुद्द मुरुड येथें चकमकी झाल्या. कित्येक लोक समशेरीला बळी पडले. साठ वर्षांच्या अवधीनंतर मुरूड पुनः एकदां उध्वस्त झालें. लोक

परागंदा झाले. बागा ओस पडल्या. मुरूडवर अवकळा पसरली पण मुरूडचा भोग एवढ्यावर संपला नाहीं. कोंकणची जमीन नापीक असली तरी अवर्षण व दुष्काळ यांची भेट तेथें सहसा असत नाहीं. मुरूडच्या दुर्दैवानें भालेराईचा तडाखा अपुरा म्हणूनच कीं काय तिच्या पाठोपाठ दुष्काळ आला. आणि मुरूडची पुरी दुर्दशा उडाली

या हवालदील परिस्थितींत केशव जोशासारख्या मातबर गृहस्थानें लोकांच्या मदतीला धांवायचें ! हातात सत्ता होती, सरकारी अधिकारी मुठींत होते. जवळ पैसा होता ! सर्व साधनें अनुकूल होतीं ! तसें केलें असतें तर लोकांनीं त्याला धन्यवाद दिले असते. पण केशव जोशानें शिव्याशाप मात्र मिळविले

वसुलीच्या निमित्तानें गहाण घेतलेल्या कित्येक जमिनी त्यानें आपल्या ताब्यात घेतल्या काहीं स्वतःकरितां ठेवल्या बाकीच्या आपल्या वर्गांतल्या लोकाना दिल्या. केशव जोशाला क्षमा करणें हें शक्य नव्हतें. केशव जोशी दीर्घकाळ लोकांच्या स्मरणात राहिला – पण चागल्या अर्थानें नव्हे.

पण एवढें पुरेसें नव्हतें. धनदौलत त्यानें जमविली पण वतनदारी अजून मिळाली नव्हती ती मिळवणें हा आता हातचा मळ होता. मुरुड, गव्हे, कळचट व हर्णै वगैरे गांवाची ज्योतिषपणाची वृत्ति त्यानें मिळविली. ती मिळविताना तंटे झाले, लोकाचा रोष पत्करावा लागला. पण त्याची पर्वा करायचें त्याला काय कारण होतें ? हर्णैच्या किल्यांत घर बांधून तो आता मोठ्या इतमामानें राहात असे. चाळीस पन्नास वर्षें केशव जोशानें मुरूडवर अशी सत्ता चालविली.

वरील चरित्र हें काहीं कागदांच्या आधारें ( पहा परिशिष्ट ) रेखाटलें आहे. दुखावल्या गेलेल्या पक्षाकडून तें असल्यामुळें तें एकदेशीय असण्याचा संभव आहे. केशव जोशाच्या स्वभावाची चागली बाजू कुळकर्णी वतनाच्या कागदावरून उघड होते. कान्होजी आंग्रे याचीं पहिलीं उमेदवारीचीं वर्षें हर्णै येथेंच गेलीं. केशव जोशी हा त्यावेळीं आपल्या कर्तृत्वाच्या ऐन माध्यावर होता. याच वेळेचा दोघाचा परिचय केशव जोशी यानें कान्होजीवर छाप पाडली होती कान्होजीनें हर्णै सोडली व केशव जोशीहि काशीला गेला. पण दोघाचा पत्रव्यवहार अखेरपर्यंत चालू होता आयुष्याची नव्वदी उलटण्याच्या सुमारास केशव जोशी काशी येथें राहायला गेला. उलाढाली करण्याचें वय निघून गेलें होतें. धन, वतनें, मान, प्रतिष्ठा-

आयुष्यांत कमवायचें तें कमावलें होतें. राहिलं होतें ईशचिन्तन. सर्व व्याप व पाश तोडून मुरुड कायमचें सोडून काशीला जाण्याचा त्याचा निर्णय जाहीर झाला काशीचें प्रस्थान त्यानें व्याघ्रेश्वराच्या देवळात ठेवले. मुरूडचे प्रतिष्ठित लोक त्याना अखेरचे भेटून आले मुरूडचे बंध आतां तुटले होते कर्दे येथील हट्टानें घेतलेली वृत्ती तिच्यावर त्यानें आता पाणी सोडलें. जेवढ्या निग्रहानें त्यानें धन-दौलतीचा संचय केला तेवढ्याच निस्पृहपणें ती त्यानें उधळून दिली. आता फक्त ईशचिंतन.

पण मुरूडकरांचा व त्याचा पुनः एकदां संबंध यायचा होता कुलकर्णी-वतनाचा वाद उत्पन्न झाला पंडित व टाळसूरकर जोशी हे दोघेहि त्या वतनावर हक्क सांगत होते ( परिशिष्ट ले ३ ). कान्होजी आंग्रे याला निर्णय देणें कठीण वाटूं लागलें. उभय-पक्षींचा पुरावाच तसा तळकट होता तेव्हा त्याला केशव जोशाचें स्मरण झालें ' केशव जोशी हा वृद्ध व प्रमाणिक गृहस्थ या बाबतींत खरीखुरी माहिती सांगेल " असें म्हणून पंडिताना स्वत चें पत्र देऊन काशीला पाठविलें. केशव जोशानें जी लेखी साक्ष दिली त्याप्रमाणेंच शेवटीं या वादाचा निर्णय देण्यात आला. पंडिताचे प्रतिस्पर्धी हे सामान्य लोक नव्हते ( पहा परिशिष्ट ले ५,६,७ ) टाळसूरकर जोशाच्या विरुद्ध निकाल झाला त्याला आधार केवळ केशव जोशाच्या शब्दांचा. शंभरीच्या उंबरठ्यावर आलेल्या केशव जोशाच्या आयुष्याचें सारें सार तर या घटनेंत आलें नाहीं काय ?

कुलकर्णी वतनाच्या निमित्तानें टाळसूरच्या जोशाचा संबंध मुरूडशीं आला. तो निदान चाळीस वर्षांहून जास्त टिकला ( पहा परिशिष्ट ले. ३,५,६,७ ) मुरूडचें कुलकर्णी वतन कृष्णाजी विश्वनाथ पंडित याना मिळालें तो आदिलशाहीचा काळ पुढें शिवशाहींत कृष्णाजी विश्वनाथाला सनदा मिळून तें त्याच्या कुळात चालू झालें. कृष्णाजीच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा हरि याच्याकडे हें वतन आलें पण तो छादिष्ट निघाला. त्याचा उद्वेग येऊन ग्रामस्थानीं त्याला कामावरून दूर करायचें ठरविलें निर्णय केला पण अमलात आणणें कठीण दिसू लागलें. कारण ग्रामस्थ कृषिकर्म व वेदविद्या यात निपुण असले तरी लेखनकामात सर्वथैव अडाणी होते बेहेरे व केशव जोशी या कामात लायक होते. पण त्यांना इतर व्यवसायांपुढें या उद्योगाला फुरसत नव्हती गावांत एक प्रभु कुटुंब पूर्वी होतें. तलवार व लेखणी याकरितां शिवशाहींतले प्रभु प्रसिद्ध. पण या सुमारास त्या कुटुंबाचें स्थलान्तर झालें होतें. यामुळें ग्रामस्थाना गांवाच्या सीमेपलीकडे दृष्टि टाकणें भाग पडलें. अशा रीतीनें

मुरूडपासून आठदहा मैलावरच्या टाळसूरच्या नारो कृष्ण जोशी याच्याकडे मुरूडचें कुलकर्णी वतन आलें

नारो कृष्ण हा शिवाजीच्या सुरुवातीच्या सहकाऱ्यांपैकीं होय शतकानुशतकाच्या गुलामगिरीनंतरचा शिवाजीचा स्वराज्याचा प्रयत्न, तो कितपत यशस्वी होतो याबद्दलची सर्वसामान्य जनतेची साशकता, सामान्य जनतेचें परंपराप्रेम आणि सर्वांत जास्त महत्त्वाचे म्हणजे टाळसूर हें शिवाजीच्या प्रत्यक्ष कार्यक्षेत्रापासून दूरचें ठिकाण. या सर्वांचा विचार केला कीं नारो कृष्ण याच्या नवीन मार्ग स्वीकारण्यातलें धैर्य लक्षात येतें नारो कृष्ण यानें शिवाजीची सेवा अनेक वर्षें केली. पुढें सेवा करणें जड जाणार असें दिसू लागले. दृष्टि पलीकडे लावावी असें वाटू लागलें. तेव्हा शिवाजी महाराजाना विनति करून त्यानें निवृत्तिवेतन घेतलें तें मुरुड येथेंच मिळालें. पुढें ईश्वराचे भजनपूजन चालू असतां मुरूडकरांच्या विनंतीवरून कुलकर्णीवतन नारो कृष्णानें काहीं वर्षें चालविलें

इतक्यांत भालेराई झाली धामधुमीमुळें गावात राहणें सुरक्षितपणाचें वाटेना. नारो कृष्णानें मुरूडहून पलायन केलें कुलकर्णी वतन परत पडितांकडे आलें मात्र तें हरिकृष्णाच्या मुलानें चालविलें. नारो कृष्ण निपुत्रिक वारला. पण मुरूडला त्याच्या कुळाचा सबध पुढें बरीच वर्षें राहिला

महाराष्ट्रावरचा तो आणीबाणीचा काळ होता संताजी घोरपडे व धनाजी जाधव याच्या विद्युद्वेगाच्या हालचालींनीं महाराष्ट्राच्या वीरवृत्तीला आवाहन मिळत होतें. प्रत्येक हालचालीबरोबर महाराष्ट्राच्या इतिहासाचीं सोनेरी पानें लिहिलीं जात होतीं. या संताजी, धनाजींच्या खांद्याला खांदा भिडवून नारो कृष्णाचे भाऊ आणि पुतण्ये औरगजेबाच्या मस्तवाल सैन्याशीं शर्थीचा मुकाबला करीत होते. मुरूडला त्याच्या त्या पराक्रमाच्या कथा सह्याद्रीच्या रांगा भेदून पश्चिम किनाऱ्यावर येऊन धडकत होत्या. एकेक कथेबरोबर त्यांचे बाहू स्फुरण पावत होते पूर्वेच्या दिशेनें निघण्याकरिता त्यांचे पाय आतुर झाले होते. त्यांना दिसत होतें तें हें कीं हे तर आपल्यातलेच लोक. आपल्याबरोबर हे येथे राहिले. सभासमारंभातून आपल्या बाजूला बसून यानीं वाद केला. पालखीवरून जाताना याच्याशीं आपण थट्टा विनोद केला रथाच्या बाहीला तर त्याच्या आपल्यात अहमहमिका लागली होती. हे नुकतेच आपल्यात होते. पण आता खूप उंचीवर गेले. बेचैन झालेल्या ह्या महत्त्वाकांक्षी लोकाना वेदातील 'यो वः शिवतमो रसः तस्य ... ...'

सारख्या मंत्राची संथा नीरस वाटूं लागली. इवल्याशा रेताड चौंढ्यामधून नांगर फिरविणें त्यांना कंटाळवाणें वाटूं लागलें. एकामागून एक त्याच त्या कंटाळवाण्या रीतीनें माड–पोफळींना पाणी मोडण्याचा तिटकारा आला साचलेल्या ह्या पाण्यांतून निघालेंच पाहिजे. शक्य तितक्या लवकर बाहेर पडलें पाहिजे हाच त्यांनीं ध्यास घेतला.

ही अदृष्टाची ओढ कितीकाना लागली हें कळणें आतां दुरापास्त आहे. साह-साची आवड व महत्त्वाकांक्षा यानीं पुष्ट अशा शिदोरीवर ब्राह्मण, मराठे, सुतार, भंडारी यासारख्या जमाती बाहेर पडल्या असल्या पाहिजेत पण दुर्दैवानें ब्राह्मणा-खेरीज इतर जमातींचा इतिहास प्रयत्न करूनहि उपलब्ध होत नाहीं. भंडारी समाजाचा इतिहास फार तेजस्वी आहे. ज्या सागरावर त्यांचा अनिरुद्ध संचार चालला होता त्या सागराइतकाच त्यांचा पराक्रम विशाल होता कान्होजी आंग्र्याच्या मर्द सहकाऱ्यामध्यें मुरूडचे भंडारी अवश्य असले पाहिजेत. मुरूडच्या भंडाऱ्याना त्याचें विस्मरण झालें आहे जी गोष्ट भंडाऱ्याची तीच इतर जमातीची त्या सर्वांचा इतिहास काळाच्या सर्वभक्षक उदरात नष्ट झाला आहे. येथें लक्षात ठेवावयाची गोष्ट एवढीच कीं महाराष्ट्राच्या पराक्रमाला आलेली ही भरती सर्व-स्पर्शी होती

मंडलिक, कान्हेरेजोशी, पंडित, चोळकर आणि कित्येक घराणीं याच सुमारास बाहेर पडलीं. कुणी सैनिकी पेशा पत्करला तर कुणीं दप्तरखान्यात असाम्या मिळविल्या. अनेकांनीं राज्यकर्त्यांची मर्जी संभाळून वतनें मिळविलीं, तीं अजून-अजूनपर्यंत कुळात चालू होतीं. विसाजी मंडलिक हे पुरातन एकनिष्ठ सेवक. त्याला शाहूमहाराजानीं नाणीज गाव इनाम दिला. पहिल्या बाजीरावाच्या कारकीर्दींत पंडितांपैकीं कुणी पूर्वजानें पराक्रम गाजविला म्हणून त्याला खानदेशात मुलकी पाटिलकीचें वतन मिळालें चोळकर, बर्वे, भावे यानीं इनामें कमाविलीं. चोळकर, दातार, बाळ हे पेशवे याच्याकडे दप्तरदार किंवा खासगी कारभारी म्हणून मोठ्या हुद्यावर लागले.

या सर्वांत कुळगांवकर जोशाची हकीकत थोडीशी जास्त तपशीलवार मिळते कुळगांवकर जोशाकडून कळलेली पेशव्यासबंधींची सर्वस्वी नवीन अशी एक आख्यायिका प्रथमच पुढें येत आहे. ती पुढें "सुरस कथा" या प्रकरणात आली आहे ती संपूर्णपणें खरी असेल असें नाहीं पण त्यात सत्यांश असावा असा इति-

हास-संशोधकाचा (श्री. य न. केळकर) तर्क आहे. त्या आख्यायिकेवरून पेशव्यांचा-तेव्हां ते फक्त भट होते, पेशवे नव्हते- व कान्हेरे जोशी यांचा अठराव्या शतकाच्या सुरुवातीस संबंध आला हरिराम केशव (कान्हेरे जोशी) यानें पेशव्याच्या कुटुंबियाच्या रक्षणाच्या कामात मोठी चतुराई दाखविली, जीव धोक्यात घातला आणि त्या मंडळींना सुरक्षित स्थळीं पोचविल्यानंतर अपघाती मरणानें जीव गमावला.

पुढें कांहीं वर्षांनीं हरि जोशी याची पत्नी आपल्या विनायक व वासुदेव या मुलाना घेऊन पुण्यास गेली. तेथें बाळाजी विश्वनाथाची पत्नी राधाबाई हिनें वासुदेवाला ओळखलें व तिघांनाहि बोलावून घेतलें कृतज्ञता हा गुण काहीं मोठा दुर्मिळ नव्हे. पण राजकर्त्यांमध्यें तो अधिक खुलून दिसतो हें खरें. कृतज्ञता व ऋणानुबंध हे पेशव्यांनीं पिढ्यानुपिढ्या जोपासले. विनायक व वासुदेव जोशी याना पेशव्यानीं "कुळगांव" इनाम दिला. विनायक कुळगावास राहात असे व वासुदेव पुण्यास वाडा बांधून राहिला. याच्या इतर भावानाहि पेशव्यानीं इनामें करून दिलीं.

हरी जोशी याला एकूण सहा मुलगे व दोन मुली. वासुदेव जोशी हा तिसरा व विनायक हा सर्वांत मोठा. वासुदेव जोशी हा पहिल्या बाजीरावाच्या कारकीर्दीत फार मोठ्या हुद्यावर चढला. इ. स. १७३३-४० या कालात तो कल्याणचा सुभेदार होता. याच कालांत चिमाजी आप्पानें शिद्दी साताला धूळ चारली. वसईचा चेंगट व अटीतटीचा लढा याच काळातला. या मोहिमातील सर्व देखरेख वासुदेव जोशी याजकडे होती. नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दीत अल्पवयीन सदाशिवरावभाऊ याची नेमणूक कल्याणचा सुभेदार म्हणून झाली तरी सर्व कारभार आपल्या मृत्यु-पर्यंत वासुदेव जोशीच पहात असे.

वासुदेव जोशी व त्याचे बंधु याचे पेशव्याशीं फार निकटचे संबंध होते हें पेशवे दप्तरांतले कागद पाहिले असतां दिसून येतें. "वासुदेव जोशी व मातुश्री राधाबाई (बाजीरावाची आई) यानीं चिमणाजी आप्पाकरिता कुलाब्याच्या नारोपंताची कन्या पहावी" (पे. द. २०-५७) "आम्ही (स्वतः वासुदेव जोशी) श्री यात्रेस (काशीयात्रेस) तीर्थस्वरूप मातुश्रीबाई समागमें गेलों होतों ते यात्रा करून पोश वद्य चतुर्दशीस घरास आलों." (पे. द. ९-१४) "चैत्र वद्य ५ मंदवासरीं (२०-३-१७३६) राजश्री चिमाजी आपा स्वार होऊन सातारियास

गेले. आगोदर येक दिवस वासुदेव जोशी याचे येथें परस्थाने राहिले" ( प्रस्थान ठेवलें ) ( पे. द. २२-३१४ ) हे जोशी पुनः मुरूडला वसतीला आले नाहींत मुरूडशीं याचा संबंध ते हयात असेपर्यंत होता. या बंधूंपैकीं सर्वांत थोरला विनायक याचा उल्लेख वैशंपायन दप्तरांत एके ठिकाणीं आला आहे इ. स. १७४५ मध्यें बच्यभट वैशंपायन याने पुण्याहून सदाशिवभट वैशंपायन याला पत्र पाठविलें आहे. बच्यंभटानें नेलेली हुंडी पुण्याला वटवली गेली नाहीं तेव्हा त्यानें विनायक जोशी याच्याकडून ५० रु घेतले ते रुपये मुरूडच्या 'धोंडभट पाटणकराला देण्या-बद्दल बच्यंभटानें सदाशिवभटाला पत्र लिहिलें आहे

मुरूडला या वासुदेव जोशी याची स्मृति राहिली नाहीं. कुळगावकर जोशी हे मुरूडचे हें मात्र मुरूडकरांना माहीत आहे. यात्रेच्या प्रसंगीं कुळगावकरांना मान होता. त्यांचें तेथें वास्तव्य नाहीं; घर नाहीं. पण मान द्यायच्या वेळीं त्याच्या आगराच्या समोर ढोलक्याचा नाद घुमत असे.

*→→→0←←←*

# प्रकरण ५ वें

## वैशंपायन

वैशंपायन हे सिद्धपुरुषाचे शिष्य व मानसपुत्र. त्याच्याबरोबरच फिरत फिरत ते अखेरीस मुरूडला आले व सिद्धपुरुषाप्रमाणेंच येथें स्थाईक झाले. वैशंपायन हे मूळ कोठचे असावेत या संबंधींचा श्री. ना गो चापेकर याचा तर्क पूर्वी आलाच आहे. वैशंपायन व भिडे हे मूळ एकच असावेत. वेदविद्या व पुराण यांतील पारंगततेमुळे महाभारताची आठवण करून देणारें वैशंपायन हें नाव त्यांना मिळालें असावें.

मुरूडचें उपाध्यपण व धर्माधिकरण वैशंपायन यांचें. हे दोनहि अधिकार एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत ते चालविताना आढळतात. इंग्रजी राजवटींत समाजाचा तोंडवळा बदलू लागला. यज्ञयागांचें माहात्म्य लोपत चाललें. परंपरागत विद्वत्ता अपरिहार्यपणें कमी होत चालली. आणि कोणाच्याहि फारसें लक्षात येण्यापूर्वी लोक कृषिकर्म करणारे तेवढेच राहिले. वैशंपायन याला अपवाद झाले नाहींत.

उपाध्ये या नात्यानें वैशंपायन याच्याकडे यज्ञ, समारंभ, संस्कार इत्यादि धार्मिक कृत्यें करण्याचा अधिकार. हीं धार्मिक कार्यें ते केवळ ब्राह्मणांकडचींच नव्हे तर प्रभु, सोनार व कासार या जमातींतीलहि करीत असत हीं सर्व यथासांग पार पाडण्याकरिता लागणारी पढिक विद्वत्ता त्याच्या कुळात अव्याहत चालू होती. प्रथम प्रथम आश्वलायन व हिरण्यकेशी या दोनहि शाखांचें काम वैशंपायनच चालवीत. पुढें कुळामध्यें " विद्यावंत " पुरुष राहिला नाहीं. दोन्ही शाखांचें काम चालविणारा नाहींसा झाला. मुरूडची वस्तीहि वाढली आणि कामहि वाढलें. या दोनहि कारणामुळें वैशंपायनानीं आपलें काम पहाण्याकरिता आश्वलायन शाखेचे काणे यांना नेमलें. ही गोष्ट घडली तो इ. स. १६७० चा सुमार. काणे हे त्या वेळेस पाटण प्रदेशाहून ( खारेपाटण ) मुरुड येथें देशवर म्हणून आले. यातूनच पुढें काणे व वैशंपायनवाद आणि प्रसिद्ध हिरेप्रकरण उद्भवलें.

धर्माधिकारी म्हणून वैशंपायनाचा अधिकार लोकांचे नैतिक आचार व विचार यावर लक्ष ठेवून ते धर्मबाह्य होत नाहींत याची काळजी घेणें. हें मोठ्या जबाबदारीचें काम होतें यांत शंका नाहीं. ' दशग्रंथी ब्राह्मण ' एवढ्या तयारीवर हें जोखीम उरकण्यासारखें नव्हतें. संस्कृत भाषेचें अध्ययनच आवश्यक होतें. पुराणें व आचार-विषयक कायदे यांचा अभ्यास अनिवार्य होता. वैशंपायनाच्या घरच्या पंचवीस-तीस बाडामध्यें ज्याप्रमाणें याज्ञिकीकरितां आवश्यक अशा पोथ्या आढळतात त्याचप्रमाणें संहिता, रामायण-महाभारत यातील प्रकरणें व मयूखादि ग्रंथहि आढळतात. सिद्धान्त कौमुदीसारखे व्याकरणशास्त्रावरचे ग्रंथ तेथें आहेत. ज्योतिषशास्त्रावरचा ग्रंथ जरी मिळाला नाहीं. तरी इ. स. १८०० मधील गणपतीचें मोठें चित्र असलेलें एक हस्तलिखित पंचांग मिळालें हें सर्व अपेक्षितच होतें. पण सध्यांच्या पंचागांत छापतात तसा, त्याच सुमाराचा, वरच्या बाजूस पूर्व दिशा असलेला चंद्रग्रहणाचा आलेख जेव्हा सांपडला तेव्हां मात्र आश्चर्य वाटल्याखेरीज राहवलें नाहीं.

दोनतीन शतकें तरी या कुळात विद्वत्ता कमीजास्त स्वरूपांत नादत होती. संस्कृत भाषेचें अध्ययन व अध्यापन त्यांच्या घरांत अहर्निश चालू होतें. वैदिक पाठशाळा त्यांच्या घरी होती. सतराव्या शतकाचे कागद फारसे उपलब्ध नाहींत. पत्रव्यवहार तर अजीबात नाहीं. अठराव्या शतकाच्या सुरुवातीचे कागद मिळत नाहींत असें नाहीं. पण भरपूर मिळतात ते त्या शतकाच्या उत्तरार्धाचे. त्यावरून ही गोष्ट चांगली स्पष्ट होते बापूभट वैशंपायन व रामशास्त्री वैशंपायन याना निर-निराळ्या गावच्या विद्यार्थ्यांनीं लिहिलेलीं पत्रें मिळतात. त्यांत ते आपला उल्लेख विनयानें " विद्यार्थी बाळकृष्ण रामचंद्र, विद्यार्थी लक्ष्मण श्रीधर काळे . . . " असे करताना आढळतात. कुटुंबातीलच एकाद्या व्यक्तीचे पत्र बापूभटाना गेलें तर त्यांत पुरवणी विद्यार्थी मंडळीची असे. विद्यार्थी हे गुरुघरीं त्यांच्या निकटच्या आप्तांप्रमाणेंच सुखदुःखांच्या बाबतींत एकजीव झाल्यासारखे दिसतात. विद्यार्थी-दशा संपल्यावरहि हे विद्यार्थी आपल्या मागच्या काळाकडे मोठ्या आदरानें पहात. गुरुजींना खुशालीचीं पत्रें पाठवीत " वेदशास्त्रसंपन्न राजश्री रामशास्त्री वैशंपायन स्वामीचे शेवेसी ... .. तुम्हाकडोन बहुत दिवसांत पत्र येऊन भेट पत्रद्वारेंहि जाहली नाही " म्हणून प्रेमळ तक्रार करतात.

सिद्धपुरुषाचे वेळीं एकच वैशंपायन आला. पण इ. स. १६६० मध्यें वैशंपायनाचीं निदान तीन कुटुंबें चालू होतीं. कुटुंबाचा पुढें खूप विस्तार झाला.

स्थळप्र
अनुक्रमांक 23022 दि. 27/6/22
वैशंपायन क्रमांक 1022 नों. दि. 33
27/11/58

तरी वृत्तीच्या दृष्टीनें इ. स. १८२२ पर्यंत त्याच्यात तीनच कुटुंब मानताना दिसतात. ही गोष्ट इ स. १६९१, १७११, १७५९ व १८२२ च्या निरनिराळ्या कागदांवरून दिसते. कुटुंबांचा विस्तार होत होता. मधूनमधून फारकती होत. विभक्त झाल्याबद्दलचें दु:ख एका कागदात "तुम्ही आम्ही एकत्र होतों. ते विभक्तपणा जाहला" असे खेदोद्गार काढून व्यक्त केलें आहे. गावावर अरिष्ट कोसळलें की परागंदा व्हावं, स्थिरस्थावर झाल्यावर परत यावं, व शांततेचा उपयोग जमिनी, वृत्ती किंवा वतनं यासंबंधींचे वाद भांडण्यात घालवावा. अठराव्या शतकभर हा क्रम अबाधितपणें चाललेला दिसतो.

कागदोपत्रातून गणो हरी हाच पुढच्या पिढ्यांना माहीत असलेला प्रसिद्ध पुरुष दिसतो इ. स १६६० मध्यें त्याचें नाव दिसतें. त्याच वेळीं शं बा. दीक्षिताचे पूर्वज गोविंदभट हेहि होते. गणो हरी याला पुढच्या पिढ्यानीं शहाणा माणूस म्हटलें आहे पण हर बेहरे किंवा केशव जोशी यासारखा तो लेखनचतुर नव्हे लेखणीतील चतुराई हें पेशवेकाळाचें वैशिष्ट्य होय या काळात गणो हरी हा शहाणा याचा अर्थ वैदिक अनुष्ठान चालवणें व पुराण सांगणें असाच घ्यायला हवा.

गणो हरीच्या पुढच्या पिढींतील व वर सांगितलेल्या गोविंदभटाचा नातू शंकरभट या संबंधींचे उल्लेख इ स. १७१० पासून ते १७६५ पर्यंत दिसतात. केशव जोशी याला त्र्यंबकेश्वराच्या देवळांत भेटायला जाणाऱ्या प्रतिष्ठित मंडळींत शंकरभट होता. हा मोठा उद्योगी व कर्तृत्ववान पुरुष दिसतो इ. स. १७०० नंतर अनेक मुरुडकरानीं वतनें संपादन केलीं. वैशंपायनसुद्धां या उद्योगात मागें पडलेले दिसत नाहींत. शंकरभट दीक्षितानें जालगांव व चोळीची खोती १७३८ च्या पूर्वी संपादन केली होती. इ स. १७३८ त बहुधा शामलानें ( सिद्दीनें ) दापोली काबीज केली असावी. कारण शंकरभटानें नारोराम देसाई पंचनदीकर याच्यामार्फत अंजनवेलच्या सुभेदाराकडे कौल मागितला आहे. वैशंपायन हे उपाध्ये व धर्माधिकारी. पण ते आतां द्रव्योत्पादक व्यवसायाकडे वळलेले दिसतात, याच्या जरा आधीं ( इ. स. १७३४ ) गंगाधरभट वैशंपायन यानें संभाजी आंग्रे याजकडे अर्ज करून मानाजीराव दळवी यांची दापोलीची बेवारशी खोती मिळविली. यानंतरच्या थोड्याच काळापासून सदाशिवभट वैशंपायन याच्या कर्जचिठ्या पहायला सापडतात. नांगर, रहाट व 'चमेचमे' चा घोष असल्या ग्रामीण उद्योगातून मुरुड बाहेर पडून नागरी जीवनाला सन्मुख होऊं लागलें.

इ. स. १७३८ च्या सुमारास शंकर दीक्षित व भास्करभट जोशी याना अंजनवेलचा किल्लेदार हिरजीराव दळवी ( सन कदाचित् मागे जाईल ) यानें पकडून तिसंगावर नेलें; व त्याच्याकडून मुरुड येथील वृत्तीबद्दल खंड घेतला. सावित्री ते वाशिष्ठी या भागावर मधून मधून शिद्याची सत्ता चालतांना दिसते लोकाना पकडावें व दंडांवर सोडावें हा प्रकार हमेशा चाले. १७४१ मध्यें जोगनाक नांवाच्या दापोलीच्या गृहस्थाला पकडून नेलें होतें. त्याच्या दंडाचे पैसे केशवभट थत्ते यानें भरले. पुढें जोगनाकानें आपलें घर व विहीर केशवभटाला दिली. यावेळेस दापवलीची निमेनिम खोती केशवभट थत्ते व शंकरभट दीक्षित यांजकडे असल्याचा उल्लेख आहे.

यानंतर केव्हातरी तुळाजी आंग्रे व शंकरभट दीक्षित याचें, कोणत्या कारणावरून न कळे, पण वितुष्ट आलें. तुळाजीनें इ. स. १७४४ मध्यें अंजनवेल जिंकल्यानंतर त्याची वाशिष्ठीच्या या टापूवर सत्ता अधिक दृढ झाली असावी [७] तुळाजीची ही कारकीर्द चित्पावनाना जाचक झाली असें म्हणतात. तुळाजीला भिऊन म्हणा किंवा दुसऱ्या काहीं कारणानें म्हणा शंकरभटाला आत्मसंरक्षणार्थ देशावर पळावें लागलें. पिढ्यान्‌पिढ्यांचें मुरूडचें घर सोडून शंकरभटानें पुणें गाठलें. इ. स. १७४८ मध्यें तुळाजीनें शंकरभटाला अभय दिलें तरी शंकरभट आणखी बरींच वर्षें मुरूडला परतला नाहीं. राज्यकर्त्यांच्या लहरी स्वभावाचा त्याला पुरा अनुभव आला असावा. तुळाजीचा नाश झाल्यानंतर शंकरभट परत कोंकणात उतरला.

एक तप परदेशात काढून शंकरभट परत आला होता. पुण्यातील वास्तव्यानें शंकरभट बदलून आला असेल काय ?

सध्याचें भव्य आणि सुंदर असें दुर्गादेवीचें मंदिर बांधण्याची मूळ प्रेरणा कुणाची हें कळायला मार्ग नाहीं. शंकरभटाला तर ही कल्पना सुचली नसावी ? घाटावरील सुंदर मंदिरें त्यानें पाहिलीं होतीं ! देवळाचें भव्य शिल्प व नदीकाठचे मनोरम घाट त्याने दृष्टीखालून घातले होते ! असें वास्तुसौंदर्य मुरुड येथें का असूं नये ? या विचारानें त्याचें मन उतावीळ झालें असेलच ! पण आपल्या आयुष्याची ही आता संध्याकाळ आहे या विचारानें तो अधिक अस्वस्थ झाला असावा !

७ तरीसुद्धा इ. स. १७५९ मधल्या खर्चाच्या खर्ड्यांत शामलाच्या बंदोबस्ताकरिता पट्टी म्हणून एक रुपया खर्च पडला आहे.

शंकरभट परदेशाहून आला तो सधन होऊन. मुरुड येथें केशवभट कर्वे, नारो हरी बाळ यासारखे मातब्बर लोकहि होते. दीक्षित, कर्वे, दातार, जोशी, आणि बाळ यांनीं मिळून योजना आखली आणि दुर्गादेवीचें भव्य देऊळ हळुहळूं उभें राहूं लागलें, ( इ. स. १७६३ ) जणुं मुरूडचें भाग्यच उदयाला येत होतें. पंचक्रोशीच्या डोळयाचें पारणें फिटत होतें. आतां दुर्गादेवीच्या वसंतनवरात्र उत्सवाला सुभग पार्श्वभूमी मिळाली. शंकरभटाच्या आयुष्यातील सर्वात मोठी आणि शेवटची हीच घटना. लवकरच त्यानें डोळे मिटले.

वैशंपायन कुळाची याच्या आधींपासूनच पुणें ही दुसरी कर्मभूमी झाली. मुरूडच्या आणखी दुसऱ्या अनेक कुळांचें पुणें हें कार्यक्षेत्र बनले होतें. रोमन साम्राज्यात सारे रस्ते रोमच्या दिशेनें जात, सध्यां मुंबईच्या दिशेनें जातात; त्या काळीं सगळे रस्ते राजधानी पुण्याच्या दिशेनें धावत. वैशंपायन, बागुल, पंडित, बाळ वगैरे अनेक पुण्याला व्यापार, भिक्षुकी वा नोकर पेशाकरितां वास्तव्य करून होते. " वैशंपायन हे पेशव्याच्या बाजूला असतात " असें एका पत्रलेखकाचे उद्गार आहेत.

सदाशिवभट वैशंपायन याचा जन्म इ स १७२८ च्या सुमारास झाला. सोळाव्या वर्षापासूनचे त्याचे कागद उपलब्ध आहेत. वैशंपायनाची वृत्ति तर त्यानें सांभाळलीच पण सर्व हयातभर सावकारीचाहि धंदा त्यानें अगदीं निर्लेप मनानें केला. निर्लेप म्हणण्याचें कारण त्याच्या वंशपरंपरागत पेशाशीं हा धंदा विसदृश नव्हे काय ? पण त्याची खंत त्याला बिलकुल वाटलेली दिसत नाहीं. आपल्या वृत्तीचें रक्षण करण्यासाठीं त्याला जन्मभर जोशी व काणे याच्याशीं झगडा करावा लागला. आपल्या तक्रारी नोंदविण्याकरितां त्याला हर्णैला तर हमेशा जावें लागे. पण प्रसंगीं साष्टी किंवा खुद्द पुण्यालाहि जावें लागे. निमूटपणे पराभव पत्करणें हें तर त्यानें जन्मात कधीं केलें नाहीं. सत्तराव्या वर्षींहि नोंदवलेल्या त्याच्या तक्रारींतील जोरकसपणा जाणवल्यावाचून रहात नाहीं अथवा त्या काळच्या मुरूडच्या लोकांचाच हा स्थायी भाव होता ज्याचीं ज्याचीं म्हणून पत्रें पहायला मिळतात त्या त्या सर्व पत्रांत पराभववृत्तीचा, उदासीनतेचा, मरगळलेपणाचा यत्किंचित्हिं वास येत नाहीं. सदाशिवभटाच्या चरित्राकडे पाहिलें कीं हा संपूर्णपणें व्यवहारी, ' शेंडी तुटो, पारंबी तुटो ' या प्रवृत्तीचा पुरुष चुकून धर्माधिकाऱ्यांच्या वशात जन्माला आला असें वाटतें.

ज्याला विद्वान म्हणतां येईल असे दोन पुरुष वैशंपायन कुळांत अठराव्या शतकाच्या अखेरीस होऊन गेले इतर अनेक झाले असतील यात बिल्कूल संदेह नाहीं निश्चित माहिती मिळते ती मात्र एक रामशास्त्री व दुसरे बापूशास्त्री यांची. बापूशास्त्री हे सदाशिवभटाचे चिरंजीव. दोघानींहि वैदिक शाळा चालविल्या होत्या. दोघांनाहि त्याच्या शिष्यानीं लिहिलेलीं पत्रें उपलब्ध आहेत. दोघाचेंहि पेशवे दरबारीं चांगलें वजन होतें. पेशव्याचे मुख्य न्यायाधीश नीलकंठशास्त्री थत्ते यांचा व या दोघांचा चांगला परिचय होता. प्रत्यक्ष भेट होत नसे तेव्हां पत्रव्यवहार चाले. " शहाळीं दोन व कोवळीं पोंफळें पाच पाठविलीं आहेत. पावतील " असे बापूशास्त्र्याच्या पत्रातील उल्लेख मिळतात. नीलकंठशास्त्री यांशीं परिचय असणारी मडळी त्याच्याच तोलमोलाची असणार. बापूशास्त्र्यांच्या विद्वत्तेबद्दलचा लौकिक इकडच्या प्रातात चागला पसरला होता. अनेक प्रसंगीं शास्त्रनिर्णयार्थ परस्थ लोक बापूशास्त्र्याना पत्र पाठवून त्यांचा विचार घेत असत.

वैशंपायनांचाच विचार येथें प्रस्तुत आहे. म्हणून वैशंपायनाव्यतिरिक्त इतर व्यक्तींचा उल्लेख आला नाहीं. मुरुड येथें अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांत अनेक विद्वान ब्राह्मण होते हें पत्रव्यवहारावरून दिसतें. बाहेरगावाहून शास्त्रनिर्णयार्थ पत्रें येत तीं समस्त ब्रह्मवृंद मुरुड याच्या नावें येत. अशीं पत्रें अंजनवेल, गुहागर, परशुराम, वाई वगैरे दूरदूरच्या ठिकाणांहून येत. मुरुड येथील ज्या इतर विद्वानाचे उल्लेख सापडतात त्यात तात्या जोशी, महादेव जोशी वगैरे नावें येतात. दुर्दैवानें नावापलीकडे त्याची जास्त माहिती मिळत नाहीं.

असो. पुनः एकदां वैशंपायन कुळाकडे वळूं.

बापूशास्त्र्यानंतर त्याच्या तोडीचा वैदिक विद्वान पुढें वैशपायन कुळात झालेला दिसत नाहीं. पण याबाबत वैशंपायन कुळालाहि फारसें दोषी धरता येणार नाहीं. आता काळच बदलत चालला होता. वैदिक परंपरेचें महत्त्व लोपत चाललें होतें. बापूशास्त्र्याच्या मृत्यूबरोबर वैशंपायनांचें महत्त्वहि संपुष्टांत आलें.

गृहसौख्याच्या दृष्टीनें अभागी, पण थोरामोठ्याशीं संबध आल्यामुळें जिचें नाव इतिहासात दाखल झालें आहे, अशा वैशंपायन कुळातील एका कन्येचा उल्लेख करणें येथें योग्य ठरेल. मुरुडहून वैशंपायनांची एक शाखा बरेच दिवस परागंदा झाली होती. त्या कुळांतील गोपाळभट वैशंपायन इ. स. १७८० च्या सुमारास मुरुड येथें पुनः रहावयास आला. त्याच्या जिऊ नांवाच्या मुलीचा श्रीमंत नाना फडणीस याच्याशीं

विवाह झाला. नानांची ही नववी व शेवटची पत्नी. नाना इ. स. १८०० मध्यें मृत्यु पावले त्यावेळीं हीच तेवढी पत्नी हयात होती. नानाच्या मृत्युसमयीं काहींच्या म्हणण्याप्रमाणें हिचें वय ९ वर्षांचें ! तर इतराच्या म्हणण्याप्रमाणें १३-१४ वर्षांचें ! कोणतेंहि खरे धरलें तरी ती पोरवयाचीच. नानाच्या मृत्यूनतर बाजीरावानें लगोलग जिऊचे वाडे, जहागिरी, इनामें जप्त केलीं. बाजीरावाची दृष्टि नानाच्या दौलतीकडे पोचणार नाहीं हे शक्यच नव्हतें. परद्रव्य व परस्त्रिया या बाबतींत बाजीराव कोण-तेच विधिनिषेध पाळीत नसे. त्यामुळें, जेव्हा जहागिरींच्या जप्तीनंतर खुद्द जिऊला शनिवारवाड्यात त्यानें आणून ठेवली, त्या वेळेस तिच्यावर मोठाच कठीण प्रसंग ओढवला होता पण जिऊबाई खंबीर होती. इ. स. १८०२ मध्यें होळकरानीं पुण्यावर हल्ला केला आणि बाजीराव तेथून पळाला. सुदैवानें जिऊबाई मात्र शनिवार-वाड्यातच राहिली. होळकराने तिला लोहगडावर नानांच्या विश्वासातील सरदार निजसुरे याच्याकडे पाठविलें बाजीरावाची पुढें गादीवर पुनः स्थापना झाली त्यानें जिऊबाईला तिचा इतमाम व वतनें चालू करण्याचा करार केला. पण जिऊबाई या प्रलोभनाला बळी पडली नाहीं. पनवेलचा मुक्काम तिनें सोडला नाहीं. बाजीराव जेव्हा पळापळी करून दमला व गादीवरून खालीं उतरला तेव्हाच तिनें पुण्यात पुनः प्रवेश केला. इंग्रजानीं तिची नक्त नेमणूक, मेणवली गांव ( वाईजवळ ) व इतर कांहीं नेमणुका चालू केल्या " जिऊबाई ही आपल्या पतीप्रमाणेंच प्रचंड घडामोडी व अवस्थान्तरें पाहून इ स. १८५४ मध्यें मृत्यु पावली. बाई शहाणी व सदाचरणी असून तिनें आपल्या जगद्विख्यात पतीचें नाव निष्कलंक राखिलें " ( मराठी-रियासत उ वि. ३ )

जिऊबाईच्या मृत्यूनें वैशंपायन कुळांतलें कर्तृत्व संपलें असें म्हणायला हरकत नाहीं. वैशंपायनांचीच एक शाखा म्हणजे दीक्षित. या दीक्षित कुळात कर्तृत्वाची परंपरा चालू आहे. पण त्यांच्या कर्तृत्वाची जात अजीच वेगळी आहे. इंग्रजी राजवटीनंतर आपलीं सगळींच मूल्यें बदललीं.

# प्रकरण ६ वें

## हिरे प्रकरण

आता जवळजवळ दोनशें वर्षें ह्या गोष्टीला होत आलीं. या प्रकरणावर आतां विस्मृतीचें एवढें दाट धुकें जमा झालें आहे कीं हिरे नावाचें एक ब्राह्मणकुटुंब मुरूड येथें वसतीला होतें ह्याचीहि कोणाला माहिती नाहीं. गांवातील सर्व प्रतिष्ठित व्यक्तींना या नाहीं त्या मार्गानें या प्रकरणात लक्ष घालावेंच लागलें कुणाला साक्षी द्याव्या लागल्या. तर कित्येकाना सरकारदरबारीं खेटे घालावे लागले. कांहीं प्रतिष्ठित व्यक्तींचे हात या प्रकरणात चागलेच पोळले. मुरूडचा चेहरामोहराच बदलून जाण्याचा प्रसंग आला. कारभाऱ्याच्या हातची सत्ता हिसकावली गेली. " आलि मनसुबी करीत होते नहीं जायाचे हर्णैस जी " हा स्थानिक शाहीराचा अभिमान इतिहासजमा होऊं लागला.

इ. स १७६४ पासून सुमारें चौदा-पंधरा वर्षें हिरे ठिकाणाचा वाद गावात गाजत होता. पण त्या वादाचीं पाळेमुळें थेट इ. स. १६६० च्या आसपास जाऊन पोंचतात. देवघर व काणे यांचा शंभर वर्षांचा धावता इतिहास, ही या प्रकरणाची पार्श्वभूमी. या नाटकाच्या अखेरच्या प्रसंगात नारो हरीसारख्या व्यक्ति प्रामुख्यानें वावरताना आढळतात शंभर सवाशें वर्षांतल्या अनेक सामाजिक घटनावर या प्रकरणानें प्रकाश पडतो. त्यामुळेंच या प्रकरणाचा येथें प्रपंच केला आहे.

ज्या हिरे ठिकाणाचा व त्याच्या मानपानाचा प्रश्न उत्पन्न झाला तो हिरे हा मूळचा फणसवण्याचा, ( फणसूं ). सिद्धपुरुषानें त्याची स्थापना मुरुड येथें केली व कोपरींतील उपाध्ये व जोशी वृत्ति त्याला दिली. गांवात त्याचा मान चवथा. या वतनदारीचा उपभोग त्यानें अनेक वर्षें घेतला. पुढें हिरे हा परागंदा झाला किंवा निर्वंश झाला. हा प्रकार बहुधा १६२४ च्या सुमारास झाला[८] असावा. त्याचें वतन व ठिकाण हीं दोन्ही बेवारशी पडलीं.

---

८ सुतार या वतनदाराचाहि असाच प्रकार झाला.

असाच कांहीं काळ लोटल्यानंतर इ. स. १६५० च्या सुमारास वे. नारायणभट देवधर अग्निहोत्री हे काशीहून येऊन मुरुड येथें स्थाईक झाले नारायणभट मोठे विद्वान् व सत्पात्र ब्राह्मण. ग्रामस्थांनीं त्यांना हिरे याचा बेवारशी आगर निर्वेध करून दिला तर आसूदकरानीं बावळैंतील शेतें दिलीं. नारायणभट व त्यांचा मुलगा यानीं आगर व शेत याचा उपभोग घेतला. पण पुढे दोघा नातवांचें आपसात पटेना रामचंद्रभट व काशीनाथभट यांनीं आपल्या ठिकाणाच्या वाटण्या केल्या व वेगळे राहू लागले. काशीनाथाची पत्नी प्रसूतीकरिता माहेरीं हरिहरेश्वराला गेली आणि देवधर कुटुंब आपत्तीच्या फेऱ्यांत सांपडलें. तेथेंच तिला मुलगा झाला पण ती बाळतपणात मृत्यु पावली. काशीनाथभटानें पुढें दुसरें लग्न केलें. हा मुरूडलाच पुढें राहता तर हिरे प्रकरण उपस्थित झालें नसतें. पण एवढ्यातच मुरुड येथें मालेराई झाली ( इ स १६८३ ). दोघा भावांच्या मनाची चलबिचल झाली व दोघेहि बंधु मुरुड सोडून पुनः काशीला गेले मुरुड ते काशी हें अमाप अंतर, चागल्या सडकाचा त्या काळच्या अभाव, राजकीय अस्थिरता या सर्वांच्या भरीला प्रवासाच्या मंद गतीची कल्पना केली म्हणजे काशीला जाण्यामागच्या कल्पनेनें मति गुग होऊन जाते. तें काहींहि असो देवधरबंधूंना मुरुडपेक्षां पिढ्यान्‌पिढ्यांचें काशीक्षेत्रच अधिक बरें वाटलें.

इकडे काशीनाथभटाचा मुलगा आजोळीं हरिहरेश्वरला वाढत होता. केशवभट चाळीस वर्षांचा होईपर्यंत हरेश्वराहून कुठें गेला नाहीं. "पुढें केशव भटजींनीं वडिलाचें ठिकाण मुरूडास आहे तेथें रहावें हा उद्देश धरून कसबे मजकुरीं आले ग्रामस्तास भेटले. त्यांणीं निमे ठिकाण दाखविलें. निमे ठिकाण राहिलें त्यांत रामभट काणे यास राहावयास पाच सात वर्षें आगोदर दिल्हे होते. ते ग्रामस्ताही केशवभट यासी दाखविलें नाहीं निमे ठिकाण मात्र दाखविले त्यात घर बाधोन राहिले. त्यास पन्नास पंचावन वर्षें होत आलीं." केशवभट ज्या ठिकाणात राहात होता तें ठिकाण खरें त्याचें नव्हतें ते त्याच्या चुलतकुटुंबाचें आणि खुद्द केशवभटाच्या मालकीच्या ठिकाणात होता रामभट काणे

काणे हे मुरूडच्या मूळच्या कुटुंबातले नव्हेत इ. स. १६७० च्या सुमारास पाटणप्रदेशाकडे धामधूम झाली; दुष्काळहि पडला त्यावेळेस तिकडून मुरूडला दोन कुटुंबें आलीं. एक काणे व दुसरें बेहरे यांचें. काणे याचा उल्लेख 'देशवर' असा केलेला आहे. इ. स. १७६३ मध्यें देवीच्या पुनःस्थापनेच्या वेळीं वैशंपायनांच्या

आचार्यवरणाला पद्माकरभट काणे यानें आक्षेप घेतला तेव्हां ग्रामस्तानीं निडून "आचार्यवरणंन तुझें कैसें. अयशींनव्वद वर्षांचा (तू) ठवणाईक." असा शेलका अहेर करावयास कमी केलें नाहीं वैशपायन यांनीं दिलेली ऋग्वेदी याची वृत्ति त्यानें व त्याचे मुलगे तुकंभट व भिकंभट यानीं चालविली हे वृत्तीचा उपभोग करीत असता मागें उल्लेखिलेलीं दोन सकटें मुरूडवर कोसळलीं एक भालेराईचें व दुसरें दुष्काळाचें. भालेराईत एक मारला गेला व दुसरा दुष्काळात मेला. तुकंभटाचा मुलगा आजोळीं दिवे येथ काहीं दिवस वाढला. पण पुढें आपल्या मूळ वंशवृक्षाचा आधार घेण्याकरिता कुडाळ प्रांताकडे गेला.

मुरूड येथें या सुमारास नारायण वैद्य नांवाचे एक फार प्रसिद्ध व "राजमान्य" वैद्य होते. त्याची मुलगी उपवर होत चालली. कोणतीं कारणें होतीं नकळे, तिला वर मिळणें कठीण झालें. या पेंचातून सोडविण्याला कारण झाले बेहेरे. बेहरे हे इ स. १६७० च्याच सुमारास मुरूडला स्थाईक झाले होते. त्याच्या सल्ल्यावरून कुडाळ प्रांतात एक मनुष्य पाठवून रामभटाला बोलावून आणण्यात आलें. रामभट हे वैद्याचे जावई झाले वैद्य, बेहरे व केशव जोशी या प्रतिष्ठित लोकांनीं रामभटाला हिरे याच्यापैकीं अर्धें ठिकाण मिळवून दिलें त्या ठिकाणाचे खरे मालक केशवभट देवधर हे त्यावेळेस हरेश्वराला होते केशवभट इ स. १७२० च्या सुमारास मुरूडला आला तेव्हां त्याच्या ठिकाणात रामभट राहात होता आपण आपल्या ठिकाणांत राहात नाहीं हें केशवभटाला कधींच उमगले नाहीं त्यामुळें काहीं बिघडलें असेहि नाहीं. केशवभट व त्याचे वंशज यांनीं जवळजवळ पन्नास वर्षें त्या ठिकाणाचा उपभोग घेतला.

इ स. १७६० च्या सुमारास मुरूडचें ज्याला उपनगर म्हणता येईल अशा कर्दे गांवात अंताजी परशुराम गोडबोले नावाचे सधन सावकार रहात होते. मोठमोठे सरदार व खुद्द पेशवे याच्याजवळ अंताजी परशरामांचें मोठेंच वजन होतें. अण्णासाहेबांच्या आत्मवृत्तात केशवभट कर्वे याच्याबरोबरच ज्या अंताजी परशराम याचा उल्लेख आला आहे ते हेच संपत्तीनें मिळणारी प्रतिष्ठा याना मिळाली. पण वतन व मानपान याच्यापुढें ही प्रतिष्ठा तुच्छ मानण्याची महाराष्ट्राची परंपराच आहे. सुताराचें वर्तकपण व हिरे याचा चवथा मान गेलीं शंभर वर्षें तरी मुरूडला अमानत पडला होता. तो मिळवून घेण्याचें अजूनपर्यंत कोणाला सुचलें नव्हतें. ऐश्वर्य संपादन करीत असताना अंताजी परशराम याना या बेवारशी धनाचा शोध

लागला तें कांहींहि करून मिळवावयाचेंच असें त्यांनीं ठरविलें. आणि आपल्या सरकारदरबारच्या वजनावर ते त्यांनी मिळविलेहि.

पण हे अधिकार अंताजी परशरामांना देणें म्हणजे हिरे यांच्या ठिकाणांत पिढ्यान्-पिढ्या राहिलेल्या देवधर व काणे यांना हुसकून देण्यासारखें होतें. देवीच्या पुनः-स्थापनेच्या वेळीं काणे यानें बखेडा माजवून ग्रामस्थाचा रोष ओढवला असला तरी त्याला निर्वासित करणें हें कोणालाहि आवडण्यासारखें नव्हतें. ग्रामस्थांनीं अंताजी परशरामाना विरोध करण्याचा चंग बांधला. हा विरोध एवढा कडवा झाला कीं शेवटीं अंताजी परशराम यांना सरकारातून ताकीदपत्र आणावें लागलें. तें ताकीदपत्र उपलब्ध आहे " आज्ञापत्र सरकार राजश्री पंतप्रधान ता॥ कारभारी ग्रामस्त का॥ मुरुड... खमस सीतैन मया व अलफ (इ. स. १७६५) कसबे मजकुरीं सुतारांचें वर्तकपण व हिन्यार्चे उपाधीकपण दरोबस्त कोपरींत कसबेयात चतुर्थ विभाग व आगर ठिकाणें व जिरायेती शेतें आहेत. त्यास वर्तक सुतार व हिन्यांचे उपाध्यपण वतनदार यांची अजी नकल (निर्वंश) जाहाली. म्हणोन हरदुवतनें व आगर ठिकाणें शेतें समेत सरकारांतोन राजश्री अंताजी परशराम . वतन करून घ्यावें म्हणोन जजिरे सुवर्णदुर्ग येथें सनद सादर होऊन आली असतां तुम्ही ग्रामस्तांहि हरकत करून सनदेप्रमाणें वतनाचा उपभोग मशारनिल्हेकडे होऊं न यावा याची हिसमील केली म्हणऊन विदित जाहालें, त्याजवरून हें आज्ञापत्र तुम्हा सर्वांस सादर केलें असे. तर हरदुवतनाचा उपभोग, मानपान गोडबोले यांस सुरळीत यथापूर्वप्रमाणें चालों [illegible] तर अंतेस [illegible] करणें जाणिजे "

[illegible]

पेशव्यांची एवढी ताकीद आल्यानंतर अंताजी परशराम यांना विरोध करण्याचें सामर्थ्य कुणातच राहिलें नाहीं. अंताजी परशरामांकडे हे मानपान चालू होणार याबद्दल ग्रामस्थांना शंका नव्हती. पण याच सुमारास वेगळींच सूत्रें अनपेक्षितरीत्या हलविलीं गेलीं आणि अंताजी परशरामाचे एवढे सर्व प्रयत्न मातीमोल झाले.

त्याचें असें झालें. ग्रामस्थांना ताकीद दिली गेली तें साल इ. स. १७६५. त्याच सुमारास इ स. १६८३ मध्यें काशीला गेलेल्या काशीनाथभटाचा वंशज ( बहुधा नातू ) मुरुड येथें आला. " त्याणी पुसिले की आमचा विभाग कोणता त्यास ( अक्षरें गेलीं आहेत ) .. आम्ही आहो हें ठिकाण आम्हास ग्रामस्तानीं दाखविलें. त्याणी उत्तर केले. निमे आगर आमची वाटणी निराली आहे. पूर्वी रामचंद्रभट व काशीनाथभट विभक्त जाहालेल्या समईचे पत्र आम्हाजवल आहे. त्यास ते फिरोन कासीस गेल्यावर

पत्र पाठवून दिल्हे. त्याचा अन्वये पाहातां ठिकाण येक अद्याप कागदीं पत्रीं हिरे याचे नाव चालते मागे हिरे याचे ठिकाणाविसी अंताजी परशराम गडबोले याणी सनदा आणिल्या . ... ( अक्षरें गेलीं आहेत ) सागत होते. आमचें पत्र कासीस होतें. मध्यें वाद पत्रावाचून कसा सागावा. पत्र आले गडबोले यानीं कजिया सोडून दिल्हा. निमेचे वाटणींत काणे सुखवस्तु दाखल होते. हाली काहीं गावकरी याजपासून आम्हास न कळता आगराचे वतनपत्रादाखल समतपत्र घेऊन जोतें बाधतात तेव्हा आपलेयाकडे बहुता दिवसाचे ठिकाण ग्रामस्तानी निर्वेध पाहोन. दिल्हे. त्या स्थलात काणे नवीन जोत बाधोन ठिकाण घेणार ... " ( आबाजी हरी देवधर याच्या पत्रांतून इ. स. १७७२ चा सुमार ). काशीहून वाटपपत्र आलें तेव्हांच दिसून आलें कीं हिरे याचे आगर व शेत देवधराना निर्वेध करून दिले आहेत. अताजी परशराम यानीं आपल्या बाजूचा कमकुवतपणा ओळखला व त्यानीं हिरे व सुतार याच्या वतनाचा नादच सोडला

अंताजी परशराम यांनीं आपलें अंग काढून घेतलें खरें. पण त्याच सुमारास या प्रकरणाला वेगळी कलाटणी मिळण्याचीं चिन्हे दिसू लागलीं. काणे राहातात तें देवधरांचेंच ठिकाण असें केशवभटाच्या नातवाना आतां कळलें. त्यानीं आता आपल्या ठिकाणाची चौकशी करावी व काणे याना नवें जोतें बाधायला बंदी करावी असा अर्ज केला काणे एका संकटांतून मुक्त होतात तों दुसरें सकट दत्त म्हणून त्याच्यापुढें उभें राहिलें काणे यांच्यावर निर्वासित होण्याचा दुर्धर प्रसंग आला.

नारो हरी बाळ व काणे याचा अनेक पिढ्याचा ऋणानुबंध होता रामभट काणे याला मुरुडला परत आणण्यांत हरी बेहरे याचा पुढाकार होता. नारो हरी हा या बेहऱ्याचा वंशज नारो हरीचें गावांत वजन मोठें, गावचा कारभारीच तो. समकालीन शाहीराच्या शब्दात सांगायचें तर "नारो हरी धनी मुरुडाचे." तो अशा कठीण प्रसंगीं काणे याच्या मदतीला धावून आला तर त्यात आश्चर्य कसले.

ग्रामस्थांच्या वतीनें आगर व शेत याचें समतपत्र काणे याला करून द्यायचें असें नारो हरीनें ठरविलें. त्या समतपत्राची हकीकत समकालीन पत्रांत वाचण्यासारखी आहे त्यांतला हा उतारा पहा– " शके १६९४ नंदन नाम सवत्सरे आषाढ वद्य ११ इदुवार ते दिवसी प्रातःकाळीं प्रहर दिवसास वे|| केशवभट अग्निहोत्री कर्वे याचे घरी मुरुडास जनार्दन अभ्यंकर यास पुढील वोटीवर कोणी येईल म्हणोन

राखण ठेविलें, व घराचे उत्तरेकडील कवाडी लाविली. आणि मागले ओटीवर बसले त्याची नावनिसी

( १ ) बालाजीपंत करमरकर कुलकर्णी.
( १ ) सदाशिवपंत दातार
( १ ) कृष्णंभट भाग्ये.
( १ ) नारो हरी बाळ वर्तक.
( १ ) याचे पुतण्ये दादाजी बाळ.
केशव भट अग्निहोत्री संध्या करीत बसले होते.

याप्रमाणें मिलोन चोरोन खोटें पत्र काणे यास हिरे याचे ठिकाणाचे लिहून दिल्हे. रा॥ बाळाजीपंत कुळकर्णी यास ल्याह्यावयास सांगत होते. त्याणें प्रत्योत्तर केलें कीं मी सर्व ग्रामस्त मिलोन श्रीचे देवळीं ल्याहावयासी सांगितलें तरी लिहीन. येथें चोरोन खोटें पत्र लिहीत नाहीं. त्याजवर मनस्वी आपले मतें नारो हरीनीं लिहिलें. ..." या पत्रातील 'चोरोन' व 'खोटें' हे शब्द जास्त तिखट आहेत. पण हें संमतपत्र सर्व ग्रामस्ताचे समोर व्हावयास पाहिजे होतें. आणि तसें तें झालें नाहीं हें लक्षात येईल. या संमतपत्राला वैशंपायन किंवा बागुल वर्तक याची संमति मिळाली नाहीं. एवढेंच नव्हे तर वैशंपायनानीं पेशव्याकडे तक्रारच केली वैशंपायनाची ही तक्रार आणि आबाजी हरि देवधर याची तक्रार यामुळें सरकारी चक्रें फिरूं लागलीं. काणे याना जोत बांधण्यास बंदी झाली व हिरे ठिकाणाबाबतची चौकशी सुरूं झाली.

या प्रकरणांत मुरुडच्या ज्या अनेकाच्या लेखी साक्षी घेण्यात आल्या त्या साक्षींच्या व इतर कागदाच्या साहाय्यानेंच वरील मजकूर जुळवला आहे. या प्रकरणात कुलकर्णी व इतरांच्या साक्षी झाल्या त्यावरून सरकारतर्फे या पत्रावर पुढील शेरा पडला "... चौकसी ग्रामस्ताजवळ करिता काही वतनदारानीं पत्र खोटे म्हणोन साक्षी न केल्या ( समतपत्रावर ) हा मजकूर सर्व सुभा समजल्यापर नारो हरी यासी ताकीद करून सदरहू पत्र पाहावयास सुभास आणवीलें ". या पत्राच्या बाबत पुढें अनेक भानगडी निर्माण झाल्या हर्णेला हें पत्र अमानत ठेवलें होतें तें काण्यांनीं पहाण्याकरिता मागितलें व तें पत्र घेऊन ते पुण्यास गेले ते पुष्कळ दिवस परतच आले नाहींत. काणे याच्यावर कडक उपाय योजावयाचे तर पुढें नारायणराव पेशव्याच्या वधामुळें पुण्याला कुणाचा पायपोस कुणाच्या पायात नव्हता. हें प्रकरण पुढें ज्या न्यायाधीशाकडे गेलें त्या मोरो हरीवर काहींतरी तोहमत आली व हें प्रकरण पुढें अधिकच रेंगाळलें.

काणे यांना घर बांधण्याला जप्ती आली होती. पण त्यांनीं नाना फडणविसाची समजूत घातली व घर बांधण्यास परवानगी घेऊन कामाला सुरुवात केली त्यानंतर पुनः बंदी आली त्या संबधींचा पुढचा एक खासगी पत्रातील उतारा पहा :

" राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री आपाजीपंत बागुल वर्तक आपा यांप्रती

आश्रित त्र्यंबक दीक्षित वैशंपायन ( शंकरभटाचा मुलगा ) कृतानेक नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणुन ता।।। ज्येष्ठ वद्य पावेतो समस्त मडलि सुखरूप असो विशेष. तुम्ही पत्र पाठविलें तें पावोन परम संतोष जाहाला. येथील मजकूर तर काणे यांनी येथून श्रीमत नानाचें चवथरा बांधावयाचें पत्र नेले तें आम्हास कळलें नाहीं. त्यालून ( कोंकणातून ) पत्र आले तेव्हा आम्ही त्या यत्नास लागलों. त्याजवर श्रीमंत नानाची आज्ञा जाहाली कीं आमचे पत्र काणे याने नेले ते वाका की गैरवाका ( योग्य कीं अयोग्य ) हें आम्हास पंचाईत करून समजावणें. त्याजवरून मोठे मोठे पचाईत मिलोन पंधरादिवस पंचाईत होत होती. त्याजवरुन येक दोन पत्रें आपणास लिहिलीं होतीं. व श्रीमंत राजश्री मोरोबादादाचीहि पत्रे घेऊन पाठविलीं होतीं. त्याजवरून काम राहिले म्हणून लिहिलें होतें . . ... "

या प्रकरणाचा पुढें निकाल काय लागला हें कळायला निश्चित साधनें उपलब्ध नाहींत. नारो हरीनें तयार केलेलें पत्र सर्वांच्या समतीचें नव्हे म्हणून खोटें ठरलें हें निश्चित; हिरे याचे सर्व ठिकाण देवघराचें हेंहि खरें. असें असूनहि काणे आपल्या ठिकाणांत सुखरूप राहातच गेले असें दिसतें. कारण अजूनहि काणे व देवधर यांच्या आगरांच्या सीमा एकमेकांना लागून आहेत. आणि जुन्या कागदपत्रा प्रमाणेंच काणे यांचें ठिकाण उत्तरेला आहे. काणे याच्या आंगणात अर्धवट टाकलेलें जोते दिसतें तें तर वरील कागदांतून उल्लेखिलेलें जोतें नव्हे ?

# प्रकरण ७ वें

## श्री दुर्गादेवी व इतर देवळें

प्रकरण दोनमध्यें दिलेली बखर ही तिची भाषापद्धति व लेखनपद्धति ( मधून मधून ऱ्हस्व इकाराचा उपयोग ) यामुळें सर्वांत प्राचीन ठरते त्या बखरींत मुरुड येथें सध्या असलेल्या देवळांपैकीं (१) दुर्गादेवी (२) श्रीभैरव (३) सीमादेवी (४) मशीद; इतक्या चार देवळांचा उल्लेख आला आहे. उत्तराभिमुख लक्ष्मी-नारायणाचें देऊळ व महारुद्राचें देऊळ हींहि कदाचित् वसाहतीचे वेळीं असावीं पेठेंतील देवळें हीं निःसंशय अठराव्या शतकांतील होत.

वसाहतीनंतर लवकरच केव्हांतरी मुरुड येथें पाच देवांचें देऊळ स्थापन झालें. वसाहतीनंतर जो पहिला वैभवाचा काल मुरुडनें पाहिला त्या कालात हें बांधलें गेलें हें निश्चित. या देवळाचें अस्तित्वहि त्या संबधींचे जे अनेक उल्लेख कागदात येतात त्यावरूनच कळतें. एरवीं तें देऊळ कुठें होतें, त्यांत कोणत्या देवाच्या मूर्ती होत्या याचा काहींच थागपत्ता लागत नाहीं. " हाली त्या देवळांतील मुहूर्ती नारायणाचे देवळांत आहेत " असा सदाशिवभटाचा इ. स. १७६४ मधील उल्लेख आहे. सध्यां खालचे पाखाडींतील नारायणाचे देवळात तळयाजवळ ज्या छिन्नभिन्न झालेल्या मूर्ती आहेत त्या तर नव्हेत ? अठराव्या शतकातील मानकऱ्याची जी यादी मिळते त्यात ' पाच देवांचा पुजारी ' याचा उल्लेख आहे. हें देऊळ इ. स. १६२४ च्या मलबारी दंग्यांत दग्ध झालें.

नंतर झालेली देवळाची वाढ ही मुरूडच्या वाढत्या वैभवाची साक्ष होय. नागलेश्वर व पूर्वाभिमुख लक्ष्मीनारायण हीं देवळें आचवलानीं बांधलीं. या नारायणाच्या जागीं आधीं रामसेट कासार रहात असे. आचवलानीं देऊळ बांधायचें ठरविलें तेव्हां कासाराला तेथून घर मोडून जावें लागलें ( इ स १७५० चा सुमार ). सिद्धेश्वर हें देवघरांचें तर तेथीलच गणपतीचें देवालय हें दीक्षिताचें. देवीच्या देवळाजवळील गणपतीचें देवालय पाटणकराचें. याच्यासंबंधींची अशी दंतकथा आहे कीं देवीचें सध्याचें देवालय बांधलें त्यावेळीं सुताराकरितां जी झोपडी बांधली

होती त्यातूनच हें देऊळ निर्माण झालें तळयाजवळील गणपतीचें व मारुतीचें देवालय हींसुद्धां नंतर केव्हा तरी आळांनीं बांधलीं. आणि श्रीरामाचें मंदिर हें तर अगदीं अलीकडे भंडारी समाजानें बांधलें

गावातील मंदिरांची संख्या ही अशी वाढत होती, दिवसेंदिवस अधिकाधिक सुंदर इमारती उठत होत्या; नवीननवीन दीपमाला पेठेची शोभा वाढवीत होत्या. देवपूजेच्या पाण्याकरिता लहानलहान सुबक तलाव खोदले जात होते. यात मुरूडच्या जिवंतपणाची साक्ष होती, मुरूडच्या वाढीचा इतिहास त्यात सामावलेला होता मुरूडच्या संपत्तीचा ओघ, धर्म आणि कला यांच्या रोपट्यांना भिजवीत होता. पण कोंकणातील नद्यांप्रमाणें संपत्तीचा ओघ आटला. लोक धनहीन झाले. त्याचा पहिला फटका बसला तो देवळे व तलाव यांना. कोलारातून गळणार पाणी, आजूबाजूच्या निसर्गाच्या गर्भश्रीमंतींत ठिगळासारखे दिसणारे निस्तेज पत्रे, दगड कोसळून पडलेलीं तीं तळीं, पडणाऱ्या भिंती मेटाकुटीनें सावरणारें तें सिमेंट– मुरूडच्या पडझडीचे हे केविलवाणे साक्षीदार आहेत मुरूडच्या वैभवाचीं भयानक स्थित्यंतरें पाहायचीं असतील तर या देवळांना, तलावाना आणि पारांना एकदां भेट द्या.

पण पूर्वीं मुरुड असें नव्हतें !

सिद्धपुरुषानें गावाची रचना केली ती परस्पर सहकार्य व स्वयंपूर्णता या तत्त्वा-वर. गावाचा व्यवहार सुरू झाला. देवळांतून समाजाचें धार्मिक व सामाजिक नियमन होऊं लागलें सिद्धपुरुषानें गावातील प्रमुख देऊळ दुर्गादेवीचें त्याच्या उत्सवाचें जें स्वरूप आखून दिलें त्यांत त्याचें समाजधारणेचें व लोकसंग्रहाचें तत्त्व उत्तम रीतीनें अंतर्हित झालेलें लक्षात येतें. या उत्सवात ब्राह्मणांपासून ते सोनार, कुणबी, मराठे, न्हावी, तेली, परीट, साळी, चांभार आदि सर्व जमातींना कांहींना कांहीं काम, मानाचे विडे व नैवेद्य देण्याची व्यवस्था करण्यांत आली होती. मुरु-डचा हा उत्सव सुरुवातीपासूनच गाजत असला पाहिजे. सर्व ज्ञाती जमातींच्या सहकार्यानें चैत्रशुद्ध प्रतिपदेपासून ते नवमी दुपारपर्यंत मुरूडला मोठया जत्रेचें व मेळयाचें स्वरूप येत असे. दक्षिणेकडील हेदवीनरवणपासून तो उत्तरेकडे दिवेआगर व पूर्वेकडे चिपळूण परशराम येथपर्यंत ८४ गावाना दरवर्षी यात्रेचें निमंत्रण जात असे.

---

शेंकडो वर्षें हा उत्सव चालू होता. कमीजास्त स्वास्थ्य हाच काय तो त्यांत बदल. धामधुमीचे दिवस गांवावर येत तेव्हां लोक परागंदा होत. अशा

प्रसंगीं गावातील प्रमुख घराणीं म्हणजे बाळ, बागुल, धारप, कोपरकर, वैशंपायन, दातार या प्रत्येक कुटुंबांतील कोणीना कोणी तरी मार्गे असेच. त्यामुळें गावातील परंपरा कधीं खंडित झाली नाहीं यामुळें दुर्गादेवीचा हा उत्सव व ब्रहिरीच्या देवळातील होळीचा उत्सव हे अविच्छिन्न चालू राहिले

देवीच्या उत्सवांत लोकांमधील उत्साह उदंड दिसत असे; देवळाच्या वैभवाची उणीवच जणूं ते या उत्साहानें भरून काढीत. देवीचें देऊळ मात्र अगदीं साधें होतें आणि उत्सवाला भरती आणणारे लोकहि वेदविद्या व कृषि याचा व्यवसाय करणारे सामान्य खेडवळ होते पण कालान्तरानें ग्रामस्थ देशोदेशीं फिरून मुरूडला परत आले ते नवीन दृष्टि आणि नवीन सामर्थ्य घेऊन! नवे विचार व संपत्तीचें पाठबळ याच्या जोरावर देवीचें देऊळ पुनः नवीन करायचें असें कांहीं मातब्बर लोकांनीं ठरविलें. शंकरभट दीक्षित, विश्वनाथ जोशी, आपाभट दातार, केशवभट कर्वे व नारो हरी बाळ असे मुरूडचे शहाणे आणि कर्ते लोक या कामाला लागले. प्रत्येकानें पाच पाच हजार रुपये याकरितां लावले.

नवीन देवळाचा आराखडा भव्य प्रमाणावर आखण्यात आला या तऱ्हेच्या इमारतीकरिता लागणारें साहित्य व कसबी कारागीर मुरूडच्या पट्ट्यात मिळण्याजोगे नव्हते. किरिस्ताव कारागीर मुद्दाम आणवण्यात आले होते ते बहुधा साष्टीहून असावेत. कारण साष्टीकडे बऱ्याच वेळा मुरूडकराना जावें लागे. किरिस्ताव मुरूडला होते याचा पुरावा वैशंपायनाच्या कागदात मिळतो. खर्चाच्या कागदात, "५० रु. जुराणि किरिस्ताव यास व्याज दुहोत्रा शके १६८१ आषाढ शु १" "३० रु. किरिस्ताव (दोन अक्षरें गेलीं आहेत) रच पेद्रू. चैत्र शु १२, ५ दोणिबदल, २५ व्याजें" असे दोन उल्लेख मिळतात. कारागीर जसे अन्य प्रदेशातून व विधर्मीय आणले तसाच इमारतीला उपयोगात आणलेला दगड. तो काळवत्री दगड त्या प्रांतात मिळण्यासारखा नाहीं तो अन्य प्रदेशातून आणवावा लागला हें निश्चित मुरुड अजून श्रीमत होतें.

देवळाचें बांधकाम सतत तीन वर्षें चाललें होतें. इ स. १७६३ मध्यें मंदिर उभें राहिलें आज आपण दुर्गादेवीचें देऊळ पाहतों तें हेंच इतकें सुंदर मंदिर त्या पट्ट्यांत दुसरें आढळणार नाहीं. पुरुषभर उंचीच्या काळ्या दगडाच्या मजबूत चौथऱ्यावर इमारत उभी आहे. पायऱ्या चढून वर गेलों की भव्य, तिन्ही बाजूनी मोकळ्या, व तुळतुळींत जमीन असलेल्या सभामंडपांत आपला प्रवेश होतो.

सभामंडपांतील सुंदर वेलबुट्टी काढलेले खांब आपल्या मनोहारी दर्शनानें भेट देणाराचें मन वेधून घेतात. सभामंडपातून आत शिरल्यावर काळोखाशीं थोडीशी ओळख करून घ्यावी लागते. सभा-कीर्तनाचे वेळीं स्त्रियांनीं या काळोख्या जागेंत बसायचें ! दृष्टि निवळल्यावर समोरच गाभाऱ्यात अष्टभुजा दुर्गादेवीचें दर्शन घडतें. या गाभाऱ्यांत–मूर्तींचा गाभारा नव्हे–उजव्या व डाव्या बाजूला दोन दोन असे पण सभामंडपापेक्षां मोठे व अधिक कलाकुसरीचे खांब दृष्टीस पडतात. बाहेरील खांबावर केवळ वेलबुट्टीची नक्षी आहे तर या आतल्या खांबावर दशावतार व इतर देवता आणि सर्प, पोपट, हत्ती, वाघ, सिंह वगैरे प्राण्यांचीं सुबक चित्रें कोरलीं आहेत

देवळाची मजबूत बांधणी, त्याची प्रमाणबद्धता, काळा कुळकुळीत घट्ट माठीव दगड व कोरलेले सुंदर खांब यानीं मन सुप्रसन्न होतें. पण नंतर लगेच एक विषादकारक विचार मनात डोकावतो. मानववस्तीच्या अगदीं उंबऱ्यावरच हें देऊळ बांधलें नाहीं काय ? माणसाची वर्दळ डावीकडे, उजवीकडे, समोर, मागें–कुठेंहि पाहिलीत तरी चुकत नाहीं. वस्तीपासून फार दूर नाहीं व फार जवळहि नाहीं असें देऊळ असलें म्हणजे अलिप्ततेचें आगळें सौंदर्य देवळाना येतें. मानवी जीवनांतलें मलिन वातावरण मागें ठेवावें; नदीच्या थंडगार पाण्यात आपल्या व्यवहाराचा ताप शांत करावा; ऊन, पाऊस, वारा या निसर्गशक्तींशीं झगडता झगडतां काळवंडून गेलेल्या देवडींतून प्रवेश करावा; आणि वडापिंपळांच्या अखंड सळसळींत विश्रामणाऱ्या मंदिरांत आपल्या बाह्य जगाची विस्मृति पडावी. देऊळ म्हटल्यानंतर असें कांहीं तरी चित्र डोळयापुढें तरळतें आणि मग वाटतें कीं जीर्णोद्धार करणारानीं वहाळेच्या तीरावर सिद्धपुरुषाच्या समाधीजवळ एखादें मंदिर का बांधलें नाहीं ?


पण तसें काहीं झालें नाहीं.

देवळाची बांधणी पूर्ण झाली. देवीची पुनःस्थापना करण्याचा मुहूर्त ठरला. भाद्रपद शुद्ध १ स मध्यान्ही हा मंगल समारंभ व्हायचा होता. सर्व मानकरी व ग्रामस्थ सभामंडपात उपस्थित झाले. पुन प्रतिष्ठेचा संकल्प आपाभट दातार यानें केला. आतां अनुष्ठान चालतें व्हावें पण आचार्यवरणाचे समयीं काणे यानें त्र्यंबकभट दीक्षित वैशंपायन याला आक्षेप घेतला. त्यावर बरीच खडाजंगी झाली. ग्रामस्थ म्हणत आचार्यवरण हें वैशंपायनाचें पूर्वार्जित आहे. आणि काणे हा तर ८०–९० वर्षांचा ठेवणाईत आहे. ( ८०–९० वर्षांपूर्वीं त्याला ठेवला. ) पण एवढ्यानें

श्री दुर्गादेवी, मुरुड



दुर्गादेवीचें देऊळ, मुरुड



निकाल लागला नाहीं. संध्याकाळ झाली. लोकांची संध्येची वेळ झाली. शंकरभट दीक्षित, नारो हरी, केशवभट कर्वे आदि घरीं जाऊन संध्या करून आले. पुनः सभा बसली. पुनः वाद सुरू झाला. ग्रामस्थांनीं निकाल दिला कीं वैशंपायन यानीं आचार्यपद स्वीकारावें. आचार्यपदाची सुपारी वैशंपायनांच्या हातांत पडते असें पाहताक्षणींच काणे यानें गाईब्राह्मणांची शपथ घातली. वेळ होत चालला. रात्र वाढत चालली. आजचा मुहूर्त टळणार असें दिसूं लागलें. कंटाळून नारो हरी आदि लोक काणे याला आचार्यपद द्यायला तयार झाले. पण ग्रामस्थानीं पुनः त्याला हरकत घेतली. अखेरीस आता निकालाची निकड लागली तेव्हां "आम्ही पांचहि यजमान आहोंत. आम्ही पाचहि यजमानपण व आचार्यपद घेऊं" असें म्हणून अनुष्ठान समाप्तीस नेलें. मूळची स्थापना वैशंपायन याच्या हातची म्हणून त्याचे हस्तें स्थापना करून अनुष्ठान "चालीस" लाविलें.

नवीन देवळामुळें मुरूडच्या प्रतिष्ठेंत भर पडली. मुरूडला थोर थोर लोकहि होते. मोठमोठ्या सरकारी अधिकाऱ्याकडे त्यांची वग होती. मोरो बापूजीसारखे सुभेदार हे या चैत्री उत्सवांतले सन्माननीय पाहुणे म्हणून येऊं लागले. पुढें लवकरच देवळाच्या सौंदर्यांत भर टाकणारी काळवत्री दगडाची दीपमाळ त्रिपुरी पौर्णिमेला दुर्गादेवीच्या अंगणाला शोभा आणूं लागली. इ. स. १७७८ चें मोरो बापूजीचें हें पत्र पहा "कसबे मजकुरीं देवीच्या देवालयापुढें त्रिपुर बाधिला. दातार, नारो हरी, कर्वे, वैशंपायन, जोशी. पांच जणांहि त्रिपुर बाधिला त्यास वरकड गांवाची चाल पाहाता ज्याणें त्रिपुर बाधिला त्याणें त्रिपुरी पूर्णिमेस पाजळावा. ऐसी चाल आहे. त्यास कसबेमजकुरीचा त्रिपुर सालगुदस्ता दातारानीं लाविला. साल मजकुरीं नारो हरी लावितील. दरम्यान दातारास कजिया करावयास प्रयोजन नसे व पुढें पाळीप्रमाणें पाचजणाहि पाच साले लावीत जाणें. जाणिजे"

हा त्रिपुर म्हणजे मुरूडचें एक लेणें आहे. दीड दोन फूट उंचीच्या प्रशस्त अशा काळया चौथऱ्यावर बरोबर मध्यभागीं एक सुंदर असें तुळसीवृंदावन आहे. चौथऱ्याच्या दक्षिण बाजूला दोन माणसाच्या कवेंत मावेल असा दगडाचा निमुळता होत गेलेला एक उंच स्तंभ व स्तंभाच्या शेवटास दगडाचीच केलेली एक भली मोठी पणती.

सध्यां ह्या दीपमाळेवर सिमेंट कॉंक्रीटची एक बेडौल इमारत उभी आहे. बिचारी दीपमाळ! आपलें अस्तित्व तरी रसिकाच्या नजरेंत येतें काय या विचारानें व्याकुळ होऊन कसेबसे दिवस कंठीत आहे!

देवीच्या देवळात निर्माण झालेल्या अनेक कटकटी सांगता येतील. विस्तार-भयास्तव हात आवरता घ्यावा लागत आहे " दोन प्रहर झाले अद्याप घटस्थापना झाली नाहीं " हें कळल्यावर सरकारकडून–हर्णैहून–ति-हाईत ब्राह्मण येऊन घटस्थापना झाली याचीं जशीं उदाहरणें मिळतात तसेंच उत्सवाच्या वेळीं अष्टमीच्या दिवसाचें उत्पन्न गावकीचें तें गावकीला मिळत नाहीं अशी नारो हरीची तक्रार आल्यावरून सरकारकडून त्या कामाकरितां खास कारकून नेमल्याचा उल्लेख आहे देवीचें अंग व्यंग ( ? ) झाल्यामुळें पूजा राहिली; सबब मानकऱ्यांना शंभर शंभर रुपये मसाला (दंड) झाल्याचींहि उदाहरणे मिळतात. या सर्व निरनिराळ्या प्रसंगावरून सरकारचें व लोकाचें देवीच्या सर्व व्यवस्थेंत कसे दक्ष लक्ष होतें तेच नजरेंत भरते.

मुरूडचें वैभव म्हणजे वसंतनवरात्राचा जातिनिरपेक्ष पण मानपानाचा उत्सव. मधूनमधून कटकटी निर्माण होत, पण हा उत्सव इ स १९०० पर्यंत अखंड चालला. पण सोनार व ब्राह्मण यामध्यें मानापानावरून इ. स १९०१ मध्ये भांडण होऊन हा उत्सव बंद पडला नवीन युगाची सूचक अशी ही गोष्ट विसाव्या शतकाच्या आरंभींच घडली ! मानपानाचे उत्सव चालू करण्याचे पुढें अनेक प्रयत्न झाले ते सर्व निष्फळ ठरले. इ. स. १९५२ मध्यें लोकांच्या उत्सवप्रियतेचा विजय झाला. लोकांनीं मानपानांवर पाणी सोडलें. मानपानविरहित असा हा उत्सव अर्धशतकानंतर पुनः चालू झाला.

मुरूडच्या वसाहतीबरोबरच शून्यालयाची ( मशिदीची ) स्थापना झाल्याचा उल्लेख मागें आलाच आहे. मशिदीसंबधीच्या एका अर्थगर्भ दंतकथेचा उल्लेख पुढें एका प्रकरणांत आला आहे. मशिदीला उत्पन्नाची व एका काजीची नेमणूक सिद्धपुरुषानेंच केली होती. या मशिदीचा काजी मुरूडच्या कारभारांतहि मधूनमधून भाग घेत असावा. पुढच्या प्रकरणात इ. स. १७०७ मधल्या एका कागदाचा उल्लेख आला आहे. त्या कागदावर पहिली साक्ष एका मुकादमाची असून ती फारशी लिपींत आहे. मशिदीला सरकारी नेमणूक कमीजास्त स्वरूपांत निरनिराळ्या राजवटींत निरनिराळी होत असल्याचें एका कागदावरून दिसतें. शिद्दीच्या अमलात मूळचे गांवकी ठिकाण मशिदीकडे चालू झालें. पुढें शिवाजी महाराजांच्या कारकीर्दींत तें ठिकाण परत गावकीकडे आलें तर आंग्रे याच्या कारकीर्दींत काजी शरीफ त्या ठिकाणाची वहिवाट करीत असे. सत्तापालटाचे हे विविध अनुभव इतर देवळाच्या बाबतींत अनुभवाला आलेले दिसत नाहींत. या जुम्मा मशिदीकडे शिद्दी-

कडून सुवर्णदुर्ग, गोवळकोट व अजनवेल या किल्याचेंहि काहीं उत्पन्न लावून दिल्याचें आढळतें.

मुरुड येथील तिसरें प्राचीन मंदिर बहिरीचें. ( निरनिराळ्या कागदातून भैरव व बहिरव असेहि या देवळाबद्दलचे उल्लेख आहेत. ) हा देव मुख्यतः कुणब्यांचा. सध्यां कुणबी यांची बहुतेक वस्ती डोंगराच्या उतारावर आहे. बहिरीचा कोंड, तांबडीचा कोंड व बोवणे आळी या ठिकाणी. दुर्गादेवीच्या खालोखाल महत्त्व या बहिरीचें. देवीचा उत्सव चैत्र प्रतिपदेला पण ग्रामस्थाच्या उत्सवप्रेमाला भरती यायची ती या बहिरीच्या होळीच्या उत्सवाचे वेळेपासून. हा उत्सवहि तितक्याच उत्साहानें, थाटानें आणि अटीतटीनें साजरा होत असे.

" महादेवाचा पुत्र बयेरी ( बहिरी ) माता हो पार्वती जी ।
दिलवारूवर सवार ( स्वार ) झाले तेही चालले सुधार्से जी ॥ "

– अशी स्थानिक शाहिरानें बहिरीची कीर्ति गायली आहे

" आज खेळ आहे बहिरीचा, निशाण त्रिशुळ डफ्रगाणें जी ।
रथावर जरीपटका पुढें चालला फरारा जी ॥ "

असें पुढें सांगून या होळीच्या उत्सवाचें शाहिरानें मोठें वैभवशाली चित्र रेखाटलें आहे. हा होळीचा उत्सव शतकानुशतकें इतक्याच उत्साहानें चालू आहे बखरींत होळींतील मानपानाचा विस्तार केला आहे. परिशिष्टांत दिलेल्या प्रश्नमालेंतहि या उत्सवाचा आवर्जून उल्लेख आहे.

इ स. १७८० च्या सुमारास या होळीच्या उत्सवावरून भांडणें उत्पन्न झाली होतीं. त्यासंबंधीचे जे कागद उपलब्ध आहेत त्यावरून पुढील मनोरंजक माहिती मिळते.

होळीकरितां खाब वाजतगाजत नेत तो पश्चिमेकडचे आगरांतील. तो दळवी याचा आगर असा उल्लेख आहे. या दळवीचा उल्लेख परिशिष्टातील बखरींतहि आला आहे ( हा दळवी याचा आगर कोठें होता ? ) " आल्यानंतर दळवी याणें पूजा-साहित्य वैशंपायन याजपाशीं द्यावें " " प्रथम खेली खेल काढितात तेंव्हा मान आपणां-कडे ( रिसबूड ) व कारभारी याजकडे देतात " " प्रतिपदेस श्रीची साहाण भरितात तेथें साहाणेस सामान आपणाकडून नेत आले, नारळ, पानें, सुपारी व तांदुळ ऐसे वाजत घेऊन जावें, आणि चौक भरून देवास गावची अर्जी करावी, विडे गुरवानें

वाटावे " बहिरी हा गावचा कोतवाल – रखवालदार तेव्हा गावाच्या संरक्षणाचा अर्ज दरवर्षी केला जावा यात आश्चर्य वाटायला नको.

गुरवानें वाटावयाच्या विड्याच्या अग्रक्रमाचा वाद उत्पन्न झाला. रिसबूड म्हणत पहिला मान आपला, नंतर इतरांचा वादाचा निकाल कौल लावून करावा असें मान्य झालें. " अवघे म्हणावयासी लागले कीं श्री बहिरीनें तुम्हास द्यावयास प्रथम सांगितलें तर देऊं. त्यावरून श्रीस कौल लाविले. देवानें सांगितलें कीं रिसबूडास प्रथम विडा द्यावा. ऐसे तीन कळयानी देवानें प्रथम घ्यावा म्हणोन सांगितलें तेव्हा अवघे उठोन गेले. त्यापासून विडे घ्यावयाचे सोडिलें " या भांडणात कुणबी, बाळ, बागूल, वैशंपायन आदि सर्वांचा समावेश होतो. चौक भरण्याकरिता साहित्य कुणी द्यायचे, विड्याचा अग्रमान कुणाचा, तें ठरविण्याकरिता बहिरीला कौल लावणें – या सर्व अनुभवांतून आपण गेलों आहोंत. आपल्या मनाच्या खोडांत या अनुभवांचें सत्व जमलेलें आहे. कासाळवाचीं पानें गळून पडतात आणि कंद वाढत जातो तसेंच म्हणाना.

बहिरीच्या घाटीला सुरुवात होते तेथेंच उंचवट्यावर हें बहिरीचें प्राचीन मंदिर आहे. मंदिर अगदीं साधें आहे. लगतच, आंबे, फणस कोकंबांची दाटी आहे समोरच पारंब्याचें झुले करतां येण्यासारखा एक वटवृक्ष आहे सकाळ दुपार संध्याकाळ ह्या झाडाच्या गर्द छायेंत पुढच्या अंगणांत बसता येतें. संध्याकाळीं वादळयाची कठीण घाटी उतरून आल्यावर बहिरीची ही शीतल छाया प्रवाशांचें स्वागत करीत असते. प्रवासी बहिरीचें दर्शन घेऊन अंगारा लावून पायऱ्यावर बसतो. दक्षिणेकडून येणारे मंद वारे त्याचें मन प्रसन्न करीत असतात. दक्षिणेकडे तोंड करून बसलें कीं थेट सिद्धपुरुषाच्या समाधीपर्यंत दृष्टि पोंचते. हे प्रसन्न वारे सिद्धपुरुषाचे तर आशीर्वाद घेऊन येत नसतील ? आपल्या निवासस्थानावर बहिरीची कृपादृष्टि असावी म्हणून तर बहिरीनें दक्षिणेकडे तोंड केलें होतें ?

# प्रकरण ८ वें

## सुरस कथा व दंतकथा

अस्सल व नक्कल अशीं इतिहासकालीन लेखी साधनें हा इतिहासाचा मुख्य आधार. आख्यायिका व दंतकथा यांचा दर्जा या साधनांच्या खालीं. धड टाकाऊ नाहीं व सर्वस्वी विश्वसनीयहि नाहीं असें या आख्यायिकांचें स्वरूप असतें. पण परंपरेनें चालत आलेलें ऐतिहासिक सत्य त्यात कुठें तरी दडलेलें सांपडतें. भोंवतीं जमा झालेलें कल्पनेचें गदळ दूर केलें म्हणजे इतिहासाचा ओघ व त्यातील भावनिक सत्य यांचें दर्शन घडतें.

पुढें कांहीं कथा गोळा केल्या आहेत. त्याना गुंफणारा धागा मुरुड व मुरूडकर. सगळयाच कांहीं दंतकथा नाहींत. बाळाबबींची माहिती २०० वर्षांपूर्वींच्या कागदावरून दिली आहे. कांहीं कथा कुळांत परंपरेनें चालत आलेल्या आहेत, तर कांहीं सर्वांच्या तोंडी जाऊन बसल्या आहेत. सामल बाळाची कथा मुरूडपासून दूरवर पसरलेली आहे तर श्रीदुर्गा देवीची कथा मुरुड येथें मुलांना भोळयाभाबड्या भाविकतेनें सांगितली जाते.

**(१) कुळगांवकर जोशी :** पुढें दिलेल्या दोन दंतकथा कुळगांवचे श्री.नारायण वामन जोशी यानीं जशा पाठविल्या तशा उद्धृत केल्या आहेत. बाळाजी विश्वनाथाच्या थोरल्या बंधूंना गोणत्यात घालून बुडविण्यात आलें हा जो समज प्रचलित होता तो अधिक संशोधनानतर खोटा ठरला आहे. पण जानोजीला जरी शिद्दीनें बुडविलें नसलें तरी या भट घराण्याच्या निसबतीनें काम पहाणाऱ्या दुसऱ्याच एका मनुष्याला शिद्दीनें बुडविलें होतें. शिद्दीचा राग भट घराण्यावर झाला होता. भट नाहीं, तरी त्याच्या विश्वासांतील एका व्यक्तीला शिद्दीनें बुडविलें होतें एवढें सत्य त्या दतकथेंतून शिल्लक उरतें दंतकथा अशा :

( अ ) बाळाजी विश्वनाथ भट याचे थोरले बंधूस गोणत्यात घालून शिद्दीनें बुडविल्यानंतर बाळाजी विश्वनाथ गाव सोडून घाटावर आले. त्याच्यामागें धरणें आलें. तेंव्हां त्यांची मुलें माणसें याना आसपासच्या गावात दडवून ठेवावें लागलें.

शोध घेत घेत तें घरणें मुरुडगावीं आलें. बाळाजीची पत्नी राधाबाई आणि मुलगे बाजीराव व चिमणाजी एवढी मंडळी हरिराम केशव जोशी याचे घरीं होती. अधिकारी घरटीप घेत चालले, तेव्हां या तिघांना, उष्टयाखळींत, पत्रावळीच्या ढिगाखालीं उजाडल्यापासून सध्याकाळपर्यंत लपवावें लागलें. मुलांची उपासमार होऊं नये म्हणून, घरात पत्रावळीवर दूधभात कालवून, तो त्याच्याकडे फेंकण्यात आला. सध्याकाळीं सामसूम झाल्यावर त्याना घरांत आणलें. यानतर त्याना तेथें ठेवणें धोक्याचें होतें. हरिराम यानीं त्याना घाटावर नेऊन पोचविलें परंतु ते परत येत असतां त्याना वाघानें खाल्लें. त्याच्या बरोबरचा गडी रिकामें घोडें घेऊन घरीं आला.

वरील हकीकतीनंतर कांहीं वर्षांनीं सगळीकडे स्थिरस्थावर झाल्यावर हरिराम याची पत्नी सहा मुलांपैकीं दोन मुलगे थोरला विनायक व तिसरा वासुदेव याना घेऊन पुण्यास गेली तेथ बाजीरावाची आई ही स्नानाकरिता नदीवर गेली असतां तिची व त्याची गाठ पडली. राधाबाईनें वासुदेवास ओळखलें व त्याना घरीं नेऊन तेथेंच ठेऊन घेतलें. नंतर विनायक व वासुदेव यांना कुळगांव इनाम देण्यांत आला. कुळगाव हा प्रात राजमाची व प्रांत कल्याण यांच्या सीमांवर होता. विनायकानें कुळगावास वाडा बांधला व तो तेथें राहूं लागला. वासुदेव हा मात्र पुण्यासच राहिला. त्याला चिमाजी अप्पानें खासगी कारभारी नेमलें. यांचा मधला भाऊ व धाकटे भाऊ यांनाहि एक एक गाव इनाम देण्यात आला मधला मुलगा नारायण हा कल्याण येथें राहिला. त्याचे वंशज सध्यां मेघश्याम या उपनांवानें ओळखले जातात. पांडुरंग व गंगाधर हे धाकटे भाऊ अनुक्रमें नेरें व बदलापूर येथें राहिले ( मेघश्याम जोशी हे स्वतःला टाळसूरकर जोशी याचे वंशज मानतात. – लेखक )

(आ) पहिल्या बाजीरावानें आपल्या राहण्याचें ठिकाण सातार्‍यापासून दूर असावें म्हणून पुणे हें मुक्रर केलें. वाडा पुण्याला बांधण्याचें ठरल्यावर एका नामांकित ज्योतिष्याला बोलावून त्याच्याकडून वास्तुस्थापनेचा मुहूर्त काढला. त्या वेळेवर मुहूर्तमेढ रोवली गेली. पण यानंतर कोणाला तरी शका आली. तेव्हा त्या ज्योतिष्याला पुनः बोलावून शका निरसन करून घ्यायचें ठरविलें. ज्योतिषी आपल्या मताच्या बाबतींत ठाम होता. तो म्हणाला, “आपणाला या मुहूर्ताबद्दल शंका असेल तर उकरून पहा मेढ शेषाचे मस्तकास जाऊन भिडली आहे.” या आश्वासनानें शकेखोरांचें समाधान झालें नाहीं. त्यानीं उकरून पाहिलें तों खरेंच मेढीच्या बुंध्यास

अ. क्र. ठा. ग्रंथालय
२३८२२ दि. २१।९।७२
५५



क्रमांक ...४९२२... नों. दि. २१।९।७२

रक्त लागलेलें. परंतु या सर्व घालमेलींत मूळचा मुहूर्त टळला. नंतर त्यानें दुसरा मुहूर्त काढून दिला. त्याप्रमाणें वाडा बांधण्यास सुरुवात झाली. (इ स १७२९). याच मुहूर्तावर वासुदेवानें आपल्या वाड्याची मुहूर्तमेढ रोविली. या मुहूर्ताबद्दल त्या ज्योतिषानें असे उद्गार काढले होते कीं, "हे दोनहि वाडे पडत्या काळात जळून जातील." आणि पुढें झालेंहि तसेंच हा कुळगावकराचा वाडा हल्लींचा नानाचा हौद व त्या पुढील रस्त्याची जागा ह्या ठिकाणीं होता. तो थोरल्या माधवरावाचे कारकीर्दींत जळला. सदर रिकामी खळ नाना फडणवीस यानीं घेऊन "नानाचा हौद" बांधला (इ. स. १७९७) वासुदेव जोशाच्या वाड्याप्रमाणेंच पेशव्याचा शनवारवाडा इ स १८२६ मध्यें जळला.

**बाळ** इ स. १६६० च्या सुमारास मुरुड येथें गोपाळ बाळ नावाचे वर्तक होते. त्या सुमारास पाटण प्रदेशांत धामधूम झाली दुष्काळ पडला. लोक उद्योगाच्या शोधात चहूंकडे पांगले. त्यापैकींच हर बेहेरे नांवाचा गृहस्थ या गोपाळ बाळ यांच्याकडे येऊन राहिला त्याच्याकडे असताना तो वर्तकपणाचें काम पाही. पुढें गोपाळ बाळ निवर्तला. व त्याच्या पत्नीनें सहगमन केलें मुलगा नसल्यामुळें तिनें सहगमनापूर्वीं आपलें द्रव्य वगैरे हर बेहेरे याच्या स्वाधीन केलें त्याला दत्तक घेतलें असा उल्लेख नसला तरी पुढें १७८० च्या सुमारास बाळकृष्ण बाळ यानीं त्याला दत्तकपुत्र मानलें आहे वर्तकपण पहात असतांनाच मुरूडच्या रिसबुडाची कन्या त्याची पत्नी झाली पुढें तो विशाळगडाला गेला. त्याची आत्या तेथील अमात्याकडे होती या अमात्याच्या साहाय्यानें बेहेरे यानें आमानी खाडिलकर याच्याकडून आपणाकडे मुरूडची महाजनकी मिळविली केशव जोशी व बेहेरे याचा दाट स्नेह झाला, याचे मुलगे पुढें आपणास बाळ म्हणवू लागले. गोपाळ बाळ याच्या पत्नीनें सती जाण्यापूर्वीं हर बेहेरे याला सांगितलें होतें कीं, "आमच्या कुळातले इतर पुरुष परागंदा आहेत" ते कालान्तरानें परत आले. पण ते गरीब होते. 'कष्ट मशागत' करून उदरनिर्वाह करीत. त्यामुळें हर बेहेरे याच्या वंशजाविरुद्ध त्यांना वर्तकपणाचा दावा लढविता आला नाहीं. शिवाय हे बाळहि (मूळचे बेहेरे) आपल्यातलेच आहेत; त्याचा आपला दहा दिवसांचा सोयेरसुतकाचा संबंध आहे एवढ्यावर ते समाधान मानून होते. पण पुढें १७८० च्या सुमारास नारो हरीनें (हर बेहेरे याचा वंशज) हा सोयेरसुतकाचा संबंध तीन दिवसांवर आणला, तेव्हा गोविंद रघुनाथ व बाळकृष्ण महादेव बाळ (हे

नाना फडणविसाचे मर्जीतील कारकून होते याची मुलगी मिरजेच्या पटवर्धन घराण्यात दिली होती. व या बाळांचे वंशज सध्या मिरजेच्या भागांत आहेत. ) यानीं ही सर्व हकीकत सरकारांत कळवून तक्रार केली. या नवीन सोयेरसुतकाच्या संबंधानें आपला वर्तकपणावर हक्क राहणार नाहीं हा या तक्रारीचा इत्यर्थ पण ही तक्रार टिकली नाहीं असें दिसतें. कारण पुढे १८१२ मध्यें गोविंद रघुनाथाच्या मुलानें नारो हरीच्या पुतण्याला वर्तकपणाला हरकत केली म्हणून त्याला ५० रु चा दंड भरावा लागला.

नारो हरी व इतर भाऊ मिळून एकुण सहाजण. त्यापैकीं महादाजी याचाच वंश सध्या मुरूडमध्यें आहे. बाकीच्याचा निर्वंश झाला नारो हरीचें वजन मुरूडला चांगलेंच दिसतें. हिरे प्रकरणात मात्र नाना फडणविसाची गांठ घेण्यात महिन्यामागून मागून त्याला यश आलें नव्हतें. एका पत्रलेखकानें " नारो हरी नाना फडणविसाकडे चार दिवशीं शहाळीं, नारळ, फणस, अननस याच्या डाली भरून पाठवितात. पण एकदांहि त्याची नाना फडणविसांशीं मुलाखत झाली नाहीं. " असे उद्गार काढले आहेत. नारो हरीनें मुरूडला भव्य चौसोपी वाडा बांधला होता. पेशव्यांकडील कांहीं सरदार मुरूडला येत असत त्यांच्यासाठीं डोंगरावर एक इमारत होती. तिला बंगला म्हणत घोड्यांनाहि पाणी पितां येईल अशी विहीर त्यानें बांधली होती. कल्याण येथें त्याची टाकसाळहि होती असें म्हणतात.

**सामल बाळ :** मुरूडच्या बाळांपैकीं एका घराण्याला सामल हें उपनाम कसे पडलें त्यासबंधीं एक मनोरजक आख्यायिका कोंकणांत प्रसिद्ध आहे. सहा मल्ल या शब्दसहतीचें सामल हें रूपान्तर. एकदा बाळ-बंधु हे रस्त्याच्या कडेला काम करीत होते. देशावरून आलेले दोन मल्ल मुरुड गावच्या रस्त्याची चौकशी करीत चालले होते. बाळांनीं या मल्लाना पाहिल्यावर आस्थेनें चौकशी केली " मुरूडच्या बाळाचीं कीर्ति ऐकून त्यांच्याशीं कुस्ती खेळण्याकरिता आलों. " हें ऐकल्यावर बाळांनीं आपण कोण हें न सांगता त्याना आपल्या घरीं आणलें. पंगतीला ते मल्ल व हे सहा भाऊ एकदमच बसले सहा भावांच्या पानात तीळ वाढलेले पाहून मल्लाचें कुतूहल जागृत झालें. तीळ मुठींनीं पिळून तें तेल भाकरीवर घेतलेलें पाहिल्यावर त्याच्या आश्चर्याला पारावार राहिला नाहीं. मनातल्या मनात ते वरमूनहि गेले जेवण झाल्यावर " आम्हीच बाळ ! कुस्त्याची दंगल केव्हा घ्यायची तें आपण ठरवा " पण एव्हांना मल्लांचें गर्वहरण झालेंच होतें.

**चोळकर** · " पेशव्याकडून आमच्या कुटुंबातील कोणा स्त्रीस ( ती पेशव्यांची बहीण म्हणून ) चोळी बांगडीकरिता मुरुडजवळील चोळी गाव मिळाला. तेव्हांपासून आमचें उपनाम चोळकर पडलें " ( वा. कृ. चोळकर, चित्पावन पृ. २२६ ) " सध्याच्या चोळकराचे पूर्वज पेशवाईंत मुजुमदार होते म्हणून पेशव्यानीं चोळकराना चोळी हा गांव चोळीबांगडीकरितां दिला. " द. सि. चोळकर.

**पंडित** : दामोदर म. पंडित यांचे पणजे महादाजीपंत हे दुसऱ्या बाजीरावाच्या सुमारास होऊन गेले. दुसऱ्या बाजीरावाचा स्त्रैण स्वभावाचा दुर्दैवजनक अनुभव महादाजीपंताना आला. महादाजीपंत हे दरबारात अधिकारावर होते. त्याच्या अत्यंत सुस्वरूप पत्नीवर बाजीरावाची दुष्ट नजर वळली. आणि शिरस्त्याप्रमाणें तिला सरकारवाड्यावर हळदीकुंकवाचें निमंत्रण गेलें. सरदार रास्त्याच्या सल्ल्याप्रमाणें चार दिवसांची अडचण सांगून तो दिवस निभावला पण त्याच रात्रीं पडितानीं वीस पंचवीस रामोशी बोलावून आणले त्यांना बक्षिसाची चांगली लालूच दाखविली व आपल्या पत्नीला व पाच वर्षांच्या मुलाला पेशव्याच्या राज्याबाहेर सुरक्षित पोंचविण्याला सांगितले. महादाजीपंताची पत्नी पालखींतून त्या रात्री बाहेर पडली. टाकोटांक शिद्दीच्या राज्यात आपल्या माहेरीं जायचें तिनें ठरविलें. मेढेघाटात आल्यावर या मंडळीला उमाजी नाईकाच्या स्वारांनीं अडविलें. बाईनीं व रामोशानीं विनवून सांगितलें कीं " एका कुलीन स्त्रीच्या अब्रूचा प्रश्न आहे. बाजीरावाचे सैनिक पाठीवर असतील. आम्हाला ताबडतोब पुढें चालते करा " त्या स्वारानीं तें बोलणें मानलें नाहीं. ते एवढेंच म्हणाले " आमचे नाईक एवढ्यांत येतील. ते काय करायचें तें करतील. " उमाजी नाईक लवकरच आला. त्यानें सर्व हकीकत ऐकिली व तो बाईंना उद्देशून म्हणाला " तुमचे काय सोनें नाणें असेल तें काढा " बाईनीं पालखींतून आपल्या दागिन्याचा डबा काढला व त्याच्या स्वाधीन केला. उमाजीनें त्यातला फक्त चंद्रहार उचलला व बाईंना पालखीचा पडदा बाजूला करायला सांगितलें. पालखींत बाईच आहे अशी खात्री पटली. बाई तुमचा हा डबा परत घ्या. मी त्यांतील फक्त हा चंद्रहार घेतला आहे. माझ्या या लोकाना मला काहीं तरी द्यायलाच पाहिजे. आणि आपण आता निर्धास्त असा. माझ्या जिवात जीव असेपर्यंत बाजीरावाचा एकहि सैनिक या घाटानें पुढे येणार नाहीं. " बाई जंजिऱ्याच्या राज्यात सुखरूप पोंचल्या. त्याची आणि महादाजीपंत याची पुनः भेट झाली नाहीं.

**दातार :** डुन्याजवळच्या दातारांना आंग्रे सरखेल यानीं शेत इनाम दिलें होतें. या दातारांपैकीं एकाचा सदाशिव नाईक दातार असा उल्लेख मिळतो. हे दातार पेशव्याकडे दप्तरदार होते असें म्हणतात. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांत त्यांचा मुरुड येथें चौसोपी वाडा होता. खैऱ्याच्या कोंडातील दातार पाखाडी व गिम्हवण्याच्या वाटेवरील दातार बाव याच दातारानीं बांधली. दूधदुभत्याकरितां एक चांगली म्हैस त्यानीं मुरूडला पाठवली होती सड्यावर चरून डोंगरकपारी उतरत असता म्हैस अवचित घसरून पडली या अपघातातून म्हैस कांहीं वाचली नाहीं. सड्यावर जाण्यायेण्यांतला हा धोका या प्रसंगाइतका दातारांना कधींच जाणवला नव्हता. या प्रसंगाची पुनरावृत्ति होऊ द्यायची नाहीं असें त्यानीं ठरविलें. या निर्णयाचें फलित म्हणजे कर्ह्यांच्या डोंगरावर जायची सुंदर पाखाडी होय.

दातार बाव सुद्धा अशाच एका प्रसंगामुळें खणली गेली पुण्याहून कोणी एक सरदार दाताराकडे येत होता. सड्यावर वाळवंटासारखी स्थिति नाहीं दापोलीपासून मुरुड हें अंतरहि फार नाहीं. मग काय असेल तें असो; या सरदाराचा घोडा पाण्यावाचून तडफडून मेला. तो ज्या ठिकाणीं मेला त्या ठिकाणीं दातारानीं त्या घोड्याच्या स्मरणार्थ व पांथस्थाना उपयोग व्हावा म्हणून विहीर बांधली. ती दातार बाव म्हणून आजहि प्रसिद्ध आहे.

**दुर्गादेवी :** मुरूडवर इतिहासकालात दोन संकटें आलीं. एक मलबाऱ्यांचा दंगा व दुसरें भालेराई. त्या वेळीं जाळपोळ व प्राणहानि झाली. इ. स. १८१७ मध्यें तिसरें संकट आलें तें म्हणजे पेंढाऱ्याचें. त्यावेळीं मुरूडची सर्व संपत्ति धुवून नेण्यात आली. आश्चर्य असें कीं त्या संबंधींचे उल्लेख वैशंपायन दप्तरांत बिलकूल मिळत नाहींत. मुरूडकराना पेंढार आल्याचें माहीत आहे पण केव्हा तें माहीत नाहीं या पेंढाऱ्याचा उल्लेख मिळतो तो गॅझेटियरमध्यें.

दुर्गादेवीसंबंधीं जी कथा मुरुड येथें सांगण्यात येते त्यांत या हल्ल्याचा संबंध जोडलेला सांपडतो. मुरूडकर तो हल्ला म्हणजे पेंढाऱ्यांचा असें मानीत. पण तो हल्ला पेंढाऱ्याहून प्राचीन असावा दंतकथा अशी मुरूडवर हल्ला झाला तेव्हा दुर्गादेवी स्वतः रणांगणात उतरली. तिच्या हातात शस्त्र नव्हतें. ती माडाच्या झाडावर भराभर चढली ( भिडयाच्या माडावर चढली असेंहि सांगतात ) व माडाची पाती काढली. या पातीचा तलवारीप्रमाणें उपयोग करून तिनें हल्लेखोराना दक्षिणेकडे

पिटाळून लाविलें. लढतां लढतां तिची मान दुखावली व वांकडी झाली. ती अजूनहि तशीच आहे. लढत असताना तिच्या नथींतील मोतीं पडले. ते तिनें मुरूडाच्या दक्षिण सीमेवर असलेल्या भीमाच्या धोंडीखाली ठेवले.

पुढें देवी पुजाऱ्याच्या स्वप्नात आली व तिनें सांगितलें कीं, "माझ्या नथींतील मोती भीमाच्या धोंडीखालीं आहे." ते मोतीं गांवकऱ्यांनीं वाजत गाजत परत आणले

**मशीद** : मशिदीसंबंधीं पुढील आख्यायिका मिळते. या जुम्मा मशिदीचे खांब देवीच्या देवळांतील खांबाप्रमाणेंच आहेत. देवीचें देऊळ बांधलें तेव्हा देवळांतील खांब नीट बसतना. "मशिदीचा खांब बसवा" असें देवळाच्या पुढाऱ्याच्या स्वप्नात आलें. त्याप्रमाणें मशिदीचा खांब प्रथम बसविला. देवीच्या देवळातील खांबाचें काम त्यानंतर सुरळीत चालू झालें.

*→→→O←←←*

# प्रकरण ९ वें

## सामाजिक जीवन

व्यक्ति आणि घटना यांचा मागोवा घेतघेत आपण अठराव्या शतकाच्या अखेरीस आलों आहोंत. यात कोठे विषयाचें सूत्र अर्ध्यावरच सोडल्याचा वाचकाना भास होईल, तर कोठें चित्र अस्पष्ट वाटेल कोठें अपुऱ्या माहितीच्या दलदलींत कथानक अडकून पडलेलें आढळेल तर कोठें लेखकानें कल्पनेचा लगाम थोडासा सैल केलेला दिसेल. पण या सर्वांत ऐतिहासिक सत्याशीं इमान राखण्याचा लेखकाचा प्रयत्नहि नजरेंत भरेल

मुरूड येथील काहीं प्रमुख व्यक्ति आणि घटना यांचें दर्शन झालें. पण त्या काळच्या सामाजिक पार्श्वभूमीखेरीज त्या व्यक्ति किंवा त्या घटना यांच्या स्वरूपाचें यथार्थ आकलन होत नाहीं आतां व्यक्ति आणि घटना यांतूनहि समाजाचें दर्शन होतच असतें. पण त्यात येणारा अपुरेपणा काहीं अंशीं भरून काढण्याचा हा प्रयत्न आहे.

सामाजिक जीवनाचा विचार करायला लागलों म्हणजे अनेक प्रश्न मनांत उभे राहतात, ज्यांचा वारसा घेऊन आपण मुरूडकर जन्माला आलों त्या पूर्वजांचे आचार, विचार, ध्येयें आपल्यासारखींच होतीं का वेगळीं होतीं; त्यांचें धार्मिक व सामाजिक शासन कशा प्रकारचें होतें ? शिक्षणाविषयीं लोकांत किती आस्था होती; त्यांची पुरुषार्थाचीं साधनें कोणतीं ? त्यांच्या जीवनामागील प्रेरणा कोणत्या ? जीवनाचा असा विशाल व्याप दृष्टीपुढें येतो, प्रश्न सुचतात-प्रश्न विचारण्यांतहि प्रगतीच असते-उत्तरें मात्र थोड्याच प्रश्नांचीं मिळतात. सतराव्या व अठराव्या शतकातील सामाजिक पार्श्वभूमी जाणून घेण्याचा चाचपडत केलेला हा एक प्रयत्न आहे.

या दोन शतकात मुरूडच्या परिसरातील राजकारणाचे रंग सारखे पालटत होते. प्रथम अदिलशाही, नंतर स्वराज्याचें सौभाग्य घेऊन शिवशाही. शिव शाहीच्या विलयानंतर पुनः काहीं काल मोंगलाची साडेसाती आली. यानंतर आंग्र्याची राजवट असली तरी शामलांची ( सिद्दींची ) धामधूम चालूच होती.

तुळाजीच्या कारकीर्दीनंतर पेशव्यांचें ' स्वराज्य ' आलें. या शासनसंस्थांच्या बदलाचे भेरवाईट आघात समाजावर सारखे घडत होते संकट आल्यावर लोकांनीं परागंदा व्हावें, स्थिरस्थावर झालेंसें वाटल्यावर परत यावें. असें चाले मध्यंतरीच्या काळात आगर ओसाड पडावा, शेतीभाती, आगरवाडी, या उपजीविकेच्या साधनाची दैना व्हावी, हा क्रम वर्षानुवर्षें चालला होता. पण ही शोककथा येथेंच संपत नाहीं. सगळा गावच काहीं परागंदा होत नव्हता. काहींजण निर्धारानें प्राप्त परिस्थितीला तोंड देत. जिद्दीनें वतनाचें संगोपन करीत. गाव सोडून गेलेले परत आले कीं त्यातून मालकी हक्काचे तंटे उत्पन्न होत पण या सर्व घटनांचा अन्वयार्थ लावण्याची कुवत समाजात दिसत नाहीं. या सर्व दुर्दैवी प्रकाराकडे वैयक्तिक दृष्टयाच पाहाण्याची समाजाची परंपरा आढळते. त्याचा सामाजिक अर्थ त्याच्या दृष्टीच्या टप्प्यापलीकडे होता. ज्याच्यावर अस्मानी वा सुलतानी संकट कोसळे तो आपलें प्रारब्ध म्हणून तें असहायपणें सहन करी. इतर लोक त्याचा हा कर्मभोग म्हणून हळहळ व सहानुभूति व्यक्त करीत. बदलत्या राजवटीबद्दल सामूहिकरीत्या तिटकारा वा हर्ष व्यक्त करणें हा त्यांच्या मनोव्यापाराचा धर्म कधींच बनला नाहीं. आमचीं सगळीं सुखदुःखें, प्रेरणा, प्रवृत्ति यांना सदैव वैयक्तिक अधिष्ठान होतें. पण ही कहाणी काहीं एकट्या मुरूडची नाहीं. भारतीय जीवनाचाच हा शाप आहे. मुरूडलाच एकट्याला दोष देण्यांत अर्थ नाहीं.

समष्टि सोडून व्यक्तीकडे लक्ष दिलें तर वेगळें दृश्य दिसतें. येथें मात्र समर्थ व्यक्ति या घटनांचा अर्थ टिपीत असलेल्या दिसतात. स्वराज्याचा उदय झाल्यापासून अनेक मुरूडकर आपलें भाग्य काढण्याकरिता पुणें, साताऱ्याकडे कूच करताना आढळतात. शिवशाहीच्या आरंभापासून पेशवाई अखेरपर्यंत अनेक ग्रामस्थांचे खुद्द राजकर्त्यांशीं फार जवळचे संबंध आले. राजकर्त्यांशीं संबंध बहुधा फलदायी होतात अनेक ग्रामस्थांनीं निरनिराळीं वतनें कमाविलीं. आणखी कित्येक मोठ्या हुद्यावर चढले. अर्थात् गुणाची चमक दाखविली म्हणूनच. कुणी मर्दुमकी दाखविली तर कुणांत लेखनचातुरी तर आणखी दुसऱ्यांत मुत्सद्देगिरी दिसून आली. मुरूडचा भाग्यरवि उदयास आला. मुरूडच्या मातींतून श्रीमंती वाडे उठले. महाराष्ट्रातील कर्तबगार नेत्यांची मुरुड येथें ये-जा सुरू झाली. मुरूडच्या कन्या थोरांमोठ्यांच्या संसाराला शोभा आणूं लागल्या.

मुरूडच्या पुरुषार्थाला या काळात सुरुवात झाली हें खरेंच, पण या पुरुषार्थाला मर्यादा पडल्या होत्या. ही वस्तुस्थिति लक्षात ठेवावयास हवी. मुरूडच्या कर्तृत्वाचें

क्षेत्र अर्थोत्पादनाच्या पलीकडे गेलें नाहीं याचें कारण काय असावें ? मुरूडकडे अमाप संपत्तीचा ओघ वळला. कोंकणपट्टयांत मुरुड हें धनिकाचें, सावकारांचें गांव ओळखलें जात होतें यांत शंका नाहीं. मग या वैभवाच्या खाणाखुणा मुरुड येथें दिसत नाहींत असें कां ? या संपत्तीचा उपयोग कलाकौशल्याकडे कां झाला नाहीं ? मुरूडला एवढा ब्राह्मणवर्ग असतानाहि एकहि गाढा पंडित त्यातून का निघाला नाहीं ? पटवर्धन, रास्ते, पेठे यासारखा एखादा रणधुरधर मुरुडकरांमध्यें का निपजू नये ? मुरूडचें कर्तृत्व असें एकमार्गी कां झालें ?

याचें कारण मुरुड गांवच्या त्या काळच्या मानसिक घडणींतच असलें पाहिजे. मुरूडकरांना कला, वाङ्मय, विद्या याची प्रेरणा का मिळाली नाहीं ? संस्कार हें तर कारण नसेल ? मुरुड येथील राहाणीचा व विचारांचा साचा तर संकुचित नसेल ? वाङ्मय आणि कला याच्या अभिजात संस्कारामुळें मनुष्याची दृष्टि अधिक उच्च विचाराकडे लागते; त्या संस्काराना मुरूडकर मुकले असले पाहिजेत एरवीं या प्रकारचा उलगडा होत नाहीं पहिलें स्वराज्य आलें आणि गुलामगिरी गेली – चोहों बाजूंच्या वाटा मोकळया झाल्या पण मुरूडकरांना वाट सांपडली ती एकच – लक्ष्मीच्या मंदिराची !

या काळात धर्माची आणि रूढीची जबरदस्त पकड लोकाच्या मनावर होती असें म्हटल्यानें मुरूडकर इतर मराठी समाजाप्रमाणें होते असेंच म्हणणें होय. पण येथेंहि एक फरक आहे. मुरुडग्रामस्थ धार्मिक आचरणाचे होते ते घटपटाचे पुरस्कर्ते म्हणून. दैनिक आणि नैमित्तिक धार्मिक आचार त्यांच्या हातून होत ते कर्तव्यबुद्धीनें. संतवाङ्मयाच्या अभ्यासानें येणारी हृदयाची श्रीमंती त्याच्याजवळ होती कीं नाहीं याची शंका आहे. मध्वमुनीची "भागीरथीला विनति" ही कविता वैशंपायन याच्या दप्तरात सापडली व त्या विनंतीच्या शेवटीं "या विनंतीवरून देहावसानीं सर्व देवता शिद्धवध्यास येऊन मध्वनाथाचें सार्थक केलें हें अद्यापि दृग्गोचर आहे." असे भक्ताला शोभणारे आर्त उद्गार ही कविता उतरून घेणारानें काढले आहेत. पण हा अपवाद झाला. भक्ताची आर्तता किंवा त्याची धार्मिकता हीं मुरुड ग्रामस्थात फारशी आढळत नाहीं ही वस्तुस्थिति आहे भक्ताच्या निवृत्तिपरतेचा तर मागमूसहि मुरुडकरात दिसत नाहीं. ते संपूर्णपणें प्रवृत्तिवादी दिसतात. पण या प्रवृत्तिवादाला सुद्धा मर्यादा पडल्या होत्या. जीवनांतल्या अदम्य उत्साहात ही त्याची प्रवृत्तिपरता दिसून येते. आपले हक्क,

आपलीं वतनें हीं त्यांनीं आपल्या पंचप्राणांच्या मोलानें जपलीं आपल्या शक्तिबुद्धि त्यानीं खर्च केल्या, त्या ह्या वतनवृत्तीकरितां प्रवृत्तीपरतेचा याहून वेगळा अर्थ त्यांच्या ठिकाणीं दिसत नाहीं.

मुरूडकराच्या मनाच्या या दर्शनानंतर त्याच्या जीवनाच्या विविध अंगाकडे दृष्टिक्षेप करूं.

सिद्धपुरुषापासून थेट इंग्रजी राजवटीपर्यंत मुरूडचा सर्व कारभार बाळ वर्तक व कोपरकरवर्तक – हेच पुढे बागुल झाले–हे पहात असत त्यांना कारभारी असे म्हणत. गावाचें वसुलींचें व दप्तराचें काम सरकारी अधिकारी करीत. शिवशाही आधीं थोड्या कालापासून तें काम पंडित ( कुलकर्णी ) याजकडे वंशपरंपरेनें आलें. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांत हे पंडित बहुतेक काल पुण्यासच असत. त्यांच्या निसबतीनें सोमण, करमरकर किंवा आगाशे काम पहात असत ते सरकारी अधिकारी असले तरी गावच्या कारभारात कुलकर्ण्यांचा हात फारच थोडा दिसतो. गावच्या कारभाराची सर्व जबाबदारी कारभाऱ्यावरच असे पण या बाबतींत त्यांना ग्रामस्थाच्या सहकार्यानें जावें लागे.

इ. स. १६३५ चा कागद पुढें परिशिष्टांत आला आहे. यावरून असें दिसतें कीं, मडलिकांचें ठिकाण बेवारशी पडलें होतें. त्या ठिकाणाचा सारा वसूल होत नव्हता. तो सारा गावाच्या नावावर चढत होता. तेव्हा गांवचा मुख्तसर[९] यानें सरकारकडे इलतिमास[१०] केली. त्यावरून सरकारी अधिकाऱ्यानीं तें ठिकाण बाबाजी वैद्य याला दिलें. या सर्व व्यवहारांत ग्रामस्थांचा हात दिसत नाहीं. मानकऱ्यांच्याच साक्षी या कागदावर आहेत. यानंतरचे आगरासंबंधींचे जे कागद उपलब्ध आहेत त्यात मानकरी व ग्रामस्थ या दोघांच्याहि साक्षी घेतलेल्या आढळतात.

इ. स. १६६० सालीं गोपाळ जोशी करजगावकर याच्या ठिकाणाच्या सीमा महाजनानी, वर्तकानी[११] समस्त आगरी या सर्वांनीं एकत्र येऊन निश्चित केल्या. त्या कागदावर प्रथम महाजन व वर्तक यांच्या सह्या असून पुढें पन्नासाहून अधिक ग्रामस्थांच्या सह्या आहेत इ स. १६९१ च्या पत्राची सुरुवात पहा " स्वस्ति श्री सके १६१३ प्रमाथीनाम सवछरे चईत्र वद्य द्वितीया त दिनी र॥ केशव मनोर कसबे मुरुड यासी माहाजन व

---

( ९ ) मुख्तसर – वतनदार, सरकारी वसूल करणार (१०) इलतिमास – विनंति (११ ) महाजन आणि वर्तक. ( प्रथमेचें बहुवचन )

वर्तक व समस्त बहुत ग्रामस्त कसबे मजकूर याहिं वतनपत्र लिहून दिले ऐसे जे " या पत्रांत आचवलाचा पडित आगर केशव मनोहर याला दिल्याचा उल्लेख आहे त्याच्या किंमतीबद्दल " लारी ६५ पासस्टी घेऊन मोगलाचे भरीस दिले असे " असाहि उल्लेख मिळतो. या कागदावर महाजन व वर्तक चौधे व इतर बावीस ग्रामस्थ यांच्या साक्षी आहेत. कागद लिहिणारा मोरो हरी पंडित हा मुरूडचा वंशपरंपरागत कुलकर्णी आहे या कागदावरून तसेंच इ. स. १७०७ च्या कागदावरून गावातील महत्त्वाचे निर्णय कारभारी व ग्रामस्थ याच्या परस्पर सहकार्यानें होत असेंच दिसतें. यानंतरच्या कागदाची सुरुवात अशी " स्वस्ति श्री शके १६२९ सर्वजित नाम सवछरे पौष वद्य पंचमी ५ गुरुवार त दिनी दामाजी आचवल कसबे मुरुड यासी महाजन व वर्तक व समस्त ग्रामस्त ( ! ) कसबे मजकूर यासी उमजपत्र लिहून दिल्हे जे तुम्हास आम्ही केलसी ( ! ) बोलावून आणून आगर खराबा चाळीस पन्नास वर्षे पडिलें आहे हे महामुरा करावें म्हणून ... नेमून दिलें असे " या पत्रांत महाजन, वर्तक व इतर ग्रामस्थ मिळून चौदा जणाच्या साक्षी आहेत. पहिली सही " फारशी मुकादमाची " म्हणून उल्लेख आहे. म्हणजे मूळ कागदात सही फारशी लिपींत आहे. मागें आलेल्या हिरे प्रकरणावरूनहि हीच गोष्ट स्पष्ट होते कीं महत्त्वाचा निर्णय कारभारी व ग्रामस्थ एकत्र बसून घेत असत

तेव्हां महाजन व वर्तक याचा अधिकार मोठा असला तरी ते ग्रामस्थांच्या सहकार्यानें आपले अधिकार चालवीत. इ. स १७५० पर्यंत मुरुड येथील राजवट नेहमींच अस्थिर अशी होती. या अस्थिरतेचे तडाके लागवडीला बसत. त्यामुळें लागवड योग्य स्थितींत ठेवण्याची बिकट जबाबदारी साधारणपणें गांवकऱ्यांवर व मुख्यतः कारभाऱ्यांवर पडे. अस्थिर राजवटीमुळें सरकारी हुकुमाची अंमलबजावणी करण्याचें काम या कारभाऱ्यांमार्फतच उरकलें जाई. सरकारी अधिकारी नेमला जात नसे. सरकारी हुकूम, अंमलबजावणीकरितां कारभाऱ्याकडे येत; गावांत कटकटी निर्माण झाल्या तर त्याचा तात्पुरता निकाल कारभाऱ्यांना करावा लागे. कोपरींतील भावे याच्याकडे एकदा कार्य चालू होतें. तेव्हां वैशंपायन व जोशी याचें वृत्तीवरून भाडण लागलें. जोशी यांनीं वैशपायन यांची पोथी फाडली. या कलहामुळें कार्य बाजूलाच राहिलें. भावे यानीं कारभाऱ्यांकडे तक्रार केली " याच्या भाडणांत आमचें कार्य राहतें तरी कार्य चालतें करावें " तें कारभाऱ्यानीं तिऱ्हाईत ब्राह्मण बोलावून

कार्य करविलें. गावातील कारभाऱ्याच्या या सत्तेमुळेंच स्थानिक शाहीर म्हणतो "नारो हरि धनी मुरुडाचे".

कारभाऱ्यांच्या या सत्तेला मर्यादा होती हें लक्षात ठेवलें पाहिजे. अधिकाऱ्याचे हुकूम यावे व त्याची अंमलबजावणी होऊं नये असेहि प्रसग येत. तेव्हा कारभारी सरकारकडे तक्रार करीत कीं सरकारी आज्ञेचा अंमल होत नाहीं. गावांत पोलिसी अधिकार असलेला अंमलदार नव्हता असाच याचा अर्थ होतो. एकदां तर ग्रामस्थांनींच तक्रार केली कीं फडणीस हे भिडेमुळें–कडक धोरण न स्वीकारल्यामुळें –गावात बेदिली माजवितात.

मुरुड हा मराठी सस्कृतीचा एक तुकडा. लाटेंतील एक ओंजळभर पाणी. त्याची संस्कृति वेगळी ही कल्पनाच करता येत नाहीं. उत्तर, दक्षिण कोंकणांतील म्हणा किंवा घाटावरील म्हणा, जी संस्कृति तीच मुरुडची. जो काहीं थोडाफार फरक असणार तो स्थानिक परिस्थितीमुळेंच. ही गोष्ट लक्षात ठेवल्यास पुढील विस्तार हा केवळ मुरुडचें वैशिष्ट्य दाखवितो असें मानलें तर चूकच होईल. जवळ उपलब्ध असलेल्या कागदांच्या आश्रयानें मुरुड येथील जीवनाच्या विविध अगावर प्रकाश टाकण्याचा हा अल्प असा प्रयत्न आहे.

**शिक्षण :** उपलब्ध कागदांत उल्लेख शिक्षणासंबंधीं व शाळासंबंधीं फारच थोडे मिळतात मात्र काहीं पत्रांत "विद्यार्थी मंडळीचे नमस्कार" असे उल्लेख येतात. त्यावरून वैशपायन घराण्यात तरी वैदिक शाळा होती हें निश्चित. ती कदाचित् बरीच जुनी असेल. इ. स. १७७०–८० च्या सुमारास तात्या जोशी, महादेव जोशी, धुंडिराजशास्त्री यासारखे संस्कृत पंडित मुरुड येथें होते. त्यांना बाहेर गावच्या लोकांचीं सस्कृत पत्रें येत त्यावरून हें अनुमान करता येतें. महादेव जोशी याचा उल्लेख ज्योतिर्विद् असा केला आहे.

हें झालें संस्कृत विद्येच्या अध्ययनाबद्दल. शिक्षणाच्या ज्या एका अंगाकडे पूर्वीच्या काळीं दुर्लक्ष होत असे असें दिसतें तें म्हणजे अक्षरलेखन. कित्येक कागदात "तो लिहिण्यास असमर्थ होता, म्हणून त्यानें गहाणखत लिहून दिलें नाहीं, किंवा कुलकर्णी वतन चालविता आलें नाहीं." असे उल्लेख सांपडतात.

शिवकालात व नंतरच्या अस्वस्थतेच्या कालात लेखनकलेची विशेष जरूरीच पडत नसे. शिवशाहीच्या आधीं फारशी-भाषेची आवश्यकता होती. ती शिकण्याचा कोणी विशेष प्रयत्न केला असावा असें वाटत नाहीं. आणि उघडच आहे,

अधिकाराच्या जागा मिळत असतील तरच त्या भाषेच्या अध्ययनाची मातब्बरी. त्या जागाच्या अभावीं लोक जर त्या भाषेविषयीं उदासीन राहिले तर त्यांत आश्चर्य वाटायला नको पण पुढें स्वराज्यांत अधिकाअधिक लोकाना जबाबदारीच्या जागा मिळत चालल्या, दूरदूरच्या ठिकाणीं लोक कामगिऱ्या बजावू लागले. त्यामुळें मुरुड व या बाहेर गेलेल्या लोकाचीं कार्यक्षेत्रें यामध्यें पत्रव्यवहार आवश्यक झाला. याचा अर्थ असा कीं अधिकार व स्थलान्तर या उभयविध कारणामुळें लेखनकला ही इतकी दुर्मिळ वस्तु राहिली नाहीं

इ स. १६८० च्या सुमारास मुरुड येथें लिहूं शकणारे तीनच लोक होते असा एका कागदांत उल्लेख आहे. वैशंपायन उपाध्ये व धर्माधिकारी असूनहि लेखनकामांत अगदीं नालायक होते. राजकीय स्वातंत्र्याच्या एक शतकानंतर – म्हणजे इ. स. १७८० च्या सुमारास वैशंपायन कुटुंबातील हरएक मनुष्य पत्र लिहीत असलेला दिसतो एवढ्यापुरतें पाहिलें तर शिक्षणाचा प्रसार जास्त जास्त होत होता असें दिसतें.

स्त्रियाचें शिक्षण कुठें कुठें होत असावें. वैशंपायनाची मुलगी यमुना वर्तकीण– अठराव्या शतकाचा उत्तरार्ध – हिचीं पत्रें उपलब्ध आहेत. ब्राह्मणांखेरीज इतर जमातींत किती शिक्षण होतें तें कळायला साधनेंच उपलब्ध नाहींत. सोनार अर्थात् लिहूं शकत. मुरुड येथील कासारानाहि लिहितां येत असावें. कर्जखतावर सही आहे एवढाच पुरावा. दुसऱ्या एका कर्जखतावर एका मुसलमानाची फारशी सही आहे. कुणब्यांत शिक्षणाचा प्रसार सध्याहि कष्टानेंच होत आहे. तेव्हा त्या वेळेस ते अशिक्षित असाव यात नवल नाहीं नवल मात्र असें कीं त्यातीलच दोघानीं मुरुडावर दोन लावण्या रचल्या आहेत. वरवरहि पाहिलें तरी त्यातील शब्दसामर्थ्य व बहुश्रुतता जाणवल्याखेरीज रहात नाहीं. (पहा परिशिष्ट ले. १२)

## आर्थिक जीवन

इ. स. १७६० चे कांहीं बाजारभाव पहा –

रु. ।।। गूळ पके अडीच शेर

,, ५ तादूळ दर ॰॰२।। ( तादूळ रायभोक दर ॰॰२।।। )

,, ५ लोणी दर ४

,, ८।। तूप वजन कचे ॰१ ( इ. स. १७८० तादूळ रुपयास
७ पायली )

इ. स. १७४१ नारळ शेंकडा २–१२–०

„ १७४४ तबाकू दर मण ३–१२–०

„ १७६० तूरडाळ दर ॥

इ. स. १७६१ मध्यें सौ. अन्नपूर्णाबाई ( बहुधा वैशंपायन ) वाईला जवळ जवळ दोन महिने रहात होत्या. त्यांनीं त्या काळांत केलेल्या खर्चाचा कागद उपलब्ध आहे. त्यातील खर्चावरून त्या काळच्या मध्यमवर्गाच्या जीवनमानाचा अंदाज यावा. अन्नपूर्णाबाईंची आर्थिक स्थिति बरी असावी या दोन महिन्यात त्यानीं कोणकोणत्या वस्तूंवर खर्च केला आहे आहे तें पहाः तांदुळ (भरपूर), जोंधळे ( जोन्हळे ), गहूं ( फार थोडा ), लोणी (भरपूर), तूप, गूळ, तेल, तुरीची डाळ, मीठ, फाटीं, हरभरे ( थोडे ), राजगिरा, खजूर, साखर ( फक्त एकदाच अर्ध्या रुपयाची ) एकूण खर्च २६० रु भाद्रपद वद्य ३ पासून कार्तिक वद्य ९ मी. हिशेबाचे अखेरीस एकूण खर्च कार्तिक वद्य ९ मी कारकीर्द सदाशिवभट वैशंपायन असा शेरा आहे दिवाळीच्या दिवशीं मोगरेल खर्च ०–४–०, विडयाचीं पानें अर्धा आणा, या खेरीजच्या विशेष खर्चाच्या रकमा म्हणजे "प्रदक्षिणा जोशी १५००० घातल्या त्याबद्दल ११। रुपये", म्हणजे १००० प्रदक्षिणाना ।॥ असे दोनदां खर्च पडले आहेत. "केसरी कुळंबीण हिला १॥ रु", "चोळी खरेदी केली त्याबद्दल १ रु" दिला, रामचंद्र गुजराथी याला वाटखर्च ।॥। ( बहुधा पुण्याहून वाईपर्यंतचा ). खुर्दी खरेदीबद्दलचाहि खर्च पडला आहे.

त्या काळच्या जीवनाचा नकाशा काढण्यास ह्या कागदाचा उपयोग व्हावा. अन्नपूर्णाबाई प्रवासात आहेत. पण सध्याचा दीर्घ मुक्काम वाईसारख्या शहरांत आहे तेथें असताना त्यांना जीवनावश्यक वस्तु तांदुळ, जोंधळे, गहूं, तेल, तूप, लोणी, तुरीची डाळ, गूळ एवढ्या वस्तू लागत. हरबरे, साखर, खजूर, राजगिरा यासारख्या वस्तू कधींकाळीं लागत. उपासाला त्याना खजूर व राजगिरा या वस्तु पुरत असाव्या. भाजीपाला किंवा फळे याकरिता खर्च पडलेला दिसत नाहीं. चैनीच्या वस्तूंची खरेदी दिसत नाहीं. मोगरेल व विडयाचीं पानें एवढ्यावरच झालेला खर्च. वस्तूंच्या स्वस्ताईची कल्पना तांदूळ, जोंधळे, तूप, लोणी याच्या भावाकडे लक्ष दिलें तर समजेल. दोन महिन्याचा अल्प अवधी व तोहि प्रवासांत, असें असलें तरी ही मंडळी ज्या ठिकाणीं राहात होती तेथें घरूं

मिळण्याची सुलभता होती. असें असूनहि या सर्व मंडळींचा मुख्य खर्च अन्न-खर्चच आहे. इतर खर्च फक्त धर्म या सदरांत पडतो.

सदाशिवभट हा सावकारी करी हें मागें आलेंच आहे. त्याच्या साठ वर्षांच्या कारकीर्दीतील अनेक कर्जचिठ्ठ्या पाहायला मिळतात. एक रुपयासारख्या क्षुल्लक कर्जांवरहि भारी दर आकारलेला दिसतो. इ. स १७५० च्या कागदात सव्वोत्रा, दिढोत्रा किंवा त्याहूनहि किंचित् जास्त दर दिसून येतो. या रकमेची कर्जफेड रोख रकमेंत, किंवा म्हैस पावधुक घेऊन, किंवा मळणीच्या वेळीं भाताच्या रूपानें किंवा चाकरी करूनहि फेडली जाई. चाकरीबाबतची कर्जचिठी पहा : "कर्जखत शके १६९० सर्वधारीनाम संवत्सरे आषाढ वद्य १० त दिनी खत लिखिते धनको नाम वैदमूर्ती सदाशिवभट वैशंपायन उपाध्ये व धर्माधिकारी मौजे मुरुड यासि रिणको नाम एसोजि खाड्या व भिकाजि व राम व गणा व गोविंद व हरि यांणीं तुम्हापासून आत्मकार्याकारणें घेतले मुदल रुपये ११५ अके एकशें पंधरा या रुपयाचि चाकरी वर्षे १६ सोला रोज पधरा देसि परदेशि पडेल तेथे करू अडेशेरि जनसिरस्ताप्रमाणे व इतर जनसिरस्ताप्रमाणे. चाकरिस अतर पडले तर तुमचे रुपये देऊ. चाकरि केली ति बुडाली हे लिहिले सई" साक्ष

रघुनाथभट उपाध्ये कसबा केलसी

दुसऱ्या कागदावर "यादि हिशेब शके १६९० सर्वधारीनाम संवत्सरे आषाढ वद्य १० ते दिवशी चाकर येसू खाड्या चाकरीस राहिला रु ११५ एकशें पंधरा त्याची चाकरी खडीत वर्षे १६ शके १६९५ फाल्गुन शुद्ध १ प्रतिपदेस चाकरीवरून पळोन ( वेळासला सहकुटुंब गेला. दुसऱ्या एका कागदात आहे ) तो चाकरीवर रुजू शके १६९७ फाल्गुन शुद्ध ५ पंचमीस रुजू झाला.

"रु १९ दो वर्षे पाळाबद्दल व्याज" ( यातील लेखन मूळ कागदांप्रमाणें राखलें आहे ) या कागदावर जास्त चर्चेची आवश्यकता नाहीं. नोकराचा पगार, त्याच्या नोकरीच्या संबंधींच्या अटी, त्यामुळें होणारी कुचंबणा, रकमेवरील व्याजाचे दर या सर्वांवर या कागदानीं चांगलाच प्रकाश पडतो

निरनिराळ्या वस्तूंचे भाव वर दिले आहेत त्यांच्याशीं तुलना केली तर मुख्य अन्न तांदूळ त्याची किंमत सध्या तेरा-चौदा पट, गुळाची किंमत अडीच तीन पट, नारळाची किंमत आठ नऊ पट असल्याचें दिसून येईल. सोन्याचा भाव १८ व्या शतकाचे अखेरीस १३-१४ चे दरम्यान होता म्हणजे सध्याच्या एकअष्टमांश होता.

साधारणपणें सध्यां आपण त्या काळच्या मानानें आठपट भाव जास्त देतों नोकराचा पगार त्या वेळीं जेऊन खाऊन अर्ध्या रुपयापासून ते दीड रुपयापर्यंत होता. हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे कीं त्या वेळीं गरजा फारच कमी होत्या. सध्यां खेड्यात राहाणाऱ्याला चहाचा खर्च येतो, जवळच्या गांवीं एस्. टी. ला चार आणे देऊन जातो, सिनेमा कुठें शेजारच्या गावीं आला तर पाहातो या सर्व खर्चांचा त्या वेळीं संभवच नव्हता.

**स्त्रिया :** स्त्रियांना आपण अर्धांगी म्हणतो. आपला प्रत्येक मंगल संस्कार व समारंभ स्त्रियाच्या भागीदारीनेंच पुरा होता. ' यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः " अशी स्तुतिस्तोत्रें गाऊन पुरातनकालापासून स्त्रियाचा आपण गौरवहि केला आहे. तेव्हा स्त्रियांचे थोरपण आपण मोठ्या औदार्यानें मान्य केलें आहे पण आचार व विचार यात मेळ असावा तेवढा पडलेला नाहीं " विनाश्रया न शोभन्ते पंडिता. वनिता लताः " या दुसऱ्या उक्तीचाच आपण अवलंब केलेला आहे. स्त्रियाचें जीवन संपूर्णपणें पुरुषांच्या मर्जीवर राखलेलें आहे. या बाबतींत मुरूडचें वेगळें वैशिष्ट्य काहीं नाहीं स्त्रियाच्या जीवनावर प्रकाश टाकणारे कोणकोणते उल्लेख मिळतात त्याचा येथें थोडा प्रपंच केला आहे. सुरुवातीसच एका विलक्षण व चमत्कृतिजनक वाटणाऱ्या उल्लेखाचा प्रथम विचार करूं प्रकरण दोनमध्यें आलेल्या बखरींत एका बालविधवेचा उल्लेख आहे तिला सिद्धपुरुषानें बंगाली विद्या शिकविली. ती मायाविद्येत प्रवीण झाली. एवढेंच नव्हे तर ती बहुरूपी याच्याबरोबर जादूविद्येतील द्वंद्वहि खेळली मुरुड गावाच्या रचनेंतहि तिचा विशेष हात होता. पांचशें वर्षांपूर्वींची ही गोष्ट आहे. तिनें हें शिक्षण संपादन करणें हेंच मुळीं वैशिष्ट्यपूर्ण आहे. पुरुषांची सावली दूर झाली म्हणजे स्त्रियाच्या व्यक्तित्वाच्या विकासाला भरपूर अवकाश मिळतो हें पूर्वीं जिऊबाईचा वृत्तान्त दिला आहे त्यावरूनहि दिसून येईल. पतीच्या बरोबर संसार करीत असताना स्त्रियामधल्या गुणाचा विकास खुरटून जातो. पुरुषांची मर्जी राखणें आणि मुलाना वाढवणें यातच त्यांची शक्ति-बुद्धि खर्च होते. जबाबदारीखेरीज अंगचे गुण बाहेर पडत नाहींत; त्यामुळें पतीचा मृत्यु ही काहीं स्त्रियांच्या बाबतींत भाग्याची गोष्ट ठरते

सर्रास नाहीं तरी पतीच्या मृत्यूनंतर पत्नीनें सती जावें अशी रूढि पडली होती. जी स्त्री सती गेली ती पतिव्रता ! ती धन्य ! सती होण्याचें धैर्य झाले नाहीं किंवा जगण्याविषयींची तीव्र इच्छा मंदावली नाहीं अशा विधवा आपल्यातल्या ह्या उणीवेबद्दल

स्वत ची निंदा करीत जगत! जनमनावर रूढीचा हा असा पगडा होता मुरुड येथील दोन स्त्रिया सती गेल्याचे निश्चित उल्लेख आहेत गोपाळ बाळ १६७० च्या सुमारास निपुत्रिक मेला त्याची पत्नी सती गेली. १६६० ते १७११ एवढ्या कालांत महादेवभट राहाळकराचे उल्लेख मिळतात हा मृत्यु पावला तेव्हा त्याचें वय निदान ७० वर्षें असावें. त्याचीहि पत्नी सती गेली सती जाण्यापूर्वी दोघींनीहि आपल्या मालमत्तेची योग्य ती विल्हेवाट केली होती. मृत्यूच्या समीप व्यवहार उरकण्याची मनाची शांतता त्यांनीं दाखविली! या शिवाय अनेक स्त्रिया सती गेल्या असतील. पण पुढें पुढें तरी हें प्रमाण कमी होऊं लागले पेशवाईत बालविधवांची संख्या कमी नसावी यांत आश्चर्य नव्हेच. बालविवाहाची प्रथा, रोगराईचा प्रतिबंध करण्याच्या बाबतींतील अनास्था व धामधुमीचे दिवस त्यामुळ या परिस्थितीची सहज कल्पना होते या बालविधवाचा प्रश्न त्या काळीं समाजाला भेडसावीत असला पाहिजे. मुरुड येथील कागदात व्यभिचाराचीं काहीं करुणास्पद उदाहरणें पाहायला मिळतात. व्यभिचार उघडकीला आला म्हणजे दोघाच्याहि नातलगावर बहिष्कार पडत असे या बहिष्कारामुळें ती मंडळी बदनाम होतच पण त्यांचा दैनंदिन व्यवहारांवर या बहिष्काराची कृष्णछाया पडून ते कटाळून जात ब्रह्मवृंदाकडे किंवा सरकारकडे या बाबतींत दाद मागण्यात येई. ब्रह्मवृंद गावोगाव पत्र पाठवून इतर ब्रह्मवृंदांची हा बहिष्कार उठविण्याला संमति घेण्यांत येई नातलगानीं पंचगव्य घेतलें व गावोगावच्या ब्राह्मणाना भोजन घातलें म्हणजे त्याची सुटका होई प्रत्यक्ष अपराध्याला याहून जास्त कडक शासन होई. पुरुषाला पुष्कळ वेळां यात्रा करावी लागे संपूर्ण मुंडण ही आवश्यक गोष्ट होती अपमानित असलें तरी त्याला जीवन असह्य होत नसे. पण बालवैधव्याचे घडी घडीला चटके व त्यांत कांहीं तरी अतर्क्य कारणावरून लादलेलें अनैसर्गिक जीवन याची कल्पना करा म्हणजे व्यभिचाराचा गवगवा झाल्यावर जगणें कसें दुःसहच नव्हे तर अशक्यप्राय होत असावें त्याची थोडी तरी कल्पना येईल. मुरूडची अशीच एक बालविधवा स्त्री हर्णैस एका सरकारी कारकुनाकडे रहात होती सातआठ महिन्यानंतर मोठा बोभाटा झाला. ती स्त्री पुढें पळून जोगेळयाला देन्यावस्थेंत दिवस काढीत होती. पुरुष अपमानास्पद प्रायश्चित्त घेऊन मोकळा झाला. या स्त्रीचे प्रायश्चित्त तसेंच रेंगाळत राहिलें खुद्द नीलकंठशास्त्र्याची परवानगी होती. पण मुरुड येथें प्रायश्चित्त द्यायला कोणी फारसें उत्सुक होईना.

पुण्याला द्यावें असें म्हणत. यावर बराच पत्रव्यवहार मिळतो. पुण्याला प्रायश्चित्त दिलें तर आपल्या प्रांताचा आब जातो असें पुण्याला गेलेल्या मुरूडच्या आजूबाजूच्या लोकांना वाटे. या बाबतींत पुढील पत्रात लेखक या दुःखी स्त्रीबद्दल त्या काळीं दुर्मिळ अशी सहानुभूति व्यक्त करताना आढळतो: “ पूर्वीं वडिलास लिहिलें होतें कीं . हीस प्रायश्चित्त व्हावें तें अजून जालें नाहीं शास्त्रीबावाचे पत्राचा आक्षेप होता तेंहि पत्र प्रांतस्थाकडे जाऊन पोचलें परंतु प्रायश्चित्त होत नाहीं हेंहि वे. रा. दादा उपाध्ये व शास्त्रीबाबा यासहि मोठें आश्चर्य जालें. प्रांत मजकुरीं कोणी गृहस्थ ज्ञाते शहाणे आहेत कीं नाहीं ? ” दुसऱ्या पत्रात हेच गृहस्थ लिहितात “ . याचे भगिनीवर शब्ददोष येऊन हर्णेहून जोगेलें येथें राहिली आहे असें ऐकितों. तर शब्ददोष येणें तोहि येकासच येतो असेंहि नाहीं. तर .. यास मात्र हर्णेकर याणी शुद्ध केले आणि .. हीस मात्र जोगेले यास लाविली. याच्या मुक्ततेची कारणें असतील तेथें ... हिच्या मुक्ततेची कारणें नाहींत कीं काय ? तर आहेत. तर असें असोन अशा गोष्टी होत नाहीं असेंहि नाहीं. त्याची शुद्धताहि होत आहे. ... ” इतका सहानुभूति-पूर्ण दृष्टिकोण नेहमीं पहायला मिळेल असें नाहीं. दुसऱ्या एका स्त्रीसबंधीं असाच बदलौकिक झाला त्या स्त्रीचे नातलग वाळींत पडले. त्यांनीं आपली यातून मुक्तता व्हावी असा अर्ज केला सरकारनें दोघाची चौकशी समिति नेमली. दोघानी तिची चौकशी केली त्या चौकशीचा रिपोर्ट दिला तो उपलब्ध आहे. .. हिला विचारलें, “ तुझा जार कोण ? ” ... असह्य कोंडमाऱ्याचें जीवन कंठणाऱ्या त्या स्त्रीच्या हातून पाप घडलें ! गांवभर व बाहेर डंका झाला. चौकशीमध्यें “ तुझा जार कोण ? ” “ तें तू सिद्ध करून देशील काय ? ” अशा तऱ्हेच्या सहानुभूति शून्य चौकशीचें पर्यवसान कशांत होईल याची कल्पना सहज करता येईल. “ . ही पातित्यदशेमध्यें मृत्यु पावली ” असे उल्लेख आहेत. आत्महत्त्येनेच मृत्यु आला, याबद्दल मनाला संशय रहात नाहीं.

**संकीर्ण** नीतिबाह्य वर्तन व बेकायदेशीर वर्तन याबद्दल सर्वसाधारण अपात्त करणें व नतर शुद्ध करून घेणें हाच प्रकार चाले. दारु पिणें, मारामारी करून रक्त काढणें, कोणाबद्दल खोटीच माहिती पुरविणें याबद्दलची शिक्षा वाळीत टाकण्याची असे मुरूडच्या एका ब्राह्मणानें ‘ सुवर्णस्तेय ’ केले, त्याबद्दले त्याला पाच वर्षें कैदेची शिक्षा झाली होती. त्याला पंक्तिपावन करून घेण्याबद्दल व मदत

देण्याबद्दल पत्र उपलब्ध आहे. महादाजी केशव याचा मुलगा बैराग्याबरोबर फिरावयास गेला. म्हणून त्याला वेगळा ठेवला होता. त्याला पंक्तिपावन करण्याकरिता गांवोगांवच्या लोकाची संमति घेण्यांत आली. पंचगव्य देऊन त्याला शुद्ध केलें. महादेव ज्योतिर्विद् याचा सात वर्षांचा मुलगा जटाधारी बैराग्यानीं पळवून नेला. त्याला त्यांनीं बैरागी बनविला. त्यांच्याबरोबर तो ३॥ वर्षें फिरत होता. पुढें तो त्यांच्या टोळक्यातून पळाला. पळाल्यानंतर पर्वतीच्या आसपास हिंडत असता श्रावण दक्षिणेकरिता पुण्याला गेलेल्या ग्रामस्थानीं पाहिला व ओळखला. त्याला ते गावीं घेऊन आले. पण तो बैरागी झालेला, पाखडिमतप्रवेश केलेला त्याला शुद्ध करून घेतला पाहिजे म्हणून तात्या जोशी, पंचनदीकर ब्राह्मणांकडे ( इतरहि ठिकाणीं ) गेले. व त्याच्याकडे प्रायश्चित्ताची चौकशी केली निरनिराळया ग्रथांतले उतारे देऊन त्या मुलाला कोणतें प्रायश्चित्त द्यावें याबद्दलची गंभीर चर्चा करणारें पचनदीकरांचें उत्तरादाखल तें संस्कृत पत्र, म्हणजे त्या काळच्या जीवनाचा आरसाच होय.

# प्रकरण १० वें

## कालचें मुरुड

पेशव्यांचें राज्य गेलें ! पाठोपाठ महाराष्ट्राचें स्वातंत्र्य गेलें ! जातां जातां स्वातंत्र्याबरोबर आलेलें मुरुडचें वैभवहि गेलें. रावबाजीच्या अंदाधुंदीच्या कारकीर्दीचा शेवट म्हणजे मुरूडवर आलेलें बळुची पेंढार. इ. स. १८१७ च्या सुरुवातीला सुवर्णदुर्गच्या आसपासचीं खेडीं त्यानीं धुवून नेलीं ! स्वातंत्र्य जाणार म्हणून जणुं लक्ष्मी जी रुसली ती मुरूडवर अद्याप प्रसन्न नाहीं. एथपासून मुरूडचा प्रवास उतारावरून सुरू झाला तो अद्याप चालूच आहे ! कुठें थाबणार व केव्हां थाबणार न कळे !

यापूर्वीच्या कोणत्याहि समकालीन राजकीय घटनाची नोंद जशी मुरूडच्या कागदाची सापडत नाहीं तशी इंग्रजी अंमलाची. १९ व्या शतकाच्या सुरुवातीला हर्णैला झालेल्या दुर्घटनांचा वा रणधुमाळीचा उल्लेख नाहीं. बाजीरावाच्या पळापळीबद्दल दुःख नाहीं एकदम इंग्रजी अंमलाचीं चिन्हे दिसूं लागतात. यापुढें ग्रामस्थाच्या पुण्याकडे वाऱ्या नाहींत. पुण्याचे आश्रयदाते संपले, राजधानी गेली, श्रावण दक्षिणा ही वस्तु इतिहासजमा व्हायला लागली. पत्राचे मायने बदलले "चिरंजीव राजश्री नारो कृष्ण यास प्रीतिपूर्वक रामाजी महादेव मुक्काम राजपुरी आसीर्वाद" पत्राची ही सुरुवात गेली. सही इंग्रजी धाटणीवर पत्राच्या अखेरीस यायला लागली. वृत्तीसंबंधीं यापुढें भांडणें नाहींत - अधिकारीच या बाबतींत उदासीन झाले.

इंग्रजाचें राज्य चोर पावलांनीं आलें होतें. पहिल्या पळापळीच्या वेळीं इ. स. १८०२ मध्यें बाजीराव[१२] मुरुड येथें आला होता. येथून तो पुढें इंग्रजाकडे आश्रयाला गेला. मुरूडकराना हें माहीत असलेंच पाहिजे. स्वातंत्र्य एव्हांनाच गेलें होतें. पण मुरुड अजून ही गोष्ट मानीत नव्हतें. अजून तें पेशवाईच्या धुंदीत होतें !

---

१२ दुसरा बाजीराव हा धोंडो नारायण मंडलिक-विश्वनाथ नारायणांचे आजोबा-याचा जावई. इ. स. १८०२ मध्यें धोंडोपंतांची ही मुलगी हयात नव्हती.

रहाटाचा बैल थांबला तरी पन्हळींतून पाणी काहीं काळ वाहतच राहतें. पण इ. स. १८१७ चा बळुच्याचा प्राणान्तिक फटका बसला! आपल्या पुढें काय वाढून ठेवलें आहे याची कल्पना येते न येते तोंच बाजीरावाच्या पळापळीच्या बातम्या कानावर थडकल्या. बाजीरावाकडून दक्षिणा उपटल्या असल्या तरी त्याच्याबद्दल दोन अश्रु टाकण्यासारखें त्याचें मनोज्ञ दर्शन मुरूडकराना कधींच झालें नव्हतें.

इ. स. १८१७ च्या गडांतरानें म्हणा किंवा इंग्रजी राजवटीच्या उदासीनतेमुळें म्हणा इ स. १८२० पासून पुढें मुरूडच्या आघाडीवर अगदीं सामसूम वाटतें. कुठें आधींची ती अदम्य धडपड! कुठें आताची नि:स्तब्ध भयानक शांतता! इंग्रजी राजवटीचा दरारा, शिस्त, व्यवस्था आणि विशेष म्हणजे त्याचा जाणवणारा दूरपणा यामुळें मुरूडग्रामस्थ भयचकित झाल्यासारखे दिसतात. त्याच्या सर्व शक्तींचा ऱ्हास झाल्यासारखा दिसतो. गावाचा पूर्वीचा लौकिक पुढेंहि कायम टिकला. पण तो सर्व गावाचा प्रयत्न म्हणून नव्हे. तो टिकला याचें कारण गावातील काहीं व्यक्तींचें असामान्य कर्तृत्व होय

इंग्रजी राजवटीच्या सुरुवातीस गावाचें महत्त्व सरकारी अधिकाऱ्याच्या लक्षांत आलें मुरुड येथें त्या वेळेस शंभराहून अधिक अशीं नांदतीं ब्राह्मण कुटुंबें होतीं आणि त्या वेळेस समाजाचें नेतृत्व ब्राह्मण समाज करीत असे. त्यामुळे मुंबई राज्यास सरकारनें प्रथमच ज्या प्राथमिक शाळा उघडल्या त्यात मुरुड येथेंहि १० ऑगस्ट १८३४ रोजीं एक शाळा उघडण्यात आली आधुनिक काळातील मुरूडच्या जीवनातील ही अतिशय महत्त्वाची घटना होय. शिक्षणाची घरबसल्या सोय झाल्यामुळें चालू युगाला साजेशा मार्गानें मुरूडचें जीवन धावूं लागलें

बदलत्या राजवटींत मराठीचा अभ्यास अपुरा पडेल ही जाणीव मुरूडकरांना लवकरच आली असली पाहिजे. इ स १८३३ मध्यें वि. ना. मंडलिक यांचा जन्म झाला. इ. स. १८४५ सालीं, वयाच्या बाराव्या वर्षी, मुरूडहून दूर अशा ठिकाणीं ते इंग्रजी शिकण्याकरिता गेले. मुरुड येथील इंग्रजी शिकणारे तेच पहिले असतील असें मात्र नाहीं. मुरूडचे गणेश वामन गानू हे १८५२ मध्यें नेटिव्ह जनरल लायब्ररीचे ग्रंथपाल होते कदाचित् इंग्रजीचें अध्ययन करणारे तेच पहिले ग्रामस्थ असतील. इंग्रजी शिक्षणाचें महत्त्व जरी लक्षात आलें तरी त्या काळीं इंग्रजी शिकणारे लोक अपवादानेच आढळत असतील. इंग्रजी शिक्षणाची जवळपास सोयच नव्हती. पण लवकरच मंडलिकांनीं आपल्या अव्वल दर्जाच्या बुद्धिमत्तेनें भराभर

एवढे मानसन्मान, लौकिक व दौलत संपादन केली कीं त्याचें अनुकरण ग्रामस्थानीं न करणें हें मानवी स्वभावाला सोडून होतें. मंडलिक हे सुरुवातीला सुधारणावादी होते. पुढें ते बदलले सामान्य लोकाच्या समजुतींना त्यानीं पुढें दुखविलें नाहीं. त्यांचें असाधारण यश व लोकमतानुरंजन यामुळें रावसाहेब मंडलीक हे मुरूडच्या शब्द-कोशात आदरानें जाऊन बसले ते अद्याप तेथें कायम आहेत.

रावसाहेब मंडलिक– वृद्ध जनाच्या तोंडीं अण्णा मंडलिक आहे – हे भराभर सरकारी अधिकारावर चढत असतानाच मुरूडला दोन थोर पुरुषांचा जन्म पांच वर्षांच्या अंतरानें झाला. इ. स. १८५३ मध्यें कै. रा. बा. दीक्षित यांचा व इ. स. १८५८ मध्यें अण्णासाहेब कर्वे यांचा. मंडलिकांचा विद्याव्यासंग दीक्षितानीं उचलला तर कर्वे यानीं त्यांची समाजसेवा घेतली. मात्र दोघानीं आपआपल्या क्षेत्रांत हिमालयाचीं शिखरें गांठलीं.

इ. स. १८६० पासून मुरूडची वस्ती वाढू लागली. शेती व बागायतीचें मुरूडचें उत्पन्न मोजकें. त्यामुळें स्थलान्तर आवश्यकच होणार. पण इ. स. १८७० च्या सुमारास हें लक्षांत येण्यासारखें नव्हतें. या काळाच्या पुढचीं पंचवीस तीस वर्षें मुरूडला आर्थिकदृष्ट्या बरीं गेलीं असावीं. कारण या सुमारास सदोबा घारी व नरहरबुवा सबाशे यांच्या नाटककंपन्या मुरुड येथे महिन्यान् महिने मुक्काम ठोकून होत्या. पांडुरंगपंत बाळ हे या सुमारास मोठे कलाप्रेमी गृहस्थ होऊन गेले. आधुनिक दृष्टिकोण व योजना तडीस नेण्यास लागणारें कर्तृत्व हीं त्यांच्या ठिकाणीं होतीं वरील नाटककंपन्या पांडुरंगपंतांच्या चौसोपी वाड्यात नाटकें करी. या नवीन प्रयोगामुळें, मुरुड येथील पूर्वींचा पौराणिक नाटकांचा ढंग बदलला. पण व्यवस्थित अशी नाटकें, मुरुड येथें व्हावयाला इ. स. १९२२ हें साल उजाडावें लागलें. पांडुरंगपंत यांच्या प्रेरणेनें मुरुड येथें इंग्रजी शाळा सुरूं झाली होती. त्यांच्याच प्रोत्साहनानें लायब्ररीहि सुरू करण्यात आली

मुरुड गांवची मंडळी मोठी आहे हौशीदार ।
चालत बोलत डोलत येती लायब्रीजवळ ( लायब्ररीजवळ )
वर्तमानपत्र वाचिती बसती दीपमाळेवर ।
– असे या लायब्ररीचें एका समकालीन कवयित्रीनें वर्णन केलें आहे.

इ स १८८० च्या सुमाराच्या या गोष्टी या वेळेस मुरुड गाव भरलेला होता. दीडशेंहून जास्त ब्राह्मणाचीं घरें चांगलीं नांदतीं हालती बोलतीं अशी होतीं.

संध्या, देवपूजा, वैश्वदेव घरोघर चालत. गाईच्या पावलाएवढा संजाब व हातभर शेंडी हीं घरोघर उठून दिसत घेरेदार सदेरे, पगडी, उपरणें, व फेटे हीं सभासंमेलनें व यात्रा, यांचीं वैशिष्ट्यें होतीं. आखूड कोट, अर्धी तुमान व काळी टोपी हा विलायती असभ्य पोषाख रूढ व्हायला पन्नास वर्षे जायचीं होतीं. जुन्या संस्कृतीची पकड अद्याप घट्ट होती.

याच्या आगेमागें मुरुड येथें निदान चार वैदिक शिक्षणाच्या शाळा चालू होत्या. यज्ञेश्वरभट दामले, गणुभाऊ होळे, तातंभट काळे, व गणुकाका जोशी हे त्या काळचे विद्वान्. वृद्ध लोकाना अद्याप त्याची आठवण आहे. कमावलेल्या गोड आवाजांतलें वैदिक मंत्राचें धीर गंभीर 'म्हणणें' हा त्या काळचा विशेष. अशा वेळीं नुकत्याच सारवलेल्या मंडपात पन्नास पन्नास वैदिकाचें दर्शन घडे. संध्याकाळच्या थड होत जाणाऱ्या त्या प्रसन्न वातावरणाची आठवण येते आणि मन विषण्ण होतें. आता ते वैदिकमंत्राचे संघर्ष पुन ऐकायला मिळायचे नाहींत.

इ. स. १८६० च्या सुमारास हर्णै बंदराला नियमित बोट यायला सुरुवात झाली. सुरुवातीला आठवड्यांतून दोनच दिवस बोट येई व बोटींतील प्रवासहि फार हालाचा व त्रासाचा असे. पण हाल आणि उपेक्षा हे शब्द कोंकणच्या लोकाना आजपर्यंत कधीं अस्वस्थ करू शकले नाहींत. तें कांहींहि असो. या बोटीमुळें मुरुड ग्रामस्थाच्या पुढें एक नवीन कार्यक्षेत्र निर्माण झालें अनेक ग्रामस्थ व्यवसायाकरिता मुंबईकडे वळूं लागले. मुरूडला पूर्ण प्राथमिक शिक्षणाची सोय असल्यामुळें प्राथमिक शिक्षक मुरुड येथें भराभर तयार होऊ लागले याचबरोबर जास्त महत्त्वाकांक्षी लोक इंग्रजीशिक्षणाकडे वळले. त्यातून कारकून तयार होत कारकुनी व अध्यापन हे मुख्य म्हणून पन्नास साठ वर्षे ग्रामस्थाचे व्यवसाय झाले. इ. स. १८८० च्या सुमारास चाळीसावर ग्रामस्थ मुंबईत अशा रीतीनें स्थाईक झाले होते. पण या लोकांत भाऊसाहेब दातार सोडले तर वरच्या अधिकारावर इतर कोणी आढळत नाहीं. प्राथमिक शिक्षण, थर्ड इयर ट्रेनिंग किंवा कारकुनीकरिता आवश्यक तेवढें मॅट्रिक वा त्याहूनहि कमी शिक्षण हीच महत्त्वाकांक्षेची सीमा होती.

अशाच लोकातून अण्णासाहेब कर्वे यानीं इ स. १८८६ मध्यें मुरुड फंडाची स्थापना केली. त्याच्या साहाय्यकांत प. ह. दामले व का. बा. काणे हे होते. मुरुड फंडाला सुरुवातीपासून असे निष्ठावंत कार्यकर्ते मिळाले कीं गेलीं

ग्रंथ सं... ठाणे. स्थळप्रत
वि. ७७
नों: दि:
क्रमांक



१०० वर्षे मुरुडच्या इतिहासात त्यानें मानाचें स्थान मिळविलें आहे. ग्रामस्थांनीं मुरुडच्या हिताची जी जी योजना आखली त्या त्या प्रत्येक योजनेला फंडानें साहाय्य केलें आहे.

इ. स. १८८० च्या सुमारास दापोलीचें मिशन हायस्कूल चांगलें चालू झालें होतें यापुढें काहीं वर्षें इंग्रजी शिक्षणाची ओढ मुरुड ग्रामस्थाना लागली. शिक्षण मॅट्रिकची मर्यादा ओलांडून पुढें जाऊं लागलें. पदवीधर ही चीज यापुढें दुर्मिळ राहिली नाहीं या काळांत व पुढच्या काहीं काळांत मुरुडकरात अनेक वकील झाले. अण्णासाहेब कर्वे यांच्या प्रयत्नानें मुरुड येथें इंग्रजी शाळा सुरूं झाली. या शाळेचें पुढें कदाचित् हायस्कूलमध्यें रूपान्तर झालें असतें. पण मुरुडच्या दुर्दैवानें दगा दिला. काहीं अनपेक्षित कारणानीं शाळेला उतरती कळा लागली. पुढें मुरुडला प्लेगचा प्रादुर्भाव झाला. मुलांची संख्या रोडावत चालली. तरीसुद्धा कै. नारोपंत दामले यांनीं १९०४ पर्यंत ती पुढें चालविली. पण तोटयात चाललेली शाळा अधिक काळ चालू ठेवणें अशक्य झालें. पुढें कै रामभाऊ गानू व श्री. द. सि चोळकर यांनीं निरनिराळ्या वेळीं इंग्रजी शाळा चालविण्याचे प्रयत्न केले. पण इंग्रजी शाळा मुरुडला स्थिर पायावर कधींच येऊं शकली नाहीं.

१९०० च्या सुमारास प्लेगनें लागोपाठ दोनतीन वर्षें भेट दिल्यामुळें मुरुडचें जीवन विस्कळित होत चाललें. मुरुडच्या अनेक कुटुंबानीं स्थलांतर केलें. हें स्थलांतर निमित्तच समजलें पाहिजे इंग्रजी शिक्षण घेतलेले जे जे पैशाच्या वा व्यवसायाच्या निमित्तानें बाहेर गेले ते परत मुरुडला आले नाहींत. मुरुडमध्य त्याना भावनिक आकर्षण असलें तरी त्याच्या मुलाना मुरुडला कायमची वस्ती करण्या-सारखें आकर्षण काहींच नव्हतें. ज्याला बाहेरून पैशाचें पाठबळ होतें असेच निवृत्त झाल्यानंतर मुरुडला येणें शक्य होतें. पण अशापैकीं सुद्धां कोणी फारसे आलेले दिसत नाहींत. उच्च शिक्षण मिळालेली मुरुडची अव्वल दर्जाची बुद्धिमत्ता मुरुडातून एकदां बाहेर पडली कीं मुरुड तिला मुकलें. हे बुद्धिमान लोक मुरुडला येत नसत असें नाहीं. पण त्यांचें वास्तव्य फारच थोडे दिवस असे. त्याच्या व्यापक अनुभवाचा, ज्ञानाचा, व संपत्तीचा उपयोग मुरुडला झालाच नाही. विसावें शतक लागल्यानंतर मुरुडच्या ऱ्हासाला अधिक गती मिळत चालली.

नवीन विचाराचें रोप रुजविण्याचे प्रयत्न मुरुडमध्यें अनेक झाले पण त्या प्रयत्नाना मुरुडनें यश लाभूं दिलें नाहीं. रामभाऊ जोशी याची बहीण व अण्णा-

साहेब कर्वे स्वतः याच्या पुनर्विवाहाचा परिणाम एवढाच झाला कीं, त्यांच्या कुटुंबाना मुरुड येथें येऊन राहणें अशक्य झालें ! चिपळूणकर, टिळक, आगरकर याच्यासारख्या विचारवतांचें तडफदार नेतृत्व हें मुरुड ग्रामस्थांच्या हिशोबी फारसें नव्हतें. या थोर पुरुषाच्या विचारानीं महाराष्ट्रीय समाज ढवळून निघत होता. दापोलीच्या हायस्कूलमध्यें मुरूडच्या शिकणाऱ्या विद्यार्थ्यांत आगरकर गट व टिळक गट तयार झाले होते. त्याच्यात वादविवाद होत असत. या वादविवादाचा व्यक्तिदृष्ट्या उपयोग झाला असेल पण गाव म्हणून मात्र मुरुड उदासीन राहिलें. अण्णासाहेबाच्या स्त्रियाच्या बाबतींतील उदार दृष्टिकोणाचा ग्रामस्थानीं उपहासच केला सध्यां शाळेंत मुलाच्या बरोबरीनें मुली शिकत आहेत, पुनर्विवाहहि रूढ होत आहे, स्त्रियांना कांहीं वेळा घटस्फोटहि घ्यावा लागतो, एवढ्या बाबी लोकानीं आता मान्य केल्या आहेत पण त्याचें कारण या सर्व प्रकाराची अनिवार्यता होय

कदाचित् या बाबतींत समाजाला दोष देतां येणार नाहीं. समाज हा स्थितिप्रिय असतो. सुधारणा येतात त्या टाळणें अशक्य म्हणून येतात. असें या रूढिप्रियतेचे समर्थन केलें जाण्याचा संभव आहे. पण या समर्थनांतहि फारसें तथ्य वाटत नाहीं. कारण ज्या नवीन विचारांचा लोकाच्या भौतिक सुधारणाशीं प्रत्यक्ष सबध आला त्या बाबतींतहि लोक उदासीनच राहिले. १९१० च्या सुमारास रामभाऊ गानू यांनीं शेती व बागायती सुधारण्याचे प्रयत्न चालविले होते. नवीन कुटीरोद्योगांनाहि त्यानीं चालना दिली होती. त्यांच्या अकालीं मृत्यूनें ते प्रयोग पूर्णावस्थेस गेले नाहींत. पुढें सुमारें पंधरा वर्षांनीं अण्णा भिडे यांनीं खाडीच्या काठाला सुरुमध्यें बागाईतीचा शास्त्रशुद्ध प्रयत्न चालविला होता. त्याचेहि ते प्रयत्न फळाला येण्याच्या पूर्वीच त्याना मृत्यूनें गाठलें. या दोनहि प्रयत्नातील नवीन दृष्टि स्वागतार्ह होती. अगदीं अलीकडे नरुशेट वराडकर याचेहि असेच प्रयत्न चालू आहेत. पण मुरुड उदासीन राहिलें आहे.

पुनः जरा मागें जाऊं या.

या शतकाच्या सुरुवातीला मोठ्या प्रमाणावर स्थलान्तराला सुरुवात झाली. ब्राह्मणांच्या जोडीला आता इतर जमातींचेहि लोक उद्योगाच्या शोधांत बाहेर पडायला सुरुवात झाली होती. या सुमारास मुरूडचे कांहीं शिक्षक मुंबईला मोठ्या हुद्यांवर होते. सातवी इयत्ता झालेल्यांना प्राथमिक शिक्षकाची नोकरी मिळवून देणें त्याना सुलभ होतें. यामुळें यापुढें कांहीं काळ तरी मुरूडमध्यें जवळ जवळ प्रत्येक

घरचा एक तरी पुरुष मुंबईच्या शाळेंत प्राथमिक शिक्षक असे. याचा एक परिणाम तरी असा झाला कीं, इग्रजी शिक्षणाकडे ग्रामस्थाचें दुर्लक्ष होऊं लागलें. मुरूडला इग्रजी शाळा न टिकण्याचें कारण ग्रामस्थाच्या या अदूरदृष्टींत पाहायला हरकत नाहीं. शिक्षणाच्या बाबतींतील ही घसरगुंडी पुढें चालूच राहिली. पुढें शिक्षकाचा पेशा मिळणेंहि कठीण होऊ लागले; तेव्हा सातवी पर्यंतचेंहि शिक्षण पुरें न करता मुरूडचे नागरिक दुकानात गुमास्तेगिरी करण्यात धन्यता मानू लागले.

पहिल्या महायुद्धानें मुरूडचें आर्थिक जीवन पार कोसळलें. आधींच मुरूडची उत्पादनशक्ति मुरूडच्या गरजा भागविण्यास अपुरी होती त्यात आता महागाईची भर पडली. एवढ्यानेंच भागलें नाहीं. आता मुरूडची जीवनपद्धतीच बदलूं लागली होती. बदललेल्या जीवनपद्धतींत खर्च वाढले आणि उत्पन्न घटलें. पंधरावीस वर्ष हे बदल घडत होते. बदल न कळत येत होते पण मुरूडचें रूप निश्चितपणें बदलीत होते.

सकाळपासून रात्रींपर्यंतच्या प्रत्येक व्यवहारांत आतां बदल घडूं लागले. खाण्याच्या, पोषाखाच्या, नटण्याच्या, प्रवासाच्या, उत्सवाच्या सगळयाच पद्धती बदलत चालल्या. पाहुण्याचें स्वागत गुळपाण्याऐवजीं चहानें होऊं लागलें. घरात किंवा दारात कडूं तेलाऐवजीं घासलेटचे दिवे व थाबडयाऐवजीं काडयाच्या पेट्या आल्या. सभेला शोभा आणणारे फेटे व पगडया गेल्या व पोरकट अशा काळ्या टोप्या आल्या – आतां त्याहि मागें पडत चालल्या. दोन पैशात होणारी हजामत मागें पडली. प्रवास पूर्वीं पायीं किंवा बैलगाडीनें व्हायचा – आता बैलगाडया मागें पडल्या. त्याचें काम मोटारी करूं लागल्या. उत्सवात किटसनचे दिवे आले – नाटकाखेरीज उत्सव फिके वाटू लागले.

१९२० च्या पूर्वीं मुरूडच्या लोकाचें मुख्य अन्न तांदूळ होतें. गहूं हा शोभेच्या वस्तूप्रमाणें बाटलींत ठेवलेला असे. गव्हाची पोळी हें पक्वान्न वाटावें इतका गहूं दुर्मिळ होता. पण आता पोळी हें श्रीमंती अन्न म्हणून राहिलें नाहीं. या सर्वांच्या बरोबरच लोकाच्या धार्मिक प्रवृत्तींवर घाले पडत राहिले. धार्मिक विधींना अर्थच उरला नाहीं अशी हळूहळू स्थिति यायला लागली. नित्य व नैमित्तिक धार्मिक अशा संस्कार आणि आचाराचें उच्चाटन व्हायला लागलें. मनाचें नियमन करणारी एक संस्थाच यामुळें उध्वस्त झाली.

हे बदल पुरुषाप्रमाणेंच स्त्रियातहि घडत होते. स्त्रियांच्या पोषाख व वेषभूषेंत बदल घडत होते. त्या बदलाची टिंगलहि होत होती- पण बदल हे पौर्णिमेच्या भरतीनें येत होते. इ. स. १९२० सालीं खोपा व चोळी कुठेंकुठें मागें पडू लागली तेव्हा आम्बाड्यावर, पोलक्यावर निंदाव्यजक गाणीं रचून म्हणण्यात येत होतीं. आणखी दहाबारा वर्षांत समाज–मनाला त्याचा विसरहि पडून गेला.

जीवन अशा रीतीनें बदलत होतें मुंबईची रहाणी मुरूडला रूढ होत होती. आणि ही रहाणी मुरूडच्या अर्थव्यवस्थेला सर्व तऱ्हेनें न पेलणारी अशी होती त्यामुळें मुरूडचें वैभव–याचा अर्थ मर्यादेनेंच घेतला पाहिजे. इ. स. १९२० च्या पूर्वीं मुरूड येथें साधारणपणें कोणत्याहि घरी दैन्य नव्हतें. दैन्य नाहीं याचाच अर्थ वैभव असा घ्यायचा–मुरूडचें वैभव पार गेले असें म्हणायला हरकत नाहीं.

इ स. १९२५ च्या सुमारास मुरूडला दिवाळीच्या दिवसात घरोघर त्रिपुर लावून दिवाळी साजरी होत असे ती दीपाची शोभा व त्या मागचें प्रसन्न मन आता मुरूडला असेल असें वाटत नाहीं.

गेल्या शतकांत ब्राह्मणानीं मुंबई व इतर ठिकाणीं व्यवसायाकरिता जायला सुरुवात केली. या शतकाच्या सुरुवातीला इतर जमातींनीं सुरुवात केली. इ स. १९२० पासून पुढें या स्थलान्तराला गति मिळाली. या जमातींतील लोक प्रथम जरी नोकरीकरितांच बाहेर पडले तरी आता त्यानींसुद्धा धंद्याकडे लक्ष द्यायला सुरुवात केली. आज आपण पाहिलें तर या जमातींतील कित्येक लोक यशस्वीपणें मोठमोठे उद्योग चालविताना आढळून येतील. मोरे, चव्हाण, लाड, बराडकर, मुकादम, भाग यासारखीं नावें या ठिकाणीं सहज लक्षात येतात.

या बाहेर पडण्याचा एक निश्चित चागला परिणाम आढळून येतो. ज्या जमातींत मराठी शिक्षण हेंच मुळीं जुलुमानें होई. त्याचीच मुलें आतां मुंबईंत आल्यामुळें, दुय्यमच नव्हे तर उच्च शिक्षणाचा लाभ घेताना दिसत आहेत. मुरूडच्या बहुजन समाजाचें मन आता निद्रित नाहीं याचा वेगळा पुरावा देण्याची आवश्यकता नाहीं.

या काळांत निदान तीन धंदे तरी मोडकळीस आले. पहिला व्यवसाय बैलगाड्याचा– १९३० पासून प्रवासी–मोटारी व मालमोटारी मुरूडवरून जायला लागल्या. त्यामुळें जवळ–दूरचीं भाडीं मिळणें आता कठीण झालें. व त्यामुळें तो

उपधंदा म्हणून मुरूडला जो पैसा येत असे तो बंद झाला. त्याचा दुसराहि एक परिणाम झाला. शेतीचीं कामें साभाळून गाड्याचा व्यवसाय चाले आता बैलाचा खर्च सर्वस्वी शेतीवर पडूं लागला. बैलांची संख्याहि काहीं अंशीं त्यामुळें कमी झालीच. बागायतीला शेणखत कमी मिळूं लागलें. जमीन निकृष्ट होत जायला यामुळें एक गतीच मिळाली.

लोकांना धार्मिक संस्काराचें आकर्षण कमी वाटूं लागलें. त्यामुळें भिक्षुकी पेशा रोडावत चालला. मुरुड येथें इ. स. १९२० च्या सुमारास किती तरी दशग्रंथी ब्राह्मण होते. ते मुरूडच्या बाहेर कामें करून पैसा कमावीत. आता त्याची संख्या एका हाताचीं बोटें मोडण्याइतकीहि नाहीं.

इ. स. १९३७ पासून सरकारचें दारुबंदीचें धोरण अंमलात आलें आणि भडारी समाजाचा मुख्य व्यवसायच नाहींसा झाला शेती व माडी असा भंडाऱ्याचा जोडधंदा असे. माडीवर त्याना आजूबाजूच्या गावांतून चागलें उत्पन्न होत असे. तें सर्व उत्पन्न आता गेलें येथे दारूबंदीच्या इष्टानिष्टतेच्या विचाराशीं आपणाला कर्तव्य नाहीं. त्या धोरणाचा मुरुडवर झालेल्या परिणामाचा विचार करायचा आहे. मुरूडचा भंडारी समाज हा सधन, कलाप्रेमी व खर्चिक म्हणून ओळखला जात असे. पूर्वीच्या त्यांच्या हातातील विपुल पैशाचा मुरूडला चागला उपयोग व्हायचा. सध्या गरीब झालेला हा समाज दिग्मूढ झालेला आहे.

मध्यंतरीच्या काळात बहुजनसमाजाची जशी जागृति झाली तसाच मुरूडचा भगिनीसमाजहि दीर्घ निद्रेंतून जागा होऊं लागला. मुरूडसारख्या खेड्यातहि गेलीं पंधरा वर्षें भगिनीसमाज आपल्यापरीनें कार्य करीत आहे आणि परस्पर सहकार्य व विचारविनिमय यानीं मुरूडला आलेल्या विस्कळितपणाला आळा घालीत आहे. समाजाचा अर्धा उपेक्षित व निद्रिस्त वर्ग जागा होत आहे या घटनेंत पुष्कळच अर्थ भरलेला आहे.

या काळांत भारतानें स्वातंत्र्य मिळविलें आहे. प्रत्येक प्रदेश व प्रत्येक गांव आपल्याला आर्थिक सुस्थिति आणण्याच्या प्रयत्नात आहे भडारी समाजाप्रमाणेंच मुरुड मात्र अजून भ्रांतचित्त आहे मुरुड जुने धंदे गमावीत आहे, नवीन धंदे शिकत नाहीं. मुरूडमध्यें बुद्धि पिकते. विकली जाते मात्र बाहेर. दुरवस्थेच्या दिशेनें चाललेला हा प्रवास रोखणें सहज शक्य आहे.

मुरुड येथील ब्राह्मणवर्गाचें नेतृत्व आतां संपलें आहे. बहुजनसमाज जागृत होत आहे – स्त्रियाहि त्याच मार्गावर आहेत. मुरूडमधून बाहेर गेलेली बुद्धिमत्ता मुरूडकडे सहानुभूतीनें पहात आहे – आपला मदतीचा हात पुढें करीत आहे – हेतु एक - मुरूडची ही पडापड थांबलीच पाहिजे ! पण अशा प्रयत्नाना स्वाभाविक मर्यादा असतात सुखी, समृद्ध जीवनाकरिता मुरूडचे स्थानिक ग्रामस्थ स्वावलंब-नाची कास धरून जी धडपड करतील तीच अखेरीस निर्णायक ठरणार आहे.

# प्रकरण ११ वें

## बोलके आंकडे

मुरूडचा इतिहास संपला. अपुरा असला तरी त्यात भर टाकणें सध्यां शक्य नाहीं. सध्याच्या मुरूडचें चित्र उभें राहण्यासाठीं काहीं तपशीलांची आवश्यकता आहे. ते येथें देण्याचा प्रयत्न केला आहे. हें प्रकरण म्हणजे संख्याशास्त्र आहे. आंकड्यातून सरासरी आणि शेंकडेवारी काढल्या आहेत त्याचा अर्थ तज्ञांनीं पहावा ही विनंती.

मुरूड हें गांव रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यांत समुद्रकिनारीं बसलेलें आहे. मुंबईपासून दक्षिणेकडे त्याचें अंतर सुमारें ७५ मैल येतें दाभोळ लाईनच्या बोटीनें सात तासांच्या अंतरावर हर्णै हें बंदर. हर्णै बंदरातूनच मुरूडचे सुरू दिसतात. तेथून दक्षिणेस तीन मैल बैलगाडीनें गेलें म्हणजे मुरूडची हद्द लागते. मुंबईहून एस्. टी. नें येणारास १७५ मैलाच्या अंतरावर दापोलीला आल्यावर गाडी बदलावी लागते. एस्. टी. नें आल्यास गांवापासून एक मैलावर पुलावर उतरावें लागतें. श्री. पेंडसे यांच्या 'गारंबीचा बापू' या कादंबरींतील विख्यात पूल तो हाच.

मुरुड ( उत्तर अक्षांश १७°१४, पूर्व रेखांश ७३°८ ) याची दक्षिणोत्तर लांबी एक मैल, ११३२ यार्ड आहे. पूर्वपश्चिम रुंदी सरासरी अर्धा मैल. मुरुडचें एकूण क्षेत्रफळ ११२१ एकर ३४ गुंठे आहे. यापैकीं २९३ एकर ३६ गुंठे खराब जमीन व लागवडीला सर्वस्वी निरुपयोगी. लागवडीला योग्य अशी जमीन ८२७ एकर ३८ गुंठे. या जमिनीला सरकारी दस्त २३१२·२८ रुपये. या शिवाय दर रुपयास ०३ प्रमाणें लोकल फंड घेतला जातो.

लागवडीखालील क्षेत्रात मुख्य उत्पन्नें भात, सुपारी व नारळ. वर्कस जमिनींत नाचणी, वरी, हरीक यासारखीं हलकीं पिकें येतात या खेरीज हिंवाळ्यात थोडीशीं कडधान्यें होतात. खेड्यापाड्यातून पूरक अन्न म्हणून केळीं, आंबा, फणस याचा उपयोग होत असतो. मुरुड येथें मात्र हीं फळें फारच अल्प प्रमाणात आहेत. हपूस आंब्यांचीं झाडें सर्व गावात मिळून वीस पंचवीस तरी असतील कीं नाहीं याची शंका

आहे. कोकंब, हरडा, उडी, खैर, साग हीं पैसा मिळवून देणारीं आणखी दुसरीं झाडें कोंकणात असतात. मुरूडला कुठें कुठें यापासून आमसुलें व कडू तेल झालें तरी मुरूडची ही उत्पन्नाची अशी बाब अलीकडे तरी नाहीं (पेशवाईमध्यें नारळ, सुपारी, फणस व उंडी या सर्वांवर कर असे.) या सर्वांचा निष्कर्ष असा कीं भात, सुपारी, नारळ व वरकस पिकें ह्याच मुरूडच्या उत्पन्नाच्या बाबी होत त्याचाच आपण आता विचार करूं.

| | लागवडीखालील क्षेत्र | पीक | किंमत अंदाजें |
|---|---|---|---|
| भातजमीन | १६५ एकर | १२४ खंडी | २९७६०·०० |
| सुपारीबाग | ४५ ,, २० गुंठे | ९१ ,, | ९१०००·०० |
| नारळ | ४८ ,, २ गुंठे | ३८४००० | ७६८००·०० |
| | २५८ एकर २२ गुंठे | | १९७५६०·०० |

वरकस जमीन ५६९ एकर १६ गुंठे, यापैकीं ८२ एकर लागवडीला; उत्पन्न २०॥ खंडी.

पिकाचे येणारे हे उत्पन्नाचे आकडे विदारक आहेत. पिकाचें उत्पन्न दोन लाखाहून थोडें जास्त होतें. याखेरीज मुरुड येथील उत्पन्नाच्या बाबी म्हणजे नोकर वर्गाचे पगार व सुपारीच्या हंगामांत मिळणारी मजुरी. याकरितां लागणारा पैसा बाहेरून येत असल्यामुळें मुरूडनें हा पैसा कमावलेला असें म्हणायला हरकत नाहीं. हें उत्पन्न पचवीस हजाराहून जास्त जाऊं नये. आणखी दूध उत्पादन व इतर किरकोळ उत्पन्नें सर्व धरलीं तर मुरुड येथें सबंध वर्षांत ३१५००० रुपयाहून जास्त किंमतीचें उत्पादन होत नाहीं. माणशीं सरासरी वार्षिक उत्पन्न पाहिलें तर सुमारें १७१ रु. येतें. महिन्याला माणशीं १४। रुपयाहून जास्त खर्च करणें मुरूडला परवडणें शक्य नाहीं. भारताच्या सरासरी २९० रु. उत्पन्नाशीं या आकड्याची तुलना उद्बोधक ठरेल.

## लोकसंख्या व साक्षरता

| | | | |
|---|---|---|---|
| इ. स. | १८६० | १९११ | १९५१ |
| घरें | ३०५ | ३८९ | ४०८ |
| लोकसंख्या | १३५८ | १८१७ | १८३५ |

पहिल्या पन्नास वर्षांत मुरूडची लोकसंख्या शेंकडा ४० नें वाढली. तर पुढच्या चाळीस वर्षांनीं ती फक्त एक टक्क्यानें वाढली. १९११ नतर मुरूडची वाढ कां थाबली ? पहिल्या महायुद्धानंतर जी महागाई झाली त्याचाच हा परिणाम काय ? या काळांत भारताची लोकसंख्या सारखी वाढतच आहे. तेव्हां मुरूडची लोकसंख्या निश्चित वाढली असती पण स्थलातर करणें आवश्यक झाल्यामुळेंच ही स्थिति उद्‌भवली. याचें एक प्रत्यंतर ब्राह्मणजातीच्या १९११ व १९५१ च्या आकड्या-वरून मिळतें. १९११ मध्यें मुरुड येथें ६०९ ब्राह्मणवस्ती होती तर १९५१ मध्यें ती ३७९ झाली म्हणजे शेंकडा ४४ टक्क्यानीं घट झाली. या काळात कितीतरी ब्राह्मण कुटुंबें मुरूडातून कायमचीं बाहेर गेल्याचें आपणास ठाऊकच आहे पराजपे मंडलिक, कोल्हटकरासारख्या कितीतरी कुटुबांनीं या काळात मुरूडच्या बाहेर घरें केलीं आहेत. कर्तृत्वाला कार्यक्षेत्र फारच अपुरें पडतें म्हणून मनुष्य बाहेर पडतो अशा कर्तबगार व्यक्तीच्या पाठोपाठ मुरूडचा त्याचा दरवाजा कायमचा बंद होतो. ब्राह्मण कुटुंबाच्या बाबतींत ही स्थिति गेल्या पन्नास वर्षांत झाली तशीच स्थिति आतां बहुजन समाजांतील व्यक्तींची होत आहे हें आपण पहातों मुरूडकर वकील, इंदूलकर, कदमबुवा याची उदाहरणें या गोष्टीचें प्रत्यंतर आणून द्यायला पुरे आहेत.

आणखी एक उद्‌बोधक तुलना या आकड्यावरून मिळते. १८६०, १९११, १९५१ या तीन सालातील मुरुड येथील कुटुंबातील व्यक्तींची सरासरी ४·४, ४ ७, ४·५ याप्रमाणें पडते. १८६० च्या मानानें सध्यां सरासरी '१ एवढ्यानें जास्त पडते. पण एकूण कुटुंबाचें मान साधारणपणें ४·५ आहे असें मानावयास हरकत नाहीं १९११ मधील ब्राह्मण कुटुंबें व व्यक्ती याची सख्या उपलब्ध आहे त्यावरून ब्राह्मण कुटुंबाची व ब्राह्मणेतर कुटुंबाची सरासरी मिळते ती अशी ब्राह्मण ३·६ व बहुजन ५·४ तुलनेकरतां १९५१ चे आकडे उपलब्ध नाहींत. एकूण निष्कर्ष असा दिसतो कीं कुटुंबनियोजकांच्या दृष्टीनें साधारणपणें हितकारक अशी कुटुंबाच्या घटकाची सख्या मुरुड येथें आढळते.

पुढें मुरुड येथील शाळेंत जाणाऱ्या मुलामुलींची जातवारी संख्या (पृ. ८६ पहा) दिली आहे. त्यावरून तुलनेकरतां प्रमुख जातींच्या शाळेंत जाणाऱ्या मुलाची शेंकडेवारी काढली आहे ब्राह्मण १७, दै. ब्रा ५३, मराठे १९, गुरव २३, कुणबी १३, भडारी १५, चांभार ३३, मुसलमान १९. एकूण लोकसख्येशीं शाळत जाणाऱ्या मुलांचें प्रमाण १३·८ एवढ पडतें. ( मुरूडच्या शाळेंतील सर्व मुलें मुरूडचीं असें मानलें

## मुरूड मुलांची शाळा – मुलांची जातवारी

### तारीख १६–१०–५७

| इयत्ता | ब्राह्मण | | दै. ब्राह्मण | | मराठा | | तिल्लोरी कुणबी | | भंडारी | | लिंगायत गुरव | | वैश्य | | भाविक गुरव | | जंगम | | तेली | | लोहार | | परीट | | चाभार | | मुसलमान | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुलगे | मुली | मुलगे | मुली | मुलगे | मुली | मुलगे | मुली | मुलगे | मुली | मुलगे | मुली | मुलगे | मुली | मुलगे | मुली | मुलगे | मुली | मुलगे | मुली | मुलगे | मुली | मुलगे | मुली | मुलगे | मुली | मुलगे | मुली | मुलगे | मुली |
| ७ | ८ | ३ | ० | ० | २ | ० | ३ | ० | ४ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ३ | ० | २२ | ४ |
| ६ | ० | ८ | ० | ४ | ६ | ० | २ | १ | ५ | २ | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | ० | १ | ० | १८ | १५ |
| ५ | ३ | ७ | १ | २ | ४ | २ | ७ | १ | ८ | २ | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | २ | ३ | ० | ३० | १७ |
| ४ | ६ | ६ | २ | १ | १ | ३ | ७ | ० | ३ | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ३ | ० | १० | ० | ३२ | १२ |
| ३ | ५ | ५ | १ | ० | ० | ४ | ११ | २ | ८ | ३ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | १ | ४ | ० | ३२ | १५ |
| २ | १ | ७ | १ | १ | १ | २ | १४ | ४ | ५ | ११ | ० | ० | ० | ० | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | २ | १ | ८ | ६ | ३५ | ३२ |
| १ | ३ | ३ | १ | ३ | ५ | ० | २० | २१ | ६ | ६ | ० | ० | ० | १ | १ | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | १ | ० | २ | ० | ४ | १ | ४४ | ४५ |
| एकूण | २६ | ३९ | ६ | ११ | १९ | ११ | ६४ | २९ | ३९ | २७ | ४ | १ | १ | १ | ३ | १ | ३ | ० | १ | ० | १ | १ | २ | ० | ११ | ४ | ३३ | १५ | २१३ | १४० |

आहे. बाहेरचीं थोडीं येत असतील. पण त्यामुळें शेंकडेवारींत फार फरक पडूं नये. लोकसंख्या १९५१ ची गृहीत धरली आहे. ) पाश्चात्य राष्ट्रांत नगररचनेच्या वेळीं प्राथमिक शाळेंत जाणाऱ्या मुलाचें प्रमाण शेंकडा १० धरतात. सर्व मुलें शाळेंत जाणार हें गृहीत धरूनहि शेंकडा १० मुलेंच फक्त धरतात हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. मुरुड येथें हें प्रमाण जास्त पडतें. एवढें असूनहि मुरूडचीं सर्व मुलें शाळेंत जात नाहींत हें निश्चित. उदाहरणार्थ, कुणबी मुलींचीच संख्या पहा. या बाबतींत दोन गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत. ( १ ) पाश्चात्य देशात आपल्यापेक्षा सरासरी आयुर्मान जास्त आहे दुसरी गोष्ट तेथें कुटुंबनियोजन ही वस्तुस्थिति आहे. त्यामुळें मुलाच्या संख्येचें प्रमाण त्याच्याकडे आपल्यापेक्षां कमी पडतें. आपणलीहि एका वस्तुस्थितीची योग्य ती कल्पना हवी. कोंकणांत लोकवस्ती स्वाभाविक असणाऱ्या कुटुंबाची नव्हे, हें लोकवस्तीचे आकडे पाहिले म्हणजे लक्षात येतें. कोंकणात स्त्रियांची संख्या पुरुषापेक्षा जास्त असते. कारण पुरुष बहुतेक मुंबईला कामाकरितां आलेला असतो. मुरुड येथेंहि अशीच परिस्थिती आहे येथील पुरुष ७९९ व स्त्रिया १०३६. याचा अर्थ पति, पत्नी व मुलें यानीं पूर्ण अशीं सगळीच्या सगळीं कुटुंबें नाहींत. मुरूडला जेवढीं कुटुंबें राहतात तेवढयाची सर्व माणसें मुरूडला नाहींत. तीं सर्व असलीं तर प्राथमिक शाळेंतील मुलाची शेंकडेवारी खालीं येईल. त्याचबरोबर कुटुंबातील माणसाची सरासरी संख्या थोडी वाढेल अर्थात वाढली तरी अर्ध्या टक्क्यानें वाढेल. शिक्षणासंबंधीं विचार चालूच आहे. तेव्हां हे साक्षरतेचेहि आकडे कसे आहेत ते पहा. मुरुड येथें ६१५ पुरुष व ६९२ स्त्रिया साक्षर आहेत. यांची शेंकडेवारी अनुक्रमें ७७ टक्के व ६६·८ टक्के एवढी पडते गावांतील एकूण साक्षरता ७१ टक्के पडते. भारताच्या २० टक्के साक्षरतेच्या मानानें मुरुड येथील साक्षरता चागली समाधानकारक आहे हें दिसून येईल.

मुरुडची जातवार लोकसंख्या अशी ब्राह्मण ३७९, कुणबी ७१६, चाभार ४५, मुसलमान २५३; सोनार ३२, मराठे १६०, गुरव २३, लोहार ६, कासार २, भंडारी २१०, जंगम ९. एकूण १८३५

मुरुड येथील गुराची गणती पुढीलप्रमाणें आहे : बैल ३००, गाई १०१, वासरें ( १ ते ३ वय ) ८५, एकूण ४८६; रेडे १२, म्हशी ८७, वासरें ( १ ते ३ वय ) ५३, एकूण १५२, बकरीं ६९, कोंबडीं ८५५,

बैल व रेडे यांचा उपयोग नांगर, रहाट व बैलगाड्या याकरिता होतो.

मुरुड येथील एकूण नागर १६२ आहेत. भातशेती एकूण १६५ एकर आहे. म्हणजे एक नागर हंगामांत साधारणपणें एक एकर शेती करतो जमिनीच्या खड-काळपणाबरोबर जमीनमालकांचे लहान लहान तुकडे हीं कारणें असणार वैलाकरितां मुरूड येथें होणाऱ्या खर्चाचे आकडे व तेच देशावरचे आकडे उपलब्ध होतील तर कोंकणच्या शेती उत्पादनावर चागला प्रकाश पडूं शकेल. मुरूडच्या १६५ एकर भात जमिनींत १२४ खंडी भात-उत्पादन होतें. याचा अर्थ एक एकर जमिनींत १५ मण भात होतें कोंकणच्या जमिनीच्या निकृष्ट दर्जाचा याहून दुसरा पुरावा नको !

मुरुड येथील इतर निरनिराळ्या धंद्यांचा इथेंच परामर्श घेऊ मुरूडला खेड-वळ जीवनाला आवश्यक ते व्यवसाय तेथें चालू आहेत. जुन्या पद्धती गेल्या नाहींत. आधुनिक यन्त्रसामुग्रीचा त्याना स्पर्श झालेला नाहीं.

**धंदे** –

( १ ) लोहारकाम :– श्री. रामजी बापू कातळकर

( २ ) सुतारकाम '– श्री नारायण रामा म्हसकर ( मराठा )

( ३ ) चामार :– पन्नास वर्षांपूर्वी सख्या, भाग्या व पाश्या चांगलीं जुतीं बाधणारे म्हणून प्रसिद्ध होते सध्यां पाच सहाजण हा धंदा करतात, त्यात 'रामा' हा जास्त प्रसिद्ध आहे

( ४ ) **सोनार** –याचीं सातआठ घरें आहेत. त्यांत विशेष कसबी किसन-शेट बाळशेट मुरूडकर.

( ५ ) **चिरकाम** लाकडें चिरण्याचें काम पाचसहा जोड्या या कामांत असतात. याना भरपूर काम असतें.

( ६ ) **बैलगाड्या** एकूण १८ गाड्या आहेत. भाडीं करणाऱ्या आठ नऊ आहेत. बाकी घरगुती कामें साभाळतात.

( ७ ) **शिवणकाम:** सध्या एकूण पाचजण हें काम करतात. ( १ ) श्री. नाना जंगम. ( २ ) श्री. महादेव गुरव. ( ३ ) श्री पाडुरंग दातार. ( ४ ) श्री. प्रभाकर पुसाळकर ( ५ ) श्री प. म. जोशी.

( ८ ) **हॉटेलें:** या लहानशा गावातहि पाच हॉटेलें चांगलीं चालतात. ( १ ) श्री उद्धव जोशी, ( २ ) श्री. विनायक जोशी, ( ३ ) श्री. अनंत मोडक, ( ४ ) श्री. सदू गुरव, ( ५ ) श्री. जयराम बिवलकर.

( ९ ) **किराणा मालाचे दुकानदार** मुरुडचीं दुकानें केवळ मुरूडच्याच गरजा भागवीत नाहींत. शेजारच्या गांवचे लोकहि येथें खरेदीला येतात. खालील सहा लोकाचीं येथे किराणा मालाचीं दुकानें आहेत :– ( १ ) श्री. बा. रा. काळे, ( २ ) श्री प. धों. रानडे, ( ३ ) श्री. जनार्दनशेठ वराडकर, ( ४ ) श्री. चंदू मुकादम, ( ५ ) श्री. वि. ग. भावे, ( ६ ) श्री नरहरीशेठ वराडकर,

( १० ) **सुपारीचा व्यापार** ( १ ) श्री. शामराव बादल, ( २ ) श्री नरहरीशेठ वराडकर, ( ३ ) श्री. विष्णु गजानन भावे व ( ४ ) नागजीशेठ, हे करतात.

( ११ ) श्री. अप्पा काळे यांचें काष्ठौषधीचें पिढीजाद दुकान अजूनहि लोकाची सेवा करीत आहे.

**पोस्ट ऑफिस :** मुरुड येथें सध्या ई. डी. सब ऑफिस आहे. त्या पोस्ट ऑफिसातील कांहीं आकडे उद्बोधक आहेत. पहा –

( १ ) दरमहा मनीऑर्डरींची आवक २०० : मनीऑर्डरींची रक्कम ६००० रु.

( २ ) दरमहा इन्शुअर्ड आवक वीस ते पंचवीस ... .. २००० रु

( ३ ) दरमहा मनीऑर्डरी जावक दहा ते पधरा .. .. २०० रु.

( ४ ) दरमहा इन्शुअर्ड जावक दोन तीन .. ... ... १७० रु.

मुरूडच्या पोस्ट ऑफिसांत दरमहा ८००० रु बाहेर गावाहून येतात व ३०० रु बाहेर जातात येथें येणारी सर्व रक्कम मुरुड आणि शेजारच्या आणखी तीन गावाची असते. तरी त्यातील जास्तींत जास्त भाग मुरूडलाच येत असतो. पोस्ट ऑफिसात सेव्हिंग्ज बँक खातीं ७०–७५ एवढीं आहेत. व्ही पी. पार्सलें दरमहा दहा बारा पर्यंत जातात. त्यामुळें ४०-४५ रु मुरूडला येतात.

# प्रकरण १२ वें

## जमाती व संस्था

मुरूड येथें सुरुवातीपासूनच विविध जमाती नांदत आहेत. या संबंधीचे उल्लेख वेळोवेळीं आलेच आहेत. अजूनपर्यंत जो इतिहास या पुस्तकांत आला तो नाइला- जानें ब्राह्मण ज्ञातीचाच आला आहे. लेखकाला मिळालेले कागद उपाध्ये कुळांतील आहेत. ब्राह्मणाखेरीज इतर जमातींशीं त्यांचा हरघडीं संबंध येत असेच, पण या उपाध्ये कुळाला ज्या गोष्टींचें महत्त्व त्यामध्यें या जमातींचा संबंध आला नाहीं. खुद्द इतर जमातींकडे कागद मिळाले असते तर गेल्या काहीं शतकांतील त्यांच्या समाजजीवना- वर प्रकाश पडला असता. मुरूड येथील बाळ व बागुल हे कारभारी आणि पंडित कुलकर्णी यांच्याकडचे कागद मिळते तरीहि मुरूडच्या जीवनावर अधिक प्रकाश पडता. पण बाळांकडचे कागद काहीं वर्षांमागें जळून गेले तर बागुलांच्या कडचे तीनचार वर्षांपूर्वी असेच अपघातानें नष्ट झाले. या पुस्तकाची कल्पना आधीं सुचती तर! मराठा समाजांतीलहि रामभाऊ गानवाकडेहि काहीं जुने कागद होते पण कसर लागल्यामुळें वर्षदीड वर्षांपूर्वी ते टाकून देण्यांत आले! कोंकणांत अजूनहि कित्येक ठिकाणीं जुने कागद संशोधकाची वाट पहात इतरांना नको असलेलें जीवन कसेंबसें ढकलीत असलेले आढळतील.

**ब्राह्मण :** मुरुड येथें ब्राह्मणांची वस्ती २७९ आहे. कुणब्यांच्या खालोखाल ब्राह्मणाची वस्ती. ब्राह्मणाची वस्ती गेल्या पन्नास वर्षांत बरीच कमी झाली आहे. महाराष्ट्र व दक्षिण भारत या प्रदेशांत ब्राह्मणवर्ग शिक्षण व विचार या बाब- तींत अग्रभागीं आहे. उत्तर व पूर्व भारतांत हें स्थान ब्राह्मणांप्रमाणेंच कायस्थाकडे- क्षत्रियांकडे आहे ब्राह्मण किंचित् मागेंच आहेत. महाराष्ट्रांत जी स्थिति तीच मुरूड येथील ब्राह्मणाची. पेशवेकाळांत ब्राह्मणांचेंच वर्चस्व मुरूड येथें होतें आग्लाईंत तें कायम राहिलें तरी हळूंहळूं अग्रस्थानाचा बिंदू सरकत सरकत बहुजनसमाजाकडे जात होता. आणखी कांहीं वर्षांनीं समाजाची उलट्या पिरामिड स्वरूपाची रचनाच बदलणार आहे. एक ज्ञाती इतर ज्ञातींच्या मानानें जास्त सुधारलेली ही स्थितीच राहणार

नाहीं ती स्थिति तशी राहणें हें समाजशरीराच्या आरोग्याला विघातकहि आहे. वसाहतकालीं ग्रामस्थ ब्राह्मणांचा मुख्य व्यवसाय शेती होता. स्वराज्याच्या काळात मुख्यतः शेती व जे बाहेर पडले त्यांनीं कारकुनी व लहानमोठ्या असाम्या मिळविल्या. कांहींनीं अध्यापन केलें इग्रजी राजवटींत शेती या व्यवसायाबरोबरच इतर अनेक पेशे उचलले मुख्य गट शिक्षक व कारकून याचाच आढळेल. याखेरीज वकील, डॉक्टर, इंजिनिअर, मेकॅनिक, व्यापारी, हाटेलकीपर असे अनेक पेशे त्यांनीं स्वीकारले आहेत. अमुक एक व्यवसाय ब्राह्मणाना अयोग्य असें नैतिक बंधन आता राहिलें नाहीं. त्यामुळें ब्राह्मण नवीन नवीन क्षेत्रें आक्रमण करीत आहेत पण या व्यवसायात डोंगराएवढी कर्तबगारी दाखविणारे अपवादादाखलच आहेत. आणि मागें सांगितल्याप्रमाणें मुरूडची बुद्धिमत्ता ही मुरूडातून पलायन करीत आहे. त्यामुळें ज्या बुद्धिमत्तेचा उपयोग गावाच्या उत्कर्षाला व्हावा तिला गांव सतत मुकत आलेला आहे.

ब्राह्मणानीं निर्माण केलेल्या संस्थांचा थोडक्यात परामर्श घेऊं.

**मुरुड फंड :** १८८६ सालीं विजया दशमीच्या मुहूर्तावर या फडाची स्थापना झाली. अण्णासाहेब कर्वे, कै. प ह दामले व कै का. वा. काणे हे मूळ संस्थापक. हा मूळ ब्राह्मणाचा म्हणून स्थापन झालेला नव्हता. पण तीन वर्षेपर्यंत ब्राह्मणाखेरीज इतर कोणीच त्यात न आल्यानें पुढें तो फड ब्राह्मणापुरताच मर्यादित करण्यात आला. फडाचे आश्रयदाते, मदतगार, कायमचे वर्गणीदार व वर्गणीदार असे सभासद आहेत. निरनिराळ्या व्यक्तींनीं निरनिराळ्या हेतूनीं देणग्या दिलेल्या आहेत. त्यासुद्धां सध्यां फडाची रक्कम २०००० पर्यंत आहे. बहुतेक रक्कम सरकारी कर्जरोख्यांत गुंतविली आहे. कर्जरोख्यावरील व्याज व जमा होणारी वर्गणी यातून नित्य खर्च होतो. गावांतील अनेक दुरुस्त्या किंवा सार्वजनिक हिताच्या बाबी व मुलामुलींचें शिक्षण याकरिता हजारों रुपये फंडानें खर्च केले आहेत. १९३७ व १९४७ सालीं सुवर्ण व हीरक महोत्सव साजरे करण्यात आले.

**नारायण फंड :** कै. रामभाऊ गानू यानी आपला मोठा मुलगा नारायण याच्या मुंजीच्यावेळीं नारळ न वाटतां त्याचे खर्चाचे पैसे व शिवाय आपली बहीण यमूताई हिच्या नावाचे २५ रु. देऊन हा फंड सुरू केला. फडाची रीतसर स्थापना २५-६-१९१६ रोजीं झाली. हा फड फक्त खालच्या पाखाडीच्या ब्राह्मणाचा आहे. या फंडाकडे उत्तराभिमुख लक्ष्मीनारायणाच्या स्थावर जंगम मिळकतीची व्यवस्था

आहे या फंडातर्फे श्रावण महिन्यात गोकुलाष्टमी, कार्तिकात महाकार्तिकी व वैशाख महिन्यात वसंतपूजा हे उत्सव साजरे होतात. नारायणाच्या मंदिराच्या घुमटाची व सभामडपाची दुरुस्ती १९११ व १९१४ साली झाली त्या वेळेला फंडाची साप-त्तिक स्थिति समाधानकारक नव्हती. म्हणून हीं कामें वर्गणी गोळा करून करण्यात आलीं. पुढें सभामडपाच्या भिंतींची दुरुस्ती करण्यात आली देवस्थानाची येणारीं सर्व कामें हा फंड पहातो. अनेक तऱ्हेनें हा फंड ग्रामस्थाच्याहि सेवेला रुज झालेला आहे. हा फड पाब्लक चरटा ट्रस्ट म्हणून नोंदवलेला आहे.

**मुरुड ग्रामस्थ ब्राह्मणसभा :** श्री दुर्गादेवीचे देवालयाची व्यवस्था पाहाणें, श्रीचे स्थावर जंगम मिळकतीची व उत्सवांची व्यवस्था पहाणें या उद्देशानें ही संस्था २६-३-१९१२ रोजीं स्थापन झाली. १९१२ च्या पूर्वी अशा तऱ्हेची संस्था अस्तित्वात होती पण ती बंद पडली होती. ही संस्था वार्षिक वर्गणी गोळा करीत नाहीं. लोकांकडून आलेल्या देणग्या व पोस्टातील रकमेवरील व्याज हींच उत्पन्नाचीं प्रमुख साधनें होत. देवळासंबधींच्या अनेक दुरुस्त्यांचीं कामें या सभेनें स्वतः खर्च करून व कधींकधीं वर्गणी गोळा करून पुरीं केलीं आहेत. मुख्य कामें . ( १ ) नवी रीफ व मंगलोरी कौलें टाकणें, ( २ ) देवळाच्या मोठ्या घंटेचे कुज-लेले लाकडी खांब बदलणें, ( ३ ) स्वयंभु देवीच्या देवळाच्या भिंतींची डागडुजी करणें, ( ४ ) दुर्गादेवीच्या सभामडपाचा कठडा दुरुस्त करणें हीं होत. या संस्थेतर्फे दोन उत्सव साजरे केले जातात. एक वासंतिक नवरात्र व दुसरा शारदीय नवरात्र. दुसरा पूर्णपणें धार्मिक स्वरूपाचा असतो. पहिला म्हणजे देवीचा प्रसिद्ध रथयात्रो-त्सव. तो पूर्वी मानपानाचा असे. अलीकडे पन्नास वर्षे बंद होता. तो आता १९५२ पासून मानपानाविरहित सुरू झाला आहे

**पूर्वाभिमुख श्रीलक्ष्मीनारायण उत्सव मंडळ** या देवळांत पूर्वी फक्त गोकुळाष्टमीचा उत्सव होत असे. इ. स. १९२५ साली देवळाचा जीर्णोद्धार [illegible] कार्तिकी उत्सव सुरू झाला. इ स. १९२९ सालीं हें उत्सवमंडळ स्थापन झालें. हें मंडळ आतां दोनहि उत्सव साजरे करतें. इ. स. १९४३ पासून कार्तिकी उत्सवांत ' तरुण संघा नें नाटक करायला सुरवात केली. इ स १९५३ पासून पाखाडीचें नाटक होतें इ. स. १९४६ पासून मंडळानें निधि जमवावयाला सुरुवात केली. सध्यां हा निधि ८०० रु. चा आहे. निधि पब्लिक ट्रस्ट म्हणून नोंदविलेला आहे.

**मराठे** ' यांची मुरुड येथील वस्ती १६० आहे. मूळ वसाहत करणाऱ्या जमातीपैकीं मराठा समाज नव्हे हें बखरींवरून ज्याप्रमाणें समजतें तसेंच त्या समाजातील प्रचलित समजुतींवरून दिसून येतें असें असलें तरी मराठा समाजातील गानवास देवीच्या उत्सवात मान मिळत असे असें समजतें. मुरुड येथील यांचीं प्रमुख कुटुंबें म्हणजे मोरे, चव्हाण, भेकरे ( राणे ), लाड व बांदल हीं होत. या समाजाला आपल्या अभिमानास्पद अशा इतिहासाची आठवण आहे. नवीन युगाचीं पावलें ओळखण्याचें सामर्थ्य कशात आहे हें त्यांनीं अचूक ओळखलें आहे. मोरे, चव्हाण, लाड यासारखे नवीन उद्योगाचीं क्षेत्रें आक्रमण करण्यात गढले आहेत. शिक्षणाचें महत्त्व त्याच्या ध्यानात यायला फारसा काळ लागला नाहीं त्याच्यापैकीं कित्येकानीं दुय्यम शिक्षण पुरें केलें आहेच. काहींनी महाविद्यालयीन शिक्षणहि पुरें केलें आहे. उद्याच्या मुरुडचें नेतृत्व बहुजनसमाजाकडेच जायचें आहे. आपल्या कर्तबगारीमुळें हाच समाज तें नेतृत्व करील असें दिसतें.

**सोनार** सोनार ऊर्फ दैवज्ञ हे मुरुड येथें वसाहतीच्या कालापासून आहेत. मुरुडचे दैवज्ञ हे केळशी जवळच्या ' इळणे ' गावाहून आले असावेत असा श्री. सी. ना. मुरुडकर वकील याचा तर्क आहे. याचें कारण त्या गांवात जो उत्सव होतो त्यांत मुरुडच्या दैवज्ञाना कांहीं मानपान आहेत. दैवज्ञ मुरुडला प्रथम आले तेव्हां त्यांच्यांत कर्तबगार व श्रीमंत व्यक्ती असल्या पाहिजेत. देवीचें देऊळ बांधण्याकरितां व इतर वेळीं सिद्धपुरुषाला त्यांनीं मदत केली त्यामुळेंच देवीच्या उत्सवांत त्याना एवढया महत्त्वाचे मान मिळाले एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीपावेतों याचा मुख्य व्यवसाय सुवर्णकाराचा. सुरुवातीपासून हे दैवज्ञ आपणास मुरुडकर म्हणवितात. इ. स. १७७१ मधील कर्दे प्रकरणात चौघांच्या साक्षीची सुरुवात अशी आहे : " तकरीर जबानी दादसेट व धोंडसेट, त्रिंबकसेट, गोपालसेट सोनार मुरुडकर वस्ती मुरुड ... ... आपले घरची हकीकत काय म्हणून पुसिले ते जोसी व उपाध्ये वैशंपायन घरीं येऊन कार्य प्रयोजन चालवितात. आजतागायेत काहीं कज्या वृत्तीसमंधे जाहला नाहीं. आपली उमर ८० असी वरसे पावतो पाहिलें. " मुरुडकर हें उपनाम आज २०० वर्षें आहे, पण ते मूळचे पोतदार असेंहि एक मत आहे. मुरुडचे दैवज्ञ हे शिक्षणांत मागासलेले होते. त्यामुळें गेल्या चार शतकातील त्याचा इतिहास अज्ञातच राहिला आहे.

अलीकडच्या काळात इंग्रजी शिक्षणाची आवड त्याच्यात उत्पन्न झाली. या समाजांत माध्यमिक शिक्षण पुरें करणारे पहिले गृहस्थ कै रंगो बळवंत मुरुडकर. त्याच्यानंतर श्री. सी. ना. मुरुडकर हे डिस्ट्रिक्ट प्लीडरची परीक्षा उत्तीर्ण झाले. आणि समाजाला सुवर्णकार, कारकुनी या पेशाच्या जोडीला वकिलीच्या धंद्याची जोड मिळवून दिली. यांच्याशिवाय नंतर वैद्य व मुंबईचे मुरुडकर वकील ही सुशिक्षित मंडळी होत. एक कर्तबगार व्यक्ति निर्माण झाली कीं तेथें एक शक्तिकेंद्र निर्माण होतें – नात्यागोत्यांतल्या माणसांना वरच्या पातळीवर जायला एक तरफच मिळते. दैवज्ञ समाजाची हीच गोष्ट झाली आहे. कला आणि विद्या यात हा समाज जास्त जास्त प्रगति करीत आहे. मुरुड येथील दैवज्ञांची संख्या सध्या फक्त ३२ आहे पण त्यांतील १७ मुलें शाळेंत जाणारीं आहेत. शिक्षणाचें महत्त्व त्यानीं आता पुरतें ओळखलें आहे.

**कुणबी :** मुरुड येथील सर्वांत जास्त लोकसंख्येची जमात तिल्लोरी कुणब्याची होय. त्याची एकूण वस्ती ७१६ आहे. अडाणी, अशिक्षित व मागासलेला असा हा समाज मुरुड येथें सुरवातीपासूनच आहे. प्रथम हा समाज नदीकाठाला सपाटीवर रहात असे. पुढें केव्हां तरी त्यानें मुरुडचे डोंगर व्यापले. देवीच्या उत्सवात बटावळयाना मान मिळत असे. देवीचें अंगण तयार करण्याचें काम कुणब्याचें.

पूर्वी कुणबी समाज पुढारलेल्या वर्गात मानला जात होता ! तो मागासलेला ठरवून घेण्याकरिता समाजाला चळवळ करावी लागली. तेव्हांपासून सरकारकडून मुलाना शिष्यवृत्त्या मिळूं लागल्या.

फारच थोडे कुणबी जमीनमालक आहेत. त्याची उपजीविका अल्प प्रमाणात शेती व बहुतेक मोलमजुरी यांवर चालते. पुरुषाच्या बरोबरीनें स्त्रिया मजुरी मिळवितात. शिक्षणाचे फायदे अजूनपर्यंत या समाजाच्या फारसे लक्षात आलेले दिसत नाहींत. मॅट्रिकपर्यंतचें अद्यापपर्यंत एकानेंच शिक्षण घेतलें आहे. सातवीपर्यंत पंधरावीस जणाचें शिक्षण झालें आहे. त्यातील अगदीं थोडे असे शिक्षणाचा पेशा करितात. धंद्यांमध्यें या समाजाचा अद्याप शिरकाव झाला नाहीं. श्री. साटले यानीं केलेला प्रयत्न हा अपवादात्मक समजला पाहिजे.

मुरुडच्या आणि एकंदरींत कोंकणच्या कुणब्यांच्या घराचें एक वैशिष्ट्य लक्षात भरतें. तें म्हणजे तेथील स्वच्छता व टापटीप. कुणब्यांच्या घराच्या अंगणांत प्रवेश केला कीं त्याचा तात्काळ प्रत्यय येतो. कै. रामभाऊ दीक्षित यांना देशावरच्या अनेक खेड्याचा अनुभव होता. त्यामुळें त्यानीं कुणब्यांच्या भाडीकुंडीं, अंगण, ओटी वगैरेच्या स्वच्छपणाबद्दल अभिमानास्पद उल्लेख मुरुडच्या एका भाषणात केला होता.

सामाजिक आणि शैक्षणिक सुधारणा करण्याच्या बाबतींत समाजात हळूहळू जागृति होत आहे. कुणब्याचा मुख्य देव बहिरी. बाहिरीचें देऊळ मोडकळीस आलें होतें. त्याची दुरुस्ती करण्याचें समाजानें ठरविलें. इ. स. १९३५ पासून देवाचें उत्पन्न आणि कुणबी व मराठा समाजाच्या देणगीच्या रूपानें जमा झालेले २३६० रु व इतर ग्रामस्थाचे सुमारें ३०० रु. एवढी रकम खर्च करून देवालय चागलें नवीन करण्यांत आलें.

**भंडारी** : भंडारी समाज हा मुरुडला सुरवातीपासूनच आहे. सध्यां त्याची वस्ती २१० आहे. सुरवातीला खोत व मुरुडकर हे मुरुडचे मानकरी. देवीच्या उत्सवात मंडप घालण्याचा मान त्याचा. पुढें खोत व मुरुडकर याचा झगडा झाला. आणि मुरुड येथून मुरुडकरांचें उच्चाटन झालें. त्याचा मान मुकादमाकडे आला.

भंडारी समाजाचें मुख्य दैवत बनकी आहे. पूर्वीं या देवीस देवरहाटी नांवाची उत्पन्नाची जमीन होती. या देवीचा उत्सव वैशाख महिन्यांत साजरा होतो. उत्सव बुधवार, शुक्रवार किंवा रविवार या दिवशीं चागला मुहूर्त पाहून साजरा करतात. त्यावेळीं कोंबडीं, बकरी व भात याचा नैवेद्य केला जातो.

अगदीं अलीकडे १९३४ सालीं या समाजानें रामाचें देऊळ स्थापन केलें. त्यात बनकी देवीचे मानकरी श्री. कृष्ण गोविंद खोत यानीं पुढाकार घेतला होता. १९३५ मध्यें श्री. द. धों मुकादम यांनीं "रामविजय संगीत नाट्यसमाज" स्थापन केला. या समाजातर्फे गेल्या बावीस वर्षांत पौराणिक, ऐतिहासिक व सामाजिक अशीं पंचवीस नाटकें झालीं आहेत.

भंडारी समाज मूळचाच कलाप्रेमी. त्यामुळें त्यांत नट, गायक, वादक असे बरेच लोक आहेत. श्री. द. धों. मुकादम व श्री. वि. स. पुसाळकर हे नट म्हणून प्रसिद्ध तर तबलजी व गायक म्हणून श्री. पांडुरंग भोसले व श्री. बापू महाडिक हे प्रसिद्ध आहेत.

समाजांत अजून शिक्षणाचें मान बेताचेंच आहे. पदवीधर असे एकच. ते म्हणजे श्री वसंत शंकर पडवळ हे सध्या मुंबईस पोलिस सबइन्स्पेक्टर आहेत. थोडे जण मॅट्रिक झाले आहेत. त्यांतील मुकादम रत्नागिरीस ओव्हरसिअर आहे सध्या शिक्षणाबाबत जागृति होत आहे. पण मूळचे ताडी, माडीचे धंदे गेल्यामुळें शिक्षण घेणें जमत नाहीं. धंदे गेल्यामुळें त्यानीं मुंबईस प्रयाण केलें. कांहींनी खाणावळी चालविल्या आहेत तर काहीं इतर धंदा किंवा नोकरीपेशा स्वीकारीत आहेत काहींना चागलें यशहि मिळालें आहे. पण एकूण समाज मात्र चिखलात रुतलेल्या गलबताप्रमाणें होऊन बसला आहे.

**न्हावी** : या जमातीचें एकच कुटुंब इंदूलकर उपनावानें मुरुडला होतें त्याना देवीच्या उत्सवात 'आदर्श (आरसा) दाखविण्याचा मान होता. सुमारें ५० वर्षांपूर्वी इंदूलकराचीं पंधरा घरें मुरूडला होतीं काहीं घरें आसूदला होतीं. पुढें धद्यानिमित्त मंडळी शहरांत जाऊं लागली. सध्या मूळच्या मुरूडच्या इदूलकराचीं कुटुंबें अलिबाग, मादिवली, वेळास, बुरोंडी, कोळथरें इत्यादि ठिकाणीं घरें करून आहेत. मुंबई येथें काहीं इंदुलकर मंडळी आहेतच मॅट्रिकपर्यंत शिक्षण घेत-लेले त्यात ५ जण आहेत त्यातील एक प्र. स. पक्षाचे कार्यकर्ते आहेत. सध्यां मुरूड येथें मात्र इंदुलकरांपैकीं एकहि जण स्थाईक नाहीं.

**मुसलमान** : मुसलमान समाज मुरूड येथें सुरवातीपासूनच आहे हें मागें वेळोवेळीं आलेलेंच आहे. देवीच्या उत्सवात मुसलमान तेल्यांना तेल पुरविण्याचा मान होता. सध्या मुसलमान वस्ती २५३ आहे. मुरूड येथें असणाऱ्या या लोकाचा मुख्य व्यवसाय शेती व दुसरा तेलाचे घाणे चालविण्याचा. हाहि मागें पडत चालला आहे. मुरूडला भागत नाहीं म्हणून अनेक लोकानीं मुंबईस हॉटेलात नोकऱ्या धरल्या आहेत. कित्येक बोटीवर खलाशाचें काम करतात. त्यांपैकीं काहीं परदेशीं जाणाऱ्या बोटीवरहि काम करणारे आहेत. दुसऱ्या महायुद्धात बोटीवर काम करणा-रांपैकीं कित्येकजण कामाला आहेत. येथील मुसलमान मुलें व मुली मराठी शाळेंतच शिकतात. मुरूड येथील मुसलमान समाज सापेक्षतः अशिक्षित व मागासलेला आहे

मुरूड येथें या जमातीखेरीज चांभार, गुरव, लोहार, कासार, व जंगम याची वस्ती आहे. त्याची लोकसंख्या इतरत्र दिली आहे. पण इतर माहिती मात्र मिळूं शकली नाहीं.

# प्रकरण १३ वें

## शिक्षण आणि कला

" बसल्यानंतर हरिकथा करवावी, व इतर गीत वाद्य नृत्य असा आनंद करावा "
— हकीकत कसबे मुरुड.

मुरुड हें कांहीं कलोपासकाकरिता म्हणून प्रसिद्ध नाहीं. महाराष्ट्रांत कीर्ति मिळ-विली आहे असा शुद्ध कलेचा उपासक प्रभाकर कवीखेरीज ग्रामस्थांत कोणी दिसत नाहीं. पण पाटणकर, दामले व कदम हीं घराणीं पाहिलीं तर संगीत, भजन, नाट्य तबला इत्यादि कलांचा परामर्श मुरुड ग्रामस्थ चांगल्या तऱ्हेनें घेतांना आढळतात. आचवल, मोरे यांच्याकडे लक्ष दिलें तर चित्रकला व मूर्तिकला या उपेक्षित नाहींत हें दिसून येईल.

मुरुड गावानें कला ह्या अगदीं वर्ज्य मानल्या नव्हत्या याचा पुरावा बखरींत मिळतो तो सुरुवातीस आला आहे. देवीच्या उत्सवाचे वेळीं गीत, वाद्य नृत्य, असा आनंद करावा असा ग्रामस्थ बंधूंचाच आदेश आहे. प्रश्नमालेंतहि होळीच्या वेळीं म्हणावयाच्या लावणीचा उल्लेख आला आहे. अठराव्या शतकाच्या अखेरीस खुद्द मुरुडच्या कवींनीं रचलेल्या दोन लावण्या अद्यापहि होळीच्या दिवसात म्हटल्या जातात अठराव्या शतकाच्या अखेरीस होऊन गेलेला प्रसिद्ध शाहीर प्रभाकर हा मुरुडचाच. पण त्याचें सर्वच जीवन मुरुडच्या बाहेर गेल्यामुळें त्याच्या काव्याचे पडसाद मुरुडला उमटले नाहींत.

नाट्य व संगीत या कलांना मुख्यतः अवसर मिळायचा तो बहिरीची होळी व देवीचा वसंत उत्सव या प्रसंगीं. होळीचे वेळीं कुणबी ग्रामस्थांचे लोकनृत्याचे व लावणीचे कार्यक्रम होत. देवीच्या उत्सवात दशावतारी नाटकें होत. या कला अर्थातच प्राथमिक स्वरूपातच होत्या. गेल्या शतकाच्या उत्तरार्धांत मुरुडनें नाटक कंपन्यांचीं नाटकें प्रथमच पाहिलीं व धंदेवाईक नाटककंपनीचीं नाटकें म्हणजे काय याची कल्पना ग्रामस्थाना येऊ लागली.

या सुमारास मुरूडहून जे ग्रामस्थ बाहेर पडले त्यांना मुंबईसारख्या शहरात संगीतकलेचें मनोहर दर्शन घडलें व त्याचे पडसाद मुरुडला कुठें कुठें दिसूं लागले. आपा दामले यानीं तबलजी म्हणून मोठीच कीर्ति मिळविली ती त्या काळात त्यानीं एक शिष्यपरपरात्र निर्माण केली. त्यापैकीं सखारामपंत भागवत हे शोकीनांच्या परिचयाचे आहेत.

मुरुड येथें याच सुमारास कै. शंकरराव चोळकर हे संगीतकलेचे मोठे उपासक होऊन गेले. संगीताची भजनी शाखा याच सुमारास कदम घराण्यानें चालू केली. ती त्यांनीं आजतागायत टिकविली आहे. याच कदम घराण्यातले श्री. विष्णुबुवा घाटकोपरवाले हे सध्या मुंबईतील भजनी गायक म्हणून प्रसिद्ध आहेत.

विसाव्या शतकाच्या आगेमागें महाराष्ट्रात सर्वत्र कला यशाचें शिखर गांठीत होत्या. संगीत आणि नाटय ह्या त्यातल्या त्यात जास्त भाग्यवान् ठरल्या. वर उल्लेखिलेल्या कलावंताखेरीज पाटणकर घराण्यांतील पुरुषानीं महाराष्ट्रात आपलें नाव चांगलेंच दुमदुमविलें होतें. एका काळीं गोविंदबुवा मुरुडकर यांचें कीर्तनकार म्हणून नाव सर्वतोमुखीं झालें होतें. गोविंदबुवांचें वक्तृत्व व त्याचे बधु शिवरामबुवा याची साथ असा दुर्मिळ योग यांच्या कार्तीत घडला होता. शिवरामबुवाचे चिरंजीव नरहरबुवा हे गेलीं दोन अडीच तपें आपली सेवा रसिकांच्या पायाशीं रुजूं करीत आहेत. अलीकडच्या काळात इंदूर येथें असलेले श्री. कृष्णराव केतकर व मुंबईत असलेले श्री. श्रीनिवास बाळ व श्री. बाळ बागूल हे सगीताची उपासना चालवीत असतांना दिसतात. श्री. ग पु. दामले यानीं श्री. अनंत मनोहर याच्याजवळ संगीताचा अभ्यास केला असला तरी त्याची खरी प्रसिद्धि आहे ती उत्तम पेटी वाजविणारे म्हणून. कोणत्याहि अनोळखी व अनवट रागांतहि ते रंग भरू शकतात.

मुरुड येथें नाटकाची परंपरा जुनी असली तरी नियमितपणें आधुनिक तंत्रानें युक्त अशीं नाटकें करायला सुरुवात झाली. ती इ. स १९२२ पासून प्रथमतः मे महिना सोयीचा वाटल्यामुळें हीं नाटकें उन्हाळ्यांत होत असत. वरची व खालची पाखाडी असे त्या वेळेस मोठया चुरशीचे व बहारदार नाटकांचे प्रयोग होत असत. स्थानिक कलावताप्रमाणेंच ग्रामस्थाखेरीजचेहि कलावंत नाटयप्रयोग यशस्वी करण्याकरिता जिवापाड श्रम घेत व अजूनहि घेतात. पुढें पुढें हीं नाटकें मे महिन्यांत करणें गैरसोयीचें वाटू लागलें. शिवाय दोनहि पाखाडयात नारायणाचे उत्सव मोठया

ग्रं. क्र. ग्र. म. ठा. स्थळप्रत
23e22 दि. ...
872 नों. दि. 11
29/11/52

शिक्षण आणि कला

थाटानें होऊं लागले होते. त्या उत्सवसमारंभाचा समारोपहि तितकाच ढंगदार व्हावा या विचारानें हीं नाटकें उत्सवाच्या अखेरच्या दिवशीं होऊं लागलीं. खालच्या पाखाडीच्या या परंपरेला इ. स. १९४७ सालीं २५ वर्षे पुरीं झालीं. त्यावेळीं मे महिन्यांत श्री. मामा वरेरकर यांच्या अध्यक्षतेखाली रौप्यमहोत्सव साजरा करण्यांत आला.

इ. स. १९३४ भंडारी समाजाचें राममंदिर स्थापन झालें व तेथेंहि रामजन्माच्या उत्सवाच्या वेळीं दरवर्षी नियमानें नाटक होऊं लागलें या समाजातर्फे अजूनपर्यंत पौराणिक, सामाजिक व ऐतिहासिक मिळून पंचवीस नाटकें केलीं आहेत.

अशा रीतीनें मुरुड येथें दरवर्षी तीन नाटकें होतात. हौशी कलावंतांनीं केलेल्या या नाटकांचें स्वरूप उत्सवी असतें. उच्च तऱ्हेच्या नाटकाचा प्रेक्षक वर्गहि कलेची अपेक्षा बाळगीत नसतो कला ही कलावंत व रसिकवर्ग यांच्या परस्पर समजुतीवर अवलंबून असते मुरुड येथील नाट्यकलेचा दर्जा विशेषसा उच्च नाहीं याला कांहीं अपरिहार्य कारणें असतील. त्याचा विचार सोडून देऊं मात्र कलोपासकांनीं मनन, चिंतन, व अभ्यास हीं पथ्यें पाळण्याची कसोशी करावी.

प्रभाकर कवि सोडला तर मुरुडनें अजूनपर्यंत साहित्यसेवक निर्माण केल्याचें आढळत नाहीं अगदीं अलीकडे एक नाटककार होण्याचा मान श्री. नाना बाळ यांनीं मिळविला आहे. त्यांचें एक नाटक प्रसिद्ध झालें असून दुसरें प्रसिद्धीच्या वाटेवर आहे.

संगीत कला व नाट्यकला ह्या एका दृष्टीनें सुलभ कला आहेत त्यातील अल्पस्वल्प प्रगतीचेंहि श्रोतृवर्गाकडून कौतुक होतें, व प्रोत्साहन मिळतें. त्या मानानें चित्रकला व मूर्तिकला या अवघड कला होत मूर्तिकार किंवा चित्रकार हा एकदम कीर्ति तरी मिळवतो नाहीं तर उपेक्षित राहतो. अशा या कठीण कलांच्या क्षेत्रांत मुरूडचे श्री. शंकरराव मोरे व श्री. माधव आचवल हे स्पृहणीय यश मिळवीत आहेत. श्री. मोरे यांच्या कलेची ख्याति खूप दूरवर पसरत आहे. श्री. माधव आचवल यांचा विशेष हा कीं ते चांगले चित्रकार, वास्तुशिल्पाचे तज्ज्ञ तर आहेतच, शिवाय चित्रकलेचे, वास्तुशिल्पाचे व वाङ्मयाचे मार्मिक टीकाकारहि आहेत

**शिक्षण**. मुरुड येथील मराठी शाळा १० ऑगस्ट १८३४ रोजीं स्थापन झाली सुरुवातीपासूनच ती पहिल्या दर्जाची व पूर्ण प्राथमिक शाळा आहे. शाळा प्रथम श्री लक्ष्मीनारायणाचे मंदिरात, नंतर देवीच्या चौकांतील केमळी इमारतींत भरत असे. इ. स. १८९४ मध्यें सरकारनें ग्रामस्थांच्या आर्थिक

सहकार्यानें काळ्या दगडाच्या चौथऱ्यावर असलेली सध्याची मजबूत इमारत बांधली या इमारतीला चार खोल्या व एक रुंद पडवी आहे.

ही इमारत पुढें अपुरी पडूं लागली, तेव्हा सरकारनें ग्रामस्थाकडे आणखी एक इमारत बांधून देण्याबद्दल मागणी केली. ग्रामस्थांनीं नवी इमारत न बांधतां वाचनालयाची पऱ्याची रिकामी खोली इ स. १९१७ मध्यें सर्व हक्कांनिशीं सरकारच्या स्वाधीन केली

एवढी जागाहि अपुरीच पडे. पण पुढें सक्तीचें शिक्षण सुरूं झालें. शाळेंत कताई विणाई सुरू झाली. शिवाय मुलींची स्वतंत्र शाळा बंद करून त्या मुलींना मुलाच्याच शाळेंत घातलें. यामुळें शाळेची जागा अगदींच अपुरी पडूं लागली तेव्हां सरकार व ग्रामस्थ यांच्या सहकार्यानें रु १४२५५ खर्च करून आणखी तीन खोल्या बांधण्यात आल्या ग्रामस्थानीं त्यात सात हजारावर रकमेचा वाटा उचलला. यापैकीं दोन खोल्याचा खर्च श्री. ना. वि. जोशीं व श्री. वि. ग. भावे यानीं दिला. ३ मे १९५३ पासून या नवीन खोल्याचा उपयोग करण्यात येऊं लागला.

अलीकडे कांहीं वर्षे मुरुड ग्रामस्थ श्री भि के भावे शाळेचे मुख्याध्यापक आहेत. त्यांच्या अमदानींत शाळेंतील अनेक उणीवा व गैरसोयी दूर होत आहेत. श्री. भावे यांच्या प्रयत्नानें कताई-विणाईचें परीक्षा केंद्र मुरूडला मिळालें. जुन्या इमारतीवरील नळीचीं कौलें काढून मंगलोरी कौलें घालण्याला त्यांचेच परिश्रम कारणीभूत झाले इ. स. १९५४ सालीं त्यानीं शिकविलेल्या सातवीच्या मुलाचा शंभर टक्के निकाल लागला त्याबद्दल अधिकाऱ्याकडून भावे याची प्रशंसा झाली.

हल्लीं शाळेंत २१९ मुलगे व १४२ मुली शिक्षण घेत आहेत. मुलींची संख्या याहून जास्त असती. पण पुष्कळ कुणबी मुली लहान मुलें संभाळण्याकरिता व घर राखण्याकरितां घरींच राहतात. मुसलमान मुलें व मुलीहि याच शाळेंत शिक्षण घेतात.

१९४७ ते १९५७ या काळातील सातवीच्या परीक्षेचा आढावा पाहा :

| मुलें | मुलगे | मुली | एकूण |
|---|---|---|---|
| परीक्षेस बसलीं | ११२ | ९९ | २११ |
| पास झालीं | ७९ | ७१ | १५० |
| शेकडा प्रमाण | ७०.५ | ७१.७ | ७१.१ |

७९२ इतिहास
३७५८९

या शाळेनें मुरुड येथील शिक्षणाची केवढी तरी मोठी गरज भागविली आहे. मुरुड येथील ग्रामस्थाच्या आयुष्याला इष्ट वळण ह्याच शाळेमुळें मिळालें. श्री. अण्णासाहेब मंडलिक, महर्षि अण्णासाहेब कर्वे, ज्योतिषाचार्य शं. बा. दीक्षित, रँग्लर अप्पासाहेब परांजपे यासारखी महाराष्ट्रांतली थोर थोर मंडळी याच शाळेंत शिकून बाहेर पडली.

शाळा इ. स. १८३४ सालीं स्थापन झाली. इ. स. १९५३ सालीं शाळेचा शतसांवत्सरिक उत्सव मोठ्या थाटानें साजरा केला गेला

**इंग्रजी शाळा** : ग्रामस्थानीं इंग्रजीचें महत्त्व फार पूर्वीपासून ओळखलें असलें तरी मुरुडला इंग्रजी शाळेचें बस्तान कधींच ठीक असे बसलें नाहीं. इंग्रजी शाळेचा पहिला प्रयत्न पांडुरंग दाजी बाळ यानीं १८७४–७५ च्या सुमारास केला. शिक्षकांचें जेवण व राहणें बाळांच्या घरीं आणि पगार म्हणजे मुलाकडून येणारी एक रुपया याप्रमाणें फी. या शाळेंत शिकण्याची संधि श्री. अण्णासाहेब कर्वे यांना मिळाली. ही शाळा दोन वर्षांनंतर बंद पडली.

इ. स. १८९१ सालीं इंग्रजी शाळा सुरूं करण्याचा दुसरा प्रयत्न झाला. श्री. अण्णासाहेब याची स्वतःची मदत व मुरुड फंड यांच्या सहकार्यानें ही शाळा चालू झाली शाळा रजिस्टर करण्यात आली होती. इ. स. १८९४ मध्ये ५ वी इयत्ता सुरू झाली मुलाचीहि संख्या ७५ वर गेली. या शाळेचें हायस्कूलमध्यें रूपान्तर होणार असा रंग दिसूं लागला. पण कांहीं अनपेक्षित घटना घडल्या. शाळेला ओहोटी लागू लागली. श्री. अण्णासाहेब हे बहिष्कारित असल्यामुळें शाळा पोरकी झाल्या-प्रमाणें झाली पुढें शाळा रोडावत चालली. इ. स १९०४ पर्यंत कै. नारोपंत दामले यांनीं कसेबसे वर्ग चालविले. पण याच सुमारास हाहि प्रयत्न फसला.

नंतर तिसरा प्रयत्न कै रामभाऊ गानू यानीं केला. खासगी रीतीनें चालविलेल्या या वर्गाचा अनेक विद्यार्थ्यांनीं फायदा घेतला. यापैकीं काहीं विद्यार्थी पुढें नावा-रूपाला चढले. त्याच्या शेवटच्या आजारपणांत ( इ. स. १९१८ ) हाहि वर्ग बंद पडला.

यानंतर शाळा काढण्याचे आणखी दोन प्रयत्न झाले. एक मुरुड फंडाच्या मदतीनें व दुसरा श्री द शि. चोळकर यांच्या प्रयत्नानें श्री. चोळकर यानीं १९४२ सालीं शाळा सुरूं केली. विद्यार्थ्यांची संख्या वाढत वाढत १५० पर्यंत गेली.

तीन शिक्षक व पाचवी पर्यंतचें शिक्षण एवढा मोठा व्याप ही शाळा संभाळीत असे. कै. रामभाऊ गानू याच्या वर्गाप्रमाणें याहि शाळेला सरकारी मान्यता नव्हती सहा वर्षे ही शाळा चालली. पण पुढें ८ व्या इयत्तेपासून इंग्रजी आलें त्यामुळें या शाळेचा पायाच नाहीसा झाला. आठवीपासून पुढचे वर्ग चालविणें हें शाळेच्या शिक्षकांना शक्य नव्हतें. यामुळें ही शाळाहि बंद पडली.

या सर्व अयशस्वी प्रयत्नाचा इत्यर्थ इतकाच कीं, ग्रामस्थाना इंग्रजीच्या शिक्षणाची महती तितकीशी कधींच समजली नाहीं.

# प्रकरण १४ वें

## मी आणि मुरुड

मुरुड गांवाची आठवण झाली कीं, अनेक वर्षांच्या स्मृति जागृत होतात. पाचसहा वर्षांचा असतांची आठवण तिशीच्या आठवणींत इतकी बेमालूम बसते कीं हें तीस वर्षांपूर्वीचें चित्र, हें पचवीस, हें पंधरा या तऱ्हेचें वर्गीकरण वृथा ठरतें. चाळीस वर्षांपूर्वी आमचें घर जळल्याची आठवण येते न येते तोंच अण्णा दामले यांचें वेडाच्या भरांत " समुद्राला आग लागली धांवा हो धावा " असे पडवींत असताना ऐकलेले शब्द मनांत घुमतात. कशास काय संबंध पण लगेच शिमग्याच्या दिवसातील शात वातावरणांत चोरपावलानीं फणस चोरायला गेलेल्या आमच्या टोळक्याची आठवण येते. आणि तेथून जें मन भरकटतें तें गणपतीकरितां पत्री गोळा करायला निघालों आहों त्याची आठवण येते. त्यावरून निघतों तें भिडयांच्या सुरूच्या टेकाडावर कसला तरी घसरगुंडीचा खेळ आठवतो. मन एका जागीं स्थिर रहातच नाहीं. आठवणी " मी मी ... " करीत सरसावत येतात आणि त्यांचा परामर्श घेता घेतां मनामध्यें व्यथा जागृत होते.

मुरूडला पूर्वी मी दरवर्षीं जात असे विद्यार्थी असताना तर वर्षांतून दोनदां. एकदां दिवाळी व परत उन्हाळा परीक्षेचा शेवटचा पेपर धड लिहायला सुचायचा नाहीं. खरें पाहिलें तर पेपर टाकल्याबरोबर आम्हाला मुरूडची वाट धरता येत नसे. दुसऱ्या दिवसाच्या सकाळपर्यंत वाट पहावीच लागे. पण मनाची उताविळी ही अशी होती. शिक्षण सुटल्यानतर व्यवसायांत गुंतलों आणि तिकडे आमच्या घराला कुलूपहि पडलें. त्यामुळें मुरूडची फेरी फक्त उन्हाळयांत होऊं लागली आतां तर दोनचार वर्षांतून एकादे वेळीं जातों आणि राहतों तोहि फार तर आठदहा दिवस.

आतां मुरूडला गेलों म्हणजे आनंद आणि विषाद याच्या कांहीं विलक्षण अशा सरमिसळीचा अनुभव येतो निर्भेळ आनंदाचे क्षण आता मन अनुभवूंच शकत नाहीं. आनंदाच्या क्षणींच कुठें तरी खोल गेलेलें दुःख अचानक जागृत होऊन वर येतें कांहीं तरी हरवलें आहे असा भास होतो. हरवलेले शोधण्याकरिता

कवाडीपासून डुंगापर्यंत वेड्यासारखा एकटाच फिरतों ! पाण्यातल्या माशाप्रमाणें हातांत सांपडलेल्या आठवणी सुळकन् निसटून जातात, जातांना मनाला जखम करून जातात.

माझ्या लहानपणीं आमचा डुंग सुरू व केतकीचीं काटेरी झाडें यांनीं गर्द आच्छादलेला होता. संध्याकाळच्या शांत वेळीं सुरूच्या सुईसारख्या करड्या पानांच्या मऊ गालीच्यावर आम्ही किती तरी वेळ बसून गप्पा मारल्या होत्या. समोरच उग-वतीकडे तोंड केलें कीं शेतें दिसतात. त्या शेतात पावसाळयांत कंबर-कबर पाणी साचत असे. समुद्रकिनाऱ्याला लागलेली एक बेवारशी होडी तेथें आणून टाकलेली होती. समुद्राचें सान्निध्य असलें तरी होडी ही मुरूडच्या जीवनात एक दुष्प्राप्य वस्तु होती व आहेहि. होडीबद्दलचें गूढरम्य आकर्षण त्या वेळेपर्यंत तर अतृप्तच होतें. आणि या वेळेला तरी काय ढोपरभर पाण्यातून होडी ढकलण्याचाच काय आनंद मिळाला असेल तोच

डुंगापासून माडाकडे यायला निघालों म्हणजे आठवणींचें मोहोळ हाताला लागल्यासारखें होतें आमच्या शेताच्या पलीकडे देवघराच्याहि पलीकडे, रिसबूडाचीं शेतें आहेत. तेथें कसलें तरी खुरट्या झाडाचें कुंपण असे, दुपारच्या उन्हाच्या वेळीं तेवढी छाया आम्हाला पुरे. कडवा पावटा निघाला कीं गुराना चरायला शेतांत सोडतात. आम्ही त्या गुराची राखण करायला बसायचे, कित्येक वेळां गुरें पलीकडच्या केसूकाकाच्या आगरात घुसलीं तरी आम्हाला पत्ता नसायचा. आणि कां असावा ? माझ्या हातात त्या वेळीं कुठचा तरी मनोरंजनाचा जुना अंक असे. ताडाच्या झाडाच्या सावलींत मी बसलों आहे. " आणि चिकाच्या पडद्यातून एक सुंदर हात बाहेर आला " असें शीर्षक असलेलें चित्र मी पहात आहें ही गोड स्मृति माझ्या मनात आज किती तरी वर्षें ताजी राहिली आहे. शेतातून जातांना ही स्मृति जागी झाल्याखेरीज रहात नाहीं. मी कोठें बसलों होतों ती जागा हुडकीत राहतों

गुरंचराईच्या या वेळात मेहमींच कांहीं वाचीत नसे इतर अनेक मुलें माझ्या-सारखींच तेथें आलेलीं असत मग आमचा ' राबो'चा खेळ सुरू होई. आता तो खेळ खेळतात कीं नाहीं न कळे. खेळाचे साहित्य म्हणजे फक्त चोडें. एका खुंटाला दोरी बांधलेली असे, त्या खुंटाच्या भोवतीं चोडें जमा करून ठेवलेलीं असत एक जणानें ती दोरी हातात धरून जेथवर जाता येईल तेथवर जाऊन आपल्या चोडाचें संरक्षण करायचें. वाटोळे उभे असलेल्यांनीं हातात एक एक चोड घेऊन तीं चोडें

लाब्रविण्याचा प्रयत्न करायचा चोंड पळविताना 'रावो' असा पुकारा द्यायचा. अगदीं साधा पण रडकुंडीस आणणारा खेळ. 'रावो' हें या खेळाचें नाव कसें निर्माण झालें, त्याचा अर्थ काय, सारें अजूनहि गूढ आहे.

गुराच्या पाठीवर मी एकदा असाच मंडलिकाच्या आगराच्या पलीकडे गेलों. लहानपणची गोष्ट आहे. आमच्या आगरापासून दोन तीन मिनिटाचा रस्ता. पण तेव्हा खूप लाब गेलों असें वाटलें. आपल्या आगराच्या सीमाची जाणीव कोंकणातल्या माणसाना फार असते त्यामुळें असें वाटलें असेल. तो आगर जरा दुर्लक्षिलेला होता. माड जेथें असायचे तेथें उंडी, भेंड वगैरे झाडाची गर्दी होती. एका उंडीचें झाडाची काळी खवलें असलेली फादी आडवी झाली होती–अजून मला ती दिसते आहे– तेथें पाण्याचा पाट नव्हता. झाडाना पोंड नव्हते. रहाटाचें हृद्य वाटणारें गीतहि अतिशय मंद ऐकू येत होतें. भास होत होता तो नागरी वस्तीचा नव्हे– ओसाडपणाचा हिरव्यागार अशा आगरात नेहमीं राहात असूनहि, लाल कंठ असलेले अशा हिरव्या पोपटाचे थवे दिसले ते त्या ओसाड रानवट, आगरात. त्या आगराचें गूढ आकर्षण अजूनहि मला तिकडे खेंचून नेतें. निसर्ग-सौंदर्याचा साक्षात्कार असा काहीं प्रकार असेल तर तो मला तेथें घडला.

आठवणींची ही मालिका कधींच संपणार नाहीं. माझ्या मनात डोकावून पाहिलें तर प्रत्येक झाड कोणत्या तरी गोड वा विषादकारक आठवणीशीं निगडीत आहे. सर्वांचा विस्तार केला तर महाभारतच होईल. पण आमच्या आगरातल्या उंडीच्या झाडाची आठवण डावलून चालणारच नाहीं. आतां तें झाड नाहीं! झाडाकरितां मनुष्य अश्रु टाकतो काय? माणसाकरिता मनुष्य अश्रु टाकतोच! गुरासाठीं टाकतो. आमचा वृद्ध बैल मोन्या मेला तेव्हा आमच्या सर्वांच्या डोळयात अश्रु आले, म्हातारा झाल्यावर त्याला आम्ही पेन्शन दिलें होतें. आणि मेल्यावर माणसारखं समुद्रावर नेऊन पुरलें होतें! गुराबर मनुष्य प्रेम करतो! मला वाटतें तितक्याच उत्कटपणें तो झाडावरहि प्रेम करतो. उंडीच्या झाडाचें सौंदर्य मराठी साहित्यांत अजून कोठेंच आलें नाहीं उंडीच्या कडू तेलामुळें त्याला लोक नाक मुरडतात! मी मात्र उंडी, फणस, व भेंड या झाडाच्या सौंदर्यानें वेडावून जातों. इतका विपुल दाट पर्णभार कोणत्या झाडाला आहे? काळसर दाट अशा पानाना खवल्यानीं युक्त अशा मजबूत बुध्याचा आधार, आणि त्याचा तो डौलदार असा आकार! नदीच्या काठाला जेथें असें उंडीवन असतें तेथून तर उठूंच,

नये असें वाटतें. वसंत ऋतूंत त्याला सुरंगीच्या फुलाशीं स्पर्धा करणाऱ्या मंजिऱ्या येतात. कडू तेल देणाऱ्या या झाडाच्या गोड मादक अशा मंजिऱ्या ! मनुष्यानें दुर्लक्ष केलें तरी पोपट खरा रसिक पोपटाचे थवे उंडीच्या झाडावर हटकून सापडतात.

आगरांतील उंडीचें झाड म्हणजे पुराणपुरुष किती वर्षांचा होता कुणास ठाऊक. आमचा धोंडू गडी सहा फूट उंचीचा. उंचीच्या मानानेंच त्याचे हात पण त्याच्याहि कवेंत तें झाड सापडत नसे इतकें जुनें झालें होतें कीं आंत मनुष्य बसू शकेल अशी ढोल तयार झाली होती. आमच्या आगरात थंड सावलींत बसायचें असलें तर तेथें बसावें. आमचा पाण्याचा चुला त्याच्या विस्ताराखालीं ! पाऊस पडूं लागला तरी आमच्या अंगावर पावसाचा थेंब येत नसे.

म्हातारपणामुळें झाड वाकलें होतें ! वादळात केव्हा पडेल याचा नेम नव्हता. त्याच्या विस्ताराखालीं आमचा रहाट होता. त्याच्या सावलीमुळें पोफळींची लागवड होत नव्हती. पण झाडाला हात लावण्याचें आमच्या मनातहि आलें नसतें. आम्ही हात लावलाहि नाहीं एका वादळांत तो पुराणपुरुष आडवा झाला. आगरात गेलों म्हणजे ती उघडी जागा अजूनहि त्या पितामहाप्रमाणें वाटणाऱ्या झाडाची आठवण करून देते.

सगळेंच भावजीवन जेथें घडवलें गेलें त्या आमच्या आगराच्या आठवणी संपणार तरी कशा ? तुळशीचें अंगण, गुलबक्षीचीं नाजुक सुंदर फुलें, कुडस्यातले पानवेलीचे माडव, मेंदीचे गंधयुक्त घोस आणि पुढच्या अगणातील त्या मळण्या, "ते लाऽऽभ .. दोऽऽने ... तीऽऽने. भात मोजणी ! एकेक बकुळीच्या फुलासारखी मंद मधुर आठवण. पण त्यांना निष्ठुरपणें मागें लोटलें पाहिजे.

जें आमच्या आगरात तेंच पाखाडीवर आल्यावर. त्याचा प्रकार थोडासा वेगळा. ज्या व्यक्ति माझ्या जीवनात आल्या व जे प्रसंग अनुभवले–त्या व्यक्ति आतां हाकेच्या पलीकडे गेल्या आहेत. आणि निसर्ग एवढा चतुर कलावंत आहे कीं तो कोणताहि प्रसंग जसाचा तसा पुन: निर्माण करीत नाहीं. आता मी वयानें बराच वाढलों आहे. जगाचा बरावाईट अनुभव साठवला आहे. छोटे मोठे लोकाचे मनाशीं कांहीं आडाखे बसवले आहेत. पण काय असेल तें असो मुरूडचे आमचे शेजारपाजारचे सामान्यच लोक माझ्या मनात डोंगराएवढी जागा व्यापून बसले आहेत. गुरुजनाप्रमाणें वाटणारे ते लोक आतां भेटत नाहींत. मुरूडला गेल्या-

नंतर मनांतल्या किती तरी जागा रिकाम्या वाटतात. ज्यांनीं आपलें कौतुक करावें, आपले कान उपटावे अशीं तीं वडीलधारीं माणसें आतां भेटत नाहींत. माझ्याहून मोठी माणसें अजूनहि मुरूडला आहेत. पण माझ्या मनांतल्या त्या रिकाम्या जागा भरत नाहींत. आणि स्वतःचें पोरपण सुटत नाहीं.

राजकीय चळवळीनें भारला गेलेला मुरूडला मी एकच माणूस पाहिला. त्याची आठवण कशी विसरणार ! जगू परचुरेचा चेहरा आठवण्याचा मी प्रयत्न करतो पण तो निष्फळ ठरतो. आठवण येते ती आम्ही कोणत्या तरी निमित्तानें मंडपात जमलों होतो, वेळ रात्रीची होती. गांधींच्या असहकाराच्या चळवळीनें वातावरण तापलें होतें. त्या वेळचा महात्मा गांधींचा खादीची टोपी घातलेला फोटो मला अद्याप दिसतो आहे. एक वर्षांत स्वराज्य आपणाला मिळणार, मग इंग्रजी जाणार व बरोबरच शनिवार–रविवारच्या सुट्टया जाणार, अमावास्या चतुर्दशीच्या सुट्टया मिळणार ! किती हर्षानें आम्ही त्या बातमीचें स्वागत केलें ! तें स्वराज्य आपण मिळवलें पाहिजे, परदेशी मालावर बहिष्कार टाकला पाहिजे, अशा स्वरूपाचे जगू परचुरेचे शब्द कानात घुमतात. आमचा परदेशी मालाशीं संबंध म्हणजे फक्त चहाशीं. चहा न घेण्याची शपथ आम्ही घेतली पाहिजे ! काहीं तरी भारल्यासारखीं आम्हीं मुलें त्या वेळीं झालों होतों. तिथच्या तिथे आम्ही मुलांनीं ती शपथ वाहिली. आम्ही सर्व मुलांनीं ती शपथ पाळली. स्वराज्य आलें नाहीं ! जगू परचुरेनें पुढें आत्महत्या केली ती, तें वर्ष पुरें होण्यापूर्वीं कां नंतर त्याची मात्र आता आठवण नाहीं – आणि स्वराज्यप्राप्तीशीं त्याचा संबंध पण नाहीं.

चिंतू वैशंपायन – चिंतू म्हटल्यावर तुमच्या डोळ्यासमोर पंधरा सोळा वर्षांचा मुलगा उभा राहील. पण तसें काहीं नाहीं. त्याची लहानपणची मला आठवण आहे ती, तो बाप्या असल्याची. पण खेड्यांत कांहीं काहीं जण वाढतच नाहींत. चिंतूचा चिंतोपंत मुरूडला कधी झाला नाहीं. काळा, भरपूर उंच, लाबट चेहऱ्याच्या चिंतूची आठवण त्याच्या हॉटेलातल्या चिवड्यापेक्षाहि देवळांतलीच येते. नारायणाच्या देवळांत उत्सवाच्या वेळीं हंड्या, झुंबरें टांगलेलीं असतच आताहि असतील, पण जमिनीवरहि दहा-दहा बारा बारा पाकळ्या असलेल्या पुरुषभर उंचीच्या समया असत. त्या समयांच्या फिकट, पिवळ्या, पाढऱ्या ज्योतींनीं कीर्तनाला न्यारा रंग चढायचा. 'पुंडलीक वरदे हाऽरी विठ्ठल'चा गजर चालू असतांनाची चिंतूची मूर्ति डोळ्यापुढें येते ती एका हातात एक ताम्हन व दुसऱ्या

हातात लहानं कातरी–कातरीनें वातीचे कोळी आवाज न होता ताम्हनांत पडत असतानाची – कीर्तनातल्या कथा लक्षांत नाहींत. वेदान्त निरूपण तर नाहींच नाहीं. उत्सव म्हटला कीं त्या हंड्या, त्या समया व कोळी कापणारा चिंतू !

या नारायणाच्या देवळातील बकुळीच्या वृक्षाची येत नाहीं एवढी आठवण देवडीच्या बाहेरच्या तांबड्या रेतीची येते – पावसाळ्यांत तेथून वाहणाऱ्या तांबड्या पाण्याच्या लोंढ्याची येते देवीच्या देवळाकडून येणारा एक प्रवाह व बहिरीच्या देवळाकडून जोरानें येणारा दुसरा प्रवाह, हे एकमेकाना मिळत तेव्हा नद्यांच्या संगमाचे दृश्य तेथें येत असे. भुरुभुरु वाहून जाणाऱ्या रेतींत पाय टिकत नसत. खळाळत जाणाऱ्या त्या तांबड्या लोंढ्याचें दृश्य अनिमिष नेत्रांनीं पाहता पाहता वेळेचें भान रहात नसे. पण पावसाच्या वेळींच वाहणाऱ्या या पाण्यानें आठवण जागृत होते ती मात्र कुरु पांडवाच्या युद्धाची. देवळाच्या सभामंडपात पुराण चालू असे. भीमाची गदा कौरवांच्या रक्ताची नदी वहावत असायची. पुराण फक्त म्हाताऱ्या कोताऱ्यांनींच ऐकावयाचें असा अलिखित संकेत ! त्यामुळें पुराणिकाची खणखणीत वाणी आम्हाला लांबूनच – देवळाच्या पोळींवरूनच – ऐकावी लागे. त्यामुळें म्हणा किंवा बालपणाच्या तरल कल्पनाशक्तीमुळें म्हणा, कौरवाच्या रक्ताची नदी आणि देवळाच्या बाहेरील तांबडा पूर हीं माझ्या मनात एक झालीं आहेत.

पाण्याचा लोंढा जातो दक्षिणेकडे ! मी मात्र निघालों आहे उत्तरेकडे. प्रथमच लागते ती रिसबूडांची कवाडी. इथें माझा दोस्त वासू रहात असे. त्याच्याकडच्या दासनवमीच्या जागरणाची व प्रसाद म्हणून मिळणाऱ्या चिवड्याची आठवण मागें टाकून बड्यांच्या घराशीं आलों कीं मुरूडच्या पहिल्या नाटकाची आठवण येते. शिरू, वासू, मी आणखी चार पांच मुलें नाटकाला आलेल्या अथांग जनसमुदायानें घाबरून जाऊं नये म्हणून हळूंच पडदा बाजूला सारून त्या जनसागराचें दर्शन घेतों. आमचें त्या नाटकांतलें काम काय म्हणाल तर 'भुवन पाळ सकल काळ...' हें ईशस्तुतीपर गाणें म्हणायचें. पण त्यावेळीं घाबरून जाऊं नये म्हणून कोण कसरत ! आयुष्यांत पहिला आणि शेवटला डोंबा फासला तो त्या वेळीं.

मी पुढे निघतों आणि थांबतों तो तात्या देवधराच्या घराशीं. खरें म्हणजे भीत भीतच थांबायला हवें ! कारण तात्या म्हणजे दुसरे जगदग्नि ! माझी मुंज झाल्यावर सोडमुंज होईपर्यंत संध्या शिकायला मी त्याच्याकडे जायचा. सर्व वेळ जीव मुठींत असायचा ! तात्यांच्या समोर शुद्ध उच्चारहि चुकीचा व्हायचा असा

त्याचा दरारा! आणि कां वाटूं नये? आतां माझ्यासमोर ही गोष्ट झाली कीं, दुसऱ्या एखाद्या वेळीं तें नक्की सांगणें कठीण आहे. कमळाकर – आमच्या अस्सल कोंकणी भाषेंत कमळ्या – तात्याजवळ संथा घेत होता. त्याची कांहीं तरी चूक झाली. दोनदां तीनदा तात्यांनीं ती चूक सुधारली, आणि मग आपस्तंबी राग एकदम बाहेर पडला. तात्यांच्या हाताशीं असलेल्या पंचपात्रीनें कमळाकरच्या कपाळाशींच लगट केली. पण तात्यांच्या खणखणीत वाणींतील वेदोच्चार ज्यांनीं ऐकले होते त्यांना तात्याच्या या कटाक्षाचें आश्चर्य वाटणार नाहीं.

तात्या असे संतापी–तामसीच म्हणाना. पण अशुद्धतेबद्दलची त्यांची हीं चीड त्याना अंतर्बाह्य व्यापून होती शुद्ध आचारविचारांची जी शिस्त त्यानीं स्वतःला लावली होती ती त्यानीं कधींहि मोडली नाहीं. एक लहानसेंच उदाहरण पहा, अर्थात् हाहि प्रसंग माझ्यासमोर झाला कीं काय नकळे. आपली कल्पनाशक्ति ऐकलेल्या व पाहिलेल्या गोष्टी अशा बेमालूम एकजीव करून टाकते कीं आपण ही गोष्ट अनुभवली, ही आपण ऐकली, ही भाषाच अर्थहीन होते. हा प्रसंग मी पाहिला असेल किंवा ऐकला असेल. कांहीं असलें तरी हा पुढचा प्रसंग माझ्या डोळ्यासमोर अजूनहि आहे. आमची पंगत बसली. हरहर महादेव झालें. 'सत्यंत्व ... परिषिंचामि' झालें. पानावरच्या लिंबाच्या फोडी वरणभातावर पिळल्या जाऊं लागल्या, आणि अवचित एका फोडीची बी तात्याच्या पानात उडली. झालें! पान उष्टें झालें! तात्या ताबडतोब पानावरून उठले! तात्या एकभुक्त होते त्या दिवशीं तात्याना खराखुरा निरशनाचा उपास पडला. आता कोणी उष्टेपणाचा एवढा विटाळ मानीत नाहीं. पण भातावर लिंबू पिळताना उपाशीपोटीं उठलेल्या तात्याची आठवण येते – माझ्या लिंबाची बी माझ्याच पानात पडते.

तात्याच्या घरावरून पुढें सटकलें कीं आपल्याच घरीं आल्यासारखें वाटलें. राधावहिनीचें घर आणि आमचें घर एकच – इतका वेळ मी राधावहिनीच्या घरी काढला आहे. रोज संध्याकाळ झाली कीं मागल्या दारानें आम्ही राधावहिनीकडे जाऊन धरणें धरायचें. धुपाटण्याच्या प्रकाशांत तिचा फराळ तरी चालू असायचा किंवा थालिपीठ तरी तव्यावर असायचें. आमच्या घरीं कोणी पुरुषमनुष्य नाहीं. आम्हाला सोबतीची गरज तशीच राधावहिनीला. पण हें झालें वरवरचें कारण. अंतस्थ कारण म्हणजे राधावहिनीचा गोष्टीवेल्हाळपणा. तिच्या चटकदार गोष्टी रात्री-मागून रात्रीं चाललेल्या असायच्या, त्यामुळें तिला या नाहीं त्या निमित्तानें आम्ही

बोलावून आणायचेच. पावसाळयाच्या दिवसांत हें सहज शक्य होई. अनेक प्रसंग पाहिलेली, केव्हाहि धीर देणारी मोठी हुशार व चतुर अशी ही बाई गडगडण्याच्या नुसत्या कल्पनेनेंच कांपायला लागायची. घरात एकटीच असली तर कोपऱ्यात दाराच्या आड लपलेली आढळायची. आता राधावहिनी अगदीं गलितगात्र झालेली आहे. स्मरणशक्तीहि जवळ जवळ गेलेली आहे – आणि तिनेंहि किती काम द्यायचें ? नव्वदीच्या जवळ आलेली राधावहिनी सध्या शरपंजरीं पडलेली आहे. त्या वेळचें मंतरलेलें अद्‌भुत वातावरण कठोर वस्तुस्थितीशीं टकरा देत आहे.

राधावहिनीचें घर आता रिकामें आहे. तसें काहीं आमच्या अगदीं शेजारचें परचुऱ्यांचें नाहीं. पण माझें मन मात्र मागें जातें तें आमचें आणि परचुऱ्यांचें घर एक होतें तेथपर्यंत घर जळल्यानतर दादा दुसऱ्या निरनिराळया घरांत रहायला गेले पण त्यांचें आमचें घर एक होतें, अंगण एक होतें, ओटी एक होती, ही आठवण कधींहि बुजत नाहीं आम्हाला सख्खे चुलते नव्हते. दादामुळें ती उणीव आम्हाला कधीं भासली नाहीं.

दादासारखी विलक्षण व्यक्ति मुरूडला क्वचितच झाली असेल. सागर दादा म्हणून ते ओळखले जात. आयुष्यांतल्या चढउताराचा त्यानीं भरपूर अनुभव घेतला पण त्याच्या स्वभावाला कडवटपणा कधीं शिवला नाहीं केव्हाहि गेलात तरी हसतमुखानें स्वागत. गोड साखरपेरणी. एक गोष्ट मात्र खरी कीं पैसा कमावणें हें दादाना माहीत पण तो टिकवणें हें मात्र ते कधीं शिकले नाहींत.

दादा आमचे आधार होते. कोणत्याहि प्रसंगीं कसलीहि मदत मागा – नाहीं हा शब्द त्यांच्या तोंडून आला नाहीं. मुरूडला गेल्यानंतर त्यांना न भेटतां येणें हें मनाला कधीं भावलें नाहीं. त्याच्या घरीं जाऊन एकदां सर्व हालहवाल सांगितली – चार शिव्या हासडून त्यानीं वाईट बातम्यांचा फडशा पाडला कीं मग कुठें बरें वाटायचें.

दादा संकटाना कधीं भ्यायले नाहींत. कौटुंबिक हानि व आर्थिक आपत्ति यांचा भरपूर वांटा त्याच्या नशिबीं आला होता पण त्यामुळें त्याचा उदंड उत्साह व मनाचें औदार्य बिलकूल कमी झालें नाहीं पण एक वेळ मात्र त्यांच्या डोळयां-तलें विरळ असें पाणी आमच्या नजरेंत आलें आणि आमच्या हृदयाचें पाणी पाणी झालें. इतर अनेक प्रसंगीं त्यानीं डोळयांत टिपें आणलीं असतील पण लोकांना अश्रू दाखविणें हें त्याना साफ नामंजूर होतें. आमच्या घराच्या शेजारीं तेव्हां ते

रहात होते सुपारीच्या व्यापारात त्यांना जबरदस्त ठोकर बसली होती सगळाच व्यापार गुंडाळावा लागणार होता यापूर्वीहि असे दोन प्रसंग त्याच्यावर आले होते. पण आता वय पन्नाशीच्या पुढें गेलें होतें. मनाची हिम्मत कमी होत चालली होती. तसें पाहिलें तर हिम्मत ही त्याची कायमची सहचारी होती – पण यावेळीं मात्र त्यांचें मन चलबिचल झालें, ओटीवर बसलेल्या व्यापाऱ्यांना तसेंच टाकून ते बाहेर आले व पायऱ्यावर उभे राहून कपाळावरला घाम व डोळ्यांतलीं टिपें त्यांनीं पुसलीं, मन स्थिर केलें व मग आत गेले. दादांना वडिलाप्रमाणें मानणाऱ्या आमच्या मनाची स्थिति काय झाली असेल याची सहज कल्पना करतां येईल

आमच्या कवाडींतून समोर पाहिलें तर अन्पूर्णाकाकू – खरें म्हणजे अन्नपूर्णाकाकूच म्हणायला हवें – याच्या अंगणातल्या मोठया वाढलेल्या बेलाचें दर्शन होते आणि अन्नपूर्णाकाकूंनीं तो बेल जगविण्याकरिता चालविलेल्या आट्यापिट्याची आठवण येते. त्यांचा ससार अगदींच छोटछूट ती व तिची मागें आलेली मुलगी आक्का. आपली सौंदर्यदृष्टि दुसऱ्याना जाचक, आग्रही व किंचित् उग्र असण्याचा सभव असतो पण अन्नपूर्णाकाकूंची सौंदर्यदृष्टि भाजींतल्या वंजनासारखी होती. खुपण्यासारखी नव्हे पण सौंदर्याची जाणीव करून देणारी, शंकराची पूजा यथासांग झाली पाहिजे या आग्रहापोटींच अंगणातलें बेलाचें झाड आलें होतें. त्याच्या घराच्या मागच्या अंगणांत गेला असतात तर रामफळ, डाळिंब, अगस्ता, कोरांटी वगैरे झाडें मोठया टापटिपीनें लावलेलीं आढळलीं असतीं

भाविकता हा त्याच्या स्वभावाचा स्थायी भाव. शक्य होतें तोपर्यंत त्यांचें देवळातलें पुराण किंवा कीर्तन चुकलें नाहीं. संध्याकाळचे चार वाजले कीं, देवळात पुराणाचे टोले पडायचे. तुम्ही ओटीवर बसले असलात तर अन्नपूर्णाकाकूंची एक एक पाऊल मोजीत टाकीत चाललेली मूर्ति दृष्टीस पडल्याखेरीज राहिली नसती. त्या पुराण ऐकायलाच जात असत हें त्यांच्याशीं चार गप्पा केल्या कीं सहज ध्यानात येई. अन्नपूर्णाकाकू म्हणजे पुराणाचा चालता बोलता ज्ञानकोश. त्याचा प्रत्येक आचार, विचार, उच्चार हा पुराणाच्या भाषेंत मुरलेला होता.

त्यांचें पुराण चुकायचें तें एकाच गोष्टीमुळें. त्या मोठया कसबी सुईण होत्या. सुईणपणाचें शिक्षण त्याना कोणीच दिलें नव्हतें. तें त्यानीं असेंच उचललें होतें. त्या होत्या तोपर्यंत त्याच्यावर खुशाल अवलंबून रहावें. त्यानीं कामाच्या बाबतींत कधीं आळस केला नाहीं. त्यांच्या हाताला अपयश कधीं माहीत नाहीं.

आपल्या यशाचें श्रेय त्या देत मात्र ' नारायणाला ' आणि या कामाच्या मोबदल्या-ची अपेक्षा त्यानीं कधीं केली नाहीं.

अन्नपूर्णाकाकूंना भेटायला गेलों म्हणजे- कधीं श्रीखंडाची वडी तर कधीं दुसरें कांहीं हातावर पडे. त्या वडीचें कौतुक मात्र करावें लागे. म्हणजे वडी काहीं घाईट नसे, उलट श्रीखंडाची वडी किंवा हलवा करावा तर अन्नपूर्णाकाकूंनीच. त्यांची भट्टी कधीं बिघडायची नाहीं किंवा चव बदलायची नाहीं. हें सर्व त्यांना ठाऊक होतें तरी आम्ही स्तुति करावी अशी त्याची अपेक्षा असेच. आम्हाला तरी त्याना दुखवण्याचें काय कारण ?

त्याची ती भाविकता आम्हाला कशी शोभणार ? एकदा मी माझ्या वडिलाची ज्ञानेश्वरी उघडून चाळीत बसलों होतों जाडजूड ग्रंथ पाहून काकूंनीं विचारलेंच " कसलें रे वाचन करतोस ? " मी ज्ञानेश्वरी वाचतों हें कळल्यानंतर त्यांना विलक्षण आनंद झाला " शिकला तरी मुलगा बिघडला नाहीं. " मला माहीत होतें कीं, आता माझी स्तुति शेजाऱ्यापाजाऱ्यांत पसरणार. स्तुतीच्या बाबतींत काकूंनीं कधीं कंजूषपणा दाखविला नाहीं.

पूर्वीं गावात समाराधना पुष्कळ व्हायच्या. जेवणाचें निमंत्रण घरोघर आदल्या दिवशींच होत असे. जेवण तयार झालें, पंक्ति वाढायची वेळ झाली कीं, दहा बारा वयाच्या उमेदवार मुलांना बोलावणें करायला धाडण्यात येई. लंगोटया कसलेले व खांद्यावर सदरा टाकलेलें आमचें टोळकें तयार होई. आणि वहाळेपासून ते केतकराच्या घरापर्यंत ' घरात कोण हो, गोविंदराव बाळाकडून स्नान सांगायला आलोय हो ' असा पुकारा करीत धांवत जाई. जेवणाची वेळ झालेली असायची- मुलें तर भुकेनें कळवळून गेलेलीं असायचीं. अशावेळीं स्नान सांगायला जायचें म्हणजे खरोखर उपचारच असे मुकटे, भांडीं बाधून मोठे लोक व सोंवळयाच्या लंगोटया, भाडीं घेऊन लहान मुलें तयारच असत.

जवळच्या घरीं कपडे बदलायचे आणि जाजमाचा पडदा असलेल्या मंडपात प्रवेश करायचा. प्रवेशद्वाराच्या उजव्या बाजूस पाय धुण्याकरतां पाण्यानें घंगाळ व तांब्या असे. उन्हानें गरम झालेलें पाणी पायावर ओतून पक्तींत जाऊन बसायचें. रांगोळीनें शोभिवंत झालेल्या त्या केळीच्या पानाच्या पंक्ती, गुलालानें माखलेले नाग्याचे काप, त्यातून वलया वलयानीं वर चढत जाणाऱ्या सुगंधी रुपेरी रेषा, थट्टा मस्करी, एकमेकाना आग्रह आणि चढाओढीनें म्हटलेले ते श्लोक – या सर्व आठवणी

आतां इतिहासजमाच झालेल्या आहेत. निळे, जाभळे, पिवळे कद, उर्मी गधं व त्याबरोबरच मोठाल्या पंक्तीहि गेल्या.

जेवणावळीचा भावे मास्तराना बरोबर पत्ता असायचा. एक वेळचे मुरूडचे ते करडे शिक्षक. ताकद अशी कीं देवीच्या देवळासमोरची नऊ मणकी दोन दोन बोटांत धरून सहज रीतीनें मागें फेकायचे. नाठाळ आणि ढ मुलांचे ते कर्दनकाळ. घोडीं देणें, उलटें टागणें, धुरी देणें वगैरे शिक्षा देणें यात त्याना गैर काहींच वाटत नसे. पुढें काय झालें तें नकळे पण मास्तर निस्सग झाले – मास्तर वेडे झाले एवढें खरें. यापुढें ते घरीं राहिले नाहींत. मुक्काम देवळांत. जेवणावळीच्या वेळीं दत्त म्हणून उभे रहावयाचे. जेवण पदरात पडलें कीं तेथें थाबायचे नाहींत. रस्त्यालून खात जात जेवणावळ नसेल तर कुणाच्या तरी घरीं जायचे व दुपारपुरती जी भाजी भाकर मिळेल ती घ्यायची मास्तर एकाच घरीं कधीं जायचे नाहींत. आणि विन्मुख कोणी पाठवायचे नाहींत. वेडा असूनहि हवासा वाटणारा हा माणूस लोकाचा लाडका होता.

त्याचें वेडेपण बुद्धीला गुंग करणारें होतें त्याच्या बेताल बुद्धीचा प्रत्यक्ष क्वचित्‌च येई. मुबईकर पाहुण्याना तर मास्तर ही अजोड अशी करमणूक होती. या बाबतींतल्या भावना विलक्षण गुतागुंतीच्याच आहेत आदर, कुतूहल, करुणा अशा समिश्र भावनानीं मास्तरांचें स्वागत होई गप्पाना मोठा रग चढे. मात्र मास्तराना त्याच्या पूर्ववृत्ताताकडे खेचण्याचे प्रयत्न फोल ठरत. "तुम्हाला वेड कशानें हो लागलें ?" यावर मास्तरांनीं काय उत्तर द्यावें ? "दापोलीला सर्कस आली आहे" प्रश्नाचें उत्तर डावलण्याचा ते प्रयत्न करीत प्रश्न करणारा एवढ्यावर न उमजतां जर पुनः पुनः प्रश्न विचारूं लागला तर 'वेड ... आहेस" म्हणून तरातरा उठून जात.

मास्तराच्या तोंडातल्या 'कळून कळत नाहीं आणि सांगून उमजत नाहीं.' या वचनाचा मुरूडकराना अजून विसर पडलेला नाहीं. मुंबईकर आले कीं मास्तर त्याना भेटून 'एक पैची सोय होईल काय ?' असें विचारीत. मास्तराना पै विडीकरतां पाहिजे असे. मास्तर पैहून जास्त मागत नसत. देणारा माणूस पैशाहून कमी देत नसे.

मास्तराशीं बोलताना करमणूक हाच मुख्य हेतु असला तरी करुणा आणि सहानुभूतीचें अस्पष्ट अस्तर असे ही प्रौढाची गोष्ट. लहान मुलाना ती

केवळ एक करमणूक होती. मास्तर बिघडले नाहींत तर मुलाचें समाधान होत नसे. ते शिव्या देऊं लागत. क्वचित् दगड मारीत. पोरांची पांगापाग, पुन्हा जमाव, बराच वेळ हा गोंधळ चाले. सुदैवानें कोणी वडिलधारं माणूस तेथें आलें तर मास्तरांची सुटका होई; नाहींतर दमछाट होईपर्यंत ही क्रूर दंगल चाले. मास्तर घामाघूम होत धापा टाकीत अखेरीस पोराचा नाद सोडीत आणि नागलेश्वराच्या देवळात एका कोपऱ्यात निपचीत होऊन पडत.

या माणसाना अंत नाहीं. प्रसंगाना अंत नाहीं सारें दुःखाला कारण – दुःख नव्हे – उदास करणारं. हें तरी बरोबर आहे कां ? मग हें सारें ठाऊक असू-नहि मला त्याचीच भूक का लागते ! उदास, दुःखी होण्याची आवड माणसाला असते का ! आयुष्यांत एवढा अनुभव घेतल्यावर माझ्या अंतरंगांतून यापैकीं कोणाचीच उचलबांगडी होत नाहीं याचा अर्थ काय ! ज्यांच्या आसपासहि हीं माणसें फिरकूं शकणार नाहींत अशांचे स्नेहसुद्धां अपुरे पडावेत !

आणि या विश्वाच्या मर्यादा तरी किती तोकड्या ! मुरूडची खालची पाखाडी ! कां आयुष्यात जें विश्व मी पाहाणार त्याची छोटी प्रतिकृति विधात्यानें मला बहाल केली होती !

# उपसंहार

मुरूडची कथा संपली ! सिद्धपुरुषापासून आजपर्यंत पाच शतकें मुरूडनें वाटचाल केली. कडू, गोड अनेक तऱ्हेचे अनुभव घेतले ! अनेक आक्रमणाना तोंड दिलें ! वैभवाचे, सुखाचे दिवस भोगले तसें वनवासाचें दुःखहि पचवलें ! प्रत्येक आपत्तीनंतर मुरूडचें सामर्थ्य वाढतच चाललें. मुरुडची आगेकूच कुणी थोपवूं शकलें नाहीं.

इतिहास कालात मुरूडनें मोठे पुरुष निर्माण केले. इंग्रजी राजवटीच्या सुरुवातीला मुरुडचें वैभव गेलें – तें मात्र परत आले नाहीं. संपत्ति गेली पण मुरूडनें त्याच शतकात डोळे दिपवणारें दुसरें वैभव मिळवलें अण्णासाहेब मंडलिक, रा. बा. दीक्षित व अण्णासाहेब कर्वे या तिघानीं मुरूडला मिळवून दिलेलें वैभव कोणीहि केंव्हाहि हिरावून घेऊं शकणार नाहीं

आजचें मुरूडचे जीवन हें मात्र दुबळें पांगळें असें दिसतें. आतां अनेक वर्षे बाहेर राहिलेल्या लेखकासारख्या व्यक्तींना निदान असें वाटतें. मुरूडची चाललेली ही पडापड केवळ मुरूडचीच कहाणी नाहीं ! कोंकणातील अनेक खेड्याची अशीच दुर्दशा चालू आहे. गेल्या पन्नास वर्षांत मुरूडची वस्ती स्थिर आहे. पण याच पन्नास वर्षांत मुरुड अधिकाधिक ओसाड होत चालल्याचा प्रत्यय येत चालला आहे. जीवनाबद्दलची आस्था व उत्साह हाच नष्ट होताना दिसत आहे ! प्रगतिपथावर असलेल्या मनाची उभारी व कर्तृत्वाकांक्षा याचा आढळ कष्टानेंच होत आहे.

आजच्या मुरूडचा विचार करताना या मुरुड ग्रामस्थाच्या मनोवृत्तीचा विचार अपरिहार्य ठरतो. मुरूडच्या भरभराटीचा या मनोवृत्तीशीं फारच निकटचा संबंध आहे जीवनाविषयींची उदासीनता हेंच केवळ मुरूडच्या अधोगतीचें कारण नाहीं. शिवाय ही उदासीनता हा मुरुड ग्रामस्थाचाच विशेष आहे असेंहि नाहीं. भारतीय मनच भौतिक वादापेक्षाहि नियतिवादाकडे जास्त झुकलेलें आहे जी उदासीनता दिसते, धडपडीचा जो अभाव दिसतो, प्रयत्नाबद्दलची जी अनास्था उद्वेगजनक वाटते त्या सर्वांची मुळें खोल आहेत. या निवृत्तिपरतेला पोसणारी अशी भारतीयता आपल्या रक्तात कांहीं शतकें तरी ठाण माडून बसलेली आहे.

अशा या पार्श्वभूमीवर ती स्व. अण्णासारखे पुरुष हिमालयासारखे भासूं लागतात. नियतिवाद, जीवनाविषयींची उदासीनता यांचा उपसर्ग या पुरुषांना कसा झाला नाहीं ? ती. स्व अण्णाजवळ असें काय होतें कीं ज्यामुळें ते उभ्या भारताच्या आदराचा विषय होऊन बसले ? प्रतिकूल शरीरयष्टी, प्रतिकूल आर्थिक परिस्थिति, अलौकिक बुद्धिमत्तेचा अभाव पण अव्यभिचारी निष्ठा, असीम त्याग आणि भविष्याला फाडून स्वप्नें रंगविण्याची प्रतिभा एवढयाच्या बळावर त्यांनीं आज जें विश्व निर्माण केलें आहे त्याचा प्रतिभासंपन्न कलावंतालाहि हेवा वाटावा.

अवनतीच्या फेऱ्यात सापडलेल्या मुरूडलाहि त्यांच्या कार्यापासून स्फूर्ति घेता येईल, अभ्युदयाच्या दिशेनें वाटचाल करायला बळ येईल.

# मुरूड शकावलि

अनुक्रम २३८२२ दि. ३१/७/८१
क्रमांक ८९२ दि. २९/११/८८

| इ. स. | |
|---|---|
| पंधरावें- सोळावें शतक | – सिद्धपुरुषाचें आगमन; मुरूडची वसाहत; दुर्गादेवी व बहिरीचीं देवळें |
| १६२४ | – मलबाऱ्यांचा मुरूडवर हल्ला; पांच देवाचें देऊळ भस्मसात |
| १६३५ | – बाबाजी वैद्य, मंडलिकांचें पूर्वेच्या आळीचें ठिकाण विकत घेतो. |
| १६६० च्या पूर्वी | – कृष्णाजी विश्वनाथ पंडित हे मुरूडचे कुलकर्णी होतात; सालदुऱ्याचें ठिकाण बडे साहेबीण हिला सानक. |
| १६६० | – गोपाळ जोशी करजगांवकर याच्या ठिकाणाच्या सीमा निश्चित करतात, त्यावर ६२ जणाच्या साक्षी; त्यात केशव जोशी, गोविंद वैशंपायन, पावगी, छत्रे, देवल, रानडे वगैरे व्यक्ती. |
| १६७३ | – शिवाजी सुवर्णदुर्गाची दुरुस्ती करतो; केशव जोशीची व शिवाजीची गाठ; अचलोजी मोहिता सुवर्णदुर्गला; |
| १६८३ शके १६०५ | – भालेराई होते, आजर्ले, मुरूड, कर्दे, पंचनदी वगैरे गांव या तडाक्यांत सापडतात. दुष्काळ पडला; मुरूडचें कुलकर्णी वेतन या सुमारास नारो कृष्ण टाळसुरकर यांजकडे. |
| १६९० | – केशव मनोरनें मुरूड येथें ठिकाण विकत घेतलें; किंमत ६५ लारी मोगलाच्या भरीस दिली. |
| १६९९ | – जोशी याची वृत्तीची वाटणी. |

| | |
|---|---|
| १७०७ | – परभु व दातार यांचीं ठिकाणें आचवल विकत घेतो. |
| १७११ | – रामभट काणे व वैशंपायन याच्या वृत्तींतील वादाबद्दल उभयतांत तडजोड. |
| १७१२ | – केशव जोशी काशीस कायमचे जातात. |
| १७१८ | – महादेव कृष्ण जोशी व पंडित याच्यातील कुलकर्णी वतनाचा निकाल केशव जोशाच्या साक्षीवर होतो, कान्होजी आंग्रे पंडिताच्या बाजूनें निकाल देतो. |
| १७२२ | – महादेव कृष्ण यास भावाचें – नारो कृष्णाचें – मुरूडचें वतन चालूं होतें. |
| १७२९ | – महादेव कृष्ण यास मुरूडचें ठिकाण, किंमत १२५ लारी – देण्यांत येते |
| १७३४ | – गंगाधरभट वैशंपायन यास अभयपत्र; मानाजीराव विचारे यांच्या मृत्यूनंतर दापवलीची खोती गंगाधरभट याच्याकडे |
| १७३८ चा सुमार | – शामलाचे कारकीर्दींत हिरबाराव दळवी यानें शंकरभट व भास्करभट जोशी यास तिसंगावर नेलें व वृत्तीसमंधें खंड घेतला. |
| १७३८ | – शंकरभट दीक्षित याला खोतीबद्दलचा कौलनामा. |
| १७४१ | – जोगनाक याला शामलानें धरून नेला, व दंडावर मुक्तता केली, दंड केशवभट थत्ते यानें भरला |
| १७५५ | – रामाजी महादेव बिवलकर यानें मुरुड येथें गायत्री पुरश्चरण केलें. |
| ,, | – सुवर्णदुर्ग इग्रजांनीं तुळाजी आंग्र्यांकडून जिंकला. |

| | |
|---|---|
| १७५९ | – काणे-वैशंपायन यामधील दुसरा मोठा तंटा; त्याचा निवाडा रामाजी महादेव यानें केला. |
| १७६०–६३ | – श्री दुर्गादेवीच्या नवीन देवळाची बांधणी, याकरतां वैशंपायन, दातार, जोशी, कर्वे व बाळ यानीं खर्च केला. |
| १७६३ भाद्र. शु १ शके १८६५ | – श्री दुर्गादेवीची पुनःस्थापना, काणे यानीं आचार्यवरणाचा वाद घातला |
| १७६४ | – अंताजी परशुराम गोडबोले यांनीं हिरे व सुतार यांचीं वतनें सरकारातून मिळविलीं. –( तीं पुढें त्यांनीं सोडलीं. ) |
| १७७१ | – कर्दे येथील गोडबोले व फडके याच्याकडील वृत्तीबद्दल जोशी व वैशंपायन यांचा वाद. |
| १७७२ | – हिरे प्रकरण व काणे याना आगराबद्दल संमतपत्र, मुरूडची पहाणी. |
| १७७३ | – महादेवभट जोशी याच्या सात वर्षं वयाच्या मुलाला बैराग्यानीं पळविला; त्यांच्याकडे तो साडेतीन वर्षं होता. पाखंडिमत प्रवेशाबद्दल त्याला प्रायश्चित. |
| १७७६ | – नारो हरी आपल्या ठिकाणाला समुद्राचा उपद्रव होतो म्हणून बांध घालतो; त्यामुळें ग्रामस्थाची काथ्या कुजवण्याची जागा जाते; ग्रामस्थ तक्रार करतात. |
| १७८२ | – देवीची प्रभावळ लाकडाची होती, ती तांब्याची केली. कामगार गोविंदशेठ संगमेश्वरकर. |
| १७८७ | – समुद्राचा उपद्रव टाळण्याकरतां दातार बांध घालतात; ग्रामस्थ तक्रार करतात. |

१७८९ – मुरूडची पहाणी.

१७९० – पहाणी

१७९१ – कारभाऱ्याना सरकारी हुकूम; "दोन प्रहर झाले अद्याप घटस्थापना होत नाहीं सबब तिन्हाईत ब्राह्मण बोलावून स्थापना करणें."

१७९१ – गद्रे याच्या आगरांत वीज पडली; घरदार, पोफळी, आंबे व फणस अशीं अनेक झाडें पडलीं; म्हणून झाडावरचा दस्त कमी करण्याबद्दल विनती.

१७९१ – लक्ष्मणभट काणे याचा आगर व शेत जत; सबब योगक्षेम होत नाहीं करितां रामाजी वैद्य याचा निर्वंश झाला; त्याचें ठिकाण सीमापूर्वक काणे याना दिलें.

१७९३ – धोंडो नारायण मंडलिक याच्या कन्येचें दुसऱ्या बाजीरावाशीं लग्न..

१८०१ – हुंडा घ्यायला सरकारी हुकुमावरून बंदी असल्याची हवालदाराची ताकीद; हुंडा घेणाऱ्याचें कुटुंब वाळींत टाकणें व घेतलेल्या द्रव्याच्या गुणित रक्कम सरकारकडे जमा करणें, ग्रामस्थाचें कायदा पालनाबद्दलचें आश्वासन.

१८०२ – दुसऱ्या बाजीरावाचें मुरूडला आगमन.

१८१० – परशुरामपंत वैशंपायन (नाना फडणविसाचे मेहुणे) हे मुरूडच्या वृत्तीवर हक्क सांगूं लागले, म्हणून जनार्दनभट वैशंपायन व इतर ग्रामस्थ यांनीं त्याच्या घराचीं कौलें काढलीं व विहिरीचे दगड काढले.

१८१७ – मुरूडवर बलुची पेंढाऱ्याचा हल्ला.

| | |
|---|---|
| १८३३, मार्च ८ | – वि. ना. मंडलिक याचा जन्म. ( मृत्यु ९ मे १८८९ ) |
| १८३४, ऑगस्ट १० | – मराठी शाळेची स्थापना. |
| १८४३ | – मंडलिकांचें इंग्रजी शिक्षणाकरिता रत्नागिरीस प्रयाण; प्रभाकर शाहिराचा मृत्यु. |
| १८४७ | – मंडलिकाचें इंग्रजी शिक्षणाकरितां मुंबईस आगमन |
| १८५३ जुलै २१ | – शं. बा. दीक्षित याचा जन्म. ( मृत्यु २७ एप्रिल १८९८ ). |
| १८५७ जून २२ | – रा. भि. जोशी याचा जन्म ( मृत्यु ७ सप्टेंबर १९२७ ). |
| १८५८ एप्रिल १८ | – महर्षि अण्णासाहेब कर्वे याचा जन्म. |
| १८६१–६२ | – हर्णैला बोटी सुरू झाल्या. |
| १८६५ फेब्रु. ९ | – वि ना. मंडलिक यांनीं रॉ. ए. सोसायटी-पुढें मुरुडवर निबंध वाचला, बखरीचें प्रकाशन. |
| १८७९–८० | – वि. ना. मंडलिक मुंबई म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष ( मेयर ). |
| १८८२ | – र. धों. कर्वे याचा जन्म. |
| १८८४ | वि. ना. मंडलिक व्हॉईसरॉयच्या ले. कौ. चे सभासद (पश्चिम भारतांतील पहिले ) |
| १८८६ विजयादशमी | – मुरुड फंड स्थापना. श्री. अण्णासाहेब कर्वे, प. ह. दामले व का. वा. काणे याच्या प्रेरणेनें. |
| १८९३ | – बाजारपेठेंत आग. बाजारपेठ व आजूबाजूचीं पाचसात घरें भस्मसात. |
| १९०० | – गावात प्लेगची साथ. |
| १९०१ | – दुर्गादेवीचा मानापानाचा उत्सव बंद. |
| १९१७ | – श्री शंकराचार्य याची मुरूडला भेट. |

| | |
|---|---|
| १९२२ | – दरवर्षीं मे महिन्यात वरची पाखाडी व खालची पाखाडी येथें नाटकाना सुरुवात. |
| १९३४ फेब्रु. २६ | – श्रीराम मंदिराची स्थापना. |
| १९३७ | – मुरूड-फंडाचा सुवर्णमहोत्सव. |
| १९४७ | – मुरूड – फंडाचा हीरकमहोत्सव. श्री. अण्णासाहेबांचा सत्कार व थैली अर्पण. |
| १९५२ | – श्री दुर्गादेवीचा मानपानरहित उत्सव सुरूं. |
| १९५३ | – मराठी शाळेचा शतसावत्सरिक महोत्सव. |
| १९५७ | – बहिरीच्या देवळाची दुरुस्ती. |
| १९५८ मे ८ | – अण्णासाहेब कर्वे याचा १०० वा वाढदिवस मुरुड येथें साजरा; अण्णासाहेबांच्या अर्धपुतळयाचें उद्घाटन. अनेक ग्राम-सुधारणेचीं कामें. |

## कर्वे शकावलि

| | |
|---|---|
| १७०० च्या आधीं | – कर्वे कुटुंब मुरुड येथें स्थाईक |
| १७०० नंतर | – कर्वे महाजन होतात. |
| १७६० च्या आधीं | – कर्वे वर्तक होतात. |
| १७६०-१७६३ | – केशवभट कर्वे दुर्गादेवीचें देवालय, इतर चौघाच्या साहाय्यानें पुनः बांधतात. |
| १७६७ | – केशवभट कर्वे याची काशीयात्रा. |
| १७७३ | – केशवभट कर्वे याचे पुण्याच्या कापड-बाजारांत दुकान असल्याचा उल्लेख ( पेशवे दप्तर ). |
| १७७४ | – केशवभट कर्वे यांचा मृत्यु (रघुनाथभटाचे बंधु ) |
| १७७६ | – रघुनाथभट कर्वे याचा मृत्यु ( अण्णासाहे-बांचे पणजे ). |
| १७७८ | – दुर्गादेवीच्या समोरील दीपमाळ, कर्वे व – इतर चौघे मिळून बांधतात |
| १८१४ | – बापूभट कर्वे याची पंढरपुरची यात्रा. |
| १८२० | – केसोपंत कर्वे यांचा जन्म. |

| | |
|---|---|
| १८२४ | – अण्णासाहेबाच्या मातुश्रीचा जन्म. |
| १८५८ ( एप्रिल १८ ) | – अण्णासाहेबाचा जन्म. |
| १८७३ | – अण्णाचा पहिला विवाह. |
| १८७५ | – इंग्रजी शिक्षणास सुरुवात |
| १८७६ | – साहाव्या इयत्तेची परीक्षा पास |
| १८७७ | – इंग्रजी शिक्षणाकरितां रत्नागिरीस प्रयाण, तापामुळें लवकरच परत. |
| १८८१ | – मॅट्रिकची परीक्षा रॉबर्टमनी हायस्कूलमधून; |
| १८८२ | – रघुनाथ धोंडो कर्वे याचा जन्म. |
| १८८४ | – बी. ए. ची परीक्षा दुसऱ्या वर्गांत; एल्फिन्स्टन कॉलेजातून. |
| १८८६ | – मुरूड फंडाची स्थापना. |
| १८९१ | – राधाबाई – प्रथम पत्नी-मृत्यु. |
| १८९१ जान्युअरी १ | – ग्रामस्थाच्या मदतीनें इंग्रजी शाळा सुरूं केली. १९०४ मध्यें बंद पडली. |
| १८९१ नोव्हें. १५ | – फर्ग्युसन कॉलेजात नेमणूक. |
| १८९३ मार्च ९ | – पुनर्विवाह. |
| १८९३ डिसें. ३१ | – विधवाविवाहोत्तेजक मंडळींची स्थापना. |
| १८९६ जून १४ | – अनाथ बालिकाश्रमाची स्थापना. |
| १९०७ मार्च ४ | – महिला विद्यालयाची सुरुवात. |
| १९०८ नोव्हें. ४ | – निष्काम कर्म मठाची स्थापना. |
| १९११ ऑक्टोबर. | – महिला विद्यालयाचें हिंगणें येथें स्थलांतर. |
| १९१५ | – कर्व्यांचें आत्मवृत्त प्रसिद्ध झालें. |
| १९१६ जून | – महिला विद्यापीठाची स्थापना. |
| १९२० | – विद्यापीठाला ठाकरसी याची १५ लाखांची देणगी व विद्यापीठाचें नामांतर "नाथीबाई दामोदर ठाकरसी भारतवर्षीय महिला विद्यापीठ" |

| | |
|---|---|
| १९२९–३० | – मदतीकरितां अण्णाचा युरोप अमेरिकेचा प्रवास. |
| १९३१–३२ | – मदतीकरितां अण्णांचा आफ्रिकेचा प्रवास. |
| १९३५ | – विद्यापीठावरील आर्थिक संकट टळलें. |
| १९३८ | – बाबू राजेंद्रप्रसाद (सध्या राष्ट्रपति) यांच्या अध्यक्षतेखालीं, ८० वर्षें पुरीं झालीं म्हणून, सत्कार – ग्रामस्थातर्फें मुरूड येथें श्री. ग. पु. दामले यांच्या अंगणात सत्कार |
| १९४७ | – मुरुड–फंडाच्या सुवर्णमहोत्सवाच्या वेळीं संस्थापक म्हणून अण्णाचा मुरुड येथें सत्कार व अल्प थैली समर्पण. सत्कार समारंभाचे अध्यक्ष वैद्यरत्नचूडामणि विनायकशास्त्री जोशी. |
| १९५५ | – भारत सरकारतर्फें पद्मविभूषण पदवी. |
| १९५७ | – मुंबई विद्यापीठाची सन्माननीय डॉक्टोरेट पदवी |
| १९५८ | – भारत सरकारची 'भारत रत्न' ही सर्वोच्च पदवी. |
| ,, मार्च | – मुंबई महापालिकेतर्फें मानपत्र. |
| ,, एप्रिल | – अण्णाच्या नावाचे पोस्टाचे स्टॅम्प्स. |
| ,, मे ८ | – मुरूड येथें सत्कार व अर्ध पुतळ्याची स्थापना. |

# परिचय

## मुरुड येथील कर्तबगार व्यक्ति

थोर इतिहाससंशोधक आणि निस्पृह विचारवंत वि. का. राजवाडे यांनीं १९१३ सालीं महाराष्ट्रातील बुद्धिमान्, प्रतिभावान् व कर्त्या लोकांची मोजदाद केली होती. कर्त्या व्यक्ति कोणत्या असा प्रश्न करून त्याचें उत्तर त्यांनीं पुढील शब्दांत दिलें आहे. " भौतिक किंवा आत्मिक सृष्टींत शास्त्रीय शोध करून ज्या व्यक्ती समाजाचें हित करतात, किंवा समाजातील कोट्यवधि व्यक्तींचें सुयंत्रण करून समाजाला पूर्ण पदाला नेण्याचा प्रयत्न करतात; किंवा आपल्या साधुचरितानें समाजांतील सामान्य लोकांना नीतीचें, वर्तणुकीचें व धर्माचें श्लाघ्य वळण घालून देतात; श्रेष्ठ धैर्यानें, दूरदृष्टीनें व करामतीनें समाजाचें अधिभौतिक, आधिदैविक व आध्यात्मिक शत्रूपासून संरक्षण करून त्याचें संगोपन, संवर्धन व प्रगति साधतात, त्या पुढारी, बुद्धिमान् व प्रतिभावान् व्यक्तींना कर्तृत्ववान् ही संज्ञा लावण्याचा सार्वत्रिक प्रघात आहे " राजवाडे यांच्या प्रज्ञासंपन्न विवेचक बुद्धीला थोरामोठ्यांच्या पदव्या, संपत्ति वा मान यांचा धाक नव्हता. निर्भीडपणें त्यांनीं आधींच्या शंभर वर्षांच्या अवधींतील दीडशें कर्त्या लोकांची निवड केली आहे. त्यात मुरुड येथील तीन व्यक्ती येतात. ( १ ) वि. ना. मंडलीक ( धर्मेतिहास – संशोधक ), ( २ ) शं. बा. दीक्षित ( ज्योतिष-इतिहासकार ) ( ३ ) धोंडोपंत कर्वे ( समाज सुधारक व संस्था स्थापक ). यानंतर " चिरस्थायी काम करणारे बुद्धिमान् " असे त्रेचाळीस लोक निवडले आहेत, त्यात ( १ ) धोंडोपंत कर्वे ( २ ) श. बा. दीक्षित अशीं मुरुडची नांवें राहिलीं. पुनः एकदा प्रतिभाशाली व्यक्तींची त्यातूनच निवड केली आहे. त्यांत त्यांच्या मतें फक्त सात लोक राहिले. त्यामध्यें चिपळूणकर, रानडे, टिळक, गोखले आदि महाराष्ट्राचीं दैवतें आहेत. मुरुडला अभिमानाची गोष्ट अशी कीं त्यांत शं. बा. दीक्षित यांचें नाव आहे.

१९१३ नंतर कोणी अशी मोजदाद केल्याचें आढळत नाहीं. आज तागायतचा असा प्रयत्न झाला तर आणखी कांहीं मुरुड ग्रामस्थांची निवड अपरिहार्यपणें करावी लागेल.

पुढें मुरुड येथील कर्त्या लोकाचा परिचय देण्यांत आला आहे. सर्वच कर्त्या लोकाचा परिचय आला नाहीं याची जाणीव लेखकाला आहे. प्रयत्न करूनहि कांहींचे परिचय मिळाले नाहींत वेळेच्या अभावामुळेंहि कांहीं व्यक्तींच्या चरित्राची जमवाजमव करायला जमलें नाहीं.

कर्त्या व्यक्तींची निवड करतां राजवाड्याची कसोटी सोडून दिली आहे. महाराष्ट्राच्या ऐसपैस बैठकीवर यातील पुष्कळच व्यक्ती ठेंगू दिसतील. पण या व्यक्तींना बैठक आहे मुरुडची मुरूडने ज्याना आदराजली वाहिली व वाहतात, ज्यांच्याबद्दल ग्रामस्थाना अभिमान वाटतो, आणि ज्याच्यापासून ते स्फूर्ति घेतात अशा विविध जमाती तसेंच विविध व्यवसाय व पेशे असलेले लोक माडीला मांडी लावून दाटीवाटीनें बसलेले येथें आढळतील. आजपासून मागें एक शतक ग्रामस्थानीं कर्तृत्वानें कसें गाजविलें याचें दर्शन या परिचयांतून घडावें असा हेतु आहे.

या कर्त्या व्यक्तींपैकीं बहुसख्य व्यक्ती समाजसेवक आहेत. शिक्षक, प्राध्यापक, वकील, डॉक्टर, व्यापारी यासारख्या कर्त्या व्यक्ती आपले उद्योग संभाळून समाजसेवा करताना आढळतील. कै. शं. बा. दीक्षित व श्री. क. रा. दीक्षित यासारखे ज्ञानाची उपासना करणारे हेंहि खऱ्याखुऱ्या अर्थानें समाजसेवकच होत केवळ समाजसेवेकरिता आयुष्य वाहणारे अगदींच नाहींत असें नाहीं. पण अशा व्यक्ती मुरूड येथें विरळच आहेत.

गतकालांत कृतार्थतेचें समाधान मिळते, वर्तमानकालात भव्य कामगिरीचें अल्प तरी आश्वासन दिसत आहे, पण भविष्याच्या उदरांत सध्यां तरी अंधार दिसतो आहे. भूतकालात शाहीर प्रभाकर, मंडलीक, दीक्षित, कर्वे पितापुत्र या सारखीं लाखमोलाचीं माणसें मुरूडनें निर्माण केलीं. आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या उंचऱ्यावर असलेले डॉ. दीक्षित किंवा तितक्याच हुरूपाने व विश्वासानें वैद्यकीय शास्त्राच्या मर्यादा विस्तारण्याच्या प्रयत्नात असलेले डॉ. गोखले सोडले तर मुरूड येथें आणखी काय दिसतें ? पर्वतप्राय माणसें निर्माण करण्याची मुरूडची ताकद संपली काय ? हें कठोर आत्मपरीक्षण आहे. महाराष्ट्राच्या विस्तृत पार्श्वभूमीवर केलेलें हें विधान आहे. येथें आलेल्या कोणत्याहि व्यक्तीचा अधिक्षेप करायचा लेखकाचा हेतु नाहीं. पण चंदनाप्रमाणें झिजून जीर्ण झालेले श्री. अण्णासाहेब कर्वे पहावे, किंवा एखाद्या तपोधनाप्रमाणें निरपेक्षपणें ज्ञानाची उपासना करीत राहिलेले शं बा. दीक्षित पहावे आणि मग आपण आज कोठें आहोत याची जाणीव करून घ्यावी !

# मुरूडचे थोर पुत्र

## 'भारतरत्न' महर्षि धोंडो केशव कर्वे

आपत्तींचे डोंगर कोसळूनहि ज्याची निष्ठा अचल राहिली, पदोपदीं झालेल्या मानखडनेनेंहि ज्यांच्या वृत्तीला कडवटपणा स्पर्श करूं शकला नाहीं, असे आमचे अण्णा. दधिचीमुनींचें स्मरण करून देणारें हें अर्पित जीवन दोन डोळ्यात मावत नाहीं. या अर्वाचीन मुनीला विनम्र प्रणाम.

# शाहीर प्रभाकर ( १७६९-१८४३ )

शाहीर प्रभाकराचें मराठी साहित्यातील स्थान अढळ आहे. प्रभाकराचे वडील जनार्दनपंत दातार हे बहुधा मुरूडहून गंगापूर ( नाशिकजवळ ) येथें राहावयास गेले. प्रभाकर याचें प्रथम कुटुंब अल्पवयांत वारलें. द्वितीय विवाहानंतर लवकरच वयाच्या वीस एकविसाव्या वर्षी प्रभाकर पुण्याला राहायला गेला. तेथें तो खंडेराव रास्ते याचेकडे कारकुनी करीत असे

प्रभाकराला कविता करण्याचा नाद पंधरा सोळा वर्षांपासून लागला. शाहीर म्हणून जम बसल्यावर त्यानें नोकरी सोडली. त्याचें नाव लोकांच्या तोंडात झालें. सरदार गंगाधरशास्त्री पटवर्धन याच्या घराण्याशीं त्याची सोयरीक घडली पण पुढें पेशवाई बुडाली कलावंताचा आश्रय गेला लौकिकाच्या काळातहि प्रभाकराची गरीबी दूर झाली नव्हती. पण पुढें तर मुंबई, ठाणें यासारख्या शहरात सटरफटर माणसावर कवनें करून त्याला द्रव्ययाचना करावी लागली. सवाई माधवरावाचा भरलेला ऐश्वर्यसंपन्न दरबार पाहून ज्यानें त्यावर कवन करून पोट भरलें, त्याला उत्तर वयात ठाणें येथील कचेरीचें वर्णन करणें भाग पडावें, ज्यानें पेशव्याचीं आणि त्यांच्या शिंदे, होळकर, गायकवाड, पटवर्धन इत्यादि सरदाराचीं वर्णनें आपल्या रसवंतीनें गाइलीं, त्याला मुंबईकडल्या अनेक लुंग्यासुंग्याचीं वर्णनें करीत सुटण्याची पाळी यावी आणि वाग्देवीच्या गळयाला दोरी बांधून दरवेशाच्या अस्वलीप्रमाणें तिला दारोदार नाचविणें भाग पडावें हें पाहून मनाला मोठा खेद वाटतो ( महाराष्ट्र सारस्वत भाग २ ).

प्रभाकराचें काव्य मुख्यत्वेंकरून शृंगाररसपर आहे पण वीर व करुण रस हेहि त्याचे आवडते रस आहेत. सवाई माधवरावाच्या मृत्यूवरील पोवाड्याच्या पहिल्याच ओळी याची साक्ष देतील: " कमि नव्हते पृथ्वींत अवातर प्राणी न्यायाला । औक्ष कसें कमि झालें सवाईमाधवरावाला " या ओळी किंवा बाजीरावावरील पोवाड्यांतील " विपरीत आला काळ मेरुला गिळिलें मुंग्यानीं " या ओळी पहा. प्रभाकराचीं कवनें फारच रसाळ आहेत.

# विश्वनाथ नारायण मंडलिक

अण्णासाहेब मंडलिक (जन्म ८-३-१८३३ – मृत्यु ९ मे १८८९) यानीं आपल्या छप्पन्न वर्षांच्या आयुष्यात राजकारण, शिक्षण, स्थानिक स्वराज्य, वाङ्मय, धर्मेतिहास या बाबतींत एवढें विपुल कार्य केलें कीं त्याच्या या कार्यनैपुण्यानें त्याचे मित्रहि चकित होऊन गेले. मुरुड ग्रामस्थाना ते अत्यंत बक्षशीर – ज्याच्या जाण्यायेण्यावरून लोक घड्याळें लावीत – व स्पेशल बोट सोडणारे एवढ्यापुरतीच स्मृति राहिली आहे पण त्याच्या विविध कार्यक्षेत्रांचा एवढा मोठा व्याप होता कीं त्याच्या मृत्यूनें एक राष्ट्रीय हानि झाली असें दुःख सर्वत्र व्यक्त करण्यांत आलें.

मुरुड येथें मराठी शाळेंत शिक्षण झाल्यावर अण्णासाहेबानीं १० व्या वर्षीं रत्नागिरीस प्रयाण केलें. तेथचें इंग्रजी शिक्षण घेऊन संपल्यावर ते १८४७ मध्यें मुंबईच्या एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूटमध्यें दाखल झाले कॉलेजांतल्या परीक्षेच्या नऊ विषयापैकीं आठ – विषयांत ते पहिले आहे. कॉलेजच्या शेवटच्या वर्षांत असताना प्रोफेसर पॅटन, गणिताचे प्रोफेसर, हे रजेवर गेले तेव्हा यानींच त्याचें काम केलें. वयाच्या एकोणिसाव्या वर्षीं त्यांचें शिक्षण संपलें तेव्हा प्रो. पॅटन यानीं त्याना आय्. सी. एस्. च्या परीक्षेकरिता इंग्लंडला जाण्याबद्दल सुचविलें होतें. पण घरची संमति मिळाली नाहीं.

यानंतर त्यांनीं सिंध, गुजरात व महाराष्ट्र यांत अधिकाधिक वरच्या हुद्यावर नोकऱ्या केल्या. १८६२ मध्यें वकिलीच्या परीक्षेच्या वेळीं सरकारी अधिकाऱ्यानीं रजा दिली नाहीं म्हणून सरकारी नोकरी सोडली. यानंतर त्यानीं जन्मभर वकिली केली. इ. स. १८८४ मध्यें ते सरकारी वकील झाले.

सुरुवातीपासून स्त्रीशिक्षण, समाजसुधारणा, राजकीय सुधारणा, जुन्या वाङ्मयाचें संशोधन व प्रकाशन, स्थानिक स्वराज्याची चळवळ अशा विविध व्यापाकडे लक्ष द्यायला सुरुवात. रॉयल एशियाटिक सोसायटीपुढे त्यांनीं अनेक विद्वत्तापूर्ण ग्रंथ वाचले होते. तुकारामाची गाथा त्यानीं प्रसिद्ध केली. प्रसिद्ध झालेली गाथ्याची हीच पहिली आवृत्ति असावी आपल्या मतांचा प्रचार करण्याकरिता 'Native opinion' नावाचें वर्तमानपत्र चालविलें. सिंधी भाषेचें पहिलें व्याकरण बहुधा रावसाहेबांचेंच असावें, काहीं इंग्रजी पुस्तकाचीं त्यानीं सिंधी, गुजराती व मराठी अशा भाषात भाषांतरें प्रसिद्ध केलीं. त्याचें मुंबईच्या समाजातील निर्विवाद पहिलें

स्थान पाहून प्रथम मुंबई सरकारनें व नंतर हिंदुस्थान सरकारनें त्याना आपल्या कौन्सिलवर नेमून घेतले. पण त्याचें सर्वांत महत्त्वाचें कार्य हिंदुधर्मशास्त्रावरचें होय मनुस्मृतीची संशोधित आवृत्ति अनेक टीपा देऊन त्यानीं प्रसिद्ध केली. " त्याचा 'मनुस्मृती'चा ग्रंथ त्याचें नांव सदोदित राखील. हा प्रचड ग्रंथ प्रचंड बुद्धीच्या पुरुषास शोभेसा आहे " ( अमृतबझार पत्रिका १८८९ ).

## वामन आबाजी मोडक

वामन आबाजी मोडक ( १८३५–१८९७ ) न्यायमूर्ती रानडे याचे वामन आबाजी हे परममित्र होते; यात त्याच्या जीवनाचें सारें सार आलें असें म्हणावयास हरकत नाहीं. साधुता, विद्वत्ता, धर्मसुधारणा व सामाजिक सुधारणा या बाबतींत नेमस्तपणा पण निर्धार या बाबतींत या दोघांमध्यें चागलेंच साम्य होतें. वामन आबाजी हे मूळचे मुरूडचे नव्हेत. त्याचा जन्म गव्हे येथें झाला. घरची अतिशय गरीबी पण शिक्षणाची दुर्दम्य आवड. त्यामुळें कधीं मधुकरी मागून तर शिकवण्या करीत करीत त्यांनीं १८६२ सालीं बी. ए ची परीक्षा दिली. मुंबई विद्यापीठाची ही पहिलीच पदवी परीक्षा होय. न्या. मू रानडे हे वामन आबाजींचे त्यावेळचे सहाध्यायी होत.

पहिले काहीं दिवस सरकारी हायस्कूलमध्यें फर्स्ट असिस्टंटचें काम केल्यावर १८६७ पासून सरकारी हायस्कूलचे हेडमास्तर म्हणून अखेरपर्यंत त्यानीं काम केलें. एल्फिन्स्टन हायस्कूलचे पहिले हिंदी प्रिन्सिपॉल म्हणूनहि त्यानीं काम केलें होतें सरकारी नोकरी लागल्यावर त्यानीं मुरुड येथें आगर विकत घेऊन त्यात घर बाधून तेथें ते राहात असत. त्यांच्या एका मुलाची मुंज मुरुड येथें झाली. एक कर्तबगार व शिस्तप्रिय हेडमास्तर म्हणून त्यानी ख्याती मिळविली. अतिशय धार्मिक आणि भाविक प्रकृतीचे असूनहि धर्मात सुधारणा व्हावी अशा मताचे ते होते. त्यामुळें ते प्रार्थना समाजाकडे ओढले गेले. " आमच्या समाजसंस्थेच्या इमारतीच्या खांबापैकीं रा. रा. वामनरावजी हे एक प्रमुख खांब होते " असे उद्गार डॉ. भांडारकर यानीं त्यांच्यासंबंधीं काढले आहेत. पुनर्विवाहाला अनुकूल मतें व्यक्त केल्यामुळें त्याच्यावर बहिष्कार पडला होता. वाङ्मयविषयक अनेक उद्योग त्यानीं सुरू केले होते. प्रार्थनेच्या वेळीं गाण्याचा उपयोग होतो म्हणून प्रौढपणीं त्यानीं संगीताचा अभ्यास केला होता. प्रार्थनेला उपयुक्त अशीं अनेक पदें व कविता याची त्यांनीं रचना केली. त्यांनीं 'उत्तर

नैषध' नावाचें नाटक लिहिलें आहे त्यांचें " धर्मपर आणि नीतिपर व्याख्यानें " हें पुस्तक १९०८ सालीं रा. भि. जोशी यानीं लिहिलेल्या अल्प चरित्रासह प्रसिद्ध झालें.

## शंकर बाळकृष्ण दीक्षित

याचा जन्म मुरुड येथें २१ जुलै १८५३ मध्यें झाला. त्यांचा प्राथमिक अभ्यास मुरुड येथेंच मराठी शाळेंत झाला. मराठी अभ्यासाबरोबरच घरच्या भिक्षुकी पेशास योग्य असें वैदिक पठन व तदनुषंगानें आणखी थोडेसे ( अमर-कोश, कौमुदी वगैरे ) संस्कृत शिक्षणहि त्यास घरींच मिळालें. घरची स्थिति गरी-बीची, त्यामुळें त्यास प्राथमिक शिक्षण पुरें झाल्याबरोबर दापोलीच्या कोर्टांत उमेद-वारी पत्करावी लागली. हें काम त्यानीं दोन वर्षें केलें पण त्याच्या महत्त्वाकांक्षेस हें क्षेत्र पुरेसें नव्हतें. १८७० मध्यें त्यांनीं पुणें मराठी ट्रेनिंग कॉलेजात प्रवेश मिळविला. ट्रेनिंग कॉलेजात अभ्यास करीत असतानाच ते खाजगी रीतीनें इंग्रजी शिकत असत. १८७३ सालीं त्यास ट्रेनिंगचें तिसऱ्या वर्षाचें सर्टिफिकेट प्रथम श्रेणींत मिळाल. तसेंच ते १८७४ मध्यें मॅट्रिक पण पास झाले. सन १८७४ पासून १८८० पर्यंत ते रेवदंडा मराठी शाळेवर आणि १८८० ते १८८२ पर्यंत ठाणे येथील मराठी शाळेवर हेडमास्तर होते येथून त्यांची बदली बार्शी येथील इंग्रजी शाळेंत झाली. तेथें ते सन १८८९ अखेर होते. त्यानंतर त्यांची बदली धुळ्याच्या ट्रेनिंग स्कूल-मध्यें झाली. तेथें ते १८९४ चे जूनपर्यंत होते. नंतर त्याची नेमणूक पुण्याच्या ट्रेनिंग कॉलेजात झाली येथेंच नोकरी करीत असताना वयाच्या ४५ व्या वर्षी विषमज्वराचे आजारात त्याचा २७ एप्रिल १८९८ रोजीं अंत झाला.

त्यांचा प्राथमिक शिक्षकाचा पेशा; साहजिकच घरची गरीबीची स्थिति. त्यास न जुमानता, प्रकृतीची काळजी पण न करता, त्यानीं आपला विद्यार्जनाचा पेशा चालू ठेवला. स्वतःच अभ्यास करून त्यानीं आपलें संस्कृत, गणित, इंग्रजी, फ्रेंच व ज्योतिष याचें ज्ञान मिळविलें व वाढविलें गणित व ज्योतिष ह्या विषयावर त्यानीं नऊ पुस्तकें प्रसिद्ध केलीं. यापैकीं ( १ ) भारतीय ज्योतिषशास्त्र, ( २ ) ज्योति-र्विलास ( ३ ) हिंदु पंचाग हीं तीन फार प्रसिद्ध आहेत

भारतीय ज्योतिषशास्त्र या पुस्तकात भारतीयाच्या ज्योतिषविषयक ज्ञानाचा आढावा घेतला असून त्यानीं या शास्त्रात लावलेल्या शोधाची माहिती दिली आहे.

हिंदु पचांगात आपल्या पंचागासंबंधीं व कालगणनेसंबंधी माहिती दिली आहे. या ग्रंथाचा मुख्य हेतु हिंदुस्थानात सांपडणाऱ्या शीलालेखात व ऐतिहासिक पत्रात दिलेल्या दिवशीं इग्रजी तारीख कोणती होती हें नक्की ठरविण्याचा आहे. ज्योतिर्विलास हें मराठी भाषेंतील ज्योतिषविषयक माहिती कादंबरीसारख्या सोप्या व चटकदार भाषेंत देणारें मराठींतील एकमेव पुस्तक आहे.

भारतीय ज्योतिषशास्त्र या मराठी ग्रंथाची उपयुक्तता एवढी मोठी आहे कीं त्याचें इंग्रजी भाषातर करण्याची जरूर भासत आहे व तें करण्याचें काम भारतीय वैज्ञानिक संशोधन खात्यानें हातीं घेतलें आहे. ज्योतिर्विलास या ग्रंथाची पण हिंदी व गुजराती भाषातरें झालीं आहेत.

शंकररावाच्या मनात नेहमीं आपण कांहीं तरी करून आपल्या आयुष्याचें सार्थक केलें पाहिजे असे विचार येत असत. त्यांनीं आपल्या ४५ वर्षांच्या प्राथमिक शिक्षकाच्या आयुष्यात केलेली कामगिरी लक्षात घेतली तर त्यानी खरोखरच आपल्या आयुष्याचें सार्थक केलें असें म्हणावें लागेल.

## रामचंद्र भिकाजी जोशी ( १८५७-१९२७ )



या पुस्तकाच्या बहुतेक वाचकाचा “ शुद्ध कसें बोलावें व शुद्ध कसें लिहावें हें व्याकरण शिकल्यानें समजतें ” या वाक्याशीं चांगला परिचय असेल. मुरुड येथें रामभाऊंच्या व्याकरणाचा अभ्यास चालू असला तरी त्याच्या घरावर मात्र त्यावेळीं बहिष्कार पडला होता. मुरुड गावांतील पहिला पुनर्विवाह कै. रामभाऊ जोशी याच्या बहिणीचा. आपल्या आईवडिलाची परवानगी मिळणार नाहीं असें समजून स्वतःच्या जबाबदारीवर मोठ्या धैर्यानें तो पुनर्विवाह त्यानीं पार पाडला. पुढें भिकंभटजींचें एवढें परिवर्तन झालें कीं, रावबहादुर वामनराव कोल्हटकर याच्या मुलीच्या पुनर्विवाहाचे वेळीं तर त्यानीं स्वत च त्या विवाहविधीचें पौरोहित्य केलें. असो.

भिकंभटजींनीं आपल्या या गोरेपान व तरतरीत अशा रामभाऊंना भिक्षुकी पेशाचें शिक्षण न देता मराठी शाळेंत घातलें. शाळेंत बुद्धिमान विद्यार्थी म्हणून नाव कमावल्यामुळें त्याना वडिलानीं मुरूडलाच इंग्रजी शाळेंत घातलें. मुरूडला दोन इयत्ता झाल्यावर पुढें काय हा प्रश्न आला. सुदैवानें रामभाऊचे मावसे वामन आबाजी मोडक हे सरकारी हायस्कूलमध्यें हेडमास्तर होते. त्याच्याबरोबर राहून रत्नागिरी व कराची येथे रामभाऊंचें मॅट्रिकपर्यंतचें शिक्षण झालें. द्रव्याभावीं पुढचें शिक्षण बंद झालें. चिपळूणकराच्या राष्ट्रवादानें त्या वेळीं महाराष्ट्र गाजत होता. त्यामुळें रामभाऊनीं सरकारी नोकरी करायची नाहीं असें ठरविलें पहिले काहीं दिवस मुरूड येथें इग्रजी शिक्षकाचें काम केल्यावर नुकत्याच स्थापन झालेल्या चिपळूणकराच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्यें त्यानीं कायमची नोकरी पत्करली. वामन रावजींच्या सहवासात त्याचे बरेच दिवस गेले होते. वामनरावजी सुधारक, शीलवान् व आदर्श शिक्षक होते. त्याच्या मताचा व वागणुकीचा परिणाम रामभाऊवर झाला ते आदर्श शिक्षक, पट्टीचे सुधारक व शिस्तीचे भोक्ते बनले.

इ. स. १८८१ मध्यें चिपळूणकरांनीं 'निबंधमाला' बंद करण्याचें ठरविलें. तेव्हां रामभाऊंनीं मित्रमंडळींच्या साहाय्यानें 'निबंध चंद्रिका' नावाचें मासिक काढलें होतें. हरिभाऊ आपटयासारख्या नामवंत लेखकाचें त्यांना साहाय्य होतें. हें मासिक लवकरच बंद पडलें पण रामभाऊंनीं ज्ञानप्रकाश, बकुल, शालापत्रक आदि नियतकालिकांतून लेखन चालू ठेवलें होतें.

पण त्याना खरी प्रसिद्धि त्यांच्या 'बालबोध व्याकरण' या पुस्तकामुळें मिळाली. त्याचीं इतरहि शालोपयोगी पुस्तकें मान्यता पावल्यामुळें त्यांना या पुस्तकावर बराच पैसा मिळाला. मराठी भाषेचा व्यासंग त्यांनीं बराच ठेवला होता; त्याचें फल म्हणजे त्याचे मराठी भाषेची घटना, प्रौढबोध व्याकरण आणि शब्दसिद्धि हे ग्रंथ होत.

विद्यार्थीदशेंत वामनरावजी व तरुणपणीं आगरकर, भानू, अण्णासाहेब कर्वे यासारख्या तडफदार समाजसुधारकाचा सहवास ! त्यामुळें रामभाऊ हे समाजसुधारणेचे कट्टे पुरस्कर्ते बनले यात नवल कोणतें ? स्त्रीशिक्षण, पुनर्विवाह, अस्पृश्यता-निवारण यांसारख्या सुधारणाचा त्यांनीं कृतीनें व लेखनानें पुरस्कार केला. बालविधवा बहिणीला पं. रमाबाईंच्या शाळेंत घातलें. पुढें तिचा पुनर्विवाह करून देऊन तिला सुखी जीवनाचा मार्ग उपलब्ध करून दिला,

वयाच्या ४५ व्या वर्षी ते विधुर झाले. पण सारासार विचार करून त्यांनी पुढील आयुष्य विधुरावस्थेंत काढलें. आपल्या आयुष्याचें सार्थक केलें या समाधानात त्याना आपल्या वयाच्या ७१ व्या वर्षी मृत्यु आला.

## र. धों. कर्वे

बुद्धिवादाचा एवढा प्रखर पुरस्कर्ता आगरकरानंतर दुसरा कोणी झाला नाहीं. महाराष्ट्राच्या थोर पुरुषात ज्यांचा अंतर्भाव करावाच लागेल अशांपैकीं रघुनाथराव एक होत. आपल्या थोर पित्याप्रमाणेंच तेहि बुद्धीला पटेल तेंच आचरीत राहिले, प्रसारीत राहिले. आपले विचार समाजाच्या पचनीं पडलेले पाहाण्याचे भाग्य तरीं ती स्व. अण्णाना लाभलें आहे त्याचा हा थोर पुत्र तेवढाहि भाग्यवान नव्हता अखेरपर्यंत रघुनाथरावांना समाजाची उपेक्षा, उपहास आणि तज्जन्य आर्थिक आपत्तीच सहन करावी लागली.

सन १८९९ मध्यें रघुनाथराव पहिल्या क्रमाकानें मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यानंतर मुंबई विद्यापीठाची एम्. ए. पॅरीस विद्यापीठाची पदवी मिळवितांनाहि त्याचा पहिला क्रमांक गेला नाहीं. आपल्या जीवनाचें ध्येय निश्चित करण्यापूर्वीं रघुनाथराव अध्यापनाच्या व्यवसायात होते. सोलापूर हायस्कूल ( १९०३ ), एल्फिन्स्टन मिडल् स्कूल ( १९०७-०८ ), एल्फिन्स्टन कॉलेज ( १९०८ ते १९१७ ), कर्नाटक कॉलेज–धारवाड ( १९१७-१९ ), गुजराथ कॉलेज ( १९२१ ), डेक्कन कॉलेज ( १९२१ ). अशा विविध ठिकाणीं अध्यापनाचें कार्य केल्यानंतर अखेरीस अन्याय होताच सरकारी नोकरीला त्यांनीं हात जोडले. यानंतर विल्सन कॉलेजात ते प्राध्यापक होते ( १९२२-२५ ). नोकरी कीं आपल्या विचाराशीं इमान राखणे ही अवघड समस्या याच काळात त्याच्यापुढें उभी राहिली आणि त्यानीं नोकरी सोडली.

रघुनाथरावाचे येथून पुढील आयुष्य हा प्रतिकूल परिस्थितीशीं अविरत चाललेला झगडा. सन १९२३ मध्यें त्यानीं संतति-नियमनावर पुस्तक लिहिलें. १९२७ मध्यें सुप्रसिद्ध “ समाज–स्वास्थ्य ” हें मासिक सुरू केलें. वेश्या व्यवसाय, कामशास्त्र, संततिनियमन – दांभिक समाजाला या सर्व विषयांचें ज्ञान हवें होतें; पण चोरून. समाजाची अत्यंत महत्त्वाची गरज रघुनाथराव पुरवूं लागले, १९५३ मध्यें ते स्वर्गवासी होईपर्यंत पदरमोड करून ते

' समाज स्वास्थ्य ' चालवीत होते. आपल्या पत्नीच्या सहकार्यानें संतति-नियमन केंद्रहि चालवीत होते.

संतति-नियमन ही आज राष्ट्रीय गरज होत आहे. यासबंधाचा समाजाचा दृष्टिकोणहि झपाट्यानें बदलतो आहे; पण या विषयीच्या ज्ञानाचा प्रसार प्राणपणानें करणारे उभ्या भारतात रघुनाथरावच पहिले. त्याना हार्दिक प्रणाम.

# वेदविद्या

## वे. मू. गणेश नारायण जोशी

गणुकाका जोशी : ( मृत्यु १९२७ ) एक उत्तम दशग्रंथी ब्राह्मण म्हणून अजून ज्याचा लौकिक आहे असे गणुकाका, याचा जन्म इ. स. १८५० च्या सुमारास झाला विद्वान् व कर्मठ म्हणून त्याचा गावात मोठा दरारा होता मुरुड येथें कित्येक वर्षें त्यानीं वेदशाळा चालविली होती. भगवद्गीता तोंडपाठ होती तिची किंवा वेदाची आवृत्ति करीत बसणें हा फुरसतीच्या वेळचा कार्यक्रम ते उत्तम बुद्धिबळपटु होते. इ. स. १९१६ मध्यें शंकराचार्य मुरुड येथें आले होते तेव्हा गणुकाकांचें वेदपठण ऐकल्यावर संतुष्ट होऊन त्यांनीं " वैदिक रत्न " ही पदवी गणुकाकाना बहाल केली.

## वे. मू. विष्णु महेश्वर जोशी

शांत, दयाळु, पापभीरु, निस्पृह, सत्वशील अशा विष्णुकाकांना ( जन्म १८५७ मृ. १९२४ ) ग्रामस्थ अजून विसरले नाहींत. यांचे वडील ज्योतिष व वैद्यकीचा व्यवसाय करीत. विष्णुकाकाचे थोरले बंधु रापूकाका ( कै. विनायकशास्त्री यांचे वडील ) हे वैद्यक व ज्योतिष शास्त्रात पारंगत होते. विष्णुकाकांचें वेदपठण मुरुड येथेंच झालें. ' क्रम ' वगैरे राहिलेला भाग त्यांनीं आंजर्लें येथें निजसुरे पाठशाळेंत पुरा केला. ' दशग्रंथ ' अध्ययन पुरें झाल्यावर ते मुरुड येथेंच भिक्षुकी करून मिळेल त्यांत संतोष मानून राहिले. त्यांच्या संसाराची धुरा त्याचे बंधु व पुतणे

यांनीं उचलली होती. चाळिसावे वर्षी ते विधुर झाले. तेव्हापासून पुढचें आयुष्य त्यांनीं वेदपठन व श्रौतस्मार्तकर्मनिष्ठ राहून ईश्वरसेवेंत घालविलें त्यांच्या वेद-विद्येच्या अध्ययनानें संतुष्ट होऊन शंकराचार्यांनीं त्यांना " वैदिकाचार शिरोमणि " ही पदवी दिली.

## वेदमूर्ति गजानन शिवराम भावे



वे. मू. बाळंभटजी भावे ( त्यांचें प्रचारातील नांव ) यांचा जन्म इ. स. १८९५ मध्यें संघलट ( ता. खेड ) येथें झाला. मराठी पाच इयत्ता व इंग्रजी दोन इयत्ता एवढं शिक्षण मुंबईला झाल्यावर त्यांनीं १२ व्या वर्षीं वेदाध्ययनाकरिता वाई येथें प्रयाण केलें. तेथें महादेवभटजी गाडगीळ यांच्या वेदशाळेंत त्यांनीं संहिता, ब्राह्मण, आरण्यक, शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छंद, व ज्योतिष इत्यादि शास्त्रामध्यें पारंगत झाले. एवढें शिक्षण झालेले वैदिक सध्या मुरुड येथें राहोच मुंबईसहि थोडेच मिळतील इ. स. १९३५ सालीं इंदूर संस्थानच्या सांग ऋग्वेदाच्या परीक्षेंत ते पहिल्या क्रमांकानें उत्तीर्ण झाले. नागाव येथील संहिता स्वाहाकार यज्ञात तसेंच करपात्रिजी महाराजांनीं केलेल्या लक्षचंडी यज्ञात ते ब्रह्मदेव होते.

# वैद्यकशास्त्र

## वैद्यरत्नचूडामणि वि. र. जोशी

विनायकशास्त्री ऊर्फ दादा (जन्म १८७३–मृत्यु १९४७) हे अलीकडच्या काळांतील मुरूडचे नामांकित वैद्य होत. त्याचे वडील रघुनाथशास्त्री हेहि एक प्रख्यात वैद्य व नामांकित ज्योतिषी होते. ज्योतिषाचें महत्त्व रघुनाथशास्त्री यांच्याच वेळीं कमी होऊं लागल्यामुळें दादांनीं प्रामुख्यानें वैद्यकीकडेच लक्ष दिलें. दादांचें वैद्यक व ज्योतिष या शास्त्राचें अध्ययन वडिलाजवळच झालें. संस्कृतभाषेचा विशेष अभ्यास त्यांनीं आंजर्लें येथें जगन्नाथशास्त्री वर्तक यांचेपाशीं केला.

भारतीय वैद्यकाला पाश्चात्य वैद्यकाची जोड ही आधुनिक काळाची गरज पाहून इ. स. १८९८ मध्यें त्यांनीं खाजगी रीतीनें मुंबईच्या मेडिकल कॉलेजांत जरूरीपुरतें ज्ञान संपादन केलें.

दादाचा व्यवसाय मुंबईसच व्हायचा, त्यांचा तेथें जमहि बसत होता पण पुढें मुंबईला प्लेग सुरू झाला व इकडे मुरूडला त्यांचे वडिलांनीं कायमचें अंथरूण धरलें, त्यामुळें दादांनीं मुंबईला रामराम ठोकला.

अचूक रोगनिदान व हाताला यश यामुळें दादाचा लौकिक दूरवर पसरला त्यांना बोलावणीं आल्यामुळे चिपळूण, महाड, जंजिरा मुरूड वगैरे ठिकाणीं जावें लागे.

इ. स. १९१७ मध्यें शंकराचार्य मुरूडला आले तेव्हा त्यांचा फार दिवसाचा यकृताचा आजार दादांनीं बरा केला; तेव्हा त्यांनीं दादांना ‘ वैद्यरत्नचूडामणि ’ ही पदवी दिली.

दादांचा व्यवसाय चांगला चालत असला तरी त्याना परमार्थाची आवड फार होती. आयुष्याचीं शेवटचीं दहा वर्षें त्यांनीं आपलें मन व्यवसायातून जवळजवळ काढलें होतें. हा काळ त्यांनीं ईश्वरचिंतनात घालविला.

मुरूडच्या प्रत्येक सार्वजनिक कार्यांत ते भाग घेत. नारायण फंडाचे अध्यक्ष, मुरुड फंडाचे ट्रस्टी म्हणून त्यांनीं कामें केलींच. १९४७ सालचा अण्णासाहेब कर्वे यांचा गौरव त्याच्याच अध्यक्षतेखालीं झाला.

## डॉ. पु. वा. मंडलिक



डॉ. मंडलिक हे आपल्या व्यवसायात एक चागले डॉक्टर म्हणून मुंबईत प्रसिद्ध आहेतच. पण त्यांची अधिक ख्याति ते एक निष्ठावत समाजसेवक म्हणून आहे त्यांनीं अनेक वर्षे कॉंग्रेसमध्ये काम केलें इ स. १९४२ मध्यें ते समाजवादी मित्राबरोबरच कॉंग्रेसमधून बाहेर पडले. सध्या ते प्रजासमाजवादी पक्षाचे सभासद असून सयुक्त महाराष्ट्र समितीतर्फे मडणगड दापोली मतदारसंघातून मुंबईच्या विधानसभेवर निवडून आले आहेत डॉक्टराचा उत्साह व काम उरकण्याची पद्धति पाहिली आणि त्यांच्याशीं प्रत्यक्ष बोलण्याची सधि मिळाली म्हणजे त्याची साठी उलटली आहे यावर विश्वास ठेवणें कठीण वाटू लागतें डॉक्टरांचें आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे शहरीं सस्काराखालीं त्यानीं आपलें खेडवळ मन शाबूत ठेवलें आहे. त्यामुळे आपल्या मतदारसघात ते फार लोकप्रिय आहेत.

## डॉ. अनंत महादेव गोखले



जन्म ३१-१०-१३. वैद्यकीय व्यवसायांत लौकिक मिळविलेले अनेक प्रख्यात डॉक्टर आपल्या नजरेसमोर येतात. पण विद्यालयात मिळविलेल्या अपुऱ्या व तुटपुंज्या ज्ञानावर बहुतेक डॉक्टर संतुष्ट असतात. डॉ. गोखले या सर्वसाधारण परंपरेला अपवाद आहेत. मुरुड येथें मराठी शिक्षणाला सुरुवात केल्यापासून त्याचा विद्याव्यासंग अखंड चालू आहे. १९३५ सालीं ते L. C. P. S ची परीक्षा मोठ्या सन्मा-

नानें पास झाले. वरच्या क्रमाकानें पास झाल्यामुळें सरकारी नोकरी मिळाली होती. पण नोकरपेशा त्याच्या स्वभावाला जुळणारा नव्हता. म्हणून ती नोकरी सोडून १९३८ मध्यें ते D. O. M. S. झाले व लगेच प्रॅक्टिसला सुरुवात केली. परेल आय्. हॉस्पिटल्, नायर हॉस्पिटल या ठिकाणीं सन्माननीय Eye Surgeon म्हणून काम करीत आहेत. सध्या ते नायर हॉस्पिटलचे प्रमुख नेत्र-वैद्य आहेत पाश्चात्य राष्ट्रांतील अद्ययावत् शोधांचा परिचय करून घेण्याची दुर्दम्य इच्छा पण L. C. P S नां तेथें मान नाहीं म्हणून १९४१ मध्यें F. Y. Sc. करितां कॉलेजांत नाव घातलें. ४७ सालीं M. B. B. S. ची परीक्षा पास झाली. पुढें लगेच दोन वर्षांनीं मुंबई विद्यापीठाची D. O. ची डिग्री मिळविली. एवढ्या खटाटोपानंतर इंग्लंडमधल्या विद्यापीठात त्यांना प्रवेश मिळाला. १९५० च्या फेब्रुअरींत लंडन विद्यापीठाची D O. ची परीक्षा दिल्यानतर व्हिएन्ना, झूरिच, जिनेव्हा, युट्रेक या ठिकाणच्या हॉस्पिटल्सना भेट दिली. ५३ पासून ते M. B B. S चे परीक्षक म्हणून काम करितात निरनिराळ्या नेत्रदानयज्ञात काम केलें. त्यांत बुंदी येथील कॅम्प त्यांच्याच देखरेखीखालीं चालला होता

१९४२ पासूनच त्यांनीं अपक्व मोतिबिंदू शस्त्रक्रियेने काढण्याचें तंत्र अमलात आणलें. मुंबईला त्याच्या पूर्वी कोणत्याहि डॉक्टरानीं हें धाडस केलें नव्हतें. बुब्बुळ बदलण्याचे त्याचे प्रयोग १९४७ पासून चालू आहेत. त्यानीं प्रथम K. E M मध्यें हे प्रयोग सशावर यशस्वी रीतीनें केले व नतर बऱ्याच माणसांवर यशस्वी शस्त्रक्रिया केल्या आहेत.

दादर मराठी ग्रंथसंग्रहालय, सहकार कॉलनी याच्या संस्थापकांपैकीं ते एक आहेत. नेत्रवैद्य सभा, मुंबई ह्या संस्थेचे ते कार्यवाह आहेत. आणखी एक उल्लेख-नीय गोष्ट म्हणजे महर्षि कर्वे याच्या मोतिबिंदूचें १९५३ सालीं केलेले ऑपरेशन. म. अण्णाचें त्यावेळीं ९५ वर्षांचें वय होतें !

## श्री. आ. वा. दातार

आयुर्वेदांतील कठीण अशी आचार्य पदवी धारण करणाऱ्या मोजक्या वैद्यांपैकीं आत्मारामपंत ( जन्म १९०९ ) हे एक होत. तेराव्या वर्षी त्यांनीं सातवींत प्रवेश केला. पण त्या परीक्षेकरिता तीन वर्षें वाट पहायला लागणार हें पाहून त्यांच्या वडिलानीं त्याना विनायकशास्त्री यांच्यांकडे वैद्यकीच्या शिक्षणाकरिता ठेवलें. तेथें

तीन वर्षें, पुढें घरीं थोडेसें इंग्रजी, नंतर सातारा व नगर अशा ठिकाणीं वैद्यकीचें शिक्षण घेत घेत इ. स १९३३ सालीं ते आयुर्वेदतीर्थ झाले.

प्रथम त्यानीं पालें येथें दवाखाना थाटला मोठ्या मेहनतीनें 'आचार्य' पदवीच्या परीक्षेनतर दादरच्या सध्यांच्या जागेंत त्यांनीं व्यवसायाला आरंभ केला. लवकरच त्याचा विवाह झाला पण सात वर्षांत, वयाच्या सदतिसाव्या वर्षी ते विधुर झाले. त्याना एका दृष्टीने ती इष्टापत्तीच वाटली कारण व्यवसायाच्या सुरवातीपासूनच आयुर्वेदात मौलिक सशोधन करावयाचें असा त्याचा संकल्प होता. आपल्या व्यवसायाच्या आर्थिक बाजूकडे दुर्लक्ष करूनहि गेलीं वीस वर्षें हें सशोधन त्यांनीं चालविलें. त्यांनीं बसविलेली पचमहाभूताची नवीन चिकित्सापद्धति प्रकाशनाची वाट पहात आहे.

# ललितकला

## कै. पु. ह. दामले

मुरुडकरात ललित कलांमध्यें उल्लेखनीय यश मिळविलेल्या व्यक्ती हाताच्या बोटावर मोजण्याइतक्याहि नाहींत. कै. पु. ह. दामले अशाच थोड्या व्यक्तींपैकीं एक होत. त्याचा जन्म सन १८६० मध्यें झाला. मॅट्रिकपर्यंत शिक्षण झाल्यानतर २० वर्षें त्यानीं रेल्वेंत नोकरी केली आणि वरिष्ठ अधिकाऱ्याशी खटका उडाला; तेव्हां राजिनामा देऊन मुरुडला आले. उर्वरीत आयुष्य त्यांनीं ईशचिंतन आणि तबल्याच्या साधनेंत घालविलें. आसुदचा सुप्रसिद्ध मठ त्यानींच आपल्या गुरूच्या स्मरणार्थ बाधला.

निवृत्त होऊन मुरुडला येण्यापूर्वीच श्री. अप्पा दामल्यांचें नाव तरबेज तबलावादनकार म्हणून झालें होतें नानासाहेब पानसे घराण्यातील प्रसिद्ध वादनपटु श्री मेहेंदळे हे त्याचे या कलेंतील गुरु. सन १९०० च्या आसपास श्री अप्पा दामल्याचें नाव अनेक ठिकाणीं गाजत होतें. मुंबईला नामवंत गायनाच्या साथीला त्याना पाचारण करण्यांत येत असे.

त्याच्या शिष्यापैकीं केळशीचे कै. धोंडोपंत वर्तक दापोली तालुक्यांत प्रसिद्ध होते, पण त्याचें नाव उज्ज्वल करणारे शिष्योत्तम कै. सखारामपंत भागवत. मठात अप्पाकडे तीन वर्षे त्यानीं शिक्षण घेतलें, आणि मुंबई तर गाजवलीच; पण युरोप, इंग्लंडपर्यंतहि आपल्या कलेचें दर्शन घडविलें.

## श्री. माधव आचवल.

आजच्या कर्तबगार मुरूडकरामध्यें ज्याचा विशेष आदरानें उल्लेख करावा लागेल त्यात श्री. माधवराव आचवल याचा अंतर्भाव होतो. मुंबईला १९२५ मध्यें त्याचा जन्म झाला. शालेय शिक्षण धुळें मुंबई येथें झाल्यावर आर्किटेक्चरचें शिक्षण घेण्याकरितां सन १९४२ मध्यें मुंबईच्या स्कूल ऑफ् आर्टमध्यें ते दाखल झाले. सहा वर्षांच्या या अभ्यासक्रमात प्रत्येक वर्षी त्यानीं “ केवल मेमोरियल प्राइझ ” आणि शेवटच्या वर्षी “ मेयो गोल्ड मेडल ” मिळविलें. यानंतर सन १९५२ पर्यंत वास्तु-शिल्प शास्त्रातील प्रत्यक्ष अनुभव मिळविण्याकरिता मुंबईच्या प्रसिद्ध ‘ मराठे आणि कुलकर्णी ’ कंपनींत ते काम करीत होते. सन १९५२ मध्यें त्यांनीं स्वत चा आर्किटेक्चरचा व्यवसाय मुंबईला सुरू केला याच कालात ‘ स्कूल ऑफ आर्ट ’ मध्यें ‘ आर्किटेक्चर ’ या विषयाचे ते व्हिजिटिंग लेक्चररहि होते. सध्यां ते बडोद्याच्या महाराजा सयाजीराव विद्यापीठांतील ‘ आर्किटेक्चर’ विभागात प्राध्यापक आहेत. याचबरोबर त्याचा खाजगी व्यवसायहि चालतो. आनंद एथील Institute of Agriculture ची सर्व योजना आणि इमारती यांचें काम त्यांच्या मार्गदर्शनाखालीं झालेलें आहे.

श्री. माधवराव हे वास्तुशिल्प शास्त्राचे केवळ पुस्तकी विद्यार्थी नाहींत, हा त्याच्या बुद्धिमत्तेचा उल्लेखनीय विशेष होय. ताजमहालच्या सौंदर्याचें विश्लेषण करणारा त्याचा प्रबंध– “ Thoughts on an illusion ” प्रसिद्ध होईल तेव्हां जाणकाराच्या चर्चेचा तो विषय होईल यात शंका नाहीं

बुद्ध मेमोरियलसाठीं भारत सरकारनें जाहीर केलेल्या स्पर्धेत शिल्पकार श्री. साठे याच्या सहकार्यानें पाठविलेल्या त्याच्या ड्रॉइंगला सातवा क्रमाक मिळाला होता. या स्पर्धेकरिता सर्व जगातून २१३ कलावंतांनीं भाग घेतला होता !

सदाप्रसन्न, मोजकेंच पण वेधक बोलणारे माधवराव कोणत्याहि मेळाव्यात फार वेळ उपेक्षणीय राहूंच शकत नाहींत. वास्तुशिल्पाप्रमाणेंच ललित साहित्याच्या शिल्प-सौंदर्याचें अधिकारी माणसाप्रमाणें ते जेव्हा विश्लेषण करूं लागतात तेव्हा ऐकणारा

चकित होतो कांहीं दिवसापूर्वी ' सत्यकथे 'त प्रसिद्ध झालेली श्री. गंगाधर गाडगीळांच्या कथालेखनावरील त्याची लेखमाला रसिकाच्या आदराच्या विषय झालेली आहे.

शिल्पशास्त्राचें उच्च शिक्षण घेण्याकरितां त्यानां फ्रेंच सरकारची शिष्यवृत्ती मिळाली असून ते लवकरच पॅरिसला जायचे आहेत

नुकतीच तिशी ओलांडलेल्या या तरुण कलावंताचा भविष्यकाळ आपणां-सर्वांच्या आदराचा आणि अभिमानाचा विषय होणार आहे हें सांगायला आतां ज्योतिषाची गरज उरलेली नाहीं.

## पाटणकर बंधु

पाटणकर घराण्याचे मूळ पुरुष वेदमूर्ती धोंडभटजी पाटणकर हे मूळचे बसणीचे (रत्नागिरीजवळ). वैदिक, सदाचरणी व अत्यंत विरक्त अशा या धोंडभटजींना आंग्रे सरदारांनीं मुद्दाम मुरूडला आणून वसविलें. धोंडभटजींपासून सहावे पुरुष वे. मू गणेशभटजी हेहि सदाचरणी व उत्कृष्ट असे वैदिक होते याना मुलगे सात. थोरले वामनराव यांनीं इ. स १९०४ मध्यें प्रसिद्ध पाटणकर मायदेव कंपनी स्थापन केली. शिवरामबोवा व गोविंदबोवा हे अनुक्रमें पाचवे व सहावे बंधु या दोघांनीहि आपल्या प्रवचन व कीर्तन यानीं मुरूडचें नांव अखिल महाराष्ट्रात दुमदुमविलें. दोघा भावानीं संस्कृत व वेदान्ताचें शिक्षण, जाल्गांव, पुणें व वाई–कै नारायणशास्त्री मराठे याच्याजवळ – येथें घेतलें. उत्कृष्ट वक्तृत्वशैली, सामान्य लोकांनाहि समजेल अशी वेदान्तनिरूपणाची ख्याति व ध्वनिक्षेपकाखेरीजहि पाचसहा हजार श्रोत्याना ऐकू जाईल असा भरदार आवाज, यामुळें गोविंदबुवा मुरूडकर यांच्या नांवाचा बोलबाला सगळीकडे झाला. शिवरामबुवाचा अभ्यास जास्त खोल, पाठान्तर चांगलें व वक्तृत्व कमी यामुळें त्यांची ख्याति प्रवचनकार म्हणून झाली. संकेश्वर मठाचे शंकराचार्य ( शिरोळकर ) यानीं खूष होऊन गोविंदबुवाना कीर्तनकेसरी ही पदवी दिली होती. गोविंदबुवाच्या कीर्तनाला रंग चढायचा शिवरामबुवाच्या साथीनें. शिवरामबोवा इ. स १९३२ सालीं व गोविंदबुवा १९४६ सालीं कैलासवासी झाले. नरहर शिवराम पाटणकर मुंबई रेडियोवर सुरुवातीपासूनच गाण्याचा मान मिळविणारे नरहरबुवा ( जन्म १८९५ ) हे शिवरामबुवांचे चिरंजीव. घराण्यातली कीर्तनाची परंपरा त्यानीं चालू ठेवली असली तरी त्यांची ख्याति आहे उत्तम गायक म्हणून. यानीं गायनाची संथा घेतली मुख्यत्वेंकरून कै. भास्करबुवा

असले याच्याकडे. याच्या गायनानें संतुष्ट होऊन शंकराचार्यांनीं याना 'संगीतरत्न' ही पदवी दिली. गेलीं तीस वर्षे सर्व हिंदुस्थानभर गायनाचे यशस्वी दौरे काढले आहेत. मुख्य व्यवसाय केला मात्र पुणें म्युनिसिपालिटींत सगीत शिक्षक म्हणून. त्यानी नाटकातील पदाना चाली लावून, कीर्तनाला व भजनी संप्रदायाला पोषक अशा चाली शोधून काढून संगीताचा प्रसार केला. प्रसिद्ध गायक छोटा गधर्व हे नरहरी-बुवाचेच शिष्य.

## कदम घराणें

संगीत, नाट्य, व वाद्यवादन या कला कदम घराण्यांत आज तीन पिढया तरी चालत आहेत कै गोविंदबुवा हे त्याच्या काळीं सगीत आरत्या, भूपाळया, भजनें वगैरे गाण्यात चांगलेच प्रसिद्ध होते. त्याचे थोरले चिरंजीव रामचद्रबुवा ऊर्फ दादा यांनाहि वडिलाप्रमाणेंच तालमीचा नाद होताच, पण त्यांनीं जास्त लक्ष दिलें तें संगीत व नाट्य या कलांकडे. तीस पस्तीस वर्षांपूर्वी त्यांनीं एक नाट्यमंडळ स्थापून त्या मडळातर्फे "कुजविहारी", "रामराज्यवियोग" यासारखीं सगीत नाटकें बसविलीं व स्वत. त्यात स्त्री व पुरुष पात्रांच्या संगीत भूमिका केल्या. अभंगगायनांत तर त्यांनीं चागलीच प्रगति केली. तरुणपणातील त्यांच्या आवाजाचा भरदारपणा व माधुरी आजहि ऐशीं वर्षे होऊन गेलीं तरी कायम आहे.

या दादांचे धाकटे बंधु विष्णुबुवा यांचा जन्म १९०६ सालीं मुरुड येथें झाला. मुरुड येथे पहिली व पुढील तीन इयत्ता मुंबई येथें, बस्स यापुढें त्यांनीं शिक्षण घेतलें नाहीं यापुढें घराण्यातली अभग गायनाची प्रथा त्यांनीं चालू केली त्यात त्यांनीं चांगलेंच नाव मिळविलें. विष्णुबुवा घाटकोपरवाले म्हणून त्याचें नाव ज्याच्या त्याच्या तोंडीं झालें. पण त्याचें मन एका कलेच्या उपासनेवर समाधान मानीना म्हणून त्यांनीं सिनेमा सृष्टींत प्रवेश केला. अनेक चित्रपटांत त्यांनीं कामें केलीं. ' नंदके लाला ' मध्यें त्यांनीं अक्रूराची भूमिका केली. पण त्यांनीं पुढें सिनेमा सोडला व संगीताकडेच जास्त लक्ष दिलें व भजनी सप्र-दायातल्या जाणकाराकडून अधिकाधिक ज्ञान संपादन केलें. कांहीं नाटकांचें संगीत दिग्दर्शन त्यांनीं केलें एवढेंच नव्हे तर नाटकांतून भूमिकाहि केल्या.

विष्णुबुवाचे चिरंजीव प्रभाकर कदम हेहि वडिलाच्या पावलावर पाऊल टाकून कलोपासना करीत आहेत. तबला, हार्मोनियम व पखवाज वाजविण्यात ते अधिका-

धिक कौशल्य संपादन करीत आहेत पखवाज वाजविण्याच्या शिक्षणाचे कांहीं पाठ त्यांनीं कै. सखारामपंत भागवत याच्याकडून घेतले.

## श्री. ग. पु. दामले

प्रसिद्ध तबलावादनपटु कै अप्पासाहेब दामले यांचे पुत्र श्री. चंडोपंत दामले आपल्या कलेमुळें प्रसिद्ध आहेत. जन्म सन १८७९. आपल्या वडिलांप्रमाणेंच नामवंत कलाकार आहेत. हार्मोनियमवरील त्यांचें प्रभुत्व दापोली तालुक्यात तरी सर्वत्र सुपरिचित आहे. कोणत्याहि पट्टींत ते सारख्याच नैपुण्यानें हार्मोनियम वाजवूं शकतात. कृष्णराव पंडितासारख्या महाराष्ट्रांतील अनेक श्रेष्ठ गायकांची साथ त्यांनीं केलेली आहे. कोणत्याहि अनोळखी, अनवट गायनांत रंग भरण्यात त्यांची कला तरबेज आहे श्री. अनंत मनोहर जोशी या प्रसिद्ध बुवांकडे त्यांचें गायनवादनाचें शिक्षण झालें.

मुंबई म्यु. शाळेंतील गायन-शिक्षकाच्या नोकरींतून निवृत्त झाल्यावर मुरुडला ते १९४३ मध्यें स्थायिक झाले. मुरुडच्या सार्वजनिक जीवनात आस्थेनें भाग घेतात. ईशचिंतन आणि उत्साही विद्यार्थी भेटल्यास आपल्या कलेचें शिक्षण देण्यांत ते आपला काळ घालवितात.

# संकीर्ण

## श्री. केशव भिकाजी जोशी

(जन्म १८६९) शतायुषी अण्णाप्रमाणेंच सर्वसामान्य आयुर्मर्यादा ओलांडणारे केशव भिकाजी जोशी हे त्यांच्याहून अधिक प्रसिद्ध अशा व्याकरणकार रामभाऊंचे धाकटे बंधु यांचें मराठी चार इयत्तांचें शिक्षण मुरुड येथें व पुढील इंग्रजी शिक्षण न्यू इंग्लिश स्कूलमध्यें झालें. फर्ग्युसन कॉलेजात एक वर्ष शिक्षण झाल्यावर त्यांनीं अलाहाबादच्या पोलिस ट्रेनिंग स्कूलचा अभ्यासक्रम पुरा केला. पोलिस खात्यांत चढत चढत ते सब इन्स्पेक्टर हुद्यावर पोंचले पण इ. स. १९११ मध्यें रामभाऊंनीं त्यांना पुण्याला बोलावून घेतलें. पुण्याला त्यांनीं कांहीं दिवस भावे स्कूलमध्यें शिक्षक

म्हणून काम केलें. इ. स. १९१३ मध्यें वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुरन्स कंपनी स्थापन झाली. केशवरावांचे स्नेही कै. काकासाहेब जोशी हे कंपनीच्या उत्पादकांपैकीं एक होते. त्यांच्या सूचनेवरून केशवरावांनीं कंपनीची एजन्सी घेतली. कंपनीच्या सुरुवातीच्या भरभराटीचें श्रेय केशवरावानाच दिलें पाहिजे. या व्यवसायात त्याना चांगला पैसा मिळाला. केशवरावानीं जुन्या काळीं आपल्या पत्नींना पं. रमाबाई यांच्या शाळेंत इंग्रजी शिक्षणासाठीं घातलें होतें व्यवस्थितपणा, खाण्यापिण्यात संयम व नियमित वागणें हें त्यांच्या दीर्घ व निरोगी जीवनाचें रहस्य म्हणायला हरकत नाहीं.

## श्री. के. त्रिं. जोशी



केशवराव ( जन्म ९।५।१८७७ ) यानीं मुरुड इतक्या वर्षांपूर्वी सोडलें आहे कीं त्याना मुरुड आठवतें ते कै. रघुनाथशास्त्री जोशी, कै अण्णासाहेब मंडलिक व कै. वामन आबाजी मोडक यांच्या वेळचें ही सर्व मंडळी त्यांच्या शेजारची. न्यू इंग्लिश स्कूलमधून हे स्कूल-फायनलच्या परीक्षेला १८९६ सालीं बसले. चार पाच वर्षे रेल्वेंतच निरनिराळ्या नोकऱ्या केल्या. एकदा वडील फार आजारी असतांना रजा मिळाली नाहीं म्हणून त्यानीं नोकरी सोडून दिली. नंतर इ स. १९०४ पासून १९३२ पर्यंत बी. एन्. रेल्वेंत स्टेशनमास्तर म्हणून काम केलें. पुनः युद्धकाळात १९४१ ते १९४६ पर्यंत तारमास्तर म्हणून काम केलें. आतां ते आपला सर्व काल ईश चिंतनात घालवितात त्याना गेल्या साठ वर्षांत ताप माहीत नाहीं. डॉक्टरचें औषधहि घ्यावें लागलें नाहीं. एक्यायशींच्या वर्षींहि पहांटे चारपासून ते रात्रीं आठपर्यंत घड्याळाप्रमाणें सुसूत्र असा त्यांचा कार्यक्रम चाललेला असतो. सावनेर येथें घर बांधून मुलें, नातवंडें, पणतवंडें यांच्या सान्निध्यात सुखासमाधानाने ते आयुष्य घालवीत आहेत.

## श्री. सी. दा. काणे



व्यायाम व खेळ याची हौस आणि त्यांत प्राविण्य कमाविणारे बापूसाहेब काणे (जन्म १-११-१८८१) हे बहुधा मुरुड ग्रामस्थांत एकमेव असावेत. त्यांचे चुलते व चुलतबंधु कराची व मुंबई येथें मोठमोठ्या नोकऱ्यावर असल्यामुळें बापूसाहेब परंपरागत भिक्षुकीकडे न वळतां इंग्रजीकडे वळले. इ. स १९०० मध्यें मॅट्रिक व स्कूलफायनल झाल्यावर प्रथम बारीकसारीक नोकऱ्या केल्या व पुढें तार खात्यात ते कायमचे राहिले. मुंबई, गुजराथ, व सौराष्ट्र अशा निरनिराळया ठिकाणीं चढत्या वाढत्या पगारावर व हुद्यावर काम करतां करता ते अखेरीस सुपरिंटेंडेंटच्या हुद्यावर असतांना निवृत्त झाले.

आपल्या दीर्घ व साधारणपणें निरोगी आयुष्याचें श्रेय ते व्यायाम, तालीम व नियमित आहारविहार याना देतात. देशी व्यायामपद्धतींत त्यानीं चांगलें प्राविण्य मिळविल व बक्षिसेंहि पटकाविलीं. इतर व्यायामांप्रमाणेंच त्याना पोहणें व कुस्ती याची विशेष आवड आहे किंवा होती असें म्हणायला हवें. भावनगर येथें त्यानीं घोडदळात शिक्षण घेतलें व घोडदळाच्या शिक्षकाचें कामहि कांहीं दिवस त्यानीं केलें. पोलो हा अतिशय कठीण असा खेळ आहे बापूसाहेब हा खेळ शिकले एवढेंच नव्हे तर ते भावनगरच्या महाराजाच्या टीममधून चुरशीचे पोलोचे सामने खेळले.

जन्मभर केलेली स्नानसंध्या पूजा अर्चा ते अद्यापहि निष्ठेनें आचरीत आहेत.

## श्री. द. ज. गोखले

दत्तात्रेय जनार्दन गोखले ( जन्म १८९० ). दत्तोपंत याचा जन्म एका गरीब कुटुंबात झाला. कांहींहि करून भरपूर शिकायचें हा लहानपणचा निश्चय त्यामुळें प्रतिकूल परिस्थितीचे अडथळे त्यानीं कधीं मानले नाहींत सातवी इयत्ता व इंग्रजी तीन इयत्ता मुरुड येथें झाल्यावर पुणें येथें मराठी ट्रेनिंग कॉलेजांत तीन वर्षें शिक्षण घतलें. या तीनहि वर्षांत त्याचा पहिला क्रमांक कधीं गेला नाहीं. पुढें खाजगीरीतीनें अभ्यास करून इ. स. १९१८ मध्यें मॅट्रिक व १९२४ सालीं बी. ए. झाले.

सरकारी हायस्कुलें व ट्रेनिंग कॉलेजें यांत नोकरी करून ते इ. स. १९४५ सालीं सेवानिवृत्त झाले.

प्राथमिक शाळांकरितां दोन व प्राथमिक दुय्यम शाळा व ट्रेनिंग कॉलेजें याकरिता इयत्तावार अंकगणिताचीं त्यानीं पुस्तकें लिहिलीं त्यावर त्याना चांगला पैसा मिळाला.

पुण्यातील अनेक सार्वजनिक संस्थाचे ते आजीव सभासद आहेत. मुरूड-फंडाच्या कार्यकारी मंडळाचे अनेक वर्षे एक उत्साही सभासद म्हणून ते काम करीत आहेत.

## श्री. वि. के. केतकर



विष्णु केशव केतकर. (जन्म ३०-६-१९००) मुरूड येथील जे थोडे लोक मोठया सरकारी हुद्यावर चढले त्यांपैकी बाबासाहेब हे एक होत. वयाचे सातवे वर्षी घरी बाराच्या दारूचा स्फोट होऊन त्यात वडील, एक भाऊ व बहीण हीं दगावलीं. सुदैवानें थोड्या जखमांवर बाबासाहेब हे सुटले. इंग्रजी शिक्षण अनेक ठिकाणीं झालें. दापोली येथील शाळेंत असताना साने गुरुजी त्याचे सहाध्यायी होते.

प्रथम तारखात्यात कारकून म्हणून १९१९ मध्यें त्याची नेमणूक झाली. पण ती नोकरी न सोडता व तारखात्याचा अभ्यास पुरा करून ते १९२१ मध्यें पुनः टेलिग्राफिस्ट म्हणून लागले. पुढें खात्यातील परीक्षा देत वर चढत चढत ते असिस्टंट सुपरिटेन्डन्ट (दुसरा वर्ग श्रेणी अ) या हुद्यावरून निवृत्त झाले. (१९५५)

सार्वजनिक कामाची आवड स्वभावतःच असल्यामुळें अनेक सार्वजनिक संस्थाचे सभासद वा अध्यक्ष म्हणून त्यांनीं काम केलें आहे. मुरूड फंडाचे ते काल-चे चिटणीस व सध्या अध्यक्ष आहेत.

वृत्तीनें धार्मिक असल्यामुळे सार्वजनिक कामाव्यतिरिक्त वेळ ते पारायणें व नामस्मरण यात घालवितात.

## श्री. भा. धों. कर्वे

भास्कर धोंडो कर्वे ( जन्म ७-११-१९०३ ). हिंगणें स्त्री शिक्षणसंस्थेला आजचें व्यवस्थित व नीटनेटकें स्वरूप यायला श्री भास्करराव यांचेच परिश्रम कारणीभूत आहेत. नवीन मराठी शाळा, न्यू इंग्लिश स्कूल, व फर्ग्युसन कॉलेज यातून शिक्षण घेऊन ते इ स. १९२४ सालीं बी एस्सी. झाले लगेच पुढच्या वर्षी बी टी ची परीक्षा देऊन शिक्षक म्हणून कॅम्प एज्युकेशन सोसायटींत एक वर्ष काढलें. लीड्स् विद्यापीठाच्या डिप्. एड्. व एम्. एड् या पदव्या १९२७ ते २९ मध्यें मिळविल्यावर अण्णासाहेबाबरोबर मे १९२९ ते एप्रिल १९३० त्यानीं जग-प्रवास केला. परत आल्यावर ते लगेच हिंगणें स्त्री शिक्षण संस्थेचे आजीव सेवक झाले इ. स. १९३३ पासून ते या संस्थेचे चिटणीस आहेत. यांच्या अमदानींत या संस्थेची खूपच भरभराट झाली. श्री. भास्करराव याचा विवाह १९३० मध्यें कु. कावेरी जोशी याच्याशीं झाला. त्या जी ए टी डी. असून त्याहि हिंगणे संस्थेच्या आजीव सेविका आहेत श्री. भास्करराव यानीं मानसशास्त्र व शिक्षणशास्त्र यावर पुस्तकें लिहिलीं आहेत सौ. कावेरीबाईंनीं मुलांकरिता गोष्टीचीं पुस्तकें लिहिलीं आहेत

## श्री. वि. वा. जोशी



विनायकराव ऊर्फ बाबासाहेब ( जन्म १६ ३-१९०४ ) पन्नाशी उलटली असलीतरी पंचविशीच्या तरुणामध्ये खेळीमेळीनें मिसळूं शकतात. याचें कारण त्याच्यातील खिळाडूपणा व उच्चभ्रूपणाचा अभाव. वडील पोस्ट ऑफिसात नोकरीला असल्यामुळें विनायकरावाचें शिक्षण अनेक गावात झालें. इग्रजी ६ वीत असताना असहकाराच्या चळवळींत सापडले होते इ. स. १९२४ मध्यें मॅट्रिक झाल्यावर मुंबई नगरपालिकेंत नोकरीस लागले ते १९५३ पर्यंत. मध्यंतरीं १९४२-४७ पर्यंत ते Auxiliary Fire Service या संघटनेंत ऑफिस सुपरिंटेंडेन्ट होते.

सार्वजनिक कामाची आवड असल्यामुळें त्यानीं व्यायाम व सहकारी चळवळ यांत प्रामुख्यानें भाग घेतला. इ. स. १९२१ ते ३० या काळांत व्यायामाचें शिक्षण घेत असतानाच मुलांना मलखांब, जोडी, कुस्ती ते विनामूल्य शिकवीत. १९३१ मध्यें त्यानीं मुंबई नगरपालिकेच्या नोकराकरिता एक सहकारी पतपेढी सुरू केली. त्या पेढीचे ते सन्मान्य चिटणीस होते. पुढें १९५३ मध्यें नगरपालिकेच्या सर्व पतपेढ्यांचें एकीकरण झालें तेव्हा विनायकरावाचा पेढ्यातील दीर्घ अनुभव पाहून त्याना या म्युनिसिपल कोऑपरेटिव्ह बॅंकेचे जनरल मॅनेजर म्हणून नेमण्यांत आलें.

## श्री. का. रा. गानू

काशीनाथ रामचंद्र गानू ( जन्म १९०९ ). वडिलाचा अकालीं मृत्यु व घरची गरीब परिस्थिति यामुळें याचें शिक्षण मुरुड, वाई, पुणें व मुंबई अशा ठिकाणीं झालें इ. स. १९३० च्या सुमारास सर्वत्र मंदी आली होती, बेकारी वाढत होती. त्यामुळें नोकरी मिळण्याची पंचाईत होती. अशा परिस्थितींत वडिलांचे स्नेही व मुरुड ग्रामस्थ कै. शंकरराव कोल्हटकर, मॅनेजर प्रताप मिल, यानीं त्याना धुळयाला बोलावून नेलें. तेथें नोकरीवर चढत चढत ते हेडक्लार्कपर्यंत चढले. पण नोकरीपेक्षा धंद्याकडे ओढा असल्यामुळें धुळयासच औषधाचें दुकान चालू केलें. दुकान खूप भरभराटींत चाललें. पण पुन्हां आलेल्या आर्थिक तंगाईच्या काळांत दुकान बसत चाललें. सध्या अनेक कंपन्याच्या एजन्सीजचा धंदा चालू आहे पण त्याची धुळयाच्या प्रदेशांत प्रसिद्धि आहे ती हस्तसामुद्रिक व संख्याज्योतिषी ( Numerologist ) म्हणून. आपल्या या शास्त्राचा त्यांनीं अनेकाना धीर व दिलासा देण्याच्या कामीं उपयोग केला आहे.

## श्री. गणपत महादेव इंदुलकर

न्हावी समाजातील इदुलकर मंडळी दोन शतकापूर्वीं मुरूडला स्थायिक झाली. यापैकींच कै. गणूभाऊ एक. वयाच्या तेराव्या वर्षी ते पोरके झाले आणि संसाराचा भार त्याच्या अंगावर पडला, पण न डगमगता आल्या परिस्थितीस त्यानीं तोंड दिलें. ८२ वर्षांचे होऊन १९३७ मध्यें ते मृत्यु पावले तेव्हा आपल्या कुटुंबाला त्यानीं सुस्थितींत आणलें होतें. आज त्यांची मुलें, नातवंडें मिळून ४० माणसाचें कुटुंब नादतें आहे त्यापैकीं कांहीं मॅट्रिकपर्यंत शिकले आहेत. काहीं राजकीय पक्षाचे कार्यकर्ते आहेत. बहुजनसमाज येत्या काळात झपाट्यानें प्रगति करणार आहे याचीं हीं प्रसादचिन्हें आहेत.

जवळ जवळ चार पिढ्यांच्या मुरुडकराशीं श्री. गणूभाऊंचा व्यवसायामुळें परिचय होता रा सा. विश्वनाथ नारायण मंडलिकांच्या आठवणी ते सांगत असत! आज पस्तिशींत असलेल्या मुरुडकराना गणूभाऊंची धीमे पावलें टाकीत चाललेली आकृति स्पष्ट आठवत असेल.

—o—

# व्यवसाय

## श्री. शिवराम गोविंद राणे ( भेंकरे )



शिवरामपंत ( जन्म १८८७-१९४६ ) हे लहानपणींच थोडेंसें शिक्षण झाल्यावर मुरुडांतून बाहेर पडले. १५ रु पगारावर त्यांनीं उरण येथें शेट भिवंडीवाला याच्याकडे नोकरीला सुरवात केली. सचोटी व कामाचा दांडगा उरक यांच्या बळांवर चढत चढत ते भिवंडीवाल्याच्या इस्टेटीचे मॅनेजर झाले. इस्टेटीची सर्व व्यवस्था पहांत असतानाच त्यानीं स्वतंत्रपणें भात व मीठ यांचा व्यापार सुरू केला, त्यातहि चांगलेंच यश मिळविलें. असीम उत्सवप्रियता व कलांबद्दलची आवड यामुळें ते उरण गांवात फार लोकप्रिय झाले होते.

## श्री. शं. दा. मोरे



शालेय शिक्षणाची कसोटी व्यक्तीच्या अभ्युदयाच्या बाबतींत कशी पंगू ठरते याचें शंकरराव (ज. १९०७) हें एक उत्तम उदाहरण आहे. मुरुड येथें चार व रॉबर्ट मनीमधल्या इंग्रजी तीन इयत्ता एवढेंच त्यांचें व्यवस्थित असे शिक्षण. या काळांतहि मिळेल तेव्हा व असेल त्या साधनांनीं चित्रें रंगविणें हाच त्यांचा आवडता छंद. या नादानें अभ्यासाकडे दुर्लक्ष व्हावें व त्यामुळें शिक्षकांनीं त्यांची शोभा करावी असा क्रम चाले.

परंतु चित्रकलेच्या याच देणगीनें त्यांना हात दिला. शाळा सोडल्यावर त्यांनीं अनेक धंद्यांत अनुभव घेतला. त्या अनुभवाचा त्यांना पुढें फार उपयोग झाला. इ. स. १९२५ मध्यें वडील वारल्यामुळें त्यांना नोकरी धरावी लागली ती डॉकयार्ड-मध्यें दीड रुपया रोजावर. या साडेतीन वर्षांच्या नोकरीनंतर वर्ष दीड वर्ष त्यांनीं कोटांतील एका प्रसिद्ध डेकोरेटर्स कंपनींत चित्रकार म्हणून काम केलें. पण नोकरीची ताबेदारी त्यांच्या स्वतंत्र व उन्मेषशाली स्वभावाला न रुचणारी. शिवाय शंकररावाचे स्नेही कर्नल मुंजे (डॉ. मुंजे यांचे चिरंजीव) यांनींहि शंकररावाच्या मागें धंदा करण्याचा लकडा लावला. या सर्वांचा परिणाम म्हणून इ. स. १९२९ मध्यें त्यांनीं एका जिन्याखालीं छोट्याशा जागेंत साईन बोर्ड पेंटिंगच्या धंद्याला सुरुवात केली. हीच एस्. मोरे आणि कंपनीची सुरुवात.

वक्तशीरपणा, सचोटी, रंगसंगतींतील व आंखणींतील नावीन्य यामुळें कंपनीनें अल्पावधींत आपला जम चांगलाच बसविला. एक तर काळ असा होता कीं मुंबईंत चांगला साईन बोर्ड हा मोरे कंपनीचाच असायचा. इ. स. १९३५ सालीं कंपनी मोठ्या जागेंत गेली. इ. स. १९४१ सालीं शंकररावांनीं श्री. देशपांडे यांच्या सहकार्यानें 'पॅकर्स इंडिया कंपनी' स्थापन केली. या कंपनीबरोबरच मूळ कंपनीची आगेकूच चालूच होती. आतां त्या कंपनीनें इंटीरिअर डेकोरेशन, ब्रिडिंग

पेन्टिंग, स्कल्प्चरल मिरर्स मेटल, लेटर्स आर्किटेक्चरल मॉडेल्स, एक्झिबिशन स्टॉल या सारख्या अनेक कामांचा व्याप वाढविला.

ग्वालियर महाराजाच्या समुद्रमहालातील पेंटिंग, हॉटेल, मंडोव्ही, गोवा येथील गोमंतकीय जीवनदर्शन घडविणारें ५० फूट लांबीचें सिमेंटमधील शिल्प, अहमदाबाद येथील ओरिएन्टल बिल्डिंगवरील १५ फूट दगडी खोदकाम, प्रदर्शनातील स्टाल्स हीं त्यांचीं कांही उल्लेखनीय कामें होत. कंपनीनें केलेलीं काहीं आर्किटेक्चरल मॉडेल्स श्री. जवाहरलाल नेहरू यानींहि वाखाणलीं आहेत. तुर्भे येथील अणु संशोधन केंद्राचें मॉडेल, स्टॅनव्हॅक कंपनीच्या कचेरीवरील उडता लाल घोडा हीं भारतांतील सर्वांत मोठी न्यूऑन साईन हीं याच कंपनीची. मुरुड येथील महर्षि अण्णासाहेब कर्वे याचा ब्रांझचा अर्धपुतळा याच कंपनीचा.

श्री. शंकरराव याची जीवनाकडे पाहण्याची दृष्टि जशी कलात्मक तशीच चौकस, चौफेर व विशाल आहे. त्याना अण्णासाहेबाबद्दल अतिशय आदर आहे. आपल्या मूलींना एरंडवण्याच्या कॉलेजात त्यानीं शिक्षण दिलें त्याच्या मुळाशीं हाच आदर होता.

## श्री. वि. ग. भावे

विष्णु गजानन भावे ( जन्म १८९१ ). पन्नास वर्षांहून अधिक वर्षे अधिकाधिक यशस्वितेनें व्यापार चालविणारे विष्णुपंत भावे हे मुरुड येथील एकच व्यापारी होत. इतर अनेक व्यापारी या कालांत मुरूडला उदयास आले पण थोड्याच काळांत त्यांचा अस्त झाला. विष्णुपंत यशस्वी झाले याचें कारण विष्णुपंताच्या सुरुवातीपासूनच्या धोरणात आहे. त्यांनीं घरगुती हिशेब व दुकानाचे हिशेब यांची कधीं गल्लत केली नाहीं. पैसा मिळतो म्हणून घरच्या खर्चाची बेबंदशाही ही त्यांनीं कधीं चालूं दिली नाहीं. त्याचा व्यापाराचा मुख्य रोख रोखीवर. याखेरीज एका बाबतींत ते मोठे सुदैवी ठरले. कुटुंबांतील मंडळीचें त्यांना आजपर्यंत संपूर्ण सहकार्य मिळालें. या सर्व कारणामुळें फक्त पांच इयत्ता मराठी शिक्षण झालेले विष्णुपंत १९०२ पासून म्हणजे आपल्या वयाच्या ११ व्या वर्षापासून मुरुड येथील एक यशस्वी व्यापारी म्हणून गणले जातात.

## श्री. माधव रामचंद्र जोशी बी. ए.

माधवराव हे कै. रामभाऊ जोशी व्याकरणकार यांचे चिरंजीव. याचा जन्म १८९६ सालीं झाला. यांचें प्राथमिक, दुय्यम व विश्वविद्यालयीन शिक्षण डेक्कन

एज्युकेशन सोसायटीचे पुणें येथील शाळाकॉलेजातून झालें. व ते १९१९ साली बी. ए. झाले कै. रामभाऊंची इच्छा आपला एकुलता एक मुलगा आपल्यापासून दूर जाऊ नये व आपल्या शालेय पुस्तकाची छपाई, विक्री वगैरेंची व्यवस्था त्यानें पहावी अशी होती व माधरावानीहि ती पुरी केली; एवढेंच नव्हे तर आपल्या कर्तबगारीनें कलकत्ता येथील कागद गिरण्यांची एजन्सीहि मिळविली व छापखान्यां-साठीं कागद व शाळांसाठीं वह्या वगैरे स्टेशनरी लागते ती सर्व आपल्या दुकानात ठेविली. यामुळें लोक त्यांना पेपर मर्चंट म्हणून ओळखू लागले.

जोडोनिया धन उत्तम वेव्हारें । उदास विचारें वेंच करी !!

या संत तुकारामाच्या उक्तीप्रमाणें त्यानीं पुण्यातील निरनिराळया शिक्षण संस्थांस व अनाथमहिलाश्रमासारख्याहि उपयुक्त संस्थास शक्त्यनुसार मदत केली आहे


ते बँक ऑफ महाराष्ट्र, श्रीराम सिल्क वगैरे कंपन्यांचे डायरेक्टर होते. हल्लीं ते लोकमान्य मिल्स बार्शीचे डायरेक्टर बोर्डांत आहेत.

त्याचे विचार त्यांचे वडिलाप्रमाणेंच पुरोगामी आहेत. सेवावृत्तीनें न रहाण्या-चा वंशपरंपरागत बाणा त्याच्या मुलामध्येंहि असल्यामुळें ते स्वतन्त्रपणानें निरनिरा-ळया धंद्यांत पडले आहेत.

## श्री. स. के. भावे

सखाराम केशव भावे ( जन्म १८८८ ). घरच्या परिस्थितीमुळें इंग्रजी पाचसहा इयत्ता झाल्यावर शाळा सोडून कांहीं फेरीवाल्याचा धंदा केला. इ. स. १९१३ ठाकुरद्वारला पुस्तकें व सुगंधी द्रव्यें यांचें दुकान काढलें. सुगंधी भावे या नावानें आजहि त्याची ख्याति आहे. इ स. १९१४ मध्यें लोकमान्य टिळकाच्या हस्तें काचसामानाचें उद्घाटन राष्ट्रीय चळवळीच्या विशेषत- लोकमान्यांच्या वेळीं राष्ट्रीय वाङ्मयाचे निर्माते म्हणून यांची प्रसिद्धि झाली. आजपर्यंत अनेक पुस्तकांचें प्रकाशन केलें आहे. सध्यां सुगंधी द्रव्यें, पुस्तकविक्री याच्या जोडीला बालवाङ्मयाचेंहि ते प्रकाशन करतात.

## श्री. शा. रा. बांदल



श्री. शामराव रामजी बादल ( १७-३-१८८८ ) बादल घराण्याचा मूळ व्यवसाय शेतीचा. श्री. शामराव याच्या वडिलांनीं शेतीच्या जोडीला व्यापाराला सुरुवात केली. शामरावांना लहानपणापासून सर्व प्रकारच्या कामाची सवय होती. शामरावांचें शिक्षण तीन इयत्ताहून जास्त झालें नाहीं. शिक्षणावाचून अडतें असा त्यांना अनुभव आला. त्यांचे बंधु श्री. त्रिंबकराव याच्या सहकार्यामुळें शामरावांचें काम निभावून गेलें. शिक्षण सोडलें तर व्यापाराला आवश्यक असें धाडस, चिकाटी, आय व व्यय यावर चोकस लक्ष व अविश्रान्त श्रम हे गुण त्याच्याजवळ भरपूर प्रमाणात असल्यामुळें आपल्या व्यापाराचा एवढा मोठा व्याप त्यांनीं सावरला आहे. सध्या ते फक्त सुपारीचाच व्यापार करतात. तोहि आपला भाऊ व मुलगा यावर सोंपविला असून शामराव आपल्या दीर्घ अनुभवाचा उपयोग त्याना सल्ला देण्याच्या कामीं करतात. त्याचें धन हें कृपणाचें धन नाहीं. हें अनेक प्रसंगीं त्यांनीं ज्या देणग्या दिल्या आहेत त्यावरून दिसून येईल.

## श्री. रा. के. मुकादम

इ. स. १९३० सालीं ताडीच्या दुकानात विक्रेता म्हणून रामभाऊ काम करूं लागले. दारुबंदीनंतर सरकारतर्फें बॅटरी कंपनींत व गव्हर्मेंट सेंट्रल प्रेसमध्यें दरमहा ८ रु. व २० रु. वर काम केलें प्रेसमध्यें असतांनाच माझगावला राईस प्लेटचें दुकान विकत घेऊन तें ५० रु स्वामित्व हक्कावर चालवायला दिलें. पण काम बरोबर होत नाहीं असें पाहून रामभाऊंनीं नोकरी सोडली व स्वतः दुकान चालवूं लागले,

रें दुकान यशस्वी रीतीनें चालविलें आहेच, शिवाय त्यांनीं कबूतरखान्याजवळ दुसरेंहि दुकान चालवायला घेतलें आहे.

## श्री. व्ही. जी. लाड



व्ही. जी. लाड प्रिन्टर्स अँड बाइन्डर्सचे मालक श्री. लाड ( जन्म १८९१ ) यांनीं शाळेंत जाऊन शिक्षण असें घेतलेंच नाहीं. त्या वेळेला आवश्यकताच वाटली नाहीं. शेती करावी व गुरें राखावीं हाच बाळपणचा उद्योग. इ स. १९०६ सालीं मुंबईला मामाकडे येऊन छापखान्यात बुकबाईंडिंगच्या कामाला सुरुवात केली तेव्हा त्याचा मासिक पगार तीन रुपये होता. पुढें १९२५ पर्यंत चढत्या वाढत्या पगारावर अनेक नोकऱ्या केल्या. त्यासाठीं होमजी स्ट्रीटवर त्यांनीं स्वतःचा बुकबाईंडिंगचा धंदा सुरू केला. स्वतःची जेवणाखाणाची आबाळ करावी, रात्रंदिवस खपावें अशी मेहनत घेऊन धंदा वाढवला सचोटी, धंद्याची संपूर्ण माहिती, व स्वत. अंगमेहनत यामुळें धंद्यात त्याना बरकतच येत गेली. पुढें स्वतःच बाईंडिंगचें मशीन व १९४५ सालीं छापखाना विकत घेतला. १९५० पासून त्याचा मोठा मुलगा या धंद्यात पूर्णपणें पडला आहे. सध्यां त्याच्या छापखान्यात २० माणसें काम करीत आहेत. सहीपुरती अक्षर ओळख असलेल्या लाडाचें हें यश स्पृहणीय होय.

## श्री. गणपतराव भाऊराव चव्हाण



गणपतराव ( जन्म १९०६ ) याचे वडील गिरणींत जॉबर होते त्यामुळें गणपतराव गिरणींत कोणते तरी अधिकारी व्हायचे. गुजर्थी शिक्षण झाल्यानंतर नोकरीला त्यांनीं सुरुवात केली ती डॉक्टराचे बिछाने घालणें. बाटल्या धुणें या कामापासून तें काम आवडलें नाहीं व त्यांनीं गिरणींत धोटे फुंकायला सुरुवात केली. पण तेथील एक भीषण अपघात गणपतरावाच्या वडिलांनीं पाहिला व त्यानीं आपल्या एकुलत्या एक मुलाला गिरणींतून काढलें.

शिक्षण थोडें असलें तरी गणपतरावाना वाचनाचा नाद होता. त्या वाचनामुळे–विशेषतः किर्लोस्कर मासिक–त्यांच्यात स्वतंत्र धंद्याची आवड निर्माण झाली

इच्छा आणि संधि याचा मेळ बसतोच असें नाहीं. आणि संधि मिळाली तरी तिचा उपयोग करून घ्यायला श्रम व धाडस याची आवश्यकता असते. गणपतरावात या दोनहि गोष्टी आहेत.

इ स. १९२७ च्या दग्याधोप्याच्या वेळी रसीटस् पोंचविण्याचें काम त्याना प्रथम मिळालें. चकला स्ट्रीट, नागदेवी, अब्दुल रहमान स्ट्रीटसारख्या दंगलग्रस्त टापूंतुन भर मध्यरात्रीं कुत्र्याच्या भुंकण्याच्या साथींत ते परत येत.

अशी सुरुवात करुन वर्तमानपत्रें विकणें, दलाली करणें अशा रीतीनें गणपतरावाचा व्याप वाढत चालला पूर्वीचे मुकादम नांव अपुरें वाटू लागलें "जी. बी. चव्हाण आणि कंपनी" कार्टिंग अँड् फॉरवर्डिंग एजन्टस् म्हणून कंपनीचा बोलबाला झाला. दहा क्लार्क, ३२ गाडी एवढा कंपनीचा स्टाफ झाला. मध्यवर्ती ऑफिस व जिल्हावार ब्रँच ऑफिसें उघडण्यात, युद्धकाळांत माल गहाळ झाल्यामुळें कंपनीचें सुमारें पन्नास हजारापर्यंत नुकसान झालें. तें सर्व फेडून कंपनी आतां स्थिर पायावर उभी आहे.

## श्री. द. गो. परचुरे



दत्तोपंत परचुरे (जन्म २२-११-१९०३). सातवीपर्यंतचें शिक्षण इ स. १९१९ पर्यंत पुरें झाल्यावर व्यवसायाच्या उद्देशानें मुंबईला प्रयाण केलें. प्रथम वर्तमानपत्रें विकणें, स्वदेशी मालाची फेरी करणें वगैरे उद्योग केले. पुढें डॉ. केतकर यांची ओळख होऊन त्यांच्या ज्ञानकोशाचा प्रचार केला. इ. स. १९२४ मध्यें मुंबई म्युनिसिपालिटींत शिक्षकाची नोकरी मिळाली. ते सध्या ठाकुरद्वार अ प्रा म्यु. मराठी शा. नं. १ चे मुख्याध्यापक आहेत. मुरुड फंड, स्कूल्स् कमिटी क्रेडिट बँक इत्यादि सार्वजनिक संस्थांचे ते पदाधिकारी आहेत मुरूडच्या नाटकांतून त्यांनीं अनेक यशस्वी भूमिका केल्या आहेत व्यापाराकडे ओढा व आवड त्यामुळें त्यांच्या मार्गदर्शनाखालीं परचुरे ब्रदर्स यांचें गिरगाव रोडवर 'स्वस्तिक ट्रंक मार्ट' हें दुकान इ. स. १९३२ पासून चालू आहे.

## श्री. गो. ना. बाळ

अण्णा बाळ (ज. ३१-३-१९०२) हे मूळ लाडघरचे. यांचें मराठी सातवीपर्यंतचें शिक्षण मुरुड येथेंच झालें. पुढें श्री. गंगाबाई बाळ यांनीं त्यांना इ. स. १९२२ मध्यें दत्तक घेतलें तेव्हापासून गेलीं ३५-३६ वर्षें ते मुरुडातच आहेत. त्यांना जात्याच सार्वजनिक कामाची आवड आहे त्यामुळें उ. ल. ना फंडाचें वीस वर्षें पर्यंत चिटणीस म्हणून त्यांनीं काम पाहिलें. नाटकाची आवड असल्यामुळें वाट्याला येईल तें नाटकातील काम ते करीत असत. मुरुड शाळेची इमारत, आसूद ते मुरुड रस्त्याची दुरुस्ती, महादेश्वराच्या देवालयाची दुरुस्ती वगैरे अनेक कामें अंगावर घेऊन त्यांनीं तीं चोखपणें पार पाडलीं आहेत. कोणीहि त्यांच्याकडे मदतीला येवो त्याचें काम ते कधीं अडवणार नाहींत अशी परोपकार बुद्धि त्यांच्यात असल्याची गावकऱ्यांची साक्ष आहे. निरलस शेतकरी व अबोल कार्यकर्ता म्हणून लोक त्यांना ओळखतात. अलीकडे तीन वर्षें ते गावचे पोलीस पाटील आहेत.

## श्री. व. सी. काणे

वसंतराव काणे ( जन्म १९१६ ) यांचें प्राथमिक व माध्यमिक शिक्षण गुजरातेंत झालें. बालपण गुजरातेंत गेल्यामुळें गुर्जरबंधूंचा मनमिळाऊपणा व व्यापारी-वृत्ति हीं वसंतरावाच्या स्वभावातच भिनलीं आहेत. इंटरपर्यंतचें शिक्षण सौराष्ट्रांत झाल्यावर इंजिनिअरिंगच्या शिक्षणाकरितां कराचीला आपल्या चुलत्याकडे गेले.

बी ई ( सिव्हिल ) ची परीक्षा १९४४ साली झाली व पुढें दोन वर्षे वसंतरावांनीं हिंदुस्थान कन्स्ट्रक्शन कंपनींत नोकरी. त्या काळात स्थापत्यशास्त्रांतल्या विविध शाखांचा त्यांना चांगला अनुभव मिळाला. पण नोकरींत त्यांचें मन रमेना. त्यांना स्वतंत्र धंदा करावा असें वाटूं लागलें. वसंतराव गोडबोले नांवाचे त्यांचे वर्गमित्र त्यांच्याच विचाराचे निघाले. या दोघा वसंतरावांनीं "गोवा इंजिनिअरिंग कंपनी' स्थापन केली. दोघेहि बी. ई दोघेहि जातीनें काम पाहणारे, व या दोघांचे सहकारी व कामगारवर्गाशीं खेळीमेळीचे संबंध त्यामुळें कंपनीची चांगलीच भरभराट झाली. सध्या या कंपनीच्या तीन शाखा नगर जिल्ह्यात काम करीत आहेत.

## श्री. गणपत काशीराम मुकादम

इ. स १९३३ साली भोंसले यांच्या ताडी दुकानांत चार आणे रोजावर गणपतराव काम करू लागले. इ. स. १९३८ मध्यें पगार १० रुपये झाला. पण लवकरच ताडी दुकान बंद झालें. पुढें मदनपुरा व फोर्ट विभागात त्यांनीं दुकान चालविण्याचे प्रयत्न केले पण यश आलें नाहीं. पण नंतर माझगाव, नारळवाडींतील राईस प्लेटचें दुकान प्रथम कॉंट्रॅक्ट पद्धतीवर चालवावयास घेतलें व पुढें तें दुकान विकत घेतलें. यांत यश आलें तरी तें पुढें विकलें व 'महालक्ष्मी विजय हिंदु हॉटेल' विकत घेतलें. या दुकानात मिळालेल्या नफ्यातून १९४३ मध्यें खेतवाडींत 'यादव हिंदु हॉटेल' व ताडदेवला 'जनता आश्रय हिंदु हॉटेल' अशीं आणखी दोन हॉटेलें घेतलीं अशा रीतीनें मुंबईंत चार आणे रोजावर सुरवात करून गणपतराव सध्या तीन हॉटेलांचे मालक झाले आहेत.

# श्री. हरिश्चंद्र कृष्णाजी रुमडे



रुमडे याचा जन्म इ. स. १९०६ सालीं मुंबईला झाला. मुंबईसच ते राममोहन हायस्कूल-मधून मॅट्रिक झाले तेथें डॉ. ग. य. चिटणीस हे त्यांचे गुरुजी होते.

त्यांचा मुख्य व्यवसाय हॉटेलें चालविण्याचा. त्याच्या मालकीचीं तीन हॉटेलें आहेत. पण ते व्यवसाय करणारे आहेत हे त्यांनीं सांगितल्या-खेरीज दुसऱ्यांना ओळखणार नाहीं; इतके ते सार्वजनिक कार्यांत गढलेले असतात.

त्यांनीं सहकारी चळवळींत प्रामुख्यानें भाग घेतला आहे. दादर येथील प्रफुल्ल कोऑपरेटिव्ह् कन्झुमर्स सोसायटीचे ते व्हाइस चेअरमन आहेत. पूर्वी चिटणीस व खजिनदार म्हणूनहि त्यांनीं काम केले. तसेंच कामगार विभागांत अभ्यासवर्ग चालविण्यात त्यांनीं पुढाकार घेतलेला आहे. कित्तेभंडारी ऐक्यवर्धक मंडळ, रामकृष्ण विवेकानन्द सेन्टर या संस्थांच्या कार्यकारी मंडळावर ते आहेत गोखले रोड साउथ गणेशोत्सव मंडळाचे तर ते सुरुवातीपासूनचे खजिनदार आहेत कलावन्त, राजकीय कार्यकर्ते, व इतर विविध क्षेत्रातले कार्यकर्ते यांना जात व पक्षभेदातीत दृष्टीनें ते मदत करतात.

# विज्ञान

## डॉ. कमलाकर रामचंद्र दीक्षित



यांचा जन्म ६ ऑक्टोबर १९०९ साली नाशीक येथें झाला. त्यावेळीं त्यांचे वडील तेथील सरकारी शाळेंत अध्यापन करीत असत. घरांत बरेंच वर्षांनीं एका लहान बालकाचा अंतर्भाव झाल्यामुळें त्यांचें बालपण आजीच्या लाडांत व प्रेमळ सहवासांत गेलें. आजीकडून आपल्या आजोबानी केलेल्या महान् कार्यांचीं वर्णनें ऐकून आपणहि आयुष्यात काहींतरी उपयुक्त कामगिरी केलीच पाहिजे असें त्याच्या मनानें घेतलें, व त्यामुळेंच मोठेपणी, ज्या विषयात माणसाच्या शोधक वृत्तीस भरपूर वाव मिळेल असा पदार्थ-विज्ञान शास्त्र हा विषय घेण्याचें त्यांनी ठरविलें.

पदार्थ-विज्ञान शास्त्राच्या अभ्यासासाठीं त्यानी प्रथम इंग्लंडमध्यें व नतर जर्मनीमध्यें काहीं वर्षें घालविलीं. तेथें सर जॉर्ज थॉमसन, प्रो. डबाय् व प्रो. हायसेनबर्ग यांसारख्या नोबेल पारितोषिक मिळविणाऱ्या सुविख्यात शास्त्रज्ञाकडे शिकण्याची अमोल संधि त्याना मिळाली.

हिंदुस्थानात परत आल्यावर ते सरकारी कॉलेजात प्राध्यापक म्हणून काम करूं लागले. इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स मध्यें ते पदार्थ-विज्ञान शाखेचे प्रमुख होते. त्यानंतर ते गुजरात कॉलेज, अहमदाबाद येथें प्रिन्सिपल झाले.

पदार्थ-विज्ञान शास्त्रात त्यानी अनेक शोधानी आपली अल्पशी भर घातली आहे त्यांचे ॲटॉमिक व न्युक्लियर फिजिक्स्, कॉसमिक रेज्, रेक्टिफायर्स व फेरोमॅग्नेटिझम् या विषयांतील कार्य प्रख्यात आहे. व अणुप्रतिक्रियेबद्दलचा त्याचा एक शोध दीक्षित लॉ म्हणून प्रसिद्ध आहे त्यानीं रेक्टिफायर्स, पॉझिट्रॉन व म्यू मिसॉनच्या बाबतीत केलेले शोध मूलभूत असे शोध मानले जातात. अलिकडे ख्यातनाम असलेल्या कॉस्मिक रेज् व ट्रान्झिस्टर्सच्या संशोधनांत ते गुंतले आहेत. त्यांनी आपल्या आजोबानी लिहिलेलें ' ज्योतिर्विलास ' हें पुस्तक अद्यावत्

माहिती घालून आपल्या पूज्य आजोबांच्या ५० व्या पुण्यतिथीला प्रसिद्ध करून त्यांना आदरांजली वाहिली

## श्री. न. द. गोडबोले

नरहर दत्तात्रेय गोडबोले परदेशांतील उच्च पदवी सन्मानानें मिळविणारे नरहरपत हे बहुधा मुरूडचे पहिलेच ग्रामस्थ असावेत. मॅट्रिकच्या परीक्षेच्या वेळीं आजारपणामुळें पहिला क्रमाक चुकला नसता तर मॅट्रिकपासून बी. ए. ( १९३२ ) पर्यंतच्या सर्व परीक्षांत पहिले, हा बहुमान त्यानीं मिळविला असता. बी. ए. नंतर पुढील शिक्षणाकरिता इंग्लंडला प्रयाण तेथें ते लंडन विश्वविद्यालयाची गणित विषयांतली एम्. ए ची परीक्षा सन्मानानें पास झाले ( १९३४ ). परत आल्यावर १९४६ पर्यंत सर परशुराम भाऊ कॉलेज व रामनारायण रुईया कॉलेज यांत गणिताचे प्राध्यापक म्हणून काम केलें. इ. स. १९४६ मध्यें ते टाटा इन्स्टिट्यूट ऑफ् फंडामेन्टल रिचर्स संस्थेंत रजिस्ट्रार म्हणून लागले. इ स. १९५२ मध्यें सर दोराब टाटा ट्रस्टमध्यें ग्रामीणविकास योजनेकरितां खास अधिकारी म्हणून नेमणूक झाली. इ. स. १९५६ पासून याच ट्रस्टचे चिटणीस म्हणून काम पाहूं लागले. चिटणिशीचें काम पहात असतानाहि ते ट्रस्टच्या ग्रामीण विकास योजनेचे खास अधिकारी म्हणून काम पहात आहेतच. ट्रस्टच्या उदार मदतीच्या साहाय्यानें पाच दहा खेड्यांचा विकास करण्याचे बहुमोल कार्य करण्यात ते सध्या गुंतलेले आहेत.

# सामाजिक कार्यकर्ते

## कै. रा. बा. गानू

रामचंद्र बाळाजी गानू ( इ. स. १८७७-१९१८ ) साठीच्या मागेपुढें असलेले अनेक ग्रामस्थ, आपण समाजसेवेची दीक्षा रामभाऊ गानू यांच्यापासून घेतल्याचें सांगतात. आपल्या अल्पवयातील त्यांची कामगिरी ग्रामस्थांच्या नजरेंत भरण्यासारखीच

होती वडील लवकरच वारलेले व घरची गरिबीची परिस्थिति त्यामुळें त्यांच्या आईच्या मनातून रामभाऊना भिक्षुकीचेंच शिक्षण द्यायचें असें ठरलें होतें. पण आपल्या एकुलत्या एक मुलाचा इंग्रजी शिक्षणाचा दृढसंकल्प ऐकून त्यांच्या आईनें त्यांना दापोलीच्या हायस्कूलमध्यें शिकायला ठेवलें. टिळक-आगरकरांच्या उदाहरणाचाच मनावर परिणाम होऊन त्यानीं मॅट्रिक झाल्यावर सरकारी नोकरी करायची नाहीं असें ठरविलें.

नारोपंत दामले यांची शाळा बंद पडल्यानंतर रामभाऊंनीं इंग्रजी शिक्षणाचे वर्ग चालू केले. होतकरू मुलाना उत्तेजन देऊन, गरीब मुलाना विनामूल्य किंवा अल्प फी घेऊन त्यानीं मार्गाला लाविलें. आर्थिक आणि शारीरिक आपत्तीशीं झगडत असतांनाच मुरूडच्या सार्वजनिक जीवनांत चैतन्य ओतण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. नारायणाच्या देवळाची दुरुस्ती, नारायण फंडाची स्थापना, मुलांमध्यें व्यायामाबद्दलची आस्था उत्पन्न करण्याचे प्रयत्न वगैरे गोष्टींबद्दल त्याची अद्यापहि आठवण काढली जाते. शेतीची व बागायतीची सुधारणा व्हावी याकरिता त्यांचे अखंड प्रयत्न चालू होते. काथ्या, तपकीर, प्राजक्ताच्या फुलाच्या देठापासून रंग वगैरे अनेक कुटीरोद्योग त्यानीं सुरू केले होते. अल्पवयात त्याना मृत्यूनें गाठलें नसतें तर त्यांनीं मुरूडवर आपला चिरस्थायी ठसा उमटविला असता.

## श्री. रामचंद्र शंकर दीक्षित

याचा जन्म २६ ऑगस्ट १८७६ रोजीं रवदडा येथे झाला. श. ना. दीक्षितांसारखे वडील, पण त्यांच्या अकाली झालेल्या मृत्यूमुळें रामभाऊंना आर्थिक व कौटुंबिक अडचणीतून मार्ग काढावा लागला नोकरीचीं पहिलीं दहबारा वर्षें सामान्य शिक्षक म्हणून हायस्कुलात काढल्यानंतर त्यांची इन्स्पेक्टिंग विभागात नेमणूक झाली, हें काम सतरा वर्षे करून ते १९३१ सालीं सेवानिवृत्त झाले. यानंतर त्यांच्या समाजकार्यास सुरुवात झाली, तें त्यांचें कार्य मृत्यूपर्यंत ( २९ ऑगस्ट १९५६ पर्यंत ) चालू होतें. पुणें शहरातील व जिल्ह्यांतील खाजगी शिक्षणसंस्थाच्या अडचणी लक्षात घेऊन त्यांस मार्गदर्शन करण्याचें काम त्यानी सेवानिवृत्तिनंतर सुमारें २५ वर्षें केलें. त्याचा खास संबंध खालील संस्थाशी आला. हुजूरपागा हायस्कूल, सेवासदन, हिंगणें स्त्रीशिक्षण संस्था, डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटी व रास्ता पेठ एज्युकेशन सोसायटी.

याशिवाय १९१८-१९ साली नगर जिल्ह्यात २५० खेड्यात जातीनें फिरून, आंकडेवार माहिती गोळा करून, प्राथमिक शिक्षणावर होणाऱ्या पैशांतील ६५ टक्के पैसा फुकट जातो हे रामभाऊंनी दाखवून दिलें. आणि फिरतीं वाचनालयें व Continuation classes चालू केले तरच हे पैसे सार्थकी लागतील हें सप्रयोग सिद्ध केलें. तसेंच हल्ली मूलोद्योगामार्फत शिक्षण द्यावें अशी घोषणा होत आहे, परंतु रामभाऊंनी १९२५।२६ सालीच लोणी काळभोर जवळ वाक येथें शेतीमार्फत व तळेगाव ढमढेरे येथें सूतकताई व विणकाम यांचेमार्फत शिक्षण देण्याचा प्रयोग सुरूं करून यशस्वी करून दाखविला होता. हें त्यांनी केलेलें कार्य आजहि मार्गदर्शक होत आहे.

## श्री. नरहरी काशीराम वराडकर

प्रेमळ व कष्टाळु अशा आईबापांच्या पोटीं नरहरीशेट याचा जन्म इ. स. १८९८ सालीं आसूद येथें झाला. याचे वडील प्रथम परचुरे यांच्याकडे नोकरी करीत. पुढें ते तंबाकु, खोबरें, हरभरे वगैरे जिनसा शेतकऱ्याना देऊन त्यातून सुपारी खरेदी करूं लागले. यांतूनच ते पुढें सुपारीचे मोठे व्यापारी बनले. वडिलांच्या या उद्योगांचा नरहरीशेटवर खोल परिणाम झाला.

त्याचें शिक्षण मराठीं पांच इयत्ता शाळेंत, पुढें तीन इयत्ता इंग्रजी कै. रामभाऊंच्या इंग्रजीच्या वर्गांत व त्याच्या पुढचें शिक्षण दापोलीच्या शाळेंत झालें. सहावीची परीक्षा झाली व मुरूडला वडील बंधु आजारी पडले त्यामुळें त्याना शिक्षणाला रामराम ठोकून मुरूडचें किराणा मालाचें दुकान संभाळावें लागलें. दापोलीच्या शाळेंत असतांना त्यानी ड्रॉईंगची इन्टर मिजिएटची परीक्षा दिली होती.

त्यानीं इ. स. १९१७ मध्यें दुकान चालवायला घेतलें. दुकानावर कर्जाचा बोजा होता. तो पाच सहा वर्षांत त्यानीं फेडला. या कामीं त्यांना श्री शामराव व कै. नारायण बाळाजी मुरूडकर याची मदत व सल्ला हीं फार उपयोगाचीं ठरलीं. सुरुवातीलाच या कर्जाला तोंड द्यायला लागल्यामुळें पुढें हें कर्ज त्यांना बहुमोलाचें मार्गदर्शक झालें.

या उमेदवारीच्या काळांत चांगल्या नोकऱ्या चालत आल्या होत्या त्या त्यानीं विचारातीं बाजूला सारल्या. धंद्याला सपूर्ण वाहून घ्यायचें असें ठरवून यापुढें कित्येक वर्ष पहाटें कोंबडा आरवताच कामाला सुरुवात करावी, दिवसभर वणवण करावी, सुपारी खरेदी, ती सोलणें निवडणें व गलबतावर पाठवणें याप्रमाणें क्रम चालविला,

या शिवाय या सुपारीच्या व्यापाराला मदतधंदा म्हणून किराणा मालाचें दुकान चालवणें या सर्व श्रमावरून त्यांच्या उत्साहाची व काम करण्याच्या ताकदीची कल्पना येईल पुढें घरीं आजारपण, माणसाचें बळ नाहीं म्हणून किराणा मालाचा व्यापार बंद केला. सध्या ते फक्त सुपारीचा व्यापार करतात

नरहरीशेट यांचें एक वैशिष्ट्य उठून दिसण्यासारखें आहे. आपल्या शिक्षणाचा उपयोग ते आपली शेती सुधारण्याकडे व इतराना त्या बाबतींत मार्गदर्शन करण्याकडे करतात. ग्रामस्थानीं लक्ष द्यावें इतक्या महत्त्वाचे त्यांचे शेतकी व बागायतीचे प्रयोग चालूं आहेत

## सीताराम नारायण मुरूडकर.

सीतारामपंत ( ज. १८८४ ) यांचे वडील हे सोन्यावरील कामाचे उत्तम कारागीर म्हणून प्रसिद्ध होते. जेमतेम सही करण्यापुरतें त्यांनें लिपीचे ज्ञान पण त्यांची सचोटी व कला यामुळें मुरूडच्या थोर मंडळींचा घरोबा होता. घरोब्याच्या कर्वे, मंडलिक वगैरे मंडळींचा सीतारामपंतावर चांगला परिणाम झाला. आपणहि शिक्षण घेतलें पाहिजे, आपणहि श्रम घेतले पाहिजेत हें त्याच्या मनावर बाळपणींच बिंबलें त्यामुळेंच गणित कच्चें असतांनाहि त्यानीं गणीताचा पिच्छा पुरवून पहिल्याच वर्षी स्कूल फायनलची परिक्षा पास झाले ( इ स. १९०२-३ ) मराठी चार इयत्ता व इंग्रजी तीन मुरूडलाच झाल्या पुढें कांहीं दिवस ते मुरूडहून दापोलीच्या शाळत ११ वाजता हजर होत व सध्याकाळीं परत मुरूडला !

इ. स. १९०८ सालीं ते डिस्ट्रिक्ट प्लीडरची परीक्षा पास झाले, व लगेच दापोली येथें त्यानीं वकिलीला सुरुवात केली सुरुवातीच्या उमेदवारीच्या काळात त्याना श्री. करदीकर वकील व कै. चौकर वकील याची सहानुभूति होती. हे दोघेहि मोठे अभ्यासू वकील होते. ते आपलें कायद्याचें ज्ञान आजतागायत ठेवण्याचा प्रयत्न करीत. या त्यांच्या पद्धतीचा स्वीकार सीतारामपंत यानीं केला वकीलींत मिळालेला पैसा ते कायद्यावरचीं पुस्तकें, अहवाल वगैरे साहित्य खरेदी करण्यात करूं लागले. या सर्व अभ्यासाचा परिणाम दहा-बारा वर्षांत चागला दिसूं लागला पक्षकार व खुद्द न्यायाधीश हे सीतारामपंताकडे एक बुद्धिमान् तरतें ज्ञान असलेला व प्रामाणिक वकील म्हणून पाहूं लागले. सीतारामपतांवरील पक्षकाराच्या विश्वासाचें एक मजेदार उदाहरण आहे. एकदा एका जुन्या वकीलांना कामाकरिता बाहेर गावीं जावें लागलें. त्यानीं आपलें काम सीतारामपंताकडे सोपविलें. या जुन्या वकीलाच्या

विरुद्ध पक्षाचे वकील हेहि अचानक बाहेरगावीं गेले जातांना त्यांनीं कोणावरच काम सोपविलें नाहीं. केस उभी राहिल्यावर सीतारामपंतांच्या विरुद्ध कोणी वकील नाहीं अशी स्थिति आली. केस पुढें ढकलण्यास न्यायाधीश तयार होईनात. या केसमध्यें तोंडी पुराव्याचा संबध नव्हता फक्त कायदा कानू व अर्ग्युमेंट करायचें होतें. सितारामपंतानीं दोन्ही पक्षाचे अर्ग्युमेंट आपण करायला तयार आहोंत म्हणून सांगितलें. पक्षकाराचा एवढा विश्वास कीं त्याला त्यानीं ताबडतोब संमति दिली. प्रकृति अस्वास्थ्यामुळें इ. स. १९५० मध्यें त्यानीं धंदा सोडला.

## हरी विष्णु कोल्हटकर

कै. कोल्हटकर हरि विष्णु, बी. ए. एल्‌एल्. बी वकील, जळगांव ( पू. खा. ) जन्म कुर्ला येथें सन १८८४. वयाच्या १८ व्या वर्षीं बी. ए.; जी. ई. इन्स्टीट्यूट, दादर येथें हेडमास्तर. सन १९१० मध्यें एल्‌एल् बी. जळगाव येथें वकिलीचा व्यवसाय. लो. टिळकांचे निस्सीम भक्त. सार्वजनिक सेवेची आवड. कॉंग्रेस पक्षावर दृढ निष्ठा. टि. स्व. संघांत पुढाकार. सन १९३० मध्यें मुंबई कायदे-मंडळात निवडून आले. जळगाव नगरपालिकेचे बरेच वर्षे सभासद. व एक वर्ष उपाध्यक्ष. जळगाव व. वा. लायब्ररीचे तसेंच पू खा. पोस्टल युनियनचे बरेंच वर्षे अध्यक्ष वकिलीच्या व्यवसायांत नावलौकिक व पैसा मिळविला. खानदेश बार एसोसिएशनचे चिटणीस. प्रकृतीचे कारणामुळें सन १९४५ पासून सार्वजनिक कामातून निवृत्त. ता. ५-५-१९४९ रोजीं दादर येथें निधन.

## दत्तात्रेय मोरेश्वर परांजपे

चिकाटी व आंतरिक तळमळ हीं कसल्याहि प्रतिकूल परिस्थितीवर मात करतात, हें तात्यासाहेब परांजपे यानीं आपल्या उदाहरणावरून दाखवून दिलें आहे तात्या-साहेबांच्या ( ज. ७-१२-१९०० ) मराठी पाच इयत्ता झाल्यावर इंग्रजी चार इयत्तांचें शिक्षण मामा कै रामभाऊ गानू यांच्या खासगीं वर्गांत घेतलें. पुढें कै. बाबासाहेब कोल्हटकर ( त्या वेळचें छ ल. मुलांच्या शाळेचे हेडमास्तर, व मुरूड ग्रामस्थ ) याच्या घरीं काम करून व शाळेंत जाऊन मॅट्रिकपर्यंतचें शिक्षण पुरें केलें (१९१८) यापुढचें शिक्षण एकीकडे नोकरी व एकीकडे महाविद्यालयीन शिक्षण याप्रमाणें बी. ए. एल्‌एल्. बी. पर्यंत १९२५ सालीं पुरें झालें.

इ. स १९२६ साली त्यानीं पाचोऱ्याच्या फौजदारी कोर्टांत वकिली करायला सुरुवात केली. आज ३२ वर्षें ते तेथें वकिली करीत आहेत पण वकिलापेक्षाहि एक विशेष व्यक्ति म्हणूनच त्यांना तेथें ओळखतात याचं कारण गेल्या तीस वर्षांतील निम्याहून जास्त वेळ व शक्ति ही सार्वजनिक कामाकरिता वाहिलीं आहेत. सार्वजनिक कामाचे धडे त्यांनीं त्याचे मामा रामभाऊ गानू, आश्रयदाते बाबासाहेब कोल्हटकर–दादरच्या सार्वजनिक जीवनाचे आधार व मामेसासरे वि. वा. सोमण वकील याच्याकडून घेतले. पाचोरा येथील सार्वजनिक जीवनाला आलेलें नीटस आणि आधुनिक स्वरूप हें तात्यासाहेबाच्या कर्तृत्वाचें फळ होय. तेथील क्लब लायब्ररी, विठ्ठल देवस्थान याचा जीर्णोद्धार केलाच, शिवाय पाचोरा तालुक्यातील माध्यमिक शिक्षणाची अडचणहि दोन ठिकाणीं हायस्कूलें मजबूत पायावर उभी करून त्यानीं दूर केली. संस्थाकरितां देणग्या मिळविण्यात तात्यासाहेबाचा हातखंडा आहे. वरील निरनिराळया कारणांकरिता म्हणून त्यांनीं लाखानीं देणग्या मिळविल्या आहेत.

## रा. ग. साटले

रामभाऊ यांचा जन्म ( १९-७-१९०२ ) कुणबी कुळात झाला असल्यामुळें दुसऱ्यांच्या जमिनी कसणें व मोलमजुरी करणें हाच वारसा त्यांच्याकडे आला होता. घरची अतिशय गरिबी असतांनाहि वडिलानीं त्या काळात उल्लेखनीय असें ७ वी पर्यंतचें शिक्षण दिलें. रामभाऊंनीं पंधरा रुपयावर तीन वर्षे शाळाखात्यात नोकरी केली. त्यावर भागेना म्हणून मुंबईसहि दोन तीन वर्षें नोकरी केली. नोकरींतील अपुऱ्या वेतनाला कंटाळून पुढें त्यांनीं वीस वर्षें लोण्याचा व्यापार केला. या काळांत ते तिल्लोरी कुणबी समाजाचे कार्यकर्ते व खजिनदार म्हणून काम करीत असत. समाजाचे ज्ञातिगृहाकरिता रु. ५०० ची उदार देणगी त्यानीं दिली इ. स. १९४९ सालीं व्यापार सोडून मुरुडला कायमचे राहायला गेले. तेथें त्यानीं पुनः आपला वडिलार्जित शेती व्यवसाय सुरू केला आहे. १९५१–५५ या काळात ते रत्नागिरी जिल्हा लोकल बोर्डाचे सदस्य होते. त्या काळात त्यानीं आसूद–मुरुड दुरुस्तीकडे बोर्डाचें लक्ष वेधविले. कुणबी समाजांत सुधारणा करण्याकरितां ते झटत असून लग्नसमारंभातील खर्चावर आळा घालण्यात त्यांनीं यश मिळविलें आहे

# भिकोबा गोळे



म. अण्णांच्या खालोखाल वयोवृद्ध कुणबी ग्रामस्थ. कष्ट करण्यात सर्व जन्म गेला. भिकोबांच्या अविरत श्रमांची कहाणी कशी सांगणार.

# कै. भार्गव हरी दामले

## एक थोर शिक्षक

श्री. भार्गवराव दामले यांचा जन्म सन १८६३ आणि मृत्यु सन १९१९ मध्यें झाला. थर्ड इअर ट्रेन्ड झालेले मुंबई म्यु शाळाखात्यांत त्यांची तीस वर्षें नोकरी झाली. ते हाडाचे शिक्षक होते. मुलाच्या विश्वांत तन्मय झालेल्या या थोर शिक्षकांचे विद्यार्थी आज साठीं–सत्तरी उलटलेले असतील वृद्ध झालेले हे विद्यार्थी ' दामले मास्तरां 'च्या गोड स्मृति साश्रु नयनांनीं सांगतांना आजहि सांपडतात. अंगीं मोठी विद्वत्ता नसतानाहि माणूस आपल्या आयुष्याचें अव्यभिचारी निष्ठेनें कसें सोनें करूं शकतो याचें ' दामले मास्तर ' हें उत्कृष्ट उदाहरण आहे.

गाडा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 23822 दि: ...
क्रमांक L.89.2...... नों: दि: ...

## मुरुड येथील महत्त्वाचीं स्थळें

१ सिद्धपुरुषाची समाधि व पादुका,
२ 'डुन्या' (दक्षिण मढी),
३ 'वादळा' (गोड पाण्याचा झरा),
४ गारबी ( „ „ „ ),
५ मढी ( „ „ „ ),
६ कव तलाव,
७ मराठी शाळा,
८ महर्षी कर्वे यांचा पुतळा.

## मुरुड येथील लोकवस्तीचीं ठिकाणें

१ मंडलिक (खालची) पाखाडी
२ बहिरीचा कोंड.
३ कर्वे (वरची) पाखाडी.
४ भंडारवाडा.
५ सोनारवाडा.
६ नवानगर.
७ बोवणे आळी.
८ ताबडीचा कोंड.

## मुरुड येथील देवस्थानें

(दक्षिणेकडून क्रमानें)

१ बहिरीचें देऊळ.
२ उत्तराभिमुख नारायणाचें देऊळ.
३ गणपतीचें देऊळ
४ सिद्धेश्वराचें देऊळ.
५ पूर्वाभिमुख लक्ष्मीनारायणाचें देऊळ.
६ स्वयभू देवीचें देऊळ.
७ गणपतीचें देऊळ.
८ श्री दुर्गादेवीचे देऊळ.
९ नागलेश्वराचें देऊळ.
१० श्रीरामाचें देऊळ
११ बनकी.
१२ शून्यालय (मशीद).
१३ क्षेत्रपाळ.
१४ मारुतीचें देऊळ.
१५ गणपतीचें देऊळ.
१६ महादेश्वराचें देऊळ.
१७ मारुतीचें देऊळ

## परिशिष्ट

# ऐतिहासिक साधनें

## प्रास्ताविक

पुढें मुरुडच्या इतिहासाला उपयुक्त असे कागद दिले आहेत. त्यापैकीं लेखांक १,२,४,८,९,१०,११ हे वैशंपायन-दप्तरांतले आहेत. लेखांक ३ हा श्री. दा. म. पंडित याकडील आहे. ले ५,६,७ हे राजवाडे खंड २० मधील, व ले. १२ हा मुरुडच्या शाहीरानें रचलेला पोवाडा परंपरेनें चालत आलेला उतरून घेण्यात आला आहे.

लेखांक १ : ही मुरुडची बखर आहे. वैशंपायन-दप्तरांत दोन बखरी मिळाल्या. एक संपूर्ण, ती प्रकरण दोन यात दिली. भाषाशैलीवरून व लेखनपद्धतीवरून ही बखर सतराव्या शतकातली ठरते. वैशंपायन बखर दोन, ही अपुरी आहे. पण मंडलिकानीं प्रसिद्ध केलेली व ही बखर या जवळ जवळ सारख्याच आहेत. त्यामुळें अपुरी वैशंपायन-बखर ही मंडलिक बखरीवरून पुरी करून येथें दिली आहे. या दोनही बखरींची ( मंडलिक प्रत व अपुरी वैशंपायन प्रत ) तुलना करून अनेक निष्कर्ष काढता येण्यासारखे आहेत. वैशंपायन-प्रतीच्या अखेरीस "करवा माहाजन याणे चोहोगांवीचे व आपले गावचे शूद्र आणवावे" हा उल्लेख आला आहे. त्यावरून कर्वे माहाजन झाल्यानंतर या प्रतीचें लेखन झालें हें उघड आहे ( म्हणजे इ. स. १७६० चा सुमार ) मंडलिक प्रतींत कर्वे यांचा उल्लेख नाहीं. तसेंच मंडलिक प्रतींत हिरे जोशी याचा उल्लेख आला आहे तो वैशंपायन प्रतींत नाहीं. यावरून मंडलिक प्रत जुनी ठरते. आणखीं काहीं सामाजिक बाबतींत निष्कर्ष निघूं शकतील. पण तें वेळाचें काम आहे तेव्हा सध्यां एवढेंच पुरे.

लेखाक २ . इ स १६३५ च्या कागदाची नकल आहे. इ स. १६२४ च्या मलबारी दग्याचे पडसाद यात जाणवतात नवीन लागवडीला यावनी सरकारकडून उत्तेजन मिळत असे हें त्यावरून दिसतें. पराजपे याना १६३५ च्या

आधींपासून मडलिक म्हणत हें दिसतें. सध्यांच्या काळात दुर्बोध होण्याइतकी फारशी भाषेची छाप या कौलनाम्यावर पडलेली दिसते

लेखांक ३ : हा कागद पंडितांकडून मिळाला. कान्होजी आंग्रे यांचा अस्सल कागद सरकारी दप्तरखान्यांत. त्यावरून सरकारकडून १८४२ सालीं दिलेल्या अस्सलबरहुकूम नकलेची ही नकल आहे. मुरुडच्या इतिहासात याचें महत्त्व अनन्यसाधारण आहे.

लेखांक ४ : याचा उल्लेख यथास्थलीं आला आहे.

लेखांक ५, ६, ७. नारो कृष्ण टाळसूरकर याचा व त्याचे बंधु, पुतणे याचा मुरुडशीं निदान पन्नास वर्षें संबंध होता. मुरुडला त्यांचें ठिकाणही होतें त्यानीं शिवाजी, संभाजी व राजाराम यांच्या कारकीर्दींत मोठी कामगिरी बजावली होती. कुलकर्णी वतनाच्या कागदात आलेले जोशी हेच होत. या सर्व कारणांमुळें राजवाडे खंड २० मध्यें छापलेले हे कागद येथें घेतले आहेत

लेखांक ८ : हा अस्सल कागद वैशंपायन दप्तरांत कसा आला याचें आश्चर्य वाटतें. ज्या वेळेस कृष्णाजी चासकराकडून अधिकार काढून ते बाळाजी बाजीरावाकडे ( नानासाहेब पेशवे ) दिले तेव्हा तो अवघा बारा तेरा वर्षांचा होता. सर्व कारभार वासुदेव जोशी मुरुडकर ( वैशंपायन यांचे शेजारी ) याजकडे होता. त्यामुळें हा कागद कदाचित् इकडे आला असावा.

लेखांक ९ : तुळाजी आंग्रे याच्या कारकीर्दींत अनेक चित्पावन परागंदा झाले होते. त्यापैकींच शंकरभट वैशंपायन होत. हें अभयपत्र जरी मिळालें तरी शंकरभट आणखी आठ वर्षें कोकणात आला नाहीं. तुळाजीचा पराभव झाल्यावर इ. स. १७५६ मध्यें शंकरभट दापोली येथें आला. कागद अस्सल आहे.

लेखांक १० : केशवभट जोशी याची ही हकीकत सदाशिवभट वैशंपायन यानें १७६४ मध्यें लिहिली आहे मुरुड येथील अनेक घडामोडींचा उल्लेख यांत आला आहे. "त्या समई प्रातात कोणी ऐवजदार असेल त्याचा सत्कार करून त्यापासून द्रव्य घ्यावें" या एका नवीनच उजेडांत आलेल्या शिवाजीच्या स्वभाव-विशेषाकडे लक्ष वेधतें.

लेखांक ११ : हा १७७६ मधला कागद आहे. यात मुरुडच्या इतिहासातील अनेक सामाजिक व राजकीय घटनाचा उल्लेख आला आहे. खार जमीन लागवडीस

आणण्याच्या प्रयत्नाचा यांत उल्लेख आहे. काथ्याचा धंदा गावात बऱ्याच प्रमाणांत चाले.

लेखांक १२ : हा पोवाडा मुरुडला होळीच्या उत्सवाचे वेळीं कुणबी ग्रामस्थ तुणतुण्यावर म्हणून दाखवितात. पोवाड्यात आलेल्या व्यक्तींच्या उल्लेखांवरून हा पोवाडा अठराव्या शतकाच्या अखेरीस रचला गेल्याचें दिसतें. दुर्दैवानें या पोवाड्याच्या कर्त्याची कांहींच माहिती मिळत नाहीं. कवीचा मुरुडबद्दल अभिमान ओसंडून वाहात असलेला दिसेल. हा कवी ब्राह्मण नव्हे. पण तो बहुश्रुत असावा हें सहज लक्षात येण्यासारखें आहे.

लेखांक १

श्री

हकीकत समस्त ग्रामस्त यांहीं लि॥ क॥ मुरुड येथील आपले गावीची मानमानी स्थिति सिधाने कोणे प्रकारे कोणकोणी कैसी वर्तणुक करावी त्याची हकीकत सर्वांनी मिलोन लि॥ (लिहिली) असे सिधपुरुष नागर ब्राह्मण बंधु त्रिवर्ग नागर देशाहून देश पाहात पाहात दक्षण देसास आले. प्रथम येता दिव्यास त्रिवर्ग येऊन तेथे ग्रामस्थापनेस स्थल योजून दिवाकरभट सिद्धपुरुष यांसी गावाची रचना करावयासी नेमून देऊन गगाधरभट व पदमाकरभट उभयेता आसूद येथील कशेडिका क्षेत्र येथें येऊन खाली समुद्रतीरी जंगलजागा बहुत चागला पाहून चितांत आणिले की येथे ग्रामाची रचना करावी. येसे पाहून आसूद ग्रामास आले. तेथे ग्रामस्तास पुसोन गोहागर येथे उभयेता व बरोबरी सिष्य वैशंपायन येसे त्रिवर्ग गोहागरास गेले. तेथे जाऊन तो जागा पद्माकर भट सिधपुरुष यासी गावाची रचना करावयांसी नेमून देऊन आपण व सिष्य येसे उभयेता फिरोन आसूदास वास्तव्य करून जंगल मोडावयासी काम चालीस लाविले जंगल तोडिता तोडिता गावाचे मध्यभागीं वडाचा वृक्ष थोर होता तो सिद्धपुरुषाचे विचारे तोडावा येसे चितात आणून बराबरी दहावीस ब्राह्मण समागमे घेतले होते तेव्हां वडाचा वृक्ष तोडावयासी लागले ते समइ घाव घालिता दातार ब्राह्मण मृत्य पावला. तेव्हा सिधानें चितात पाहिले तो यामध्ये पिशाचं बहुत आहे, व वटवृक्षात कोणी देवता आहे. तेव्हां त्ये देवतेची प्रार्थना करून पिशाचे याचे बधारण करउन ब्राह्मण जिवंत करविला. केल्यानंतरी सर्व जंगल मोडून क्षेत्र सिद्ध केल. त्याजवर गगाधरभट सिधपुरुष व सिष्य वेशपायन येसे कर्नाटक प्राती जाऊन गंडकी सीलेच्या मुहूर्ती घेऊन आल त्यासी मुहूर्ती आपणाजवल ठेऊन व येक मुहूर्ती गोहागरास पाठविली. येक दिव्यास पाठविली. येथील मुहूर्तींची स्थापना करावयासी प्रारंभ केला तेव्हा वैशंपायन याजकरवी अनुष्ठान स्थापनेचे करउन देवस्थापना केली. पुढें गावी वतनदाराची स्थापना करिता त्ये समई प्रथम वैशंपायन यासी सर्व ग्रामातील उपाध्यपण व धर्माधिकार येसे दोनी देऊन पुढे आपला मानपान वडीलपणाचा आहे तो देऊन आपलें पुत्रत्व त्या करावे आणि श्री चे देवलांतील श्रीचे पूजेचा अधिकार दातार यासी दिल्हा. आणि आपले क्षेत्री गोऱ्यारास स्थल नाही तेव्हा शेलार वसींचा जालंधर राजा जालगावास होता त्याजवळ सिद्धपुरुष गंगाधरभट जाऊन आपल्यास स्थल मागितले. तेव्हा त्याणे आसूद व फाणसूं व

गिम्हवणे व करदे यां चोहो गावीची भूमी त्या लोकाजवळ राज्याने वतन मागोन सिधांस दिली. यामध्यें कोणाची सिधाखेरीज स्वांमित्व दुसरियाचे नाही येसे करून राज्याची आज्ञा घेऊन आपले क्षेत्री आले. आणि चतुः सीमा व जागजागा विशाव्यरक्षणास जागजागा देवदेवस्थाने स्थापिली आणि दक्षणेस भद्रागिरी पर्वत, उत्तरेस चंद्रागिरी पर्वत, पूर्वेस आसवं नदी, पश्चमेस समुद्र चतुसीमेमध्ये देवब्राह्मणाची दक्षणेकडून स्थापना करीत चालिले. नदीचे आलिकडे क्षेत्रुपाल स्थापिला. त्याचे पश्चमेकडून उभा मार्ग केला. आणि गडदू तेथे स्थापिला आणि आपले स्थलात निर्गुंडा देवी स्थापिली. आपले उतरेस बाळ ब्राह्मण याची स्थापना केली, आणि त्यासी वर्तकपणाचा अधिकार दिल्हा त्याचे उतरभागी मार्गाचे पूर्वभागी श्री नारायेण याची स्थापना केली आणि पूजेस भाग्या ब्राह्मण स्थापिला. त्यासी स्थल नेमून दिल्हे त्याचे पूर्वभागी बहिरव देव स्थापिला नारायणाचे उतरेस मार्गाचे पश्चमेस रुद्रभूमीस जावयासी मार्ग ठेविला. मार्गाचे उतरेस वैशंपायन सिष्य स्थापून त्यासी उपाध्यपण व धर्माधिकार ग्रामाचे दिल्हे त्याचे उतरेस नेना ब्राह्मण या नामेकरून स्थापिला. त्यासी महाजनकीचा अधिकार सांगितला. त्याचे उतरेस मार्गाचे पूर्वेस पर्वताकडे जावयासी मार्ग ठेविला. त्याचे उतरेस तेथून पुढे मार्गाचे पश्चमेस श्री गंगानारायेण यासी स्थापिला. वरदाक्षायणी स्थापिली. आणि त्याचे पूजेस पराजप्या ब्राह्मण स्थापिला. त्याचे उतरेस क्षेत्रुपाल स्थापिला त्याचे उतरेस सुतार ब्राह्मण स्थापिला. त्यासी वर्तकपणाचा अधिकार दिल्हा. त्याचे उतरेस प्रथम ग्रामाचे मध्येभागी श्रीची स्थापना केली. श्रीचे पूर्वभागी चोहो देवाची स्थापना केली. ( स्थल उतरेस नेमिले ) त्याचे पूर्वभागी महारुद्र. त्याचे संनिध क्षेत्रपाल. पलीकडे पूर्वभागी कावलेश्वर श्रीचे संनिध शुभा देव. श्रीचे पश्चमेस क्षेत्रुपाल. शुभा देवीचे संनिध दातार ब्राह्मण, स्थापिला त्यासी पूजेचा अधिकार दिल्हा. त्याचे उतरेस करवा ब्राह्मण स्थापिला. माहाजनकीचा त्यासी अधिकार दिल्हा. त्याचे उतरेस कोपरकर ब्राह्मण स्थापिला. त्यासी वर्तकपणाचा अधिकार दिल्हा त्याचे उतरेस जोशी ब्राह्मण स्थापिला. त्याचे पुढे मार्गाचे पश्चमेस रुद्रभूमीस जावयासी व पूर्वेकडे जावयासी मारग ठेविला. मार्गाचे उतरेस व उभ्या मार्गाचे पूर्वेस श्री नागलेश्वर स्थापिला. त्याचे पश्चमेस चंद्रभराडी स्थापिली. तिचे उतरेस धारप ब्राह्मण स्थापिला त्यासी वर्तकपणाचा मान दिल्हा. नागलेश्वराचे पूर्वेस सोनार स्थापिला. त्याचे पूर्वेस क्षेत्रपाल स्थापिला. धारपाचे उतरेस गडदू सीमा

करून ठेविली. गडदूचे पश्चमेस बनची या ( उत्रारादेव ? ) नावे करून देवी स्थापिली. तिचे उतरेस नदीपलीकडे चंद्रागिरीचे खाली समुद्रतीरी सीमा देव स्थापिली तिचे पूजेस सोनार स्थापिला. याप्रमाणे देव देवस्थाने व अनखी क्षेत्र-पाल व देवस्थले स्थापिली. अनखी वतनदार जागचे जागा स्थापिले. आणि चितात पाहिले तो पुढे यवनी राज्य होईल याजकरिता गावाचे सेवडीस शून्यालय बांधिले शून्यालयाचे पूर्वपश्चमभागी गडदूपलीकडे यवनास स्थळ ठेविले व इतर जातीस ठेविले यानंतरी वतनदाराही फाल्गुन वद्य अमवास्येपासून कोणे रवितीने वतनदारानी चालावे त्याचा तपशील अमवास्याचे दिवसी श्रीचे येथून वसन्तनवरात्राचे सर्वास गावामध्ये आमत्रण दातारानें करावे. चैत्र शु॥ प्रतिपदेचे दिवसी श्रीच्या देवलात सडासंमार्जन घालून ग्रामस्तास बसावयासी दातार याणे घालावे घातल्यानतरी देवीस स्नान द्यावे. उदक श्रीचे द्वारीच्या दोणी भरून पाद्य आचमनास ठेवावे वैशंपायेन उपाध्ये याही प्रातःकाली श्रीचे देवळात जावे. गेल्यानंतर दातार याणे बसावयासी द्यावे. आणि पूजासाहित्य घेऊन दातार याणे देवीची पूजा करावयासी यावे. आल्यानंतरी दातार याणे पूजा करावी. आणि वैशंपायन याही पूजा व श्रीसंनिध पुराण साधावे. आणि ग्रामस्त श्रीचे देवली आलियाजवरी ज्याचे घरी मृत्य पावले असेल त्याचे घरी दाहापाच ग्रामस्त व माहाजन वर्तक उपाध्ये जोसी व दातार याही जाऊन त्यासी बहुमान करून वाजत गाजत श्रीचे देवलास आणावे आणित्या नंतरी सर्वांही शुभादेवीच्या देवलामध्ये बसावे बसल्यानंतरी जोसी याणी देवीच्ये संनिध उभे राहोन पंच्याग श्रवण सर्वास करावे. केल्यानंतरी दातार याणे गंधविडा द्यावा. दिल्यानंतरी वैशंपायन याही श्रीचे संनिध बसोन सिद्धपुरुषाची परिभाषा आमंत्रणाची आहे ते लिखित वाचावे आणि ते दिवसी मुरडीस पाठवावे. वाचल्यानंतरी दातारानें गंधविडे दक्षणा द्यावी. दिल्यानंतरी हरिकथा करावी. जाहालियानतरी सर्वास गंधविडे देवीच्या भाडारा ईनामलीहून घ्यावे. दिलियानंतरी सर्वांही घरोघरी जावे. सायंकाली पुराणास व हरिकथेस ग्रामस्त गेलियानंतरी दातारानें बसावयासी व पुराणास पाटसमई ठेवावे हरिकथा जाहालियावरी गंधविडे प्रथम वैशंपायेन यासी द्यावे व जोसी यासी द्यावे व हिन्यास द्यावे, व माहाजनवर्तक यासी द्यावे सर्व सभेस द्यावे याप्रमाणें त्रतीया पर्यंत वर्तणुक करावी. त्रतीयेचे दिवसी वाजंत्री गुरव याणे सीमादेवीचे चैत्रेचे आमत्रण गांवामध्ये सर्वांस सोनार याणे आमंत्रण करावे. ( कारभारी याहीं लिखि-

तास कागद वैशंपायनाजवळ द्यावे. त्याही लिखितें लेहून द्यावी. कारभारी याही गावगना पाठवावी ) चतुर्थीचे दिवसी सर्वांही श्रीसीमादेवीस नैवेद्य घेऊन ( जेवणास ) जावे दातार याणे प्रात काली मुखवास लावावयासी सोनार तिचा पूजक म्हणोन याजवल द्यावा तेथ गेलियानंतरी जोसी याणे पचांग साधावे साधितल्यानतरी हरिकथा करवावी दाताराने गध विडे वैशपायन व जोसी व माहाजन वर्तक व सर्वासही द्यावे. त्यानंतरी गुरुवास चोवालणी देऊन दातार याणे मुखवास घेऊन त्याचे बरोबरी सर्वांही वाजत गाजत श्री दुर्गेच्या देवली यावे. येतेसमई शून्या-लयासमूर आले म्हणजे वाद्य क्षणमात्र वाजवू नये. आल्यानतरी ग्रामस्त श्रीचे देवलाजवल असतील ते व आपण सर्वांही परस्परे भेटावे. भेटिल्यानतरी श्रीचा रथ उचलून दाताराने वर चढोन पेठेमध्ये ब्राह्मणाही आणावा. आणि दाताराने सर्व देवांस धुपारती करावी केलियानंतरी येथा स्थानी रथ ठेवावा. ठेविल्यानंतरी श्रीच्या देवलात जाऊन हरिकथा करावी गधविडे येथा अनुक्रमे दाताराने द्यावे दिल्यानंतरी रात्रौ गुरवाने सिधपुरुषाचे स्थलाचे गडदूपासून वाजवीत सर्व मान-करी श्रीच्या देवलास घेऊन जावे. सर्व गेलियानंतरी जो कोणी गेला नसेल त्यासी माहाजन वर्तकाही वारीक थासी पाठवून बोलावून आणावे. दातार याणे बसावयासी घालून दिवे लावून ठेवावे बसलियानतरी पुराण व हरिकथा जाहालि ( या ) जवरी यथा अनुक्रमे दाताराने गध ब्राह्मणास लावावे. लावल्यानंतरी सोनार बसले असतील त्यासही दातारानेच ( गंध ) लावावे. व सर्वांस गणेसपुजा विडे दक्षणा भाडारापा श्रीचे द्यावी. याप्रमाणे नव दिवस चालवावे व जोसी याहीं नित्य श्रीचे देवली पचांग श्रवण करावे पंचमीचे दिवसी प्रातःकाली श्रीचे व मानकरी याचे घरोघरी गुरवाने वाद्य वाजवावे. त्याचा अनुक्रम प्रथम श्रीचे आगण्यामध्ये वाजवावे म्हणजे श्रीचे व दाताराच आंगणें येक, व इतर देवास व मानकऱ्यास तेथून नेना माहाजन याचे दारी वाजवावे. तेथून बाळ वर्तक याचे दारी वाजवावे. तेथून सिधाचे जागास्थलासी वैशंपायेन धर्माधिकारी याचे दारी वाजवावे तेथून उपाध्ये वैशपायेन याचे दारी वाजवावे तेथून करंदीकर माहाजन यांचे दारी वाजवावे. तेथून धारप यांचे दारी वाजवावे तेथून सुतार वर्तक याचे दारी वाजवावे तेथून सुताराचे अगोचर जोसी याचे दारी वाजवावे. तेथून कोपरकर वर्तक याचे दारी वाजवावे. तेथून हरि ( जागा मोकळी ) याचे दारी वाजवावे वाजविल्यानंतरी याज-प्रमाणें दोनप्रहरी वाजवीत यांसहित सर्व ग्रामस्तास श्रीचे देवलास पुराण व

हरिकथेस न्यावे. सोनार यासही आणावा. याजप्रमाणें पुराण व हरिकथा जाहालिया-जवरी पूर्ववत यथा अनुक्रमें गंधविडे गणेसपूजा द्यावी. याजप्रमाणें वाद्यवाजंत्र मानपान चालवावे सप्तमीचे दिवसी दातार याणे श्रीचे येथून केलवणास मानकरी यासी व सेवकास व इतर जातीचे मानकरी आहेत त्यासी बोलवावे आणि केलवण करावे सोनाराने देव केलवणास न्यावो. दातारानें गंध विडे द्यावे. दाताराने अष्टमीचे दिवसी श्रीची गुतसात्राची समाराधना करावी. भाडारापा|| खर्च करून सर्वांही साहित्य करावे. आसूदासही आमंत्रण करावे सर्वांही श्रीचे समाराधनेस भोजनास जावे दातार याणे रसईची पूजा करून नैवेद्य घेऊन वाजत श्रीस न्यावा वैशंपायन याही पूजा साधावयासी बरोबरी जावे. तेथून आलियानंतरी याही समारजनेस अनशुध वाढावी. आणि उदक सोडवावे. सोडिल्यानंतरी भोजने जाहालियावरी ब्राह्मणास भाडारातून विडे दक्षणा द्यावी सायंकाली बाल वर्तक याही श्रीस माहाउपार श्रीस करावा. उपाध्ये धर्माधिकारी वैशंपायन व जोसी यासी प्रातःकाली बाल याही आमन्त्रण करावे. संध्याकाळीं महाउपाराचा संकल्प करून नैवेद्य पूजा घेऊन वाजत गाजत श्रीच्या देवली जावे गेल्यानंतरी श्रीची पूजा करून वैणवपात्रा मध्ये नैवेद्य घातला असेल तो श्रीस दाखवावा. नैवेद्य पूजा सपलियानंतरी रथपुतलीस नैवेद्य दाखवावा. तेथे दाखविल्यानंतरी श्रीचे पाठीमागे क्षेत्रपाल आहेत त्याची पूजा करून नैवेद्य दाखवावा. त्या नंतरी गणपतीची पूजा करून गणपतीस नैवेद्य ठेवून झुंभादेवाचे पूजेस जावे. पूजा करून नैवेद्य ठेवून ब्राह्मणास गंधविडे व दक्षणा गणेसपूजा द्यावी. दिल्यानंतरी झुंभा देवीचे उतरभागी तोरण बांधिले असेल त्याखालून जावे दाताराचे घरी येका जणाने नैवेद्य जेवावयासी जावे. आणि सर्वांही घरास येऊन भोजन करावे. जाहालिया नंतरी श्रीचे देवली जावे. गेल्यानतरी पुराण श्रवण जाहालियाजवरी श्रीचे अलंकार भूषणें भांडाराहून काढून माहाजन वर्तक याही दाताराजवल देऊन श्रीस घालावे. बाल वर्तक याणे श्रीसंनिध उभे राहावे घातल्यानंतरी मंडपामध्ये कोपर-कर वर्तक याणे दिवे लावून च्यारी प्रहर वाततेल घालीत असावे. माहाजन वर्तकाही वार्का ( वारिक ) करून बसावयासी मंडपात घालावे. घातल्यानंतरी परस्थली लिखिते पाठविली ते लोक त्याचे जागे आहेत नेमिलेले त्या त्या जागां त्यासी बैसवावे. बस-लियानंतरी ग्रामस्त व आसूदकर याहीं एकत्र बसावे. सिधांची प्रतिमा वैशंपायन याही सभा संन्मुख बसावे बसलियानंतरी हरिकथा करावी. व इतर गीत वाद्य नृत्य येसा आनद करावा. कोणी ग्रहस्त परस्थलचा आला, हरिकथेस नसेल त्यांसी आमं-

त्रण पाठवून सभेस बहुमान करून आणावा. आनंद जाहालियावरी गंध विडे द्यावे. प्रातःकाली सूर्योदय जाहला नाही तो सडा समार्जन देवळांत घालून दाताराने ठेवावे.

केले असेल त्याही श्रीचे देवली सैपाक करून सवाष्ण ब्राह्मण सांगोन श्रीस नैवेद्य दाखवून भोजन करावे. प्रातःकाली श्रीचे देवली सर्वांही येऊन धारपाने व सुतार याणे रथाचे साहित्य पाहून तयार करावे. शिपी याने रथ कापडावा. अनामिकाने आदरश लावावा. व दाताराने शुंभादेवीच्या मडपांत वतनदारांस बसावयासी घालावे. घातल्यानंतरी कारभारी यांही भांडारातील अडसेरी व मुशारा इतर जातीचे चाकरीचे लोक आहेत त्यासी कोपरकर वर्तक याणे अडशेरी मुशाहिरा सर्व मानकरी ब्राह्मण असतील त्याचे विद्यमान येथ अनुक्रमाप्रमाणे द्यावा. त्यासी दाताराने प्रथम गधविडा त्यांसी द्यावा कोपरकर वर्तक यासी द्यावा. व सर्व मानकरी यासी गधविडे द्यावे. तेथून रथाजवल यावे. आल्यानंतरी माहाजन नेना याणे पोफळाचे मखर भरावे. त्यासी प्रथम ( मजमदार ) दाताराने रथाजवल गंधविडा द्यावा. व त्याणे सुपाऱ्या मानकरी मानकरी यासी द्याव्या पराजपे याणे केली याचे मखर भरावे त्यासी गंध विढा दाताराने द्यावा. प्रथम त्याणे सर्व मानकरी यासी केळी द्यावी ( यानतर सोनार याणे श्रीस बसावयासी सोने रुपे याचा पाट द्यावा ) दिल्यानंतरी धारप याणे देवलातून रथ पुतली भोग मुहूर्ती आणून रथावरी ठेवावी ठेविल्यानंतरी त्यासी तेथे प्रथम गंध वीडा द्यावा. दिल्हानंतरी दाताराने रथावरी चढावे व कोपरकर वर्तक याणे रथावरी चढून दिवटी पाजलावी सर्व ब्राह्मणांही रथ उचलावा. उचलियानंतरी पेठेत न्यावा. तेथे गेल्यानतरी सुतार वर्तक याणे रथास डेल्या घेऊन रथाबरोबर जावे त्यानंतरी करवा माहाजन याणे चोह्रो गावीचे व आपले शूद्र आणवावे आणि त्याजपासी ब्राह्मणाही रथ द्यावा. तेथून सर्वांही रथाबरोबरी जाऊन उत्तरेस न्यावा. घरोघरी ब्राह्मणाचे घरासी उभा करून ब्राह्मण व सवाष्णी पूजा नैवेद्य देतील, तो देवीस दाखवावा घरोघरची बाळगोपाळें रथावर चढवावी. दाताराने गावामध्ये जागजागीं देवस्थानें आहेत त्यास वरचेवरी धुपारत करीत असावे उत्तरेच्या सेवडीस हद गडदूपासून आलिकडे फिरवावा तेथून फिरोन आणून नागलेश्वराचे दक्षण भागीचे विदीने कोपरीहून तेथील देवास धुपारत करीत पेठेंत आणावा ( जाते समई सोनार याणे आपले घरीची तेथे पूजा द्यावी ). पेठेतून दक्षणचे सेवडीस नदीपर्यंत नेऊन

तेथे गुहागरचे देवीस धुपारत करून रथ फिरवावा. नारायणाचे देवळा जवळी उभा करावा तेथें शूद्र लोकांचे बाळ गोपाळांनीं श्रीचे पाया पडावें.

( वैशपायन याजकडे मिळालेली बखर एवढीच. पुढची पानें हरवलीं आहेत. येथून पुढचा मजकूर श्री. अण्णासाहेब कर्वे याच्या आत्मवृत्तातून घतला. )

गोवळे यास खादेली यास व सर्वांस पाणी उदक द्यावें तेथून उपाध्ये वैशंपायन याचा स्थळापासून यासी रथावरी घेऊन गगानारायण यासी धुपारत करावी, करून रथ पेठेंत न्यावा. तेथें ब्राह्मणांही फिरून रथ घेऊन मंडपाजवळ यथास्थानें रथ ठेवावा. ठेविल्या नतर श्रीचे दर्शनास जाऊन गंधविडे घेऊन घरोघर जावें. सायंकाळीं सर्वांहीं त्यागास जावें. गेल्यानंतर तेथें वारिकानें उपोसित राहून, हातीं शस्त्र घेऊन प्रथम धर्माधिकारी वैशंपायन यासी हाक मारावी, दुसऱ्यानें उपाध्ये वैशंपायन यासी हाक मारावी; तिसऱ्यानें जोसी यासी हाक मारावी, चवथ्यानें ( चार अक्षरें गेलीं ) हाक मारावी, याजप्रमाणें गावचे व परगांवचे उपाध्ये जोसी यासी हाक मारिल्यानतर त्यासी दातारानें गंध विडे सेले यथा अनुक्रम द्यावे. चाकरीचे लोकास मुशारा द्यावा. दशमीचे दिवशीं सर्वांही मिळून इनामतींतून शाहाळीं पाडून त्याचा उदकानें देवीस स्नपन घालावें. आणि पूजा करून उत्तम सोपस्कर नैवेद्य दाखवावा. दाखविल्यानंतर सर्वांस गंध, विडे, गणेशपूजा सर्वांस द्यावी. नवरात्र संपूर्ण करावें. चैत्र वद्य सप्तमीचे दिवशीं दातारानें जपाचें आमंत्रण सर्वांस घरोघर सांगावे. अष्टमीचे दिवशीं दातारानें संकल्प करून दातार यानें वैशपायन उपाध्यें याचे हातीं आचारवर्ण द्यावें. यांहीं जप सर्वांकरून करवावा; अनुष्ठान संपवावें. संपल्यानंतर आच्यारी यास सर्व ब्राह्मणांस गंध, विडे व दक्षिणा द्यावी. सर्वांही घरोघर जावें. चैत्र वद्य १४ चे दिवशीं, दातारानें उक्तावल काढवावी. पिशाच्यास बळ द्यावी. वैशाख वद्य अमावास्येस वारिकानें श्रीच्या देवळात भावई देवी आहे, ती प्रात कालीं दातारानें बाहेर आणून ठेवावी, आणि देवळामध्यें वारिकानें जाऊन सडासमार्जन घालून तेथें बसलें असावें. गांवच्या बायका तिच्या दर्शनास जातील, पूजा नैवेद्य दक्षिणा ठेवितील, ते वारिकानें न्यावे. सायंकाळीं दातारानें देवी गर्भाऱ्यात ठेवावी, आणि वारिकानें सडासमार्जन घालावें. ज्येष्ठ वद्य १४ मढेरू काढवावें. मढेराचें साहित्य बालवर्तक याणीं करावें. दातारानें संकल्प करून उदक उपाध्ये याहीं सोडवावें पूर्वी पिशाच्याहीं ब्राह्मण बल घेतली होती, तेव्हां सिद्धांहीं ब्राह्मण त्याजकरवीं जीवंत करून त्यासी नरबळ देऊ केली,

त्यास वस्त्र नूतन घालावें आणि सर्व गांवामध्यें शूद्राहीं व गुरवानीं समागमें जाऊन गांवभोंवतें फिरवून श्रीचा देवळास आणावा, आणि आणिल्यानंतर श्रीचें तीर्थ व सिद्धाचे हातींचे आड व तळया आहेत, त्याचें उदक आणून, त्याजवरी शिपवावें; श्रीस धुपारत करावी आणि सर्वांनीं श्रीजवळ प्रार्थना करावी. केल्यानंतर श्रीनें त्यास जिवत करावा आशाडी दशमीपासून चातुर्मास दशमी एकादशीस श्रीचे पालखींत मुखवास घालून गावामध्यें दातार यानें फिरवावी. लोक पूजा नैवेद्य देतील, तो घ्यावा. याप्रमाणें कार्तिकीपर्यंत चालावें. श्रावण शुद्ध चतुर्दशीस श्रीचे येथून श्रावणीचे आमंत्रण सर्वांस दातारानें करावें पौर्णिमेचे दिवशीं सर्वांहीं उपाकर्मास जावें उत्सर्जन महादेश्वराचे देवळीं करावे दातारानें श्रीचे देवळीं उपाकर्मांचे अनुष्ठानाचे साहित्य करून ठेवावें, आणि दातारानें व सर्वांहीं संकल्प करून गणपतीपूज्यन करून उपाध्यावर अक्षत टाकावी उपाध्याहीं अनुष्ठानास प्रारंभ करून समाप्तीस न्यावे सभादीप आले असतील, ते ते यजमानाकरवून संकल्प उपाध्ये याहीं करवावा केल्यानंतर श्रीस येक ठेवावा दुसरा असला तर उपाध्ये वैशंपायन यास द्यावा. तिसरा असला तर धर्माधिकारी यासी द्यावा. चवथा असला तर जोशी यासी द्यावा. पांचवा असला तर ( सुमारें सहा अक्षरें गेलीं आहेत ) कोपरकर यासी द्यावा. दुसरे असले, तर ग्रामस्थाचे मध्ये थोर ब्राह्मण असतील त्यांस द्यावा. दिल्यावर सर्वांही घरोघर जावें उपाध्ये यास दातारानें जेवावयासी बोलवावें गावामध्यें हव्यकव्य कार्य प्रयोजन ज्याचे घरीं होईल त्याणे अगोधर मानकरी याच्या भेटी घेऊन यथा अनुक्रमें बोलवावें श्रीचे देवळांत ग्रामसमधें अनुष्ठान होईल त्याचा संकल्प दातारानें करावा, आणि वैशंपायन याचे हातीं आचारीवर्ण द्यावें, व सदशवर्णही त्याचे हातीं द्यावें, व गांवामध्यें याजप्रमाणें वर्तणूक करावी. जोशी यास ब्राह्मत्व द्यावें श्रावणीचा अनुष्ठानाचें ब्रह्मत्व वैशंपायन यासी द्यावें. सिद्धाचा प्रथम गंध विडा मानमहत्त्व वैशपायन यास पुत्र म्हणून यज [ न ] याचें ब्राह्मत्व जोशी याचें. गावामध्यें उपाध्येपण व धर्माधिकार, असे दोन मान वैशंपायन याचे, तिसरा जोशी याचा. (सुमारें आठ अक्षरें गेलीं आहेत) ब्राह्मणाखेरीज यज्ञोपवीताचा अधिकारी असेल त्यास, व गुजरास व क्षेत्रीयास, व सोनारास, वैशंपायन याजखेरीज दुसरा उपाध्या नाहीं, जोशी या खेरीज दुसरा जोशी नाहीं. या प्रमाणें चालवावें. भाद्रपद शुद्ध ४ स लोक गणपतीस श्रीचे देवळात आणितील, त्यास दातारानें गंध विडे द्यावे. भाद्रपद पौर्णिमा आमावाश्यास दातारानें शारदी नवरात्राचे श्रीचे येथून गावामध्ये आमंत्रण करावें

अश्विन शुद्ध १ चे दिवशीं इनामतीचे पैकीं भाडारातून घटस्थापनेचें साहित्य कारभारी याहीं दाताराकडून आणवावें, आणि दातार याणे संकल्प करून नवरात्राचें आचारी वर्ण वैशंपायन याचे हातीं देऊन घटस्थापना करावी. जप देवी महात्म याचा जप करून पुराण श्रवण करावें. सप्तमीचे दिवशीं जपाचें आमन्त्रण दातारानें करावें बालगोपाल येऊन, सर्वांहीं लहान थोराहीं जप करावा जपाचा संकल्प दातारानें करून उपाध्ये वैशंपायन याचे हातीं वर्ण द्यावे याहीं समाप्तीस अनुष्ठान न्यावें नवमीचे दिवशीं होमाचे साहित्य इनामतीपैकीं आणावें. होम जाहल्यानंतर बलिदान करून तुऱ्या वाजंत्री व वारीक याहीं न्यावा. नेल्यानंतर श्रीस अभिषेक दुधानें करून स्तपन जाहलें म्हणजे उत्तम प्रकारें पूजा नैवेद्य दाखवावा, व उपाध्यायास व इतर ब्राह्मणास विडा दक्षणा द्यावी नवरात्राचे जपाचे मळासेत उपाध्याहीं लावून इनाम उपभोग करावा. दशमीचे दिवशीं प्रातःकाली सर्वांहीं श्रीचा देवळीं जाऊन शमीपूजन करावें अथवा सीमेवर नदीसंनिध शमीपूजन करावें केल्यानंतर सर्वांही वाजतगाजत श्रीचा देवळास येऊन दर्शन घ्यावें. घेतल्यानंतर सर्वांहीं घरोघर जावें कार्तिक पौर्णिमेस त्रिपूर तेवावा. यासी सर्वांहीं जावें. सर्वांस इनामतींतून गंध विडे द्यावे. पौषमासीं मंगलवारीं इनामतींतून मंगलवारीचे मंगलवारीं सर्वांस गंध विडे द्यावे. माघमासीं शिवरात्रीचे दिवशीं सर्वां [ सुमारें चार अक्षरें गेलीं आहेत ] करावें. फाल्गुन शुद्ध ५ पासून खेळी याहीं यथा अनुक्रमानें देवळास व मानकरी यांचे दारीं मान द्यावा. दक्षिणेकडून मानकरी यांचे दारीं मान देत उत्तरेस जावें. पौर्णिमेचे दिवशीं सोनार याणे नवें नगर येथें क्षेत्रपालाचे पलीकडे पूर्वभागीं होली करावी मानकरी ब्राह्मण यासी सोनारानें आमंत्रण करावें. सायंकाळीं तुऱ्या वाजंत्री याणे कोपरीचे त्रिदीनें वाजत न्यावें. तेथें गेल्यानंतर वैशंपायन यांहीं सोनारास पूजा सांगावी. सांगितल्यानंतर प्रथम गंध विडा वैशंपायन उपाध्ये यासी द्यावा, दुसरा महाजन यास द्यावा, तिसरा दुसरे महाजनास; चवथा दातारास द्यावा. पांचवा जोसी यासी द्यावा. सहावा बालवर्तक यासी द्यावा, तेथून घारप यासी द्यावा, तेथून सुतार यासी द्यावा तेथून कोपरकर वर्तक यासी द्यावा, व इतर ग्रामस्थ जातील त्या सर्वांस गंध विडे द्यावे, व सर्वांहीं वाजत गाजत कोपरीचे मार्गानें श्री बहिरव याचे होळीचे संनिध यावें आल्यानंतर दळवी याणें पूजा साहित्य वैशंपायन याजपासी द्यावें. याहीं पूजा करून सर्वांहीं प्रदक्षिणा करून होळी लावावी. होळी लागल्यानंतर गुरव व वारीक यांहीं सर्वांस घरोघर पावावें. प्रतिपदेचे दिवशीं सोनाराने पंचखूर जातीचे लोक मिळ-

वून उत्तरेकडून दक्षिणेस बहिरव याचे होळीवर यावें. आल्यानंतर तेथून बहिरवाचा कौल घेऊन सर्वांहीं गांवामध्यें श्री नारायण याचे संनिध यावें. आल्यानंतर तेथून धुरवाड खेळत खेळत श्रीचा देवळापासीं जावें. गेल्यानंतर उपाध्ये याहीं मंत्र म्हणावा, म्हटल्यानंतर श्रीचा दर्शनास जावें तेथून घरोघर जावें पंचमीचे दिवशीं सोनारानें सिंपणें याचें आमत्रण सर्व मानकरी यांसी करावें, व दातारासही करावें. यानंतर सायंकाळीं तुऱ्यानें व वारिकानें दिवटी तेवून, तुऱ्यानें वाजत गाजत श्रीच्या देवळासी आणावे. आणिल्यानंतर दाताराने हलदिव [ हलदिवे ] उदक करून, आम्रपल्लव घेऊन श्री दुर्गेवर उदक शिंपवावें तेथून शुभा देवीवर शिंपणें करावें. तेथून सर्वांहीं वाजतगाजत सर्व देवास शिंपणें करीत करीत कोपरीचे विदीनें होळीवर क्षेत्रपालास जावें तेथें जाऊन होळी करून सोनार याचे घरी नवे नगरास जाव. सोनारानें बसावयाची घालून मानकरी यांस बसवावें. बसल्यानंतर प्रथम अनुक्रमें गंध, विडे, व सेले दातारापासून सर्व मानकरी यास द्यावे. दातारास दिल्यानंतर उपाध्यास द्यावा, तेथून पुढें जोशी यास द्यावा, तेथून महाजन व वर्तक यासी द्यावा, तेथून उत्तरेकडून गावामध्यें यावें. आल्यानंतर गडदूपासून श्री सीमा देवीस शिंपणें करावें. तेथून सर्वांस देवास शिंपणें करीत करीत दक्षिणेस जावें. आल्यानतर क्षेत्रपालावरी सर्व उदक घालून, सर्वांही घरोघर जावें. याजप्रमाणें वतनदारांनीं चालावें. वठारें वाटून दिल्हीं. क्षेत्राचीं वठारें आठ यां मधोन मानकरी याणीं असावें येणेंप्रमाणें गांवची रचना केली, तेव्हां कोपरी वठारास नंतर राज्यापासून दत घेतले तेव्हां तेथील ब्राह्मण याची सत्ता, ते समयीं ब्राह्मण तेथील उभे राहिले तेव्हां ते बोलिले कीं आम्हास आज्ञा काय तेव्हा सिद्ध बोलिले कीं तुमचा वठारास आपली सत्ता धर्माधिकार ( सुमारें चार अक्षरें गेलीं आहेत ) उपाध्येपण व श्री महादेश्वराचा देवळींची पुराण आपलें, व दुसरे आचारी वर्ण व सदश ( सभासद ) वर्ण आपले, प्रथम गंध आपले. येणें प्रमाणें त्या ब्राह्मणाहीं सिद्धास दिल्हे. सिद्धांही मानसपुत्रास दिले; व आसुद ग्रामस्थ याजपासून चंपावती क्षेत्र नदीचे उत्तर भागीं नदीपासून व्याघ्रेश्वराचे पूर्वेस पर्वतापर्यंत उपाध्येपण व धर्माधिकार व श्री व्याघ्रेश्वराचे देवळींचें आपणांस त्याहीं दत दिले आपण मानसपुत्रास दिले; आणि सेतें पाच आपणास दिलीं. कोपरीमध्यें वतनदार अधिकारी हिरा ज्योतिषी आपले ग्रामींचा प्रथम आसूद ग्रामातून ब्राह्मण समुदाय क्षेत्र पाहावयासी येते समयीं, नदीचे अलिकडे आले, तेव्हा प्रथम नूतन क्षेत्र असें नाम ठेवून, पुढें

सागराचे तीरीं आलें. त्याजवर वटवृक्षास छे (द) न करावयासी आरंभ केला. करितांच त्यामध्ये देवता बहुत पिशाच्यें यांहीं क्षोभ करून घाव घालितां त्या दातार ब्राह्मणाची बली घेतली, तेव्हां देवताचे शातवन करून ब्राह्मण जीवंत करविला. आणि दुसरे नामाभिधान मूळ वट ग्रामस्थ असें ठेविलें. श्रीची व इतर ब्राह्मण याची स्थापना जागजागीं केली देव देवस्थानें बहुत पिशाच्य रक्षणास स्थापना केल्या. श्रीस व आपणास शेतें नेमून ठेविलीं आपले पुण्यतिथीस चिरेखाण बाविल नेमिलें. श्रीस वोंवळें शेत नैवेद्यास नेमिलें. कनक शेत श्रीचा फुलापानास नेमिलें. उंबरक्षेत्र श्रीचे यात्रेस समाराधनास नेमिलें लमग क्षेत्र श्रीचे यात्रेस तबूनेडी यासी. चंदन क्षेत्र आपले पुण्यतिथीचे ब्राह्मणास गधास व विडे दक्षिणेस नेमिलें. गणेशशेत गणपती नागलेश्वर यासी नेमिलें. मडशेत मदेरूं यासी नेमिलें. नदीपलीकडे आपणास व श्रीस शेत मागितलें. मागोन घेतलें. वरकड शेतें:— १ केसर शेत शून्यालयास नेमिलें; आमशेत ३, चोखडे ४, चार (?) पाच= त्यामध्ये केसरशेत शून्यालयास नेमून १८०, आणि चार आपणास व आत धर्मादायास ठेविलीं, त्यामध्यें उत्पन्न होईल तें निमे भांडारात ठेवावें निमे आपल्या कुटुंबपोषणास आपले मानसपुत्रानीं व दातारानें न्यावें. सीमा देवीस नैवेद्यास व यात्रेस देवीस नमूद देवळें सेत नेमिलें, आणि श्रीचे भांडारास चद्राग शेत व माडीस सेतें नेमिलीं. दक्षिणेस आपल्या क्षेत्राचे परिमित, भीमसेन पाषाण पर्वतरूप याचे सन्मुख, पूर्वेस पर्वतावरील उदक, पश्चिमेस व उत्तरेस येतें तेथपर्यंत आपलें क्षेत्राचा नियम. करवंदा क्षेत्र राज्यापासून आपणांस मागून घेतले, तेथें वडीलपणाचा मान व उपाध्येपण व धर्माधिकार व वडीलपण आपलें, आणि ब्राह्मणाची तेथें स्थापना केली. त्यासीं जळें स्थळें करून दिल्ही आणि आपणांसहि ठेविलें. शूद्र वतनदार होते तेहि स्थापिले. आपले क्षेत्रात शूद्र लोक करोडीका क्षेत्र व नागलेश्वराचे पूर्व व उत्तरभागीं सेवकास स्थल देऊन इतर जातीस ठेविलें; आणि देव देवस्थानें यांचें संनिध आड व तळया ब्राह्मणास स्नानसंध्याधिक गोधनांस असें सर्वांस उदक करून ठेविलें. ब्राह्मणास ग्रामाबहि महारुद्राचें पूर्व भागीं दक्षिणेकडे पिंडदानास स्थळ उदक नेमून ठेविली. त्याचे उत्तर भागीं इतर जातींस रुद्रभुम जागजागा जातीजातीस नेमून ठेविली. महादेश्वर याचे पूर्वभागींचे नदीचे उत्तरेस नूतन क्षेत्रींचा लोकास रुद्रभूमी नेमून ठेविली.

फुगसुवा क्षेत्र अधिकारी कोपरीपर्यंत क्षेत्रुपालाचे दक्षिणेकडेस पूर्वपश्चिमेकडेस जावयाचा मार्ग करून ठेविला त्याचे दक्षिणेस कोपरी अलीकडे उत्तर भागीं आपलें नूतन नगर आपण प्रथम नाम ठेविलें. येणें प्रमाणें क्षेत्र करून पिशाच्च मर्दनास देव देवस्थानें व अनेक क्षेत्रुपाळ जागजागा स्थापिले, आणि आपले पुण्यतिथीस व श्रीच्या भांडारास स्थळें नेमिलीं. आपले पुण्यतिथीचे चिरस्नान बाविल शेत नेमिलें. महादेश्वर यासी कोपरीमध्यें स्थल नैवेद्यास पेढिका क्षेत्र नेमिलें. त्याचे मध्यें येक अंश श्री देवाचा, येक अंश आपले पुण्यतिथीचा, येक अंश कोपरीचा ब्राह्मणाचा ( सुमारें ६ अक्षरें गेलीं आहेत ) उत्तरेस श्रीचे यात्रेस व सदैव सर्वांस गंध लावावयासी चदन क्षेत्र चंदनास नेमिलें, तांबूलास सदैव नेमिलें व आपणास दक्षिण भागीं स्नानसध्येस वायुगंगा इचे तीरीं स्नान करावयासी पाषाण असावयासी व उदकास द्रोण ठेविली; व तटाक संध्या करावयास बांधिले. आपले क्षेत्राची चतु सीमा – दक्षि(णे)स पर्वताचे वर उदक, उत्तरेचा पर्वतावर उदक, पूर्वेस पर्वताचे पालाकडेस पलीकडेस तिकडेस उदक जाय तेथपर्यंत, पश्चिमेस सागर. पूर्वील हकीकत लिहिली.

---

टीप :– वैशंपायन बखरींत मधूनमधून दोन ओळींच्या मध्यें मागाहून मजकूर घातला आहे तो मजकूर कंसात दर्शविला आहे.

लेखांक २ श्री नकल

## सिका

कौलनामे हुदेदारानी मौजे मुरुड मामले जाफराबाद अमाल बदर मोमुन मुरफताबाद सुहुरसन खमस सलासीन अलफ (इ. स. १६३५) ताहा बेस्मी बाबाजी वैद्य मो। मजकूर यासी दिला कौल यैसाजे तुमचे बाबे मोख्तसर याहीं येऊन इलतिमास केली जे. बाबाजी वैद्य हे गावीं येऊन राहिले आहेत. बहुत कालींही ठिकाण आगरवाडी मिरास नाहीं. तरी साहेब मेहेरबान होऊन मं (ड ?) लि (क ?) महाजन याकडे बाकी दिवाणीची बेमबलग जाहाली आहे आणि तो मयेत जाहाला. आगर गयाल पडिले आहेत बाकी गावाकडे वोढत आहे. गांव बाकीदार जाहाला आहे. तरी साहेबीं बाकीबदल आगर बाबाजी वैद्य यासी देऊन लारी १२५ सवासें घेऊन मिरास करून द्यावा म्हणून इलतिमास केली त्यावरून खातीरेस आणून मोख्तसराचे मते तुम्हापासून लारी सवासें घेऊन तुम्हास आगर विकत मिरास करून दिले आहे. महदूद

पूर्वेस सेत आगरावरील दक्षणेस गाईंवाडी पश्चमेस मारगबीद उत्तरेकडे आगर दामाजी यथा याचा.

या चारी हदेमध्यें आगर असे. सदरहू सवासें लारीबदल तुम्हास बाकीबदल विकत मिरास करून दिल्हे आहे. आगर कमावीस करून दिवाणाचा दस्त देऊन कस्टमशाखत करून सुखरूप राहाणें कोणे बाबे शक अंदेशा न धरणें त्या आगरामध्यें तुम्ही नवी लावणी जी कराल ती तुमचे बादस्तास मजुरा देऊ. त्या आगरावरील सेत व भुई भाटले सपाती परडें देखील तुम्हास मिरास करून दिले असे. कस्टमशाखत करून कीर्दी करून सुखें राहाणें. दरीबाब कौल असे.

र॥ छ १० खर मोर्तब

निशाणी

केसयाजी महाजन

महादमानी वर्तक

कृष्णाजी धारप वर्तक

तिमाजी मडलिक महाजन

हरबाजी बाल वर्तक

लेखांक ३

श्री

छत्रपती संभाजी राजे

सीका मराठी अक्षराचा

आज्ञापत्र समस्तरा ( ) कार्य धुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री कान्होजी आगरे सरखेल ता॥ बालाजी मोरेश्वर उपनाम पंडित कुलकर्णी कसबे मुरुड तर्फ पंचनदी सुभा प्रात दाभोल सुहूर सन समान अशरीन मया व अलफ कारणें दिल्हे वृत्तीपत्र ऐसेजे कसबे मजकूरचा कुलकर्णपणाचा कथला तुजमध्ये व माहादाजी कृष्ण उपनाम जोसी टालसुरेकर याजमध्ये लागला असता सन सीत अशरीन मया व अलफ या सालीं तुंवा व माहादाजी कृष्ण यांचे तर्फेने खंडो चिमणाजी प्रभु कुलाबाचे मुकामी हुजूर येऊन हमालजालेस आणि तुवा आपली हकीकत जाहीर केली, की कसबे मजकूरचे कुलकर्ण आपले. भोगवटा आपणास च्यार पिढ्या जाला, तो ठावका आहे. आदलशाहाचे कारकीर्दीपासून हा कालवर पिढी दरपिढी उपभोग करितो. आपला पणजा कृष्णाजी विश्वनाथ व आजा हरी कृष्ण व वडील चुलता विसोबा हरी व आपला बाप मोरो हरी व चुलत चुलता बालाजी माहादेव याणी वतन आनभविलें. मध्ये माहाराज राजश्री कैलासवासी स्वामी याचे वेलेस आपला आजा हरी कृष्ण यामध्ये व ग्रामस्तामध्ये बेबनाव जाहाला. तेव्हा ग्रामस्तानी माहादाजी कृष्ण याचा भाऊ नारो कृष्ण टालसुरेकर याचे हातून कुलकर्णाचा धंदा काहीका दिवस घेतला होता त्याउपरी सवेच आपले वतन आपले बापाचे स्वाधीन केलें. याणी व आपल्या चुलचुलता वतन आनभवीत असता धामधुम जाहाली. कुलदेश उध्वस जाहाला. ते प्रसगी वतनाचे कागदपत्र सनदापत्रा जे होते ते गेले. आपला बाप मोरो हरी परागंदा जाहाला. हली हे कथला करितात. पारपत्य करावे म्हणून विदित केलें. त्याउपरी माहादाजी कृष्ण याचे तर्फेनें खंडो चिमणाजी याणी विदित केले की महाराज राजश्री कैलासवासी सभाजी राजे स्वामी याचे वेलेस माहादाजी कृष्ण यांचा भाऊ नारो कृष्ण यास ग्रामस्तानी वतन करून दिल्हे. त्याप्रमाणें हुजूरची पत्रे आपणाजवली आहेत, म्हणून निवेदून दाखविली. त्याजवरून हरदूजणाचा अर्थ कलला पाहिजे याजकरिता समस्तग्रामस्त मुरूडकर हुजूर आणून हरदूजणाचा कथला पूर्वोत्तर असेल तो सागणे त्याजवरून समस्त ग्रामस्तानी सागि-

तले कीं पंडित कुलकर्णी आदलशाहाचे वेलेपासून खरे आहेत. मध्ये ग्रामस्तानी नारो कृष्ण टालसुरेकर यास दिल्हे होते सवेच मोरो हरी पंडित याचे वतन याचे स्वाधीन केले इतके आपण जाणतो, म्हणोन ग्रामस्तानी विदित केले ऐशास याचा निर्णय करिता कृष्णाजी विश्वनाथ पंडित वतन आनभवीत होता. यापूर्वी वतनदार कोण होता हे मूल कलले पाहिजे त्यास वेदमूर्ती केशव जोतीषी मुरूडकर नवद पंच्याणव वर्षांचे पुरुष प्रमाणिक हाली श्री वाराणशी माहाक्षेत्री क्षेत्रवास करून आहेत, त्याजपरयंत जाऊन त्यांचे लिहिले घेऊन येणे म्हणोन तुजला आज्ञा करून वेदमूर्ती केशव जोतिषी यास पत्र लेहून देऊन रवाना केले तुवा निघोन वाराणसीस गेलास. त्याजउपर राजपत्राप्रमाणे माहादाजी कृष्ण यांस पत्र करून दिल्हे व मुरूडकर ग्रामस्त यास आज्ञा केली की माहादाजी कृष्ण यास महजर करून देणे. त्याजवरून महजरही ग्रामस्तानी करून दिल्हा आहे हली तुवा वेदमूर्ती केशव जोतिषी मुरूडकर वास्तव्य वाराणसी याचे पत्र घेऊन आलास त्याचा अर्थ मनास आणिता त्याणी लिहिले आहे की " कसबे मुरुड येथे पुरातन कुलकर्णी मिरासदार नव्हता. माहालीहून जो हुदार पाठवीत तोच गावचा कारभार चालवीत असे. अदलशाहाचे कारकीर्दीस कृष्णाजी विश्वनाथ पडित हा कसबेमजकूरचा मख्तसर यास कुलकर्ण वतन करून दिल्हे. व वतन आनभवीत असता कितेका वर्षी थोरले कैलासवासी माहाराज राजश्री स्वामीचे राज्य जाहाले. ते समइ कृष्णाजी विश्वनाथ कुलकर्णीवतन आनभवीत असता हुजूरची सनद वतनाची करून घेतली. त्याउपरी कितेका वर्षाही कृष्णाजी विश्वनाथ मृत्य पावला. त्यामागे त्याचा पुत्र हरी कृष्ण व नातू विसोबा हरी हे दोघे बापलेक कुलकर्ण चालवीत असता विसो हरी मृत्य पावला हरी कृष्ण छांदसजुर्गी बालटी होता. त्यामध्ये व आम्हा समस्त ग्रामस्तामध्ये बेबनाव जाहला. तेव्हा नारो कृष्ण टालसुरेकर यास आणून कुलकर्ण सागून ठेविले. पाच वर्षे त्याणे चालविले. मध्ये शामलाची धामधूम जाली म्हणोन नारो कृष्ण पळोन गेला. तेव्हा मोरो हरी, हरी कृष्ण पंडित याचा लेक, याचे वतन याचे हवाला केले. हा चालवीत असता आपण सा वर्षे त्या प्रांते सुवर्णदुर्गी होतो. तदोतर श्रीस्थली येऊन आजीपपरयंत वास करून असो. याकरिता आपण लिहिले की सत्यपूर्वक या वतनाचा वृतांत असेल तो लिहिणे म्हणऊन आपला पत्रलेख आला. तरी जे आपणास ठावके होते ते आपणास सत्यपूर्वक लिहिले आहे. म्हणून केशव जोतिषी याच्या पत्रार्थावरून व समस्त ग्रामस्ताचे गोहीसाक्षीवरून तुझे व माहादाजी कृष्ण

याचे पूर्वोतर मनास आणिता तुझा पणजा कृष्णाजी विश्वनाथ याणे कुलकर्णाचे वतन करून घेतल्यापूर्वी कोणी मिरासदार कुलकर्णी कसबे मजकूरास नव्हता. विज्यापूरकराचे कारकीर्दीस ग्रामस्तानी तुझा पणज्यास कुलकर्णवतन करून दिल्हे. उपभोग करीत असता थोरले कैलासवासी माहाराज राजश्री स्वामीचे राज्य जाहाले. तेव्हा हुजूरची सनदही घेतली. च्यार पिढ्या भोगवटा चालिला. मध्ये तुझा आजा हरी कृष्ण याचे छांदस वृत्तीवर ग्रामस्तानी घालमेल केली होती. तेही शेवटास न गेली. पुन्हा तुझा बाप मोरो हरी याचे स्वाधीन ग्रामस्तानी कुलकर्ण पूर्ववत वतन करून दिल्हे. त्याणे वतन चालविले. तो मृत्य पावल्यावरी तुझा चुलतचुलता बालाजी माहादेव याणे चालविले. व धामधुमीच्या प्रसगात सनदपत्रे होती ती गेली म्हणून विदित केले होते तेही वेदमूर्ती केशव जोतिषी याचे पत्रावरून खरे जाले. व माहादाजी कृष्ण याणी प्राचीन वतनदार कसबेमजकुरास नाही म्हणून हुजूर गैरवाका विदित करून राजपत्रे घेतली ते समई तुझा कोणी हजीर नव्हता येवप्रकारे तू वतनदार खरा यास्तव माहादाजी कृष्ण टालसुरेकर यास राजपत्रावरून जी पत्रे या कुलकर्णसंमधे करून दिल्ही आहेत ती व ग्रामस्ताकडून महजर करून देविला आहे तो रद करून तुजला हे वृत्ती ग्रामस्ताचे साक्षीवरून व वेदमूर्ती केशव जोतिषी याचे पत्रावरून व भोगवट्यावरून करून दिल्हे असे. तरी तुवा कसबे मुरुड त॥ पंचनदी सुभा मामले दाभोल येथील कुलकर्णाची सेवा पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने करून वतन आनभवीत जाणे हकलाजिमा पेशजीप्रमाणे करार केला असे घेत जाणे.

र॥ छ १२ सफर

मोर्तब

## लेखांक ४

### प्रश्नमाला

( या कागदांत मुरुड व आजूबाजूचे गांव याची माहिती मिळविण्याच्या इराद्यानें अनेक प्रश्न विचारलेले आहेत. प्रश्न कोणी कोणाला केले आहेत त्याचा बोध होत नाहीं. पोथीकरिता वापरतात त्या तऱ्हेच्या ११-११॥ इंच लांबीच्या कागदावर हे प्रश्न लिहिलेले आहेत. यात आलेला जोशांच्या वृत्तीच्या वादाचा उल्लेख सन १६९९ मधला आहे. केशव जोशी हे १७१६-१७ पर्यंत हयात होते. या सर्व

गोष्टींवरून या कागदाचा लेखनकाल इ. स. १७२० चा असावा. पाश्चात्यामधली जिज्ञासाबुद्धि आपणात नाहीं हें निश्चित. तरीसुद्धां त्या गुणाचा सर्वस्वी अभाव नव्हता एवढें या कागदावरून दिसेल. कागद बाळबोधींत आहे ).

श्रीगणेशायनम. । श्री दुर्गायै नमः ।। सडी लिहोन देणार त्याजपासून लिहोन घ्यावे तुम्ही ( मूळ कागदात तुह्मी ) वतनदार की गहीरवतनदार, तुमचे वतन प्राचिन कीं नवे, तुमचे पाठीमागें ठिकाण कोण ? तुमचा कसबे मजकुरी पुरुष कोण आला ? त्यास वर्षें किती जाहाली ? तुम्हास येथें वतन काय आहे ? तुम्ही वतन सरकारातून घेतले कीं जाणे रचना केली त्याणे दिले की कोणी दिले. कलम १

सिद्धपुरुष याणी वसाहात केली याशि मुदत किती जाहाली ? सिद्धपुरुष कोठून आले ? ते राहिले कोठे व ते कोण व त्याची ज्ञात ( जात ) कोण व ते भाऊ किती व ते राहात होते कोठकोठे ? त्यांजला राजे याणी इनाम तांम्रपटे करून द्यावयास कारण काय व सिद्धपुरुष याणी श्रीची स्थापना करून इनामत पैकी शेत आगर वेगळे करून श्रीस द्यावयास कारण काय ? गाववसाहात केला तेव्हा वतने कोणकोणास कसकशी दिली ? त्यातून गावी कोण आहेत व परागदा कोण आहेत व कोणाचे कोणी नाही व नवे जाहाले कोण व गावची चतुःशीमा कोणकोणती ? सदरहू सिद्धपुरुषानें रचना केली ते प्राचिन वर्त्तमान लिहून द्यावे, ताम्रपटे आणून पाहावे. कलम १

प्राचिन सारदुळे व आंबवली हे गाव येक कीं दोन ? येक म्हटलेयास दोन कधीपासून लागो लागले ? दोन व्हावयास कारण काय ? आंबवली व सारदुळे या गावचे प्राचिन वतनदार कोण खोत पाटिल अथवा वतनदार कुळवाडी अवा इतर जातीमधील अशिलियास पुसावें. दोहो गांवची चतुःशीमा कोणकोणती व देव देवस्थान होळी पोळी ऐसे साद्यंत लिहून द्यावें. कलम १

सारदुळे व कसबेमजकूर हा गाव प्राचिन येक कीं दोन ? दोन म्हटलेयास याची चतु.शीमा कोणकोणती व श्री शीमादेवीची कसबेमजकूर यात्रा करितात यास कारण काय व श्रीची स्थापना कोणाचे हातिची व तिचे शिमादेव हे नाव ठेवावयास कारण काय व तिचे देवळ कोठे आहे व तिचा अधिकारी कोण कोठे असतो व तिची होळी होत्ये कोठे व होळीवर येतात कोणकोण व होळीचा अधिकारी कोण व देवळामध्ये लावणी कोठकोठची होत्ये व शेताभाताची राखण कोणकोण देतात; येक म्हणतलेयास दोन व्हावयास कारण काय हे साद्यंत लिहून घ्यावे. कलम १

सारदुळे व आंब्रवली येथें शेतंभातें कोणकोण गांवकरी करितात व तेथें शेतभात व अणखी जमीन वतनी कोठकोठचे गावकरी यांची आहेत व हाली आब्रवली व सारदुळे येथील खोती करितात ते खोत कोठून आले व पूर्वी होते कोठें व त्याजला खोती कोठून प्राप्त जाहाली. कलम येक १

कसबे मजकुरी होळया आहेत त्यातून ब्राह्मणाची होळी कोणती व तिचा अधिकारी कोण व ती पूजाअर्चा कोणाकडे प्राचिन होती व हाली कोणाकडे आहे व तेथें मानपान कोणाचा कसकसा व ती होळी होत्ये कोठें व बाहेरवडीची (वाडीची) होळीचा अधिकारी कोण ? पूजाअर्चा कोणाकडेस व तेथें मानपान कोणाचे कसकसे व होळीवर येतात कोणकोण ? होळी पूर्वी होती कोठे ? हाली आहे कोठे ? गांवामध्ये प्राचिन होळया किती व त्याचे अधिकारी कोणकोण व तेथे मानपान कोणकोण कोणकोणत्ये होळीवर कसकसे घेत व कोणकोण जागा होळया होत ते साद्यांत लिहावे. कलम येक १

होळीची साहाण भरितात ती प्राचिन कोठे भरत्ये व हाली कोठकोठे भरत्ये तेथें मानपान कोणकोण कसकसा घेत. कलम १

धुरवाज खेळतात ते कोण कोठचे होळीवरून येतात आणि धुरवाज निघत्ये कोठून आणि समाप्त होत्ये कोठे ? तेथे कोणाचा मानपान धुर्वाडीस आहे की काय ? धुर्वाड येक की दोन. कलम येक १

प्राचीन आसूद व कसबेमजकूर हा गाव येक की दोन. कलम येक

श्री शीमादेवीची यात्रा होत्ये तेथें मानपान कोणकोण कसकसा घेत व तेथें अधिकारी कोण व तेथे देवाचे जेवणी नैवेद्य येतात ते वाटयाप्रमाणे मानकरी यास वाटून देतात ते मानकरी कोणकोण व द्यावयाचा अधिकारी कोण याजप्रमाणें प्राचीन व हाली वर्तमान काय ते लिहावे. कलम १

श्री व्याघ्रेश्वर खिस्त म्हणोन शेत वेगळे लागते हे जमीन कोणेगावची व श्रीस पहिलें हें इनाम होतें कीं काय अथवा या शेताचे नाव हें कीं काय याची चवकशी करावी कलम १

आब्रवलिमध्ये जुना चवथरा देवालयाचा होता व तळे आहे. हाली तेथे केतकर याणी देवालय बाधिलें हे पूर्वी कोणी देवालय बाधिले होतें व पाटाचें पाणी आहे हें केतकर गद्रे हे तेथे राहिले तेव्हा पाटपाणी आणिले कीं त्याचे पूर्वी पाटपाणी होते ? कलम १

कसबे मजकूरचे कुलवाडी व इतर जात याची प्राचिन रावयाची जागा कोणती ? कलम १

श्री बइरंव देव याचा गुरव बारीक याची प्राचीन राह्यावयाची जागा कोणती ? कलम १

कसबे मजकूर हा गांव वसाहात केला ते समई दक्षणेकडून व( सा ) हात केली तेंव्हा पश्चिमेकडे वसाहात केली कीं पूर्वपश्चिम दोन ओळी वसाहात केली ? त्यातून वतनदार मानपान घेता त्यातून पश्चिमेचे ओळीस कोणकोण आहेत व पूर्वेस कोण आहेत कीं काय हे लिहावे. कलम १

मौजे आसूद व कसबे मुरूड व सारदुळे व आबवली याची चतुःशीमा कोणत्या त्याची यथास्थित चोहोगावचे लोक मिळवून व त्याचे लगते गाव आहे ते कसकसे आहेत, त्याची शीमा कसकसी आहे त्याची यथास्थित चवकशी करावी, कलम १

केशव जोशी हे अचळोजी मोहिता ( शिवाजीचा १६७४ मध्यें सुवर्णदुर्गचा किल्लेदार ) याजवळ सावकारी करीत होते. ते समई गाव कसबे पैकीं व इतर गाव पैकीं आगर व शेतें गाहाण घेतलीं. त्यापैकीं आपणाकडे किती ठेविली व आपले भाऊबंद यांजकडे किती दिली व आणखी लोकाकडे किती आहेत ते आगर व शेतें कोणकोणतीं व जोशी याजकडे याजखेरीज आगर व शेतें आहेत कीं नाहीं. अशिलियास त्यांतून प्राचीन आगर शेत कोणकोणते व अणखी मिळविली अशिली तर ती कसकशी मिळाली याची चवकशी करावी. कलम १

वरवडेकर शांडिल्य गोत्री जोशी याजला पाटागर व राहाटागर येथें प्रांतामध्ये ज्योतिष्यपणाची वृत्त कोठेकोठे आहे व प्राचिन अमके गावी होती त्यांतून कोण-कोण गावची दुसरे चालवितात व याजकडे गांव किती आहेत याची चवकशी करावी. कलम १

कळझट वा घवे येथील जोशी वृत्त चालवीत होते तेंव्हा भाऊबंद आंतचे आत भाडले याज कारण काय आणि सरकारात गेले. सरकारातून सडीदार नेले. याजवर तेथे आपणाआपणामध्ये समजतो ऐसे म्हणावयास कारण काय आणि घरी येऊन समजले त्यास पैल्हा विभाग कसा होता आ समजेले यावर विभाग कसा जाहाला आणि येकयेकास पत्रे लिहोन दिली आहेत तीही आणवावी आणि चौकशी करावी. कलम येक १

आसूदास वृत्ती चालवितात हे कसबे मचकूर व कर्दे येथील अनखी गावची वृत्त चालवीत होते काय ? त्याजपासून कान्हेरे केशव जोशी याही वृत्ती घेतली. पूर्वी आसूदकर याजला वृत्त चालवावयाशि दिली होती कोणी पूर्वी जोशी शांडिल गोत्री होते की केशव जोशी याचे वडील होते याही त्याजला गावकरी याजला मिळऊन पत्र करून आणि आपले गाहाणवटीपैकी गयाळ दिल्हे आणि गयाळाची मालुमात आत घालून पत्र दिले त्यामध्ये करजगावकर ऐसे नाव लिहावयासी कारण काय व पत्र आहे ते आणून पाहावे. आसूदकर हे प्राचीन आसूदचे जोशी की याजला शांडिल्य गोत्री जोशी याजपासून प्राप्त जाहाले अथवा अनखी पदार्थेकरून प्राप्त जाहाले याची चौवकशी करावी. कलम १

प्राचीन अडखल व हरणई हे गाव येक की दोन ? अडखल येथील वृत्ती आजरलेकर जोशी याजकडे आहे; आणि हरणईमध्ये तृतीयांश हाली मुरूडास वृत्ती चालवितात. याजपासून आजरलेकर याही वृत्ती घेतली अथवा केशव जोशी हे अचलोजी मोहिता याजपासव कारगीरी ( ) त होते त्येसमई घर बाधोन किले-यात राहिले तेधवा मिळविली ? ती कशी मिळाली याचे वर्तमान आजरलेकर जोशी याजपाशी आणि अनखीही लोकाजवळ विचारावयाजला ( पाजला ? ) याजला प्राप्त व्हावयासी कारण काय हे साद्यंत मनास आणावे. कलम १

मौजे आसूदकर गावकरी याशी आणि अनखीही लोक गावचे याजला पुसावे मौजे मचकूर हा ब्राह्मण गाव कीं शूद्र गाव ? येथील प्राचीन जोशी उपाध्ये व धर्माधिकारी कोण ? हाली चालवितात हे प्राचीन की आलीकडे याजला वृत्ती प्राप्त जाहाली ? जोशी मचकूर याजलाही विचारावे तुम्हास वृत्ती प्राप्त कोणापासून झाली ? आणि मौजे मचकुरी पाटपाणी कोणी आणिले ? वैशपायन याजला मौजे मचकुरी आगर व शेत वृत्तीमध्ये काही आहे की नाही ? आहे ऐशी दंतकथा वा आयकिले अथवा काही बोलाचाली असेल ते साद्यंत चवकशी करावी. कलम १

मौजे कर्दे हा शूद्र गाव जोशी म्हणतात त्यास ब्राह्मण गांव आणि शूद्र गाव प्रांतांत बहुत आहेत. त्यामध्ये ब्राह्मण गावची लक्षणे काय आणि शूद्र गावची लक्षणे काय ही मनास आणावी मौजे मजकुरी पाटागर दहापंधरा आहेत व राहाटागर दाहापंधरा आहेत. परंतु मलवारी याची धामधूम होऊन कै मुदत्त प्रात उद्वस्त होता. पुढी त्यातून कोणी आले व कोणी न आले. ठिकाणातून काहीं झाडझाडोरा राहिला व काही मोडला, आणि दाभोळ बसाहात होती ते समई यवनानी आगर

मोडीस आले ते काही गाव गांवी पुनः त्यातून आगर वसाहात केले आहेत, याची चौकशी करावी व काही आगर समुद्र वाढोन खाडीपलीकडेला हाली त्यामुळें काही आगर गेले काही पहिले होते तेही मधी मोडले. काही त्याजवर मधी आले होते ते भालेराहीमध्ये फिरोन परागदा जाहाले. हाली ब्राह्मण गावी आहेत त्याजला विचारावे तुम्हा आगर ठिकाणे कैशी प्राप्त जाहाली. मागे येथे कोणी ब्राह्मण होते कीं काय ? व तेथें शूद्र व यवन आहेत त्याजबही चौकशी करावी. अनखी ब्राह्मणाची ठिकाणें व शूद्राची ठिकाणें व यवनाची ठिकाणें प्राचीन कोठकोठे आहेत त्याची चौकशी करावी व अनखी बंदरकिनारियाशि गांव आहेत ते पाहावे व हा गाव पाहावा व गावचे देवस्था ( न ) प्राचीन कोठे होते वा तेथे मानपान कोणाचा कसकसा होता प्राचीन वतनदार कोण कसे होते मधी वैवाट कसकशी होती व हाली कसकशी आहे. जोशी आसूदकर मागें मुरुडास मागे वृत्ती चालवीत होते. ते समई कर्दे याशि वृत्त कोण चालवीत होते आसूदकर जोशी याही कधी काही दिवस कर्दे याची वृत्त चालविली की नाही आणि प्राचीन जे मचकुरी जोशी वतनदार कोण हाली चालवितात कोण उपाध्या धर्माधिकारी प्राचीन कोण हाली चालवितात हे कोण रीतीने चालवितात याचे साद्यंत जे असेल त्याची चौकशी करावी आणि लिहोन द्यावे. कलम १

## लेखांक ५

( राजवाडे खंड २० लेखांक २८५ ) १६४४ भाद्रपद शु. १३

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ४९ शुभकृत नाम संवत्सरे भाद्रपद शुध त्रयोदशी मंदवार क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शंभु छत्रपति स्वामी याणी समस्तकार्यधुरधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री कान्होजी आंगरे सरखेल यासि आज्ञा केली ऐसी जे राजश्री नारो कृष्ण उपनाम जोशी शांडिल्य गोत्र हे स्वामीच्या राज्यांतील पुरातन सेवक या राज्यात निस्टेनें सेवा केली त्याउपर सेवा सोडून आपला काल सार्थक व्हावा याकरिता स्नानसंध्या करून ईश्वरभजनीं लागले याची योगक्षेमाची अनुकूलता करून दिधल्यानें स्वामीस व स्वामीच्या राज्यास श्रेयस्कर याकरिता विशाल-

गडचे मुक्कामी कैलासवासी थोरले स्वामी कसबा मुरुड ता। पंचनदी प्रा। दाभोल पैकीं स्कारी दाभोली लारी ४०० च्यारसें पुत्रपौत्रीं वृत्ती राजश्री सिवाजी राजे दाजी याणी दिल्ही प्रस्तुत नारो कृष्ण याणीं कैलासवास केला. त्याचे पोटीं संतान नाहीं याकरिता त्याचे भाव महादाजी कृष्ण व गोविंद कृष्ण व पुतणे राजश्री बालाजी माहादेव व रामचंद्र माहादेव व कृष्णाजी माहादेव याणीं विनंति केली व पत्रें आणून दाखविलीं. सदरहू च्यारसें लारीची वृत्ती आपणास उत्तरोत्तर चाले ऐसी आज्ञा करावी त्यावरून सदरहू वृत्ती यासि पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें करार करून हे आज्ञापत्र तुम्हास सादर केलें आहे. तरी तुम्ही हे वृत्त नेमून देऊनु वंसपरंपरनें चालवणें साल दर साल ताजा सनदेचा उजूर न करणें या सनदेची प्रती लेहून घेऊनु मुख्यपत्र महादाजी कृष्ण, गोविंद कृष्ण व बालाजी माहादेव व रामचंद्र माहादेव व कृष्णाजी माहादेव व श्रीधर गोविंद याजवळ भोगवटियास परतोन देणें बहुत लिहिणें तरी तुम्ही सूज्ञ असा.

| मर्यादेयं |
|---|
| विराजते |

लेखांक ६

( राजवाडे खंड २० ले. १९७ पृ २९६

श्री १६४४ भाद्रपद शु. १३

स्वस्ति श्री राज्याभिषेकशके ४९ शुभकृत नाम संवत्सरे भाद्रपद शुद्ध त्रयोदशी सौम्यवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभू छत्रपती स्वामी याणी देशमुख व देशपांडे ता। पाल यासि आज्ञा केली ऐसी जे

| श्री शंभू छत्रपति हर्षनिदान रघुनाथ-सुत तिमाजी पंडित मुख्य प्रधान | श्री आई आदिपुरुष श्री राजा शभु छत्रपती स्वामी कृपानिधि तस्य कृष्णाजी परशराम प्रतिनिधि |
|---|---|

राजश्री महादाजी कृष्ण व गोविंद कृष्ण उपनाम जोशी गोत्र शांडिल्य सूत्र आश्वलायन हे स्वामीचे पुरातन सेवक तीर्थरूप राजश्री थोरले कैलासवासी स्वामीपासून बहुत निष्ठेने सेवा केली व तीर्थस्वरूप राजश्री संभाजी राजे काका याची सेवा केली व त्याउपरी तीर्थरूप राजश्री कैलासवासी स्वामी चंजीस असतां तांम्राचें संकट प्राप्त जाहालें तें समयीं महादाजी कृष्ण हे संताजी घोरपडे व जाधवरायासमवेत फौजा घेऊनु गेले. ते समयीं विशेषाकारें सेवा केली. याकरिता यांवरी राजश्री कैलासवासी स्वामी कृपाळु होऊन चंजीचे मुकामीं यासी मौजे खवली ता॥ पाली प्रा॥ मजकूर हा गाव कुलबाब कुलकानू खेरीज हकदार व इनामदार करून जलतरुपाशाणनिधिनिक्षेपसहित हालीपटी व पेस्तरपटी देखील इनाम अजरामऱ्हामत देऊनु सनदा दिल्हा. त्यावरि मा॥रनिलेनीं व त्याचे पुत्र राजश्री बाळाजी महादेव यानीं राजश्री शिवाजी राजे दाजी याची सेवा केली. त्यावरून त्याणींहि मौजे मजकूर यांसि इनाम चालवावयाची आज्ञा करून पत्रे दिल्ही. त्याप्रमाणें गाव यांस इनाम चालतच आहे ऐशास, महादाजी कृष्ण व गोविंद कृष्ण व बाळाजी महादेव व रामचंद्र महादेव व कृष्णाजी महादेव हे स्वामीचे एकनिष्ठ सेवक यामधें बाळाजी महादेव याणीं वडिलवडिलापासून स्वामीची सेवा एकनिष्ठेनें केली व हालीं करीत आहेत. याचे चालवणें स्वामीस अगत्य, याकरिता तीर्थरूप राजश्री कैलासवासी स्वामीनीं मौजे खवली हा गाव चंदीचे मुकामी महादाजी कृष्ण यास इनाम वंशपरपरेनें दिल्हाप्रमाणें स्वामीनींहि चालवावयाची आज्ञा केली असे. तरि, यास मौजे मा॥र पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें इनाम चालवणें या पत्राची प्रती लेहून घेऊनु अस्सल पत्र भोगवटियांस याजवल परतोन देणें निदेशसमक्ष.

मर्यादेयं विराजते

रुजु सुरु सुद बार

## लेखांक ७

( राजवाडे खंड २०, ले. २८६ ) १६५१ फाल्गुन शु. ४

श्री

राजश्री देशाई व देशपांडे वर्तमान व भावी सुभा प्रांत दाभोल गोसावियासि

अखंडितलक्ष्मी आलंकृत राजमान्य

श्रो॥ सेखोजी आंगरे सरखेल रामराम सु ॥ सलासीन मया व अलफ राजश्री नारो कृष्ण उपनाम जोशी शांडिल्य गोत्र हे स्वामीच्या राज्यातील पुरातन सेवक सेवा एकनिष्ठेनें केली त्याउपरी सेवा सोडून आपला काल सार्थक व्हावा याजकरिता स्नानसंध्या करून ईश्वरभजनीं लागले यांची योगक्षेमाची अनुकूलता करून दिध-ल्यानें स्वामीच्या राज्यास श्रेयस्कर याकरिता विशालगडचे मुक्कामीं कैलासवासी छत्रपती स्वामी याणी कसबा मुरूड ता॥ पचनदी पा॥ मजकूरपैकीं लारी दाभोली लारी ४०० च्यारसें लारी पुत्र पौत्री वृत्ती करून दिल्ही प्रस्तुत नारो कृष्ण याणी वैकुंठवास केला त्याचे पोटीं संतत नाही याकरिता त्याचे भाऊ राजश्री महादाजी कृष्ण व गोविंद कृष्ण व पुतणे राजश्री बालाजी माहादेव व कृष्णाजी महादेव व नातू नारो रामचंद्र याणीं हुजूर जाऊन विनंति केली श्रीमंत राजश्री छत्रपती स्वामींचीं राजपत्रें आणिलीं व हाली राजश्री बालाजी माहादेव कुलाबाचे मुक्कामी रदबदल केली त्यावरून कसबे मा॥री वृत्तीपत्र लारी च्यारसें करून द्यावा त्यास कसबे मजकुरीं बहुतेक वतनदाराचीं सेतें सदरहू लारींची बेरीज न भरे याजकरितां बेरिजेची भरती करून दिल्ही असे.

| | |
|---|---|
| कसबे मुरुड येथील खुदवाडी नि॥ माहादेव केसमाजी थथे याजबा॥ निमे आगर मा॥रनिलेकडे आहे तो आगर याजकडील असे त्या आकारापैकी लारी १२५ | मौजे कुंभवे ता॥ जालगाव येथील खराब जमीनपैकी नेमून देणे लारी दाभोली लारी २७५ |

एकूण च्यारसे लारींची वृत्ती करून दिली असे यासि पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने करार करून हें पत्र तुम्हास सादर केले असें सदरहुप्रो वृत्ती चालवणें साल दरसाल ताजा सनदेचा उजूर न करणे या सनदेची प्रती लेहून घेऊन मुख्यपत्र बालाजी महादेव व नारो रामचद्र व कृष्णाजी महादेव व श्रीधर गोविंद यास भोगवटियास परतोन देणें जाणिजे र॥ छ ३ माहे साबान

– श्री०
श्रीशाहु नृपति प्रीत्या तुकोजी तनु जन्मन. । सेखोजी सरखेलस्य मुद्रा जयति सदा

मोर्तब खुद

लेखांक ८

| |
|---|
| श्री राजाशाहू नरपति हर्षनिधान<br>बाजीराव बल्लाळ मुख्य प्रधान |

शके १६५४ भाद्र. व॥ ७
इ. स. १७३२ आगस्ट ३१

श्री

दं मा॥ सेनाधर व कारकून किले सिद्‌गड यासि बाजीराऊ बलाल प्रधान सुरु सन सलास सलासैन मया व अलफ कल्याण भिवडी प्रांतीचा मामला राजश्री कृष्णराऊ माहादेऊ याजकडून दूर करून चिरंजीव राजश्री बालाजी बाजीराऊ यास सालमजकुरी सांगितला आहे मा॥रनिलेचे तर्फेनें र॥ रखमाजी रेपाले व कृष्णाजी हरि पाठविले आहेत यास किल्यावर घेऊन तुम्ही र॥ बरवाजी ताकपीर दि॥ राजश्री बालाजी बाजीराऊ याजकडे कल्याणास जाऊन ते आज्ञा करतील त्याप्रो वर्तणूक करणे जाणिजे छ २० रबिलौवल [ निराळें अक्षर ] आज्ञा प्रमाण ( लेखन सीमा )

लेखांक ९

## सीका असे

अभयपत्र समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री तुळाजी आंग्रे सरखेल ता॥ बे॥ शंकरभट वैशंपायन मुरूडकर सु॥ समान आर्बैन मया व अलफ ( इ. स. १७४८ ) तुम्ही परागंदा होऊन वरघाटी गेलेत. हाली आपले गांवी येणार म्हणोन विदित जाले. त्यावरून आज्ञा केली असे सुखरूप आपले कुटुंबासह वर्तमान येऊन गांवीं राहाणें. कोणेविसीं शंका न धरणें. अभय असे जाणीजे छ ४ शाबान

मोर्तब असे.

लेखांक १०

तालिका

श्री

( हा कागद इ. स. १७६४ मध्यें सदाशिवभट वैशंपायन यानें लिहिलेला आहे. यांत आलेला शिवाजीमहाराजांसंबंधींचा उल्लेख नवीन वाटतो. )

तकरीर जबानी सदाशिवभट वैशंपायन उपाध्ये ( व ) धर्माधिकारी कसबे मुरुड ता॥ पंच्यनदी ( सु॥ ) आर्बा सबैन मयां व अलफ जजिरे सुवर्णदुर्गचे मुकामी तकरीर लिहून दिल्ही ऐसीजे कसबे मजकुरी पूर्वी प्राचीन वतनदार जोसी शांडिल्य गोत्री वृत चालवीत असता केशवभट कान्हेरे याचे वडील बाप विदेशाहून येऊन गावी राहिले. यावर शांडिल्य गोत्री जोसी याणें कळबट व धवें दोही गावची वृत चालवावयासी आपला वंत ठेऊन सागितली. ते चालवीत असता कसबे मुरूड येथील वृत गोपाळ जोसी गार्ग्य गोत्री चालवीत होते. त्यास चळ ( ? ) प्रात होता परंतु साक्षर ब्राह्मण शिष्ट होता. त्या समई शिवाजी माहाराज गडकोटकिले बाधीत मुळीक ( मुलुख ? ) कबजात करीत या प्रांती येऊन सुवर्णदुर्ग बाधावयाचा प्रारंभ करावयासी या देशीं आले. त्या समईं प्रातात कोणी ऐवजदार असेल त्याचा सत्कार करून त्यापासून द्रव्य ध्यावें. त्यासमईं केशवभट कान्हेरे द्रव्यवान व्यवसाय करीत होते. त्यास सिवाजीने आल्यावर त्यांचा बहुमान करून सुवर्णदुर्गास नेले. किल्याचे इमारतीचे कामकाज अमलदार कारखाने याचे होते त्यास सागोन बंदोबस्त करून जातेसमईं याजबळून द्रव्य कर्ज काहीं घेतलें. माहाराज पुढें स्वारीस गेले. इमार( त ) होत आली. कान्हेरे जंजिरेयात जाऊन येऊन सावकारी करीत होते. मुलकात सावकारीची फैलावणी सरकारचे आश्रयाने बहुत आरंभिली. सरकारी पैका कर्ज देऊन मुलकात ऐवज तोडून घ्यावा, प्रजेस बहुत पीडा करावी पैका निर्माण न होय तेव्हा त्याचा आगर शेत भुई गाहाणपत्र जबरदस्तीने देऊन घ्यावें. पुढें पैका आलियाने पत्र न घ्यावे. याचा दाखला हाली गांविक शेतें ( आ ) पली म्हणतात काही पेशजी सोडलीं. सेत आगर तिराईताचें असोन मध्येंच तराईताचें नावें पत्र घ्यावी. याप्रमाणें चाल चालविली आहे. दुसरा मजकूर गोपाल जोसी गार्ग्य गोत्री गांवची ज्योतिषपणाची वृत चालवीत होते त्यास दूर करून आपण वृत चालवावी या विचारें कान्हेरे

जोसी आपण कलबट व घवे या चालवीत तेव्हांपासून कर्मनाम जोसी असे पडलें. तेव्हा जंजिरे यांतील वृत जबरदस्तीने काहीं चालवूं लागले. कळवट व वाघवे याची वृत याचेच घराणे याचे निमेनिमे प्रमाणें दोन कुळाचे विभागी चालवीत होते त्या समईं गाविक आगर जोसी याजकडे गाहाण पडला होता. तोच आगर गार्ग्य गोत्री गोपाळ जोसी यासी देऊन लग्नास दोन-आणे, मुंजीस दुवल याप्रमाणें पत्रात लिहून दिल्हें. ते पत्र हालीं आहे. त्यात अन्वये पाहावा. लग्नास व मुजीस पैका घ्यावा तो यजमानाने घ्यावा किंवा जोसी याणी घ्यावा हे पत्रावरून कळेल आंजरलेकराजवळ कलह करून हर्णईची वृत जबरदस्तीनें सरकार आश्रयानें नूतन मेलविली. यावर घरकलह आरंभिला. कळबट वाघवे निमेनिमेप्रमाणें चालवीत होते ते न्यायामुळें ( )रे जाहालें तेव्हा घरीं नेऊन आगर दरोबस्त त्याचे हवालीं करून मुरूड वगैरे गाव मिळोन येकदर षष्ठांश देऊन समजीचे पत्र केले ते हाली बाजीनस जोसी याजवल आहे तें मनास आणावें. कर्जगावकर जोसी याचे नावें पत्र केल्यावर गोपाळ जोसीच वृत चालवीत होते. पुढें अशक्त जाहाले सामर्थ्य नाहीं त्या समईं ग्रामस्त फोडून वृत गावात चालवूं लागले. करजगावकराचे व ( ) याचे भाऊबदाचे समजीचे दोन्ही पत्रें पाहिलियानें पुरातन वतनदार जोसी कोण हे मूळचे कान्हेरे, कर्मनाम हाली जोसी म्हणतात. याप्रमाणें हकीकत असे.

---

## लेखांक ११

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री मोरो बापुजी यासि सेवक माधवराव नारायण प्रधान नम(स्कार) सुहूरसन सीत सबैन मया व अलफे (इ. स. १७७६) वे ॥ त्रिंबक दीक्षित वैशंपायन उपाध्ये व धर्माधिकारी कसबे मुरूड ता॥ पंचनदी ताल्लुके सुवर्णदुर्ग याणी सरसुभा विदित केला कलमे.

ग्रं. स्थळप्रत.
ऐतिहासिक साधनें 23 e 22 वि. ...
क्रमांक 77 नों. दि. 22/12/1954

कसबे मजकुरी गावचे शेवटास पूर्वी सिद्धपुरुष याणीं कसबें मुरुड दक्षिणेकडेस पऱ्या समुद्रास मिळाला आहे त्या पोहिटीनें (खाडीचा फाटा) खारे पाणी येऊन थोडेसे खाजण खारवट जमीन आहे. तेथे गावकरी चोडे कुजवून काथा करीत असतात. सरखेलचे (आंग्रे) कारकीर्दीस गणोबा नाईक दातार हे आगरात जमीन सापडवून दक्षणेकडेस बाध घालून खारवट मोडीत होते त्या समईं ग्रामस्त सरकारात जाऊन खारवटाचें वृत निवेदन केले, कीं खारवट प्राचीन चोडे कुजवावयाची जागा आहे. हें बाधिलेयानें काथा होणार नाहीं त्याजवरून चौकसी होऊन खाजण बाहेर टाकून आगरास बांध बांधिला. हाली नारो हरी बाळ खाजण मोडून जागा आपल्याकडेस साधून घेणार त्यास आपण तेथें असता मनाईं केली. त्याजवरून मशारनिल्हेनी पुरंधरचे मुकामीं मालुमात गैर वाका समजावून सरकारचें पत्र नेलें आहे. जबरदस्तीनें बाध बाधून खाजण मोडणार येविसी ताकीद जाहाली पाहिजे म्हणोन त्याजवरून लिहिलें असे तरी पुरातन खाजण गावकरी याचे चोडें कुजवावयाचें असल्यास मोडूं न देणें. ग्रामस्तानीं मशारनिल्हेस खाजण बाधावयासी दिल्हे असल्यास बाधूं देणें. कलम १

हा (गाव) वसाहात करून इनामत करून घेतला त्यापासून सारदुले येथील डोंगर चांदा गुरचारास होता. त्यास पुढें मलबारीयाची धामधूम जाली. बंदर किनारा ओसाड पडला. त्याजवर काही दिवसानीं फिरोन वसाहात जाहाली. पुढे तुर्काण जाहालें. ते समईं इनामत दूर जाहाली. मधें मायसाहेबीण (विजापुरच्या शहाची आई. हिनें इ. स. १६६१-६२ मध्यें मक्केची यात्रा केली) विजापुराहून दाभोळेस आली तेव्हा कसबे मजकुराहून सारदुले वेगळे करून तिजला सानक दिल्हे (सानक म्हणजे निर्वाहासाठीं दिलेली इनाम जमीन ही परत घ्यायची नसते). तेव्हापासून सारदुले याची उगवणी (वसूल) सरकारात वेगळी होती आगारकाचें कारकीर्दीस (आंग्रे याचे) आडाचे सेत व खार सरकारातून कीर्द करीत (सरकारतर्फें जमिनीची लागवड होई) सबब त्याचे राबासाठीं थोडेसे कुरण सदहू डोंगरावर राखीत होते. पुढें सेत रयतीकडेस लागल्यापासून कुरण राखीत नाहीं. गुरचाऱ्याकडे राहिले. आलिकडे स्वराज्यामध्यें नारो हरी याणी सुभा समजावून कुरण राखूं लागले. आम्ही सुभा वर्तमान समजावून मना केलें. त्याजवरून ते हुजूर येऊन कुरण राखा-

वयाविसी सनद नेली. त्यास प्राचीन
गुरचारा आहे; त्याप्रमाणें असो द्यावया-
विसी ताकीद जाहाली पाहिजे म्हणोन
( त्रिंबक दीक्षिताची विनंति ) त्याज-
वरून लिहिले असे तरी प्राचीन गुर-
चाऱ्याचा डोंगर असल्यास नारो हरी
यास कुरण राखूं न देणें.

कलम १

येकूण दोन कलमें सदरहू लिहिल्याप्रमाणें करणें

लेखांक १२

## लावणी मुरूडची

मुरूड कसबा सवाई जोशा ( घोशा ) ऐक सांगतों तुम्हाला.
बहिरी बावाची दया ( दऱ्या ) दुस्मन कस पलती है कविराया ।।
सिद्ध पुरुषाची अगाध महिमा चौगांवाची आहे सीमा ।।
मसणामधीं तेहि बैसले कसि केली राव स्थापना ।।
अशी रचणुका पहा मुरुडाची ध्वजा बसवल्या चौकोना जी ।
आज मशिद आहे भवानी संभादेवीचे ठिकाण जी ।।
नारायण गणपतिस स्मरल्या पावशी श्री भगवान जी ।
महारुद्र मादेवसवाय शिरस्नात करि दैना जी ।।
क्षेत्रुपाळ ती बनकी आल्या विघ्नाची करि दैना जी ।।
दुष्टावर हात टाकिला पळत सुटले दुस्मनजी ।।
दऱ्याकिनारीं सवाई वस्ती धाव पाव श्री रघुवीरा
बहिरीबावाची दया दुस्मन कस पलती है कविराया ।। धृ ।।
आई काळेसरि ती जोगेश्री खळनाथ जाले प्रसन्न जी ।

बादळ देव आहे कड्यावर तोहि भरला सागर जी ।
हितुन राखिले प्रजा मुरुड कसा नांदतो हौसेन जी ।
( कसा नांदतो हुसेन जी ? )
अंजनवेली होता हपशी त्याणी केला बेमान जी ।
येसू ठाणगा तो कोंकण्या किति आले राव चालोन जी ।
चौमुलकामधि आवई त्याची किति गांव नेले मारुन जी ।
आई दुर्गेची दया तार कारण टाकिले बुडवोन जी ।
हराहरीचें नाव घ्यावें बहिरी देव आहे दारुण जी ।
हे अवतारी ब्रह्मचारी ज्याची माया है त्याला
बहिरिबाबाची ॥ धृ ॥ २
नारो हरी धनि मुरुडाचे त्यानीं हो केली कीर्त जी ।
चौमुलुखामधी धोशा त्याचा त्याला सारथि भगवान जी ।
आपाजीपत बागुल, हे कारभारी गावाचे जी ।
भगवताची दया ( दय्या ) पूर्णावर ठेवी हात जी ।
सदाशिवपत दातार हे दुर्गेचे भगत जी ।
ती अंबिका दयाळवत तेहि राखुण सर्वांस जी ।
जोशी हाकेली डका काही होतिल लोकास जी ।
एकासारे एक सवाई वैऱ्याला पडली धास ( धास्त ) जी ।
दिक्षित वैशंपन पुराणिक शास्त्रामध्यें अधिक जी ।
वतनदारीचा पेशा आहे तो आयकेना कोणास जी ।
महाजन वर्तक असे कारभारी सारी बैठक देवळात जी ।
आलि मनसोबी करीत होते नाही जायाचे हर्षेस जी ।
आता झालि बडाळि ( बडाई ) कुणाला कोण नाहीं मानीत जी ।
नीत कज्जा आहे गांवांत किती बैसले पुण्यांत जी ।
पेशव्यांचे राज ( राज्य ) अंबर काय उणे दौलतीस जी ।
चंद्र सूर्य ते गगनीं ते प्रसन्न आहे तयाला ( जी ) ।
बहिरी बाबाची ॥ धृ ॥ ३

महादेवाचा पुत्र बहेरी माता हो पारवती जी ।
दिलवारूवर सवार झाले तेहि चालले युद्धास जी ।
आहे बहिरीची बहिण भवानी किति भिये घालीत्यास जी ।
नाही आयके कोणाचे शिराण शिराण शेदिल दैतास जी ।
आज खेळ आहे बहिरीचा निशाण त्रिशुळ डफ गाडे ( णें ) जी ।
रथावर जरिपटका पुढे झुलतो फरारा जी ।
एक्या तारवामधीं येऊन नको लावूं कौलेस्वर जी ।
अजून तरी उमज मनीं किती पाहूं राव दाहला जी ।
रामरंगिला भिकू सवाई भवानि प्रसन आहे त्याला जी ।
लक्ष्मण वाजवि चौघडा दुस्मन कापे थरारा जी ।
म्हणे बालकोजी तो अर्जुन त्यामधि ताना करि हल्ला जी ।
नागीशाचे ( नागेशाचे ) शीस हरिवले कलगीवर दिला टोला जी ॥ ४ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ......
क्रमांक ......
REFBK-0021689
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र.
ग्रंथ शाखा